१८५५

# निबंध-विकास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं

REFBK-0008536

- प्रकाशक -
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम ९०.२९
विभाग क. नि
क्रमांक १०१०
नों. दि. २०।११।५५
ग्रंथालय शाखा

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्राज्ञ परीक्षेसाठी नियुक्त

# निबंध--विकास

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

— प्रकाशक —

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६६३६ ६५३६
REFBK-0008536

मार्च १९५५ ]

[ किंमत दोन रुपये

प्रकाशक :
प्रा. बा. दा. गोखले,
चिटणीस, म. सा. परिषद,
टिळक रोड, पुणें २.

मुद्रक :
दि. दा. गांगल,
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव, पुणें २.

# निबंध-विकास

## प्रास्ताविक

एकोणिसाव्या शतकांत भारतभर पसरलेलें इंग्रजी साम्राज्य ही राजकीय दृष्ट्या महान् आपत्ति होय यांत शंका नाही. परंतु या राजकीय निमित्ताने, वाईटांतून ज्या कांही चांगल्या गोष्टी आपणांस लाभल्या त्यांत मुद्रणकलेची प्रगति, सामाजिक सुधारणांचा दृष्टिकोन, विज्ञानप्रणीत समाजरचना इत्यादि गोष्टींप्रमाणे, मराठी साहित्यांतील कांही प्रकारांच्या विकासाचा आपणांस उल्लेख करावा लागेल. मराठींतील पद्य वाङमयाची वाढ बाराव्या व तेराव्या शतकापासून होत गेलेली जशी आढळते तशी गद्याची विपुल व विविध वाढ झालेली आढळत नाही. पंचतंत्र, वेताळ-पंचविशी असलें कथावाङमय, ज्योतिष व वैद्यक शास्त्रांवरचे किरकोळ ग्रंथ, तुरळक चरित्रें, शिवकालानंतरचें बखरगद्य व पत्रव्यवहार या पलीकडे गद्याचें दालन सजविलें गेलेलें नव्हतें.

इंग्रजी अमदानींत मुद्रणकलेला प्रोत्साहन मिळालें व वृत्तपत्रांचा जन्म झाला. इंग्रजी शिक्षण देण्यासाठी शाळा, कॉलेजें व विद्यापीठें स्थापन झालीं व विपुल आणि विविध प्रकारचें इंग्रजी वाङमय अभ्यासिलें गेले. आणि त्यांतूनच कादंबरी, नाटक, चरित्र, प्रवासवर्णन, इतिहास, टीकाशास्त्र आणि निबंध इत्यादि अभिजात वाङमय-प्रकारांचें एक नवें पर्व महाराष्ट्रांत निर्माण झालें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही.

● ● ●

मराठी निबंधाचा जन्म झाला तो याच परिस्थितींत. मराठींतील निबंध शब्द जुना आहे, निबंधवजा लेखन संस्कृत साहित्यांतहि तुरळक आढळतें. परंतु आज या निबंध शब्दाच्या उच्चाराने जो एक सहेतुक लिहिलेला कलात्मक वाङमय-प्रकार आपल्या दृष्टीसमोर उभा राहतो, तो मात्र

केवळ गेल्या शेंसव्वाशें—वर्षांतीलच आहे. महाराष्ट्रांत धर्मप्रसारार्थ आलेल्या कांही ख्रिश्चन-धर्मीयांनी प्रारंभी कांही लेख लिहिले व तेच आद्य निबंध होत असा विचार कांही साहित्यिक मांडतात व त्या दृष्टीने मिस् फारार व रे. विल्सन यांना आद्य-निबंधकाराचें श्रेय देतात. मिस् फारार हिने लिहिलेले 'कुटुंबनीतिप्रवर्तक निबंध', 'मद्यपान विषयक निबंध' यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. परंतु वास्तविक बघता मराठींत प्रथम जें नियतकालिक सुरू झालें त्यांतील सहेतुक अग्रलेखांना व लेखांना आद्य निबंधाचा मान द्यावयास पाहिजे. १८३२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'दर्पण' या नियतकालिकांतून बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, स. का. छत्रे, इत्यादि लेखकांनी जे लेख लिहिले तेच खरे आरंभीचे निबंध होत; आणि या निबंध-विकासाला वृत्तपत्रें व नियतकालिकें यांनीच खरा हातभार लावलेला आहे. दर्पण, प्रभाकर, दंभहारक, ज्ञानप्रसारक, ज्ञानप्रकाश, ज्ञानोदय, विविधज्ञानविस्तार, इंदुप्रकाश इत्यादि नियतकालिकांनी मराठी गद्य व निबंधवाङ्मय यांचा प्रसार केला. जांभेकर, महाजन, स. का. छत्रे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, लोकहितवादी, ज्योतिबा फुले, हरी केशवजी, गोविंद नारायण यांनी या आरंभीच्या चाळीस-पन्नास वर्षांत निबंध-लेखन केलें. या निबंधकारांची भूमिका उपदेशकाची व ज्ञानप्रसारकाची होती. त्यांना लोककल्याणाची तळमळ होती व लोकांतील अज्ञान दूर करण्याची इच्छा होती. बेकनचे लहान लहान पण उपदेशप्रधान निबंध या नूतन आंग्ल-विद्या-विभूषित लोकांसमोर आदर्श म्हणून होते; व या विविध विषयांवरील छोटेखानी लेखांनी 'हळू हळू शहाणे करून सोडावे', 'इंग्रजांसारखे गवरनर व्हावे', 'भारतांत पार्लमेंटसारखे कामकाज व्हावें' अशीं स्वप्नें हे लेखक निर्माण करावयास लागले होते. समाजांतील दुष्ट चालीरीती दूर केल्या, दारूसारख्या व्यसनास दूर ठेवलें, शिक्षणाचा फैलाव केला की झालें अशी अल्पसंतुष्ट वृत्ति निर्माण झाली व इंग्रज हे प्रभु-प्रेरणेने आपल्यावर राज्य करण्यास आले आहेत अशी श्रद्धा वाटूं लागली—मराठी निबंधाचा आरंभखंड हा असा परपुष्ट व परधार्जिणा होता.

• • •

१८७४ हें वर्ष म्हणजे मराठी साहित्यांतील जागृतीचें बोधचिन्ह आहे. महाराष्ट्राला ग्रासून टाकणाऱ्या परपुष्टतेचा व परधार्जिण्या वृत्तीचा धिक्कार करणारा एक तारा आपलें तेज या वेळेपासून प्रकट करूं लागला. हा महाराष्ट्राच्या क्षितिजावरचा तेजस्वी तारा म्हणजे निबंध-मालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर हा होय ! स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा यांच्याविषयी अपरंपार अभिमान असलेल्या या 'महाराष्ट्राच्या युगप्रवर्तकास' व 'मराठी भाषेच्या शिवाजी 'स इंग्रजांचा कुटिल कावा चटकन् कळून आला. अनुवंशाने प्राप्त झालेलें बुद्धिसामर्थ्य व अस्मितेच्या साक्षात्काराने निर्माण झालेली निर्भय वृत्ति, त्यांच्या ओजस्वी शैलींतून प्रकट होऊं लागली. १८७४ मध्यें विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंध-माला' सुरू केली व विविध विषयावर व्यासंगी पण सडेतोड निबंध लिहून, महाराष्ट्राला खडबडून जागें केलें. "लोकभ्रम, गर्व, वाचन, ग्रंथावरील टीका, मोरोपंताची कविता, भाषांतर, इतिहास, डॉ. जॉन्सन, आमच्या देशाची स्थिति" असे अनेक विषय त्यांनी लोकांसमोर मांडले. डॉ. जॉन्सनचा गाढ व्यासंग, ॲडिसनची लोककल्याणाची तळमळ आणि मेकॉलेच्या भाषाशैलींतील विविध ढंग यांचा परिणाम चिपळूणकरांवर एकत्रित झालेला आढळतो. चिपळूणकरांनी निबंधाचें बाह्य तंत्र उचललें तें या उपरोक्त इंग्रज लेखकांकडून; पण त्या निबंधांतून निघालें मात्र त्यांच्या देशोन्नतीसाठी तळमळणाऱ्या अंतःकरणांतले मंत्र ! आजच्या मराठी गद्याला स्वतंत्र वळण लावण्याचें श्रेय चिपळूणकरांनाच द्यावें लागेल. संस्कृतनिष्ठ पांडित्य-प्रचुर भाषाशैली, प्रदीर्घ वाक्यरचना, स्वमत-प्रतिपादनांतील अभिनिवेश आणि परमत-खंडनांतील उपहास व वक्रोक्ति, वकिली डावपेचानुसार केलेली रचना व मुद्द्यांची बिनतोड मांडणी, आवश्यक तेथे पुरविलेले विविध देशांच्या इतिहासांतील व वाङ्मयांतील दृष्टान्त हीं चिपळूणकरांच्या शैलीचीं वैशिष्ट्यें आहेत. हीं वैशिष्ट्यें लो. टिळक, गोपाळराव आगरकर, शिवरामपंत परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, न. चिं. केळकर, विनायकराव सावरकर, श्री. म. माटे व व ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या लेखनांत आढळून यावींत इतकी उज्ज्वल परंपरा चिपळूणकरांनी निर्माण केली होती.

● ● ●

चिपळूणकरांनी राजकीय जहाल निबंधाचें जें एक नवें युग निर्माण केलें त्याचा विकास लो. टिळक यांनी केसरींतून निरनिराळ्या प्रासंगिक अग्रलेखांतून केला. लो. टिळकांची शैली ही स्पष्ट, सुबोध, ओजस्वी व ओघवती होती. अलंकारापेक्षा अर्थाकडे व परिणामाकडे त्यांचें अधिक लक्ष असे. चिपळूणकर व टिळक यांच्या तालमींत तयार झालेले लेखक म्हणजे शिवराम महादेव परांजपे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, नरसिंह चिंतामण केळकर हे होत. शिवरामपंतांनी लोकमान्य टिळकांच्या युयुत्सु राजकारणाचा पुरस्कार केला; पण तंत्र मोठें काव्यात्मक वापरलें; आशय स्पष्टपणे मांडण्याच्या ऐवजी त्यांनी तो रूपकांतून प्रकट केला. उपहास व वक्रोक्ति यांचा मार्मिकपणे उपयोग करून प्रतिपक्षीयांना नामोहरम केलें. स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचा अभिमान प्रकट केला. संस्कृतप्रचुर भाषा असली तरी तिला काव्यात्मक वळण प्राप्त करून दिलें. त्यामुळे त्यांचे निबंध हे कलात्मक वाटतात. या उलट खाडिलकरांचे राजकीय निबंध हे लो. टिळकाच्या निबंधांप्रमाणे स्पष्ट भाषेंत लिहिलेले आहेत. इतिहासाचार्य राजवाडे हे जसे बुद्धिमान् तसेच राष्ट्राभिमानी होते. त्यांच्याहि अनेक निबंधांतून पांडित्याबरोबर अस्मितेची जाणीव वारंवार वाचकांना होते. न. चिं. केळकर हे लो. टिळकांचे शिष्य खरे; पण त्यांची मनोवृत्ति समतोल होती; भावनाप्रधानतेपेक्षा बुद्धिप्रधानतेकडे कल असल्यामुळे त्यांच्या निबंधांत विचारांना प्राधान्य आहे परंतु तात्यासाहेब हे रसिक वृत्तीचे असल्यामुळे त्यांच्या लेखनशैलीस व निबंधरचनेस कलात्मकता लाभली आहे. वृत्तपत्रांत दैनंदिन प्रासंगिक विषयांवर लिहावें लागूनहि त्यांच्या अनेक लेखांना यामुळेच अक्षर-वाङ्मयाचें मूल्य प्राप्त झालें आहे. भाषेंतील प्रासादिकता, विषय सुबोध करण्यासाठी दिलेले उपमा-दृष्टान्तादि अलंकार, संयम व सूचकता हीं त्यांच्या निबंधाचीं वैशिष्टचें आहेत. केसरींतून राजकीय निबंधाचें निर्माण झालेलें युग, आजहि विविध वृत्तपत्रांतील अग्रलेखांतून आपणांस आढळून येईल.

• • •

राजकीय निबंधाप्रमाणेच सामाजिक विषयावर निबंध-लेखन प्रारंभापासून सुरू होतें. ‘ लोकहितवादी ’ ( गोपाळराव देशमुख ) यांनी १८४८ ते १८५० या काळांत ‘ प्रभाकर ’ मधून लिहिलेलीं शतपत्रें म्हणजे प्रामुख्याने निबंधच होत. या निबंधांतून लोकहितवादींनी आमच्या समाजांतील शिमगा, मद्यपान, लग्नसमारंभ इत्यादींतील दुष्ट चालीरीतींवर कोरडे उडविलेले आहेत. लोकहितवादींची भाषाशैली सरळ व स्पष्ट, आणि त्यांची तळमळ विलक्षण होती. त्यांचें कार्य पुढें ज्योतिबा फुले, बाबा पदमनजी यांनी चालविलें; परंतु त्यांस खरें रूप आणून दिलें गो. ग. आगरकरांनी ! आगरकरांनी ‘ सुधारक ’ या पत्रांतून सामाजिक सुधारणावादी निबंधांचा सतत वर्षाव महाराष्ट्र-समाजावर केला. ‘ समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व’ या विचारांचा स्वीकार केला. एकोणिसाव्या शतकांतील मिल, स्पेन्सर या विचारवंतांच्या लिखाणांचा परिणाम आगरकरांवर इतरांपेक्षा अधिक झाला होता. ‘ व्यक्तिस्वातंत्र्य, ऐहिक सुखवर्धन, आणि बुद्धिप्रामाण्य ’ हीं तात्त्विक सूत्रें त्यांच्या निबंधांतून मोठ्या तपशीलाने स्पष्ट झालेलीं आहेत. अलंकारिक डौलदार भाषा, उपहास व वक्रोक्तीचा उपयोग, तात्त्विक अभिनिवेश, समाज सुधारण्याची तळमळ हीं त्यांचीं वैशिष्टचें कोठल्याहि निबंधांतून आढळतात. त्यांच्या या भूमिकेच्या आश्रयानेच वा. ब. पटवर्धन, सावरकर, माटे यांचे सामाजिक निबंध लिहिले गेले आहेत. साने गुरुजी हेहि सामाजिक सुधारणावादी व स्वातंत्र्यप्रेमी निबंधकार होत; परंतु त्यांच्या निबंधांत वैचारिक तर्कशुद्ध मांडणीपेक्षा, भावनोत्कटतेकडेच अधिक लक्ष आहे.

राजकीय निबंध असो किंवा सामाजिक निबंध असो, या लेखकांनी जें अतुल वैचारिक दर्शन घडवून आणलें व महाराष्ट्र-अभ्युदयाचा जो सर्वांगीण पुरस्कार केला तो अविस्मरणीय आहे. त्यांचें लेखन व कर्तृत्व हीं उद्यांच्या महाराष्ट्राचीं स्फूर्तिस्थानें आहेत. उपदेश, ज्ञानप्रसार व मतप्रचार हीं कार्यें निबं द्वारे घडवून आणण्याचें त्यांचें धोरण स्पष्ट होतें. विष्णुशास्त्री ते विनोबा यांच्यापर्यंत निबंधाची वाटचाल ही अशी झालेली आहे.

राजकीय आणि सामाजिक निबंधांप्रमाणे, याच कालखंडांत वाङमयीन टीकात्मक निबंधांना चालना मिळाली. चिपळूणकरांनी 'मोरोपंतांची कविता' किंवा 'तारा नाटक' या विषयांवर परीक्षणात्मक निबंध लिहिले. वा. ना. हंस यांचा मोरोपंतांवरील निबंधहि याच काळांत लिहिला गेला. त्यांच्यानंतर शि. म. परांजपे, श्री. कृ. कोल्हटकर, ना. गो. चापेकर, श्री. व्यं. केतकर, न. चिं. केळकर, वा. म. जोशी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. के. क्षीरसागर, वा. ल. कुलकर्णी यांचीं नांवें या संदर्भांत सहजच घेतां येतील. ह्यांचे निबंध कोणत्याहि अभिनिवेशाने लिहिले गेलेले नाहीत; तर वाङमयीन व जीवनविषयक मूल्यें आधारास घेऊन तात्त्विक चिंतनांतून ते लिहिले गेले आहेत. मराठींतील गंभीर व वैचारिक निबंधाचें स्वरूप हें असें विविध आहे. हे सर्व निबंध विषयप्रधान आहेत व त्यांत पांडित्यदर्शन आहे. लेखकाला तात्त्विक अधिष्ठान आहे आणि त्याच्या भाषेला शुद्ध डौलदार वळण आहे.

● ● ●

इ. स. १९२६ या वर्षाचाहि उल्लेख निबंधाच्या आढाव्यांत आपणांस अवश्य करावयास पाहिजे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी ज्या पद्धतीचा वैचारिक व गंभीर निबंध आपणांसमोर ठेवला होता, त्या पद्धतीपेक्षा निराळा, पण निबंध या नांवानेच ओळखला जाणारा एक वाङमय-प्रकार मराठींत या वेळेपासून सहेतुक लिहिला जाऊं लागला. आणि मौज ही की याहि निबंध-प्रकाराची वाढ इंग्रजी निबंधांच्या अध्ययनांतून झालेली आहे. इंग्रजी भाषेंतील चार्लस् लॅब्, रॉबर्ट लिंड, ल्यूकॉस, चेस्टर्टन, गार्डिनर इत्यादि लेखकांच्या लघु-निबंधाकडे पहिल्या महायुद्धानंतर मराठी लेखकांचें लक्ष वेधलें गेलें व त्या धर्तीवर प्रथम प्रा. ना. सी. फडके यांनी 'रत्नाकर' मासिकांतून १९२६ सालीं गुजगोष्टी या नांवाने लेखन केलें. आज या लघु-निबंधालाच गुजगोष्ट व ललित-निबंध हीं दोन नांवें प्राप्त झालेलीं आहेत.

लघु-निबंध हा जुन्या चिपळूणकरी निबंधापेक्षा अंतर्बाह्य निराळा आहे. आकाराचें लघुत्व हा एक मुद्दा असला तरी तो निर्णायक मुद्दा

मात्र नव्हे. लघु-निबंध हा विषयप्रधान नसून व्यक्तिप्रधान आहे. एखाद्या विषयाची साधकबाधक चर्चा करण्यासाठी तो लिहिला जात नाही किंवा एखाद्या विशिष्ट उपदेशाची किंवा मतप्रचाराची आग्रही भूमिकाहि त्यांत नाही. लेखकाच्या मनांत सहजगत्या एखादा विषय सुचावा—मग तो विषय कितीहि क्षुद्र व सामान्य असला तरी हरकत नाही—आणि त्या विषयाच्या अनुषंगाने त्या लेखकाने गप्पा माराव्यात व स्वतःचीं मतें, स्वतःच्या आवडी-निवडी, स्वतःच्या जीवनांतील आठवणी एखाद्या जिवलग मित्राला मोकळ्या रीतीने सांगाव्यात, या पद्धतीचें स्वरूप या लघु-निबंधाचें असतें; भाषेची प्रकृति प्रतिष्ठितपणापेक्षा घरगुती वळणाकडे झुकणारी असते व लेखकाच्या वृत्तीनुसार त्यांतून विनोदाचा झरा हळुवारपणे वाहत असतो. आत्मनिवेदन सत्य किंवा आभासरूपाने करून, सर्वसामान्य वाचकांना विश्वासांत घेऊन जिव्हाळ्याच्या गप्पा मारण्याचा प्रयत्न हा लघु निबंधकार करीत असतो. मात्र या गप्पा असल्या तरी त्या मर्मज्ञाच्या असतात, बहुश्रुत पंडिताच्या असतात, जीवनाच्या यथेच्छ अनुभवांनी समद्ध झालेल्या कलावंताच्या असतात हें विसरुन चालणार नाही. कारण या गप्पांच्या ऐन भरांत हा लघु-निबंधकार जीवनांतील एखादें सौंदर्यतत्त्व किंवा विचारतत्त्व अशा मार्मिकतेने सुचवीत असतो की त्याची जाणीव प्रारंभीं तरी सामान्य वाचकाला होत नाही. लघु-निबंधकाराची ही कलाकृति लक्षांत घेऊनच प्रा. फडके म्हणतात कीं ‘लघु-निबंध म्हणजे बहुश्रुत मर्मज्ञ मित्राचें मधुर आर्जवी संभाषण.’

आशय, अभिव्यक्ति, व्यक्तिनिष्ठा, मांडणींतील स्वैरता, चटकदार मथळा, इत्यादि वैशिष्टयांमुळे हा लघुनिबंधाचा वाङमयीन प्रकार गेल्या तीस वर्षांत अत्यंत लोकप्रिय झाला आहे. लघुकथा, आत्मचरित्र, पत्र-व्यवहार आणि भावगीत यांच्या सरहद्दीवर या लघुनिबंधांचा प्रपंच उभारला गेला आहे असें म्हटल्यास वावगे होणार नाही. प्रा. ना. सी. फडके यांच्या प्रमाणेच वि. स. खांडेकर, अनंत काणेकर, वि. ल. बर्वे, वि. पां. दांडेकर, ना. मा. संत, कुसुमावती देशपांडे यांनी या लघु-निबंधाच्या विस्ताराला आपापल्या वैशिष्टयांनी हातभार लावलेला आहे. आणि गो. रा. दोडके, र. गो. सरदेसाई, गं. भा. निरंतर. म. ना.

अदवंत, वा. भा. पाठक, वा. पु. दामले, के. ज. पुरोहित यांनी या प्रकाराकडे आपल्या प्रतिभेचा मोर्चा यशस्वी रीतीने वळविला असल्याच्या खुणा आज दिसूं लागल्या आहेत.

● ● ●

प्राज्ञ परीक्षेच्या निमित्ताने मराठीतील निबंध वाङ्मयाच्या विकासाचे प्रमुख टप्पे नजरेंत यावेत आणि या वाङ्मय--प्रकाराच्या विषयनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ संप्रदायाचा परिचय व्हावा या हेतूने कांही निबंध येथे संग्रहीत केलेले आहेत. ' निबंध-विकास ' या पुस्तकाच्या संपादनकार्यांत प्रा. म. वि. फाटक व प्रा. म. ना. अदवत यांचें अतिशय साहाय्य झालें आहे. त्याबद्दल परिषद् त्यांची आभारी आहे. त्याचप्रमाणें या पुस्तकांतील सर्व निबंध त्या त्या लेखकांनी परिषदेला विनामूल्य छापण्यास संमति दिली याबद्दल परिषद् त्यांची ऋणी आहे.

---

# अनुक्रमणिका


| क्रमांक धड्याचें नांव | लेखक | पृष्ठांक |
| --- | --- | --- |
| १. आमच्या देशाची स्थिति | वि. कृ. चिपळूणकर | १ |
| २. सामाजिक सुधारणा आणि कायदा | गो. ग. आगरकर | ८ |
| ३. शिवाजीची एक रात्र | शि. म. परांजपे | १९ |
| ४. जशी संस्कृति तसें हत्यार ! | वि. का. राजवाडे | ३० |
| ५. विरोळचाने काय शिकविलें ? | वा. ब. पटवर्धन | ३७ |
| ६. गरजा व वासना | न. चिं. केळकर | ४६ |
| ७. वाङ्मयविषयक माझी दृष्टि | वा. म. जोशी | ५८ |
| ८. श्रद्धा सरितेची गंगोत्री | श्री. म. माटे | ६२ |
| ९. जीवनाचा यात्रेकरू | प्र. के. अत्रे | ७३ |
| १०. दोन तात्या | ग. त्र्यं. माडखोलकर | ८० |
| ११. बुद्धीचा महिमा | पां. स. साने | ९० |
| १२. बाजार | ना. सी. फडके | १०१ |
| १३. श्रावण | वि. स. खांडेकर | १०६ |
| १४. दोन मेणबत्त्या | अनंत काणेकर | ११५ |
| १५. रेल्वे-लाइन्स | वि. पां. दांडेकर | ११८ |
| १६. रिकाम्या बाटल्या | ना. मा. संत | १२३ |
| १७. मुखवटे | म. ना. अदवंत | १३० |
| १८. सावळाच रंग तुझा | के. ज. पुरोहित | १३१ |


## शुद्धलेखन

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नियमांनुसार आहे.

अनुक्रम ९०० विभाग क्रमांक १०९० नों. दि.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८४३६

# १. आमच्या देशाची स्थिति

— वि. कृ. चिपळूणकर

आमच्या प्रस्तुतच्या दैन्याचें मुख्य कारण काय आहे हें कोणालाहि सांगायला नकोच. तें परकी अंमल हें होय हें उघडच आहे. इंग्रज लोक इकडे प्रभु होण्यापूर्वीं हा देश फार संपन्न होता व मुसलमानांची जुलमी म्हटलेली कारकीर्द सांप्रतच्या सुधारलेल्या कारकीर्दीहून शंभर वाटांनी बरी वगैरे गोष्टी अलीकडे सिद्धान्तासारख्या होऊन बसल्या आहेत, व प्रत्यक्ष इंग्रज लोकहि त्या बोलून दाखवितात, हें आज बहुधा सर्वांस माहीत असेलच. असो; तर आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंचें आधिपत्य हें जर आमच्या विपत्तीचें मोठें कारण होय, तर तें नाहीसें झालें असता आमची स्थिति सुधारेल ही अर्थातच कोणाच्याहि मनांत प्रथमतः मोठी कल्पना येणार आहे. तर आमचा व आमच्या राज्यकर्त्यांचा संबंध तोडून टाकून आपणांस सुखी करण्याचें आमच्या स्वाधीन आहे कीं काय याविषयीं पहिल्याप्रथम विचार करूं.

वरील उपाय म्हटला म्हणजे आम्ही आमच्या राज्यकर्त्यांशीं लढाईला उभे राहून त्यांचा पराजय करायाचा, व आपलें राज्य पुनः आपलें आपण वहिवाटायाचें हा होय. आता ही गोष्ट हल्लींच्या काळीं कितपत साध्य आहे हें बहुधा एखाद्या लहान पोरालाहि कळण्यासारखें आहे. जो असंबंध सिद्ध करायास आमच्या पातालवासी बंधूस आठ वर्षें घनघोर संग्राम करावा लागला, व ऐरिश लोकांनी आज शेकडो वेळा झटापटी खाल्ल्या पण कांही एक झालें नाही, तो आमच्याने आज तडीस जावयाचा म्हणजे खरेखुरेच मुसळास अंकुर फुटावयाचे होत ! आमच्या राज्यकर्त्यांचें केवढे अपार सामर्थ्य व केवढा कट्टा सरंजाम, तसाच केवढा जगड्व्याळ बंदोबस्त; आणि आमच्याकडे मंडळींत परस्पर किती सूत, आमची हल्लींची रणसामग्री किती, व युद्धकलेचें ज्ञान किती...सर्वच गोष्टी अनकूल ! असो;

तर वरील थोरल्या उपायाच्या संबंधाने तर आज कोणी गोष्टहि काढूं नये अशी सांप्रतची अवस्था आहे हे स्पष्टच आहे.

तेव्हा हें सिद्ध आहे कीं, आम्हांस सांप्रतच्या दुरवस्थेंतून जर निघावयाचें असेल तर आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांशीं बिघडून आम्हांस बिलकूल सोय नाही. जो प्रसंग पडला आहे त्यास सादर होऊन त्यांच्या सलोख्यानेच जें काय कार्य होईल तेवढें करून घेतलें पाहिजे. हा सलोखा होण्यास दिवसांदिवस अधिकाधिक सोईहि होत चालल्या आहेत. पूर्वीं टोपकराचा स्पर्श होतांच सचैल स्नान करावें अशा ज्या आमच्या ठिकाणीं आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंविषयी समजुती होत्या त्या आता पुष्कळ कमी होऊन त्यांचें वैभव व थोरवी हीं आता आमच्या पुरती लक्षांत येऊन चुकली आहेत. त्याप्रमाणे हिंदु म्हणजे आफ्रिकेंतील नीग्रो लोकांचे बंधु ही जी आकाशांतील बापाच्या पवित्र लेकरांनी चोहोंकडे समजूत पसरून दिली होती तींतहि आता इतकें अंतर पडलें आहे कीं, जगाच्या चारी खंडांत गीर्वाण वाणीचा घोष सुरू होऊन अमेरिकेंतली मंडळी अर्धा गोल ओलांडून आम्हांस कडकडून भेटण्याकरिता व आमच्या प्राचीन ऋषींचा आम्हांपासून अनुग्रह घेण्याकरता आम्हांकडे उडया टाकूं लागली आहे. तसेच अर्वाचीन शास्त्रांनी व कलांनी सारें भूमंडल एकमय करून टाकून ‘ पवित्र शास्त्रां ’तील सार्वलौकिक बंधुत्वाचें जें पोकळ मत त्यास यथार्थता आणण्याचा योग आणला आहे. खेरीज या शतकांत राजांच्या सत्तेस धक्का बसून त्यांचें महात्म्य किती कमी होत चाललें आहे, आणि लोकप्रभुत्व व स्वातंत्र्य हीं तत्त्वें चोहोंकडे किती जारीने पसरत चाललीं आहेत हेंहि आज कोणाहि शोधक मनुष्याला अश्रुत नाही. तर वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता या देशाविषयी कळकळ बाळगणाऱ्या कोणाहि मनुष्यास मोठी उमेद येण्यासारखी आहे कीं, हल्लींच्या निकृष्टावस्थेंतून निघून हिंदुस्थानने पुनः आपलें नांव जगांत गाजवावें असें होण्यास दिवसांदिवस अधिकाधिक उपाय सिद्ध होत आहेत.

आता वरील उपाय कोणते, त्यांची योजना कोणत्या तऱ्हेनें झाली पाहिजे, व आजपर्यंत आमच्या मंडळीचें काय काय चुकत होतें, वगैरे गोष्टींच्या संबंधाने आम्ही आपले विचार आमच्या देशबंधूंस सादर करतों.

मनुष्याची किंवा राष्ट्राची सुधारणा करावयाची म्हटली म्हणजे तिचा पाया आत्मस्थितीचें पूर्ण ज्ञान हें होय. ज्यास आपली अवस्था काय आहे, पुढे काय होणार, आपलें बळाबळ किती, वगैरे गोष्टींचें चांगलेसे ज्ञान नाही त्याची स्थिति कधी सुधारायाची नाही. तर आमच्या लोकांस प्रथमतः स्वतःविषयींचें ज्ञान करून देणें अवश्य होय. आता स्वतःविषयीचें ज्ञान म्हणजे काय अशी कोणी पृच्छा केली तर तिचें उत्तर असें आहे. साऱ्या जगाची स्थिति हल्ली काय आहे, अलीकडे निरनिराळ्या संबंधांनी पृथ्वींतील देशांचे परस्परांशीं व्यापार कसे सुरू आहेत, त्यांत या आमच्या देशाचें इतरांशीं दळणवळण कोणत्या प्रकारचें आहे, आमच्या राष्ट्राची पूर्वी स्थिति कशी होती व हल्ली कशी आहे, या स्थित्यंतराची उपपत्ति काय, आपली पुनः भरभराट होण्यास कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत, इत्यादि विषयांवर सर्वांचे यथार्थ समज होणें हें अगोदर फार जरुरीचें आहे. हें जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत हल्लींसारखेच पोकळ लोककल्याण व रिकामी बडबड चालेल. व वास्तविक उपयोगाचें असें कांही एक होणार नाही. उघडच आहे कीं, ज्याला आपणांस कांही रोग जडला आहे हीच मुळी कल्पना नाही तो औषधक्रियेची तजवीज कशाला करील ? तो मूर्खपणाने कुपथ्यावर कुपथ्यें करून ऐन त्रिदोषाच्या वेळेस मात्र हाका मारीत बसेल, तर ज्यास आपली प्रकृति नीट करून शरीर दृढ करायाचें असेल त्याने प्रथमतः आपल्या प्रकृतीचें मान समजून घेणें जसें अत्यावश्यक होय त्याप्रमाणेच येथेहि प्रत्येक मनुष्यास आपल्या देशाची स्थिति पूर्णपणे लक्षांत येऊन आपलें बळाबळ जेव्हां त्याच्या पुरतेपणीं मनांत भरेल तेव्हां आमच्या सुधारणेला आरंभ झाला असें खास म्हणतां येईल. आता ही साऱ्या राष्ट्राची जागृति व्हावी कशी ? हा वरच्याच्या पुढला विचार होय. पण याचाहि निकाल करणे फार कठिण आहे असें नाही. अज्ञान ध्वंसनाचीं अलीकडे जशीं जबरदस्त साधनें उपलब्ध झालीं आहेत तशीं पूर्वी कधीहि नव्हतीं. छापखाने, आगगाड्या, आगबोटी, डाका, तारायंत्र वगैरे अर्वाचीन कला हीं सर्व युद्धांत कामीं पडणारीं अशीं केवळ दिव्य अस्त्रेंच होत असें म्हटलें असता चालेल. पण हीं स्वतः केव्हांहि

प्रबळ असलीं तरी उपयोग काय ? पंतांनी आपल्या प्रसिद्ध महाकाव्यांत म्हटलें आहे :—

**सहाय असिला असे तरिच शत्रुला मारवे ।**

मोठी भवानी तलवार असली तरी तिचें पाणिग्रहण जव्हा 'यवन-कुंजर शिरपर' चढणाऱ्या 'सिंहा' ने करावें तेव्हा तिचें पाणी खळाळणार, नाही तर कोंडून राहिलेल्या डबक्याप्रमाणे तें जागच्या जागींच मठ्ठ बसून राहणार !

तर वरील महा साधनांच्याद्वारे आमचा येवढा सारा देश जो कुंभ-कर्णासारखा निद्रापद भोगीत स्वस्थ व सुस्त होऊन पडला आहे त्यास हाल हालवून जागे करण्याची प्रथमत: तजवीज झाली पाहिजे. हाच प्रकार यापूर्वी साऱ्या युरोपांत, फरान्स देशांत व रशियांत झालेला आहे. अवघे युरोपखंड हें सोळाव्या शतकापूर्वी आमच्या देशाप्रमाणेच स्वस्थपणे घोरत पडलें होतें. पण चीन देशांतून मुद्रणकलेने येऊन पाश्चात्य राष्ट्रांचे ठायीं वस्ती केली मात्र, तों लागलीच पन्नास साठ वर्षांत जिकडे तिकडे चळवळ सुरू झाली. जुन्या ग्रीक व लाटिन ग्रंथांचा साऱ्या देशांत अभ्यास व्हावयाला लागून युरोपची बुद्धिदेवता फार दिवसपर्यंत जी निद्रिस्त झाली होती ती एकाएकी जागृत झाली. हिचें फळ सोळाव्या शतकांतील जगत्प्रसिद्ध धर्मक्रांति हें होय. याप्रमाणेच फरान्स देशांतहि अठराव्या शतकापर्यंत बिलकुल गडबड नसून हवी तशी अंदाधुंदी चालली होती, व एकंदर राष्ट्र हें मेंढवाड्यासारखे होऊन गेलें होतें. सरकारी अधिकाऱ्यांनी हवे तसे जुलूम करावे, आणि ते खुशाल खपले जावे. पण **व्हॉल्टेर** प्रभृति महान् महान् ग्रंथकारांनी देशभाषेच्या द्वारे लोकांचें मन क्षुब्ध करून त्यांस सुजाण केल्याबरोबर वरील शतकाच्या शेवटीं अशी धुमश्चक्री उडाली कीं तिने फरान्सच काय, पण सारें युरोपखंड खळबळून सोडलें ! अशाच प्रकारचें तिसरे उदाहरण रशियन लोकांचें होय. हे लोक अद्यापहि आडदांड व दांडगे असेच आहेत, व त्यांची गणना सरासरी अर्धवट रानटी लोकांतच आहे. मग दोन शतकांपूर्वी तर त्यांचीं अवस्था काय असेल ती पहा ! पण तसल्या स्थितींतहि त्यांचा राजा **पीटर दि ग्रेट** याने जातीने अचाट मेहेनत करून त्यांची सुधारणा करण्याचें मनांत आणलें, आणि पांचपंचवीस वर्षांत

आपल्या राष्ट्रांत अतोनात फरक करून सोडला. तो इतका की रशियाचें संस्थान आज साऱ्या युरोपांत प्रबळ होऊन बसलें आहे असें म्हणण्यास हरकत नाही ! असो; तर ज्ञानाच्या प्रसाराचा महिमा असा विचित्र आहे.

तेव्हा आमच्या देशाची हलाखी पाहून ज्यास खरोखर दुःख होत असेल, व तिजपासून त्याची सुटका व्हावी म्हणून जे झटत असतील, त्यांनी वरील ज्ञानांजनाचा प्रयोग करण्याचें मनावर घेतलें पाहिजे. सर्व क्रियेचें मूळ मन आहे, यास्तव तेंच सुविचारसंपन्न व पोक्त झालें असता केवढा फायदा होणार बरें ! ही गोष्ट येवढी स्पष्ट असताहि तिजकडे आमच्या आजपर्यंतच्या पुढारी मंडळीचें कांहीच लक्ष पोचलें नाही असें म्हटलें पाहिजे. देशहिताची दीक्षा विद्यापीठांतील भट्टाचार्यापासून घेऊन निघाल्यावर आमच्या नूतन पंडित मंडळीने करावें काय, तर सरकारी हुद्दे मिळवावे, जन्मभाषेची व आपल्या देशाची ओळख विसरून जाऊन पाश्चात्य भाषेंत निरंतर अद्वातद्वा प्रलाप करावे व आपल्या राज्यकर्त्यांचें सर्व प्रकारे अनुकरण करून मोराचीं पिसें लावून आयता थोरपणा मिळवू पाहणाऱ्या डोमकावळ्याच्या पंक्तीला बसावे, आणि लोककल्याणाची मोठी शिकस्त काय, तर मोठा थोरला तंबुरा घेऊन आकाशांतील बापाच्या कानीं सुस्वर आक्रोश पाडावा, किंवा मिशनरी साहेब जसें एखाद्या 'वेड्या कोकरा'ला घेरून आपल्या कळपांत ओढून नेतात, त्याप्रमाणे एखादा उपटसुंभ्या बघावा आणि एखाद्या हतभाग्य देशभगिनीचा व त्याचा योग करून देऊन आपण मुकाट्याने निसटून जावे ! ज्यांच्या शिरावर साऱ्या देशसुधारणेचा भार, व जे आपणास अटोकाट शहाणे समजून आपल्या देशबंधूंचें विपत्तिरूप महागर्तेतून उद्धरण करणार, त्यांच्या वरील कृति पाहून कोणास आश्चर्य व खेद हीं वाटणार नाहीत ! प्रार्थनासमाजीय तंतुवाद्यांच्या शंभर भोपळ्यांनी तरी हा विपन्मग्न देश तरण्याचा संभव आहे काय ? त्यांचा कर्णमधुर व पवित्र रव हिंदुस्थानच्या वीस कोटी प्रजेच्या कानीं कधी पडणार ! आणि तो पडला असे जरी मानले तरी त्यापासून या भरतवर्षाची उन्नति होण्याचा कितीसा संभव आहे, याविषयी आम्हांस फार संदेह आहे. ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज हे जरी खूप जारीने सुरू झाले तरी त्यांत देशास किफायत ती काय होणार ?

इतर शेकडो पंथ आहेत त्यांत हेहि आणखी सामील होतील, दुसरे काय ? त्याप्रमाणेच आलीकडे पूर्वीचे संप्रदाय मोडून टाकून हवे तसे गमतीचे विवाह जे होत आहेत त्यांपासून तरी काय निष्पन्न होणार असेल तें असो ! इकडील एखादी फाकडी मिस् (कुमारी) आणि तिकडचा एक घोटक ब्रह्मचर्य आचरणारा गोरा नवरा यांचा गांधर्वविवाह झाल्याने आमच्या देशसुधारणेचें तारू जर पुढे ढकललें जाणार तर वटोदर मुक्कामीं कांही वर्षांपूर्वी जो कपोतविवाह येवढ्या कडाक्याने गाजला तोहि देशोन्नतीची पताका फडकण्यास परम साधनीभूत म्हणून समजायाला नको काय ? एकंदरींत पाहता आम्हांस वरील प्रकार केवळ बालिशत्वाचे वाटतात. त्यांत व देशोन्नतींत ज्यांस कार्यकारणभाव दिसत असेल त्यांचें तार्किक आमच्याहून फार निराळें आहे असें म्हणून स्वस्थ बसणें भाग आहे !

तर देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय. ही संपन्नता सिद्ध करण्याचीं मोठीं दोन साधनें म्हटलीं म्हणजे, रसना व लेखनी हीं होत. पहिल्या सदराखाली शाळा, व्याख्यानें येतात; दुसऱ्याखाली वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व ग्रंथ हे येतात. या दोन्ही साधनांचा उत्कर्ष होऊन या अज्ञानांध राष्ट्राचे डोळे उघडावे एतदर्थ आमच्या थोर व दयाळू सरकारने आजपर्यंत थोडा उद्योग केला आहे असें नाही. युनिर्व्हसिटी (विद्यापीठ), विद्यालयें, शाळा, वगैरेंची स्थापना करून आज वर्षांनवर्षें त्यांची व्यवस्था चालविली आहे, व देशभाषांची अभिवृद्धि व्हावी म्हणूनहि होईल तितका यत्न सरकारने केला असून अजूनहि तो चालू आहेच. पण सरकारने आपलें काम बजाविलें म्हणून तितक्याने काय झालें ? आम्ही स्वतः मोठे कर्तृत्वाचे पडलों ना ! आमच्या तोंडावर अचानक जांभूळ पडलें तरी तें आंत लोटायलाहि आणखी कोणी पाहिजेच ! आमची मर्दुमकी असली कीं रडतरावाप्रमाणे आम्हांला घोड्यावर बसवून शिवाय आमच्या हातून लोकांनी तरवारहि मारविली पाहिजे ! वस्तुतः पाहता सरकारने जर इतका पल्ला मारला, तर बाकीची मजल आम्ही मोठ्या संतोषाने व उत्साहाने केव्हांच आटपावी. येवढा ज्ञानाचा प्रवाह आडवून त्याची मालकी जर आमच्या सरकारने आमच्या नवीन बांडास दिली, तर नलिकाद्वारे घरोघर उदकसंचय

करण्याचें अल्पस्वल्प कामहि त्यांच्याने होऊं नये ? पण हें करतो कोण व गरज कोणाला ? शिवाय असें करण्यापासून कांही फायदा होण्यासारखा आहे हें तरी कोणाच्या अंतःकरणांत बिंबलें आहे ? आमच्या भाषेंत म्हण आहे कीं, ‘ डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर ’; तर याच न्यायाने सारी व्यवस्था चालली आहे. आमची अन्नान्नगत झाली आहे, दुष्काळाचा तडाका उडाला म्हणजे लाखो लोकांची चांदी उडते आहे, सरकारदेण्याखाली रयतेचा चुराडा होत आहे, लोकांस आपल्या सामान्य हक्कांचें व सामान्य गोष्टींचें सुद्धा ज्ञान नसून त्यांच्या अभावीं त्यांची स्थिति पशुवर्गासारखी होऊन गेलेली आहे; येवढा हा संपन्न देश असता, येथील लोकसंख्या येवढी असता, लोकांची बुद्धि येवढी प्रखर असता व आहे तेथे अर्थसंचयहि विपुल असता कल्पवृक्षाखाली उपवास या न्यायाने इतकी प्रजा व्यर्थ हाल सोसते आहे,—ही स्थिति सर्वांच्या डोळ्यासमोर आहे; आणि देशोन्नतीचे धुरंधर वरील विपत्तींच्या प्रतिकारार्थ उद्योग काय करते आहेत म्हणाल, तर एक आकाशांतील बापास आरोळी देत आहेत, दुसरे आपल्या लेडीकरवी कोणा गौरकाय अधिकाऱ्याचें हस्तपीडनपूर्वक स्वागत करताहेत, कोणी पार्लमेंटच्या गर्दींत गुंग होऊन गेले आहेत, कोणी अर्वाचीन सोमरसांत तल्लीन होऊन जातिभेदरूप महान् अनिष्टांचा उपशम होऊन या देशास आराम पडावा म्हणून अर्वाचीन ऋषींचा तांडा जुळवून गवालंभाचें अनुष्ठान करीत आहेत, कोणी सरकारी अधिकाऱ्यांचे प्रतिदिवशीं उंबरठे पुजून त्यांच्यापुढे निरंतर लांगूलचालन करीत आहेत, इ. इ. ! हा सर्व प्रकार आम्हांस तर केवळ लज्जास्पद दिसतो. **मेकॉले** सारख्यांनी येवढी भवति न भवति करून व येवढा अट्टाहास करून जी नवीन शिक्षणपद्धति सुरू केली तिचीं वर सांगितली हींच फळें काय ? त्यांनीं लावलेल्या उत्तम वृक्षास दरवर्षी येवढा मोहोर येत असता तो बहुधा सगळाचा सगळा गळून जावा आणि फळ म्हणून प्रायः मुळीच धरूं नये ही केवढी खेदाची गोष्ट आहे ! आमच्या राष्ट्राचे पालक म्हणून ज्यांस सरकारने नेमलें आहे त्यांनी आपला अधिकार किती उत्कृष्ट रीतीनें आजपर्यंत बजावला बरें ?

---

# २. सामाजिक सुधारणा आणि कायदा

**— गो. ग. आगरकर**

सुधारणेचा शब्दान्तःपुराच्या बाहेर संचार होऊं नये म्हणून डोळ्यांत तेल घालून खडा पहारा करणाऱ्या नानाविध धर्मकल्पनांशीं तुमुल संग्राम करण्यास ज्यांस स्फुरण यावें, त्यांच्या भोंवतालीं उभारलेल्या प्रचंड लोकमततटास ढासळून पाडण्यास ज्ञानतोफांस ज्यांनी सरबत्ती द्यावी, व त्यास गराडा घालणाऱ्या रूढीखंदकावर क्रियासेतु बांधण्यास ज्यांनी प्रवृत्त व्हावें अशा विचारसंपन्न लोकांनी दुराग्रहाच्या भरी भरून व शुष्क बाबतींत दुही माजवून आपल्या मुख्य कर्तव्याची हेळसांड होऊं द्यावी ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय.

‘ नवखंड पृथ्वी व दहावें खंड काशी ’ यापुढे ज्यांच्या भूगोलविषयक कल्पनांची धाव जात नाही, वेदाचा अर्थ कालत्रयी होणे नाही अशी दृढ समजूत असूनहि त्यांतच मनुष्यास आवश्यक अशा सर्व ज्ञानाचा गड्डा आहे असा ज्यांचा पक्का ग्रह झाला आहे व प्राचीन ऋषिप्रणीत आचारांहून सुखकर असे आचार असूं शकतील अशा नुसत्या कल्पनेचाहि विटाळ न होऊ देण्याविषयी जे अत्यंत दक्ष आहेत, तात्पर्य ‘ पुराणमित्येव हि साधु सर्वम् ’ या महामंत्र्याच्या प्रभावापुढे पदोपदीं येणाऱ्या असंख्य नडी ज्यांस साह्य झाल्या आहेत अशा लोकांनी नुसतें कायद्याचें नांव ऐकलें नाही तोच वेडावून जाऊन माधवबागेंतील सत्तेचाळिसेतरांवर ताण करून सोडावी हें अगदी साहजिक आहे. परंतु ही सीमा ओलांडून पुढे गेलेल्या ज्ञानविशिष्ट म्हणविणाऱ्या लोकांनी कायद्याच्या विरुद्ध इतकें काहूर कां माजवावें याचा मात्र आम्हांस उमज पडत नाही. सामाजिक सुधारणा आणि कायदा यांच्यामध्ये अपरिहार्य एकनाड असल्यामुळे त्यांचें जुग कधीहि जमावयाचें नाही असें जें कित्येक सामुद्रिकांनी गणित केलें आहे त्यांत आमच्या मतें कांही चूक झाली आहे, व ती दाखविण्याचा प्रयत्न केला असता तिकडे शांतपणाने नजर फेकण्याची जर ते तसदी घेतील, तर हा वाद मिटून उभय

पक्षांत समेट केवळ दुरास्पद आहे असें आम्हांस वाटत नाही. सामाजिक सुधारणेंत कायद्याची मदत घेणें अनर्थावह आहे असें प्रतिपादणाऱ्या मंडळींच्या आजपर्यंच्या वाटाघाटींत आम्हांस जितका दुराग्रहाचा भाग दिसून येतो तितका योग्यायोग्य विचार दिसून येत नाही असें म्हटल्यावाचून आमच्याने राहवत नाही. सकृद्दर्शनीं ज्यांत कांही अर्थ आहे असें भासतें असें काय तें एकच कारण पुढे आलें आहे बाकी सर्व शब्दजाल, हट्टवाद व पुराणप्रियतेच्या संस्काराची अवशिष्ट झाक यांचेंच अकांडतांडव आहे व तें कारण हेंच कीं आमचें सरकार परकें, त्याचा धर्म वेगळा, त्याचे रीतिरिवाज भिन्न, तेव्हा अशा सरकारास आपल्या समाजव्यवस्थेंत हात घालूं देणें अत्यंत भयावह आहे; याचे परिणाम फारच अनिष्टकारक झाल्यावाचून राहणार नाहीत व याबद्दल मागाहून पस्ताव्यांत मात्र पडावें लागेल. आता हा कोटिक्रम करणाऱ्यांस आमचा इतकाच प्रश्न आहे कीं, सामाजिक गोष्टींत आजपर्यंत सरकारने औदासीन्य पत्करलें आहे त्याचें कारण तसें करण्यास आम्ही त्यांस परवानगी देत नाही इतकेंच आहे काय ? मुसलमान लोकांनी एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन आम्हांपैकी कित्येकांस बाटविलें त्या वेळीं तसें करण्याविषयी आम्ही त्यांस परवाना दिला होता काय ? किंवा आमच्या समाजव्यवस्थेंत ढवळाढवळ करण्यास सरकारने मनांत आणलें तर तें आज असमर्थ आहे असें तरी मानतां येईल काय ? तात्पर्य, सरकार सामाजिक बाबतींत उदासीन असण्याचें कारण तसें करण्यास आम्ही त्यास संधि देत नाही इतकेंच काय तें; बाकी आम्ही त्यांस आमच्या घरगुती गोष्टींत हात घालण्यास केव्हा विनंती करू म्हणून तें अगदी चातकाप्रमाणे वाट पहात आहे व एकदा का त्यांस आपणाकडून जराशी फूस मिळाली कीं कायद्यामागून कायदे करून आमच्या सर्व सामाजिक व्यवस्थांचा भंडवडा करून आम्हांस तें त्राहि करून सोडतील, वगैरे विचारांत जर कांही तथ्य असेल तर मग 'आपण कोंबडी झाकली कीं उजाडावयाचें राहिलेंच' असें मानणाऱ्या म्हातारीच्या समजुतींतहि तथ्य नाही असें कोण म्हणेल ?

दुसरे, सती जाण्याची चाल जी सरकारने बंद केली त्यापासून आमच्या धर्मांतहि प्रसंगानुसार हात घालण्यास सरकार डगमगणारे नाही असें सिद्ध

झालें नाही काय ? किंवा जो पुनर्विवाह हिंदुधर्मशास्त्राने बेकायदेशीर ठरविला होता तोच कायदेशीर ठरविण्याविषयी कित्येकांनी आपण विनंती केल्यावरून तो कायदेशीर ठरविल्यास आज ३४ वर्षे झालीं असून त्या वेळीं मिळालेल्या फुशीचा त्यांनी अद्यापपावेतो फायदा घेतला नाही हें कसें ? इंग्लंड देशांत बारा वर्षांच्या आंत पुरुषाचें लग्न झाल्यास तें बेकायदेशीर आहे. परंतु येथे पाळण्यास बाशिंगें बांधणेंहि कायदेशीर असून १० वर्षांच्या आंतील स्त्रियेशीं प्रत्यक्ष नवऱ्याने संभोग केला असता त्याजवर जबरी संभोगाचा आरोप शाबीत होतो असें कलम पीनलकोडांत कोठून आलें ? तात्पर्य, सामाजिक गोष्टींत आधींच सरकारने हात घातला आहे, असें असता आणखी अमुक एका गोष्टींत असा असा कायदा करा अशी सरकारास विनंती केल्याने त्यास आमच्या सामाजिक गोष्टींत आयतीच ढवळाढवळ करण्यास फूस सांपडेल, अशा समजुतीवर कायद्याचा निषेध करीत बसणें म्हणजे वास्तविक पाहता आम्हांस पुढे जावयाचें नाही हेंच जगास जाहीर करणें होय.

आता आजमितीस जितक्या म्हणून सुधारणा आम्हांस इष्ट किंवा आवश्यक वाटतात, त्या सर्व कायद्याच्या मदतीने सुसाध्य आहेत असें आमचें म्हणणें नाही किंवा त्यांपैकी कांही कायद्याने सुसाध्य असल्या तथापि त्या सर्वांवर कायद्याची अंमलबजावणी करावी असेंहि आम्ही इच्छित नाही. परंतु याचें कारण आमचें सरकार परकें आहे हें नव्हे; किंवा सामाजिक गोष्टींत सरकारने हात घालणें गैरशिस्त आहे अशा सामान्य सिद्धान्ताचा आम्ही अंगीकार करतों असेंहि नव्हे. व्यक्तीच्या ज्या आचरणापासून समाजाचें प्रत्यक्ष अपरिमित नुकसान होत नसेल, तें आचरण त्या व्यक्तीस घातक असलें, तथापि त्याने तें करूं नये अशी समाजानें सक्ती करण्याचा समाजास अधिकार नाही. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजबंधन या दोहोंसहि मर्यादा आहेत. त्या मर्यादांचा अतिक्रम होईल तर त्यापासून एकंदर समाजाचेंच नुकसान होणारे आहे. व्यभिचार हा एक पुण्यमार्ग आहे असें कोणत्याहि धर्माचा मनुष्य प्रतिपादणार नाही. परंतु एवढ्यावरून व्यभिचार करणाऱ्यांस कायद्याने शिक्षा ठरवावी किंवा नाहीं असा प्रश्न पुढे आला असता सर्व विचारी लोक एकदम हो म्हणण्यास तयार होणार नाहीत.

अनुक्रम ९.८०.१० विभाग क्र.१५ ११ १०९० नों. दि. २८/१९/५५ शाळा

त्या व्यभिचारापासून समाजाचें प्रत्यक्ष नुकसान होत आहे कीं काय ? या प्रश्नाचा प्रथम विचार केला पाहिजे; तसेंच दारू पिणें हें जरी वाईट आहे तथापि ती पिणाऱ्या व्यक्तीपासून समाजास त्रास पोहोंचल्यावाचून त्यांजवर कायदा लागू करणें न्याय्य होणार नाही. तात्पर्य, एखादी गोष्ट आपणांस कितीहि चांगली वाटली, तथापि दुसऱ्यांनी तिचा स्वीकार केलाच पाहिजे अशी सक्ती करण्याचा आपणास अधिकार नाही. आपण पाहिजे तर त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करावा; परंतु यापुढे मात्र आपणांस जाता येणार नाही. वरील विचारावरून हेंहि ध्यानांत येण्यासारखे आहे, कीं ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीच्या आचारविचारापासून समाजाचें नुकसान नसता, तो आचारविचार बदलण्याची समाजास सक्ती करता येत नाही, त्याचप्रमाणे आधीच जर समाजाने सक्ती केली असेल तर ती नाहीशी करणें हेंहि समाजाचें कर्तव्य होय व तें बजावण्यास समाज तयार नसेल तर समाजाचा विशेष जोरदार प्रतिनिधि जें सरकार त्याने पुढे झाले पाहिजे. पातिव्रत्यसंरक्षणार्थ स्त्रियांनी आपणांस पतिचितेवर जिवंत जाळून घ्यावे हें अत्यंत मूर्खपणाचें, अविचाराचें व साहसाचें कृत्य होय असें समजून, लोकांची वाट न पाहता सरकारने एकदम या कामीं कायदा करून ती क्रूर चाल बंद केली. एखाद्या स्त्रीचा पति निवर्तला असता तिने दुसरा पति करूं नये अशी जी पातिव्रत्यसंरक्षणार्थ दुसरी सक्ती समाजाने केली आहे, तीहि व्यक्तिस्वातंत्र्याविरुद्ध आहे हें सरकार जाणून होतें. परंतु सतीच्या चालीइतकी ती अमानुष नसल्यामुळे त्यांनी कांही दिवस वाट पाहिली व योग्य काळ आला असें दिसतांच, तीहि सक्ती दूर करून पुनर्विवाह कायदेशीर मानला जाईल म्हणून ठराव केला. आता पातिव्रत्य-संरक्षणार्थ समाजाने केलेली तिसरी सक्ती म्हटली म्हणजे केशवपन होय. या केशवपनाच्या प्रघाताचें मंडन करणाऱ्या लोकांनी त्यापासून किती जरी फायदे दाखविले व तो त्यांस किती जरी संमत असला तथापि ज्या स्त्रीचें वपन होणार तिची इच्छा नसता व ती एकसारखा हंबरडा फोडून आपणांस या ममताळू वैऱ्यांच्या तावडींतून कोणी सोडवील काय म्हणून गयावया होऊन चोहीकडे दृष्टि फेकीत असता, तिला जुलमाने न्हाव्यापुढे बसविणें किती निंद्य आहे. व अशा रीतीने तिचें स्वातंत्र्य हिरावणें म्हणजे

केवढा घोर जुलूम आहे हें सिद्ध करीत बसण्याची आमच्या मते मुळीच आवश्यकता नाही. ज्यांच्यावर हा घोर प्रसंग गुदरतो त्या परावलंबी अबलांस ही विटंबना कितपत मानवते हें त्यांचें हृद्गत जाणणाऱ्या समवयस्क मैत्रिणीवाचून दुसऱ्यास सहसा सांगता येण्यासारखे नाही! तथापि त्याची अटकळ कल्पनेने अगदीच बांधता येणार नाही असें नाही. ज्याने आपणांस जन्म दिला, आपणांस लहानाचें मोठें केलें व आपल्याकरिता अनंत कष्ट साहिले, त्या बापाच्या नांवाने मिशा काढण्याचा प्रसंग दुर्दैवाने आला असता, केवळ चटावर काम उरकून घेण्यास पुरुष कसे तत्पर असतात; १५–२० दिवसांनी मुण्डन केल्याचा मागमूसहि राहण्याचा संभव नसून तें टाळण्यास काय काय उपाय योजतात व मुंडन केल्यावाचून गत्यंतर नाही असा प्रसंग आला असता आपल्या बापाविषयी आपली पूज्यबुद्धि व्यक्त करण्याकरिता ज्यांनी आपलें मुंडितमुख मोठ्या गर्वाने लोकांस दाखवीत फिरावे तेच लोक अंधारकोठडींत कशी दडी देतात हें ज्यांनी पाहिलें असेल, त्यांस स्त्रियांच्या मनाची स्थिति कशी होत असेल त्याची कल्पना करणें कठिण नाही! लहानपणापासून ज्यांची जोपासना केली, ज्यांस न्हाऊं माखूं घालून वाढविलें, ज्यांस नाना भूषणांनीं शृंगारिलें असे केश क्षणार्धांत नाहीसे होऊन आपण सर्वांच्या तिरस्कारास पात्र होणार व पंधरावीस दिवसांनी पूर्वस्थिति येण्याची तर आशा नाहीच, परंतु उलटें ज्याचें मुखावलोकनहि करावयास नको अशा त्या परक्या नापितापुढे दर पंधरवड्यास मान वाकवावी लागणार. हे विचार मनांत येऊन या विटंबनेस सर्व स्त्रिया आपण होऊन राजी होतील अशी नुसती कल्पनाहि करता येत नाही. आपल्या अत्यंत जवळच्या आप्ताच्या किंवा आपल्या स्वतःच्या प्रिय कन्येच्या अशा हालअपेष्टा पाहण्याचें ज्या हतभाग्यांच्या कपाळीं आले असेल, त्यांची अंतःकरणें दुःखोद्वेगाने विव्हल झाल्यावाचून कदापि राहिलीं नसतील.

तात्पर्य, दुसरें लग्न करण्याची इच्छा असूनहि तसें करण्यास कायद्याची आडकाठी असणें यांत जितका अन्याय आहे, त्याहूनहि या विद्रूप करण्याच्या घोर चालींत अधिक अन्याय व प्रत्यक्ष जुलुमाचा प्रकार आहे हें प्रत्येकास कबूल केले पाहिजे व तो अन्याय नाहीसा करण्यास कित्येकांनी अर्ज करून

कायदा करून घेतला असता, त्याहून अधिक अन्यायाचा व जुलुमाचा प्रकार बंद करण्याकरिता 'अमुक वयाच्या आंत मुळींच वपन करूं नये व त्या-पुढेहि तें स्त्रीच्या मर्जीविरुद्ध होऊ नये,' असा कायदा मागणें हें केवळ परंपरेस धरूनच आहे; यांत नवीन असें कांही एक नाही.

'म्हातारी मेल्याचें दुःख नाही परंतु काळ सोकवतो' या न्यायावरच कायद्याचा प्रतिषेध करीत बसणें केवळ वेडगळपणाचें आहे. कारण सरकारने सामाजिक गोष्टींत आधीच हात घातला आहे; तसेंच ज्या कांही सामाजिक गोष्टींत सरकारने कायदे केले आहेत, व ज्या दुसऱ्या गोष्टींत कायदा असावा असें कित्येकांचें म्हणणें आहे, त्यांमध्येंहि त्या त्या गोष्टी सामाजिक या सदराखाली मोडतात किंवा नाही हा वाद अप्रासंगिक होय. व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या ज्या योग्य मर्यादा आहेत त्यांचा अतिक्रम होतो कीं काय, एवढ्याच धोरणाने कायदा असावा कीं नाही हें ठरविलें पाहिजे, व सरकारने जो सती जाण्यास प्रतिबंध केला, किंवा विधवेचें बेकायदेशीर मानलें जाणारें लग्न कायदेशीर ठरविलें तेंहि वरील तत्त्वास अनुसरून केलें व विधवावपनाचा चाल बंद करण्यास कायद्याची मदत असावी म्हणून जें कित्येकांचें मत आहे तेंहि वरील तत्त्वावरच अवलंबून आहे, वगैरे विचार वरील लेखांत दाखविले. या लेखांत बालविवाहाची चाल बंद करण्यास कायद्याचें साह्य घ्यावें असें जे कित्येकांचें म्हणणें आहे, त्याविषयी दोन शब्द लिहिण्याचा विचार आहे.

बालविवाहाची चाल अत्यंत घातक आहे! याविषयी आता बहुधा मत-भेद राहिला नाही. तसेच या दुष्ट चालीच्या तावडींतून आपण सुटलों असें म्हणता येण्यास, मुलगी निदान १५–१६ वर्षांची होईपर्यंत व मुलगा २०–२२ वर्षांचा होईपर्यंत त्या उभयतांचाहि 'नीतिशास्त्रां'त प्रवेश होऊं नये, हेंहि पुष्कळांस संमत आहे. परंतु हें घडवून आणण्यास कोणते उपाय योजावेत याबद्दलच काय तो वाद राहिला आहे. एका पक्षाचें म्हणणें असे पडते कीं, ही गोष्ट लोकांनींच आपल्या शिरावर घेतली पाहिजे; दुसऱ्या पक्षाच्या मते केवळ लोकांवरच ही जबाबदारी सोपविण्यापेक्षा, सरकार व लोक या उभयतांच्या साह्याने हें काम शेवटास नेण्याचा प्रयत्न करणें,

नुसतें इष्ट आहे इतकेंच नाही, तर तसें केल्यावाचून या बाबतींत आमचें पाऊल खात्रीने पुढे जाण्याची फारशी आशा नाही. आता सती जाण्याची चाल बंद करण्यास किंवा विधवाविवाह कायदेशीर ठरविण्यास जीं कारणें होतीं, किंवा विधवावपन बंद करण्यास जीं कारणें आहेत, तीच या बालविवाहाच्या चालीसहि पूर्णपणें लागू होतात, असे मात्र म्हणता येणार नाही. व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या योग्य मर्यादांचा जसा प्रत्यक्ष अतिक्रम वरील गोष्टींत होतो, तसा बालविवाहाच्या चालींत उघडपणे भासत नाही. या बालविवाहाच्या चालीमुळे लक्षावधि मुलांचा १२ दिवसांच्या आंतच मोक्ष होत असला, १६–१७ वर्षांतच मुलें बाप बनल्यामुळे त्यांची तारुण्यांतील हिम्मत व महत्त्वाकांक्षा सर्व जागच्या जागीं जिरून जात असली, किंवा ७–८ वर्षांपासूनच आईबापांच्या ममतेस पारखी होऊन सासरच्या माणसांच्या धाकाने मुलीचें सर्व व्यक्तित्व नाहीसें होऊन संसाराचा गाडा हाकण्यास ती सर्वतोपरी लंगडी होत असली, तथापि त्यांत काय झालें? त्यांत घोर अनर्थ तो कोठें घडला? व तो बंद करण्यास कायदा कशास पाहिजे? असा एक पक्ष करतां येण्यासारखा आहे हें आम्ही जाणून आहों. आता 'कृतान्तकटकामलध्वजजरा दिसों लागली। पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली॥' अशी स्थिति होऊन जाऊन ज्यांस मृत्युपाशाने घेरल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत अशा ९९ वर्षांच्या थेरड्यास 'नवरा मुलगा' समजून एखाद्या ७–८ वर्षांच्या अल्लड लेकरास बोहल्यावरच 'रंडकी' करण्यांत ज्यांस अनीतीचा यत्किंचितहि भाग दिसत नाही, व तिचा मात्र पुनर्विवाह झाल्यास 'अब्रह्मण्यम्', 'अब्रह्मण्यम्' म्हणून दाही दिशा दणाणून सोडण्यास जे तयार, अशा लोकांस, आईबापांनी व सासुसासऱ्यांनी केवळ आपल्या हौसेखातर सजीव बाहुलाबाहुलींचीं लग्न लावण्याचा खेळ खेळल्यापासून, 'तुमचा खेळ होतो परंतु आमचा जीव जातो' असें म्हणण्यास कशी जागा सापडते हें कळू नये हें अगदी असावें तसेंच आहे. तसेच एखाद्या चोरट्या सुनेस ओळ लावण्याकरिता तापल्या पळीने डागणें, किंवा तिला उलटी टांगून तिच्या पाठीचीं सालडीं काढणें हें जसें सासूचें कर्तव्यच आहे, त्याप्रमाणे पुढेमागे वाईट पाऊल पडेल एवढ्या संशयाच्या आरोपावरून एखाद्या बालविधवेची

न्हाव्याकडून धिंड काढविणें हें केवळ यथान्याय आहे अशीच ज्यांची समजूत अशा लोकांनी बालविवाहाच्या कायद्याच्या आड यावें यांतहि कांही विलक्षण नाही. व ही 'राष्ट्रीयसभा नुसत्या ब्राह्मणांचीच आहे व यापासून ब्राह्मण लोक आपलाच फायदा करून घेत आहेत' असे अजागळासारखे प्रलाप करणारे लोक वेडे आहेत म्हणून जसें सरकारने ते जमेस धरण्यासारखे नाहीत, तसेंच वरील लोकांचीहि सल्लामसलत घेण्याचें सरकारास कारण नाही. परंतु राजकीय गोष्टींत मत देण्यास ज्यांस अधिकार आहे, अशा सुशिक्षित लोकांत या बाबतींत केवळ एकमत जरी झालें नाही, तरी कायदा असावा असें बहुमत झाल्यावाचून मात्र कायदा करणें योग्य होणार नाही हें उघड आहे.

आता ज्या गोष्टींत प्रत्यक्ष अन्याय किंवा जुलूम होत नसेल असे समाजांतील दोष कायद्याने काढू पाहणें योग्य नाही असें आम्ही पूर्वी दर्शविले असून या चालीच्या निरसनार्थ कायद्याची मदत घ्यावी असें कां म्हणतों, हें प्रथम सांगितलें पाहिजे. बापाने मुलास, पंतोजीने शिष्यास किंवा भाडेकऱ्याने आपल्या तट्टास ममतेने, मन वळवून, चुचकारून मार्गास लावावें हा प्रथम पक्ष; परंतु तशाने सर्वच प्रसंगीं कार्यभाग होतो असें नाही. कधी मुलास बागुलबुवाचें भय दाखवावें लागतें, कधी शिष्यास घोडीवर चढविणें भाग पडतें व तट्टास बाभळीच्या फोकावाचून दुसरा उपाय अपुरा पडतो; तीच गोष्ट प्रस्तुत प्रसंगींहि लागू आहे. लग्न म्हणजे पोरखेळ नव्हे, त्याचा व समाजाच्या हिताचा फार निकट संबंध आहे. तेव्हा एकदा कशी तरी पोरांचीं हाडें भाजून काढलीं कीं, गंगेंत घोडें न्हालें असें समजून, काळ, वेळ वगैरे कांही न पाहता, जीं आईबापें आपल्या मुलांमुलींस चतुर्भुज करण्याविषयी अगदी हवरीं झालेलीं असतात, त्यांनी आपलें कर्तव्य जाणून स्वसंतोषाने हा 'पोरखेळ' सोडावा हा तर राजमार्ग. परंतु आईबापांच्या अज्ञानामुळे किंवा दुराग्रहामुळे तीं तसें करण्यास तयार नसतील, तर त्यांस कायद्याच्या बागुलबोवाने भिववणें अर्थात् अवश्य होतें. आता नुसत्या आईबापांच्या धाकाने किंवा शिक्षकाच्या दबकावणीने मुलांची सर्व सुधारणा होणारी नाही. मुलानेंहि कांही उमजलें पाहिजे हेंहि खरें. परंतु चवदाव्या रत्नाच्या भीतीने एकदा त्यास वळण लागलें म्हणजे

हळूहळू त्या वळणाच्या गोडीनेच त्याची सुधारणा होत जाते. तसेंच बाल-
विवाहाची चाल मोडून योग्य कालीं विवाह होऊं लागल्यास केवळ कायदा
बस्स आहे असें आम्ही मुळीच म्हणत नाही. कायद्याने फारच थोडा टप्पा
साधणार आहे; पुढचा सर्व मार्ग क्रमण्यास समाजाच्या पायांतच जोर
पाहिजे, त्यावाचून तो आवरणार नाही हें उघड आहे. कायदा ार झाले
तर मुलीच्या बाबतींत १०–१२ वर्षांपर्यंत मजल मारील किंवा मुलाच्या
बाबतींत १६–१७ वर्षांपर्यंत विवाहमर्यादा नेईल. परंतु एव चानेच
आपणांस समाधान मानून बसता येत नाही; आपणांस त्याच्या पुष्कळ पुढे
गेलें पाहिजे. कायद्याच्या योगाने इतकेच होईल कीं, १०–१२ व १६–१७
ही मर्यादा तरी कायमची झाल्यासारखी होईल. आजमितीस ज्या लोकांस
या दुष्ट चालीचे परिणाम माहीत नाहीत तेच याच्या पूर्वी लग्नें करतात
असें नाही; ज्या लोकांस आपली चूक पूर्णपणे दिसत असते अशाहि लोकांस
मुलगी ७–८ वर्षांची झाली नाही तोंच व मुलास १२ वें वर्ष लागलें नाही
तोंच त्यांच्या लग्नाच्या फिकीरींत पडावे लागतें. कारण, जातिभेदामुळे
वधूवरांची निवड करण्यास फारच आकुंचित प्रदेश असल्यामुळे, व
त्यांतल्या त्यांत नवीन शास्त्रार्थ मध्ये घुसून ब्राह्मणांतल्या ब्राह्मणांत देशस्थ,
कोकणस्थ, कऱ्हाडे असे वर्ग उत्पन्न झाल्यामुळे आपण आपली मुलगी
किंवा मुलगा वाढविला असता, त्यास पुढे योग्य स्थळ कसें मिळेल, ही
काळजी आईबापांपुढे दत्तासारखी उभी राहून त्यांचे सर्व सुधारणेचे विचार
जागच्या जागीं थिजून जातात. एखाद्या मनुष्याचे हात बांधून टाकून तो
कांही उद्योग करीत नाही म्हणून त्यास दोष देणें शहाणपणाचें नाही. तसें
सुधारणा व्हावी असें इच्छिणाऱ्या व बोलून दाखविणाऱ्या लोकांच्या
अडचणी दूर करता येण्यासारख्या असूनहि, त्या दूर न करता ‘ क्रियेवीण
वाचाळता व्यर्थ आहे ’ असा मोठ्या आढ्यतेने उपदेश करीत बसणें, व
जी गोष्ट आपल्या हातून घडत नाही, तीच गोष्ट दुसऱ्यांनी न केल्याबद्दल
त्यांचा उपहास करीत बसणें केवळ चुकीचें होणार आहे. ज्या सुधारणेचा
केवळ स्वतःपुरताच परिणाम घडणारा असतो अशा गोष्टींत मनुष्याने
स्वतःस झीज लावून घेऊन धैर्याचें उदाहरण जगास दाखवावें हें योग्य
आहे. परंतु ज्या सुधारणेचा दुसऱ्याच्या हिताहितांशीं प्रत्यक्ष संबंध

पोहोचतो अशा गोष्टींत, आपलें बोलणें खरें करून दाखविण्याकरिता, आपलें व आपणावर अवलंबून असणाऱ्या मुलाबाळांचें नुकसान करण्यास प्रवृत्त होणें हें सर्वथा योग्यच आहे असें खात्रीने म्हणता येण्यासारखे नाही. तात्पर्य, बालविवाहाची चाल घातक आहे असा जरी पुष्कळांचा समज झालेला आहे, तथापि इतरांचाहि तसा झाला आहे किंवा नाही या विषयी साशंक असल्यामुळे व आपल्या मुलाबाळांचें हिताहित पाहणे विशेष महत्त्वाचें कर्तव्य असल्यामुळे, त्या विचारांचा आचारावर परिणाम घडण्यास जी एक मोठी अडचण येते ती ह्या कायद्याने दूर होण्यासारखी आहे. सर्वच मुलींचीं लग्नें १०–१२ वर्षांच्या आंत होणार नाहीत किंवा सर्वच मुलांचीं १६–१७ वर्षांपूर्वी होणार नाहीत अशी कायद्याने हमी घेतली असता सर्वांचीच काळजी दूर होईल व आपलें एक तरी पाऊल पुढे पडलें असें खात्रीने म्हणता येईल. शिवाय १०–१२ वर्षांच्या कांही मुली अविवाहित राहतात, व त्याबद्दल कोणी तक्रार करीत नाही, येवढ्यावरून असा कायदा करण्यास लोकांची धर्मसमजूत आडवी येते असेंहि म्हणता येणार नाही. तात्पर्य, अशा बाबींत सामान्य दृष्टीनें पाहता कायद्याची मदत घेणें जरी सर्वांशीं ग्राह्य नाही, तथापि आमच्या समाजाचा पूर्व इतिहास व सांप्रतची स्थिति ही मनांत आणता हें आमचें निगरगट्ट तट्टू कायद्याच्या फोकावाचून सहसा हलणार नाही असें आम्हांस वाटतें.

आपल्या सुशिक्षित मंडळीस खरोखर आपली सुधारणा व्हावी ही गोष्ट जर इष्ट असेल तर आमच्या मते त्यांनी या कायद्याच्या आड येण्याचें कारण नाही. बाकी सुधारणाच नको असेल तर मग खुशाल ‘ थंडे सुधारक ’ व ‘ उतावळे सुधारक ’ वगैरे निरर्थक कोटिक्रम लढवून पांडित्य करीत बसावें. आम्ही असा कायदा असावा असें सुचविलें आहे त्यांत वावगें असें कांही नाही. त्याच्या योगाने समाजाच्या धर्मसमजुतीस धक्का पोहोचण्याचें भय नाही. त्याच्या योगे पुष्कळांस इष्ट असणारी सुधारणा अनायासाने होणारी आहे व तीहि फारच नियमित असून सर्वांस संमत अशीच आहे. ‘ तुमच्या राष्ट्रीय सभेंत स्त्रियाहि हजर आहेत हें पाहून मला फार आनंद होतो ’ असे मि. ब्राडलॉचे उद्‌गार ऐकून टाळ्यांचा गजर करून सोडणारे

हिंदुस्थानच्या २५ कोटि प्रजेचे मुखत्यार जर अप्रामाणिक नसतील, तर या कायद्याने विवाहमर्यादा कायमची १०–१२ वर्षांवर येऊन, तितका वेळ तरी ज्यास जसें इष्ट असेल तसें मुलीस शिक्षण देण्याची सोय होणारी आहे; अशा विचाराने ते या कायद्याच्या आड येणार नाहीत अशी आम्हांस आशा आहे. १०–१२ वर्षांच्या पूर्वी विवाह न झाल्याने पुष्कळ बालवधूंचें कुंकू पुसलें जाणार नाही; अशा मुग्ध वयांत सासरीं कसें वागावें हें न कळल्या-मुळे, त्यांच्या हातून ज्या चुका होतात, त्यासहि संधि राहणार नाही, व आईबापांच्या बेचाळीस कुळांचा उद्धार होण्याचें थांबून, त्या लेकरांचाहि पुष्कळ जाच अनायासे दूर होईल. पेनाच्या एका तडाख्यासरशीं सर्व सुधारणा करूं पहाण्याचा आरोपहि या कायद्यावर आणता येण्यासारखा नाही. बालविवाहाचा प्रघात खरोखर मोडण्यास समाजानेच तयार झालें पाहिजे ही गोष्ट हा कायदा विसरला नाही. बापाच्या घरीं मुलीस ऋतु प्राप्त झाला असता बेचाळीस कुळचा नर्कांत जाणार ही वेडगळपणाची समजूत दूर करणें म्हणजे एखादा प्रचंड पर्वत जमीनदोस्त करण्यासारखे आहे. व या पर्वतावर आघात करीत बसण्याचें काम समाजासच केलें पाहिजे, तें मात्र कायद्याने होणें अशक्य आहे. फार दिवसपर्यंत एकाच स्थितीशीं खिळून गेलेल्या या आमच्या समाजास प्रथम गति देण्याचें काम मात्र कायद्याने होणारे आहे. आगगाडी चालूं लागण्यापूर्वी जसा थोडासा धक्का सोसावा लागतो तसाच हा कायद्याचा कडक उपाय गौण असला तथापि तो पत्करला पाहिजे. एखादा मनुष्य रोगाने जर्जर झाला असता नुसत्या मात्रेच्या वेढ्याने त्यास म्हणजे पूर्ण उतारा पडून तो धट्टाकट्टा होतो असें नाही, तर त्याच्या योगाने केवळ प्राण मात्र बचावतो. तशीच केवळ या कायद्याची गोष्ट आहे. यांत उतावळेपणाचा गंध नाही. ज्या सर-कारच्या न्यायप्रियतेवर आमचा इतका विश्वास आहे कीं, आम्ही सर्वस्वी गुलाम बनलों आहों; तथापि त्याच्याच मदतीने आम्ही स्वतंत्र ज्ञानपद होऊं असा आमचा पूर्ण भरंवसा आहे; ज्यांच्या केवळ भूतदयेने असंख्य गुलाम आज स्वातंत्र्य भोगीत आहेत, व आम्हांसारख्या परधर्मी, भिन्नवर्णी व हजारो कोसांच्या अंतरावर राहणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठी अश्रान्त श्रम करणारे मि. ह्यूम, मि. ब्रॉडलॉ ह्यांच्यासारखे शेकडो उदार महात्मे

ज्या लोकांत निपजतात, त्या लोकांनी नियंत्रित अशा हिंदुस्थानसरकारापाशीं आम्ही कायदा मागितला असता काय परिणाम ओढवतील कोण जाणे, म्हणून बळेंच आपण भ्यालयासारखे दाखवून दुसऱ्या असंख्य लोकांस भिवविण्याचा प्रयत्न करण्यांतच जर थंडी सुधारणा असेल तर अशा थंड्या सुधारकापासून ईश्वर आम्हांस वाचवो ! आम्हांस त्यांची प्राणघातक माया नको ! ज्यांच्याकरिता एखादी सुधारणा करावयाची त्यांच्यावर त्या सुधारणेने प्रत्यक्ष जुलूम होत असूनहि ती सुधारणा कोणी करूं पाहील तर त्याच्या आड येणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे, व अशा लोकांसच जर योग्य रीतीने 'थंडे सुधारक' म्हणता येईल तर मग बालविवाहाच्या दुष्ट प्रघातांत, लोकांवर प्रत्यक्ष जुलूम न करिता, अंशतः प्रतिबंध करण्यास साधनीभूत असा कायदा मागणाऱ्या लोकांस 'उतावळ्या सुधारकां'त ओढून, तुला न मला घाल कुत्र्याला, असा प्रकार सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांनी कां करावा हें आम्हांस समजत नाही.

## ३. शिवाजीची एक रात्र

**— शि. म. परांजपे**

शिवाजी लहान होता. वडलांचा धाक आणि आईची प्रीति ह्यांच्या मिश्रणामध्ये कधी विद्या तर कधी क्रीडा अशा अवस्थेंत त्याचे दिवस जात होते. त्याच सुमारास दुसरीकडे हिंदुस्थानवर परकी लोकांचे अतिशय जुलूम चाललेले होते. देवळें मोडावीं, गाई कापाव्या, ब्राह्मण बाटवावे, लोकांना लुटावे, गावच्या गाव बेचिराख करावे, गरिबांच्या कत्तली कराव्या, असे अनेक अनर्थावह जुलूम देशावर चालले होते. ते पाहून शिवाजीच्या कोवळ्या मनावर फार विलक्षण परिणाम होत असत; व या सगळ्या जुलुमांपासून आपल्या देशाला आणि आपल्या देशबांधवांना कसे स्वतंत्र करावे याबद्दल तो रात्रंदिवस विचार करीत असे. परंतु हे विचार त्या वेळींसुद्धा उघडपणे बोलण्याची चोरी होती. त्यामुळे त्याच्यासारख्या कलाचे जे कोणी चार

हिंदुस्थानच्या २५ कोटि प्रजेचे मुखत्यार जर अप्रामाणिक नसतील, तर या कायद्याने विवाहमर्यादा कायमची १०–१२ वर्षांवर येऊन, तितका वेळ तरी ज्यास जसें इष्ट असेल तसें मुलीस शिक्षण देण्याची सोय होणारी आहे; अशा विचाराने ते या कायद्याच्या आड येणार नाहीत अशी आम्हांस आशा आहे. १०–१२ वर्षांच्या पूर्वी विवाह न झाल्याने पुष्कळ बालवधूंचें कुंकू पुसलें जाणार नाही; अशा मुग्ध वयांत सासरीं कसें वागावें हें न कळल्यामुळे, त्यांच्या हातून ज्या चुका होतात, त्यासहि संधि राहणार नाही, व आईबापांच्या बेचाळीस कुळांचा उद्धार होण्याचें थांबून, त्या लेकरांचाहि पुष्कळ जाच अनायासे दूर होईल. पेनाच्या एका तडाख्यासरशीं सर्व सुधारणा करूं पहाण्याचा आरोपहि या कायद्यावर आणता येण्यासारखा नाही. बालविवाहाचा प्रघात खरोखर मोडण्यास समाजानेच तयार झालें पाहिजे ही गोष्ट हा कायदा विसरला नाही. बापाच्या घरीं मुलीस ऋतु प्राप्त झाला असता बेचाळीस कुळचा नर्कांत जाणार ही वेडगळपणाची समजूत दूर करणें म्हणजे एखादा प्रचंड पर्वत जमीनदोस्त करण्यासारखे आहे. व या पर्वतावर आघात करीत बसण्याचें काम समाजासच केलें पाहिजे, तें मात्र कायद्याने होणें अशक्य आहे. फार दिवसपर्यंत एकाच स्थितीशीं खिळून गेलेल्या या आमच्या समाजास प्रथम गति देण्याचें काम मात्र कायद्याने होणारे आहे. आगगाडी चालूं लागण्यापूर्वी जसा थोडासा धक्का सोसावा लागतो तसाच हा कायद्याचा कडक उपाय गौण असला तथापि तो पत्करला पाहिजे. एखादा मनुष्य रोगाने जर्जर झाला असता नुसत्या मात्रेच्या वेढ्याने त्यास म्हणजे पूर्ण उतारा पडून तो धट्टाकट्टा होतो असें नाही, तर त्याच्या योगाने केवळ प्राण मात्र बचावतो. तशीच केवळ या कायद्याची गोष्ट आहे. यांत उतावळेपणाचा गंध नाही. ज्या सरकारच्या न्यायप्रियतेवर आमचा इतका विश्वास आहे कीं, आम्ही सर्वस्वी गुलाम बनलों आहों; तथापि त्याच्याच मदतीने आम्ही स्वतंत्र ज्ञानपद होऊं असा आमचा पूर्ण भरंवसा आहे; ज्यांच्या केवळ भूतदयेने असंख्य गुलाम आज स्वातंत्र्य भोगीत आहेत, व आम्हांसारख्या परधर्मी, भिन्नवर्णी व हजारो कोसांच्या अंतरावर राहणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठी अश्रान्त श्रम करणारे मि. ह्यूम, मि. ब्रॉडलॉ ह्यांच्यासारखे शेकडो उदार महात्मे

ज्या लोकांत निपजतात, त्या लोकांनी नियंत्रित अशा हिंदुस्थानसरकारापाशीं आम्ही कायदा मागितला असता काय परिणाम ओढवतील कोण जाणे, म्हणून बळेंच आपण भ्याल्यासारखे दाखवून दुसऱ्या असंख्य लोकांस भिवविण्याचा प्रयत्न करण्यांतच जर थंडी सुधारणा असेल तर अशा थंड्या सुधारकापासून ईश्वर आम्हांस वाचवो ! आम्हांस त्यांची प्राणघातक माया नको ! ज्यांच्याकरिता एखादी सुधारणा करावयाची त्यांच्यावर त्या सुधारणेने प्रत्यक्ष जुलूम होत असूनहि ती सुधारणा कोणी करूं पाहील तर त्याच्या आड येणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे, व अशा लोकांसच जर योग्य रीतीने 'थंडे सुधारक' म्हणता येईल तर मग बालविवाहाच्या दुष्ट प्रघातांत, लोकांवर प्रत्यक्ष जुलूम न करिता, अंशतः प्रतिबंध करण्यास साधनीभूत असा कायदा मागणाऱ्या लोकांस 'उतावळ्या सुधारकां'त ओढून, तुला न मला घाल कुत्र्याला, असा प्रकार सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांनी कां करावा हें आम्हांस समजत नाही.

# ३. शिवाजीची एक रात्र

— शि. म. परांजपे

शिवाजी लहान होता. वडलांचा धाक आणि आईची प्रीति ह्यांच्या मिश्रणामध्ये कधी विद्या तर कधी क्रीडा अशा अवस्थेंत त्याचे दिवस जात होते. त्याच सुमारास दुसरीकडे हिंदुस्थानवर परकी लोकांचे अतिशय जुलूम चाललेले होते. देवळें मोडावीं, गाई कापाव्या, ब्राह्मण बाटवावे, लोकांना लुटावे, गावच्या गाव बेचिराख करावे, गरिबांच्या कत्तली कराव्या, असे अनेक अनर्थावह जुलूम देशावर चालले होते. ते पाहून शिवाजीच्या कोवळ्या मनावर फार विलक्षण परिणाम होत असत; व या सगळ्या जुलुमांपासून आपल्या देशाला आणि आपल्या देशबांधवांना कसे स्वतंत्र करावे याबद्दल तो रात्रंदिवस विचार करीत असे. परंतु हे विचार त्या वेळींसुद्धा उघडपणे बोलण्याची चोरी होती. त्यामुळे त्याच्यासारख्या कलाचे जे कोणी चार

सोबती त्याला भेटत त्यांच्याशीं तो संध्याकाळच्या संधिप्रकाशांत किंवा मध्यरात्रीच्या निबिड अंधकारांत आपल्या भावी पराक्रमांचे गुप्त कट करीत बसे, व अशा वेळीं स्वदेशाच्या स्वतंत्रतेच्या मनोराज्यामध्ये पुष्कळ वेळा तो अगदी गर्क होऊन जात असे.

असल्या स्वदेशाच्या स्वातंत्र्याच्या कल्पनांनी त्याचें डोकें भणाणून गेलेले असल्यामुळे आत्मसदृशवृत्तीच जेथे तेथे संचरत राहिली आहे असा सदोदित त्याला भास होत असे. अशा मनाच्या स्थितींत एके दिवशीं संध्याकाळीं तो एकटाच बसला असता त्याचे लक्ष आकाशांत हळूहळू एकेक दिसू लागणाऱ्या ताऱ्यांकडे व नक्षत्रांकडे वेधलें. त्यांच्याकडे पाहत तो स्तब्ध राहिला. त्याच्या मनाने पृथ्वीवरील दाट हवेचें वातावरण सोडलें, आणि तो मवाचा अतिशय हलका आणि अतिशय सूक्ष्म परमाणु वायूच्या सरोवराच्या पृष्ठभागावर पोहणाऱ्या एखाद्या पतंगाप्रमाणे वरवर तरंगत जाऊं लागला. जितके जितके उंच जावे तितका तितका जास्त विस्तीर्ण देखावा दिसूं लागतो, हा एक निसर्गदेवतेच्या राज्यांतील कायदा आहे. आणि त्यांतून कल्पनेची दृक्शक्ति तर फारच विलक्षण असते ! शिवाजी त्या ताऱ्यांना उद्देशून म्हणाला :—

"हे ताऱ्यांनो, तुम्ही आहां तरी कोण ? तुम्ही तारेच असाल अशी माझी आजपर्यंत समजूत होती; पण आता मला तुमच्या नेहमीच्या कृतीवरून कांही निराळाच भास होऊ लागला आहे. आता तुमचे खरे स्वरूप हळूहळू माझ्या लक्षांत येऊ लागले आहे. मला वाटत आहे तेंच खरें असलें पाहिजे ! जुलुमाच्या अतिरेकावाचून आणि परिस्फोटाच्या दहशतीवाचून असली वर्तणूक संभवावयाची नाही ! इतक्या उंचावर देखील जुलमी राजे गेले आहेत ना ! शिव ! शिव ! या जुलमी राजांच्या जुलमाने ज्यांना जेरीस आणलें नाही असे लोक विरळाच सापडतील. हें जग खालपासून वरपर्यंत देवाने जुलमी राजांच्या जुलमाकरतांच निर्माण केलें आहे कीं काय कोण जाणे !—तुमच्याबद्दल माझा तर्क अगदी बरोबर आहे. सूर्य मावळून अंधार पडत चालला म्हणजे तुमच्यापैकी एकेकजण या पटांगणामध्ये येऊ लागतो. एक पूर्वेकडून येतो तर दुसरा पश्चिमेकडून येतो. एक दक्षिणेकडून आला तर दुसरा उत्तरेकडून डोकावू लागतो. कोठे कोणी दिसत नसता

एकदम तुम्ही या ठिकाणी येता. आपल्याला कोणी ओळखील म्हणून आपल्या गुप्त मसलतीच्या या गुप्त संकेतस्थानीं येऊन पोहोचेपर्यंत आपली वाट गुप्त आणि अदृश्य रीतीने चालण्याची मोठी अजब हातोटी तुम्हास साधली आहे! कोठे कांही दिसत नसता एकदम तुम्ही या शून्य संकेत-स्थानीं कसे जमता! --एक आला, दोन आले, दहा आले, पंचवीस आले, शंभर आले,—अबब! थोड्याशा वेळांत किती तरी हे गुप्त कटवाले या निर्मानुष मैदानामध्ये एकाएकीं जमा झाले! हे किती असतील! आता यांची संख्या कसली मोजता येते!—एखाद्या विस्तीर्ण रणमैदानावर लढाईच्या पूर्वी दबा धरून बसलेल्या असंख्य शिपायांच्या पलटणी लढाईची वेळ आली म्हणजे जशा चोहोबाजूंनी एकदम पुढे सरसावतात, त्याप्रमाणे या आकाशांतील गुप्त कटवाल्यांची स्थिति दिसत आहे!—हे ताऱ्यांनो, तुम्हाला गुप्त रीतीने एकत्र जमा होण्याची ही हातोटी किती तरी छान साधली आहे! तुम्ही इतकेजण येथे जमला, पण कोठे एक पाऊल तरी वाजले आहे का! किंवा कोठे थोडासा तरी गलबला झाला आहे का! किती गुपचुप पद्धत! इतक्या गुप्त रीतीने तुम्ही वावरता यावरून तुमच्यावर फारच कडक जुलूम चाललेला असला पाहिजे! रात्रीच्या अंधा-रांत तुम्ही लपून छपून येथे येता त्यावरून दिवसास तुम्हाला एकमेकांपाशीं आपली अन्तकरणे मोकळी करून आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगण्याची सक्त मनाई असली पाहिजे! अरेरे! इतक्या जाचांत तुम्हांला ठेवणारा असा कोणता तरी राजा तुमच्यावर जुलूम करीत आहे! आमची या पृथ्वीतलावरील लोकांची पुराणादिकांतील गोष्टींवरून साधारणपणे अशी समजूत झालेली आहे कीं, नरकलोक खाली आहे आणि स्वर्गलोक वर आहे! पण छे, छे! वर देखील गुलामगिरीचा नरकलोक आहेच असें दिसते! तुमच्यावर कोणता जुलमी राजा राज्य करीत आहे?—सांगा, सांगा, मला तुम्ही त्याचे नांव निर्भयपणाने सांगा. माझ्याबद्दल तुम्हाला यत्-किंचितहि शंका नको. मी कांही कोणी जुलुमी राज्यांच्या जुलुमाला मदत करणारा गुप्त हेर नव्हे. उलट मी तुमच्यासारख्याच दुसऱ्या एका जुलुमी राज्याच्या जुलुमाने गांजलेला प्राणी आहे. तुम्ही ज्या स्वतंत्रतेच्या प्राप्ती-साठी गुप्त बेत करण्याकरता या ठिकाणी एकत्र जमला आहां, त्याच स्वतं-

त्रतादेवीचा मीहि एक उपासक आहे. तुम्हाला जसें कोणी तरी गुलाम बनविले आहे, त्याचप्रमाणे मी गुलामगिरीमध्ये सापडलो आहे. पण या गुलामगिरीचे साखळदंड लवकरच तोडल्यावाचून मी कधी राहणार नाही असा माझा निश्चय आहे. असल्या मनुष्यापाशीं तुम्ही आपले रहस्य सांगणार नाही, तर तुम्हाला माझ्यासारखा समदुःखी व माझ्यापेक्षा जास्त विश्वसनीय असा कोण स्वदेशभक्त भेटणार ?—तेव्हा सांगा. मोकळ्या मनाने मला सांगा. तुमच्यावर कोण दुष्ट जुलूम करीत आहे ? माझ्या देशाचे नांव हिंदुस्थान आहे, त्याप्रमाणे तुमच्या देशाचे नांव काय ? तो आहे कोठें, आणि त्याची स्वतंत्रता गेली केव्हा, हे तुम्ही सगळे मला सांगा. तुमची स्वतंत्रता तुमच्या जुलुमी राजाने कशा रीतीनें फसवून घेतली हे तुम्ही मला आधी सांगा. बहुतकरून सगळ्या जुलुमी राजांची फसविण्याची एकच तऱ्हा असते. त्याने तुमच्यांत फूट पाडून तुम्हाला जिंकलें काय ? आणखी त्याने तुमच्या देशांत काय काय अनन्वित कृत्यें केलीं ? बहुतकरून त्याने तुमची रत्नखचित देवळें तर खास फोडली असली पाहिजेत; कारण हे सर्व आकाशभर अस्ताव्यस्त पडलेले त्या भग्न करून टाकलेल्या देवळांच्या कोंदणांतील लखलखीत हिरे या गोष्टीची साक्ष स्पष्टपणे देत आहेत. इतके हिरे ज्यांनी टाकून दिले त्यांनी लूट करून नेलेल्या हिऱ्यांची संख्या किती तरी प्रचंड असेल ! काय ही लूट ! आणि काय हा परचक्राचा भयंकर परिणाम ! आकाशांत हल्ली जी जी मोकळी जागा दिसत आहे ती सगळी पूर्वी हिऱ्यांच्या राशींनी भरून गेलेली असेल ! आणि त्या राशी लुटारूंनी आपल्या कंठाळींत भरून नेल्यामुळेच बहुतकरून आता ही मधून मधून हजारो ठिकाणी रिकामी जागा पडली असली पाहिजे ! इतकी ही तुमची दुर्दशा कोणी केली ?—हे ताऱ्यांनो, नक्षत्रांनो, आणि ग्रहांनो—तुमचे इतके हाल होत असूनहि ते तुम्ही मुकाट्याने कसे सहन करतां ? तुमच्यापैकी जे नवग्रह आहेत ते फार मोठे पराक्रमी म्हणून आमच्या मृत्युलोकांत त्यांची अतिशय ख्याति आहे. मग हे ग्रहांनो तो तुमचा पराक्रम कोठें गेला ?—अथवा कसला पराक्रम आला आहे ? तुम्हा ग्रहांनादेखील केव्हातरी ग्रहदशा असलीच पाहिजे ? आणि या गुलामगिरीच्या ग्रहदशेच्या फेऱ्यांत सापडलेल्या कोणाचाहि पराक्रम चालत नाही ! आणि हे नवग्रहांनो,

या नियमाला तुम्हीहि अपवाद नाही. तुम्ही अनेक वेळा अनेक दानवांच्या गुलामगिरींत बांधलेले आहा, रावणाने तर तुम्हा नऊजणांना एकमेकावर पालथे घालून आपल्या जिन्याच्या नऊ पायऱ्या केल्या होत्या! गुलामगिरींत सांपडल्यावर कोणाचे शहाणपण चालत नाही. तुमच्यापैकीं मंगळ लढवय्या आहे, बुध बुद्धिमान आहे, गुरु उत्कृष्ट मंत्री आहे, शुक्र अत्यंत कुशल आहे, आणि शनीसारखा उच्छेद करून टाकणारा दुसरा कोणी आढळणारच नाही. मग हे मंगळबुधादिक ग्रहांनो, स्वराज्य आणि स्वतंत्रता यांच्याकरिता लागणारे सर्व आवश्यक गुण तुमच्या अंगांत असतांना तुम्ही असे रात्रीचे अंधारांत आणि निर्मानुष जागेंत चोरट्यासारखे गुप्त खल करण्याकरता कां जमता! हे शनैश्चरा, तूं गरिबांच्या पाठीस लागून त्यांना आपल्या साडेसातींत बुडवून टाकतोस, तें तुझे विध्वंसक सामर्थ्य या जुलमी राजांवर तूं उपयोगांत का आणीत नाहीस? तुझी आज्ञा शिरसावंद्य मानून तुझ्या भोवती सदोदित घिरट्या घालीत असणाऱ्या आपल्या सर्व उपग्रहासह वर्तमान तूं या जुलमी राजांना आपल्या पूर्ण दृष्टीच्या आकर्षणामध्ये आणून त्यांना रसातळाला का नेऊन पोहोचवीत नाहीस?—अथवा तुम्हीहि आम्हा मनुष्याप्रमाणेच गुलामगिरीचे जोखड झुगारून देण्याला असमर्थ आहा असे दिसते, तरी पण तुम्ही सगळेजण रात्रीच्या अंधकारांत एकत्र जमून गुप्त विचार करीत आहा हे कांही वाईट नाही. तुम्ही स्वतंत्रतेच्या मार्गांत आहा आणि तुमची ही गुप्त कट करण्याकरता जमण्याची जागा तर फारच मजेदार आहे! आम्हाला जर अशी जागा मिळती तर किती छान झाले असते! आमच्या या जमिनीवर कोठे कांही गुप्त गोष्ट बोलण्याची किंवा गुप्त बेत करण्याची सोय नाही. जिकडे जावे तिकडे चहाडखोर! हे ताऱ्यांनो, मी आपल्या साथीदारांना घेऊन आमच्या स्वतंत्रतेचे गुप्त कट करण्याकरिता तुमच्या या रमणीय जागेंत येऊन बसत जाऊं का? आम्हाला येथे कोठे चांगली जागा नाही. आमच्या या जगांत फार घाण भरली आहे. दुष्ट, नीच, अधम, लबाड, विश्वासघातकी, अन्योन्यद्वेषी, क्षुद्र दृष्टीचे आणि स्थूळ पातकांचे, अन्तकरण वृत्तीचे हलके आणि बुद्धीने जड, अशा असंख्य प्राण्यांना यमाचे दूत नरकलोकाकडे

नेत असता त्यांची नजर चुकवून ते या भूलोकांत शिरून येथील किल्ल्यांतून आणि राजवाड्यांतून दडून बसलेले आहेत. असल्या ठिकाणीं बसून कोणतेहि चांगले नवीन विचार मनांत उत्पन्न व्हावयाचे नाहीत कारण विषकुंडांत अमृतवल्ली कधीहि उगवत नाहीत. उलट जे उदात्त विचार असतील ते यांच्या या घाणेरड्या संसर्गाने कुजून आणि सडून गेल्यावाचून राहावयाचे नाहीत. म्हणून मी म्हणतों कीं, हे ताऱ्यांनो, आम्ही तुमच्या त्या जागेंत गुप्त बेत करण्याकरता येऊं का ? ती तुमची जागा किती शांत दिसत आहे ! तेथे जाऊन एखाद्या ढगावर बसावे असे वाटते ! आम्ही सगळे साथीदार जमून तेथे आलो तर खात्रीने तेथे आम्हाला आपल्या स्वदेशाच्या स्वतंत्रतेच्या प्राप्तीचे कांही तरी उत्कृष्ट विचार सुचतील असे मला वाटते. आम्ही तेथे येऊं का ? तुमच्या जागेंतील ही रात्र किती प्रशान्त, गंभीर आणि रमणीय दिसत आहे ! आम्हाला पृथ्वीतलावर अशा रात्री फार दुर्मीळ असतात. येथील रात्री म्हणजे सगळ्या दुष्ट आणि निंद्य कर्मांच्या हंगामाची वेळ. व्यभिचार, वेश्यागमन, मद्यपान, जुगार, नाच, तमाशे, बीभत्सपणा, चहाड्या, घरे फोडणें, आगी, दरवडे, गुप्त छापे, खून वगैरे सर्व लहानमोठ्या पातकांच्या गर्दीने येथील रात्रींचा शांतपणा अगदी गजबजून गेलेला असतो ! येथे कोणाला गुलामगिरीचा तिटकारा नाही आणि तोंडपुजेपणाचा वीट नाही. आपसांत भांडत बसल्याबद्दल कोणाला लाज नाहीं, व क्षुद्र हेतु साधून घेण्यातच मोठेपणा आहे असे मानण्यांत कोणाला कमीपणा नाही. असल्या जगापासून अलिप्त होण्याकरता क्षणभर तरी आम्ही वर येऊं का ? हे ताऱ्यांनो, तुमच्या प्रकाशाच्या किरणासारख्या दिसणाऱ्या तुमच्या त्या सोन्याच्या तारेने विणलेल्या दोरखंडाच्या दोऱ्या खाली सोडाल काय ? म्हणजे आम्ही सगळेजण पटापट त्यांना धरून वर चढून येऊ. आमच्यापैकी सगळ्या साक्षीदारांना दोरीला धरून उंच उंच किल्ले चढण्याची चांगली सवय आहे. आम्ही तुम्हाला ही तसदी दिली नसती, पण काय करावे ? देवाच्या पक्षपातापुढे कोणाचाच इलाज नाही. यःकश्चित पक्ष्यांना देखील त्या देवाने पंख दिले आहेत. मग मनुष्यांवरच त्याची इतकी इतराजी कां झाली कोण जाणे ! अतिशय सूक्ष्म आणि परमाणुप्राय अशी जी कल्पनाशक्ति तिला देखील पंख

आहेत ! पण हा मनुष्याचा इतका स्थूल देह असून त्याच्या हातांत अंतरिक्षांतील स्वेच्छाचाराचे कांही एक साधन ठेविलेले नाही ! पाण्यावर पोहता येण्याची तरी शक्ति देवाने मनुष्याच्या अंगांत ठेविली आहे ही एक त्याची मेहेरबानीच समजावयाची ! नाही तर त्याने मनुष्याला ज्याप्रमाणे अकलेने दगड केले आहे, त्याचप्रमाणें वजनानेहि दगड केले असते, तर बिचारा मनुष्यप्राणी काय करणार होता ! शरीराच्या पंचीकरणाच्या वेळीं या कातडीच्या पोत्यांत देवाने हे मातीचे गोळे जरा कमी भरले असते तर आम्ही तुमच्या या शांत आणि रमणीय देशाच्या सरहद्दीवर येऊन तेथ कितीतरी उपयुक्त गोष्टी केल्या असत्या. आमच्यावर जुलूम करणारे लोक आपल्या उंच उंच प्रतोलिकांवर आमच्या देशांतील साध्वी स्त्रियांना धरून नेऊन जो गुप्त बलात्कार करीत असतात, तो आम्ही वरून पकडला असता आणि आकाशांतील एखाद्या ढगाच्या अंतर्भागांत एखाद्या गुप्तीप्रमाणे गुप्त असलेली वीज क्षणभर उचलून घेऊन ती त्या दुष्ट अधमांच्या डोक्यावर वरून खाली फेकून दिली असती ! शत्रूच्या सैन्याची आम्ही वरून टेहळणी केली असती, आणि त्यांची सगळी छावणी पूर्णपणे चिरडून जाईपर्यंत वरून आम्ही ढगांचे ढीगच्या ढीग खाली ढकलून दिले असते ! —पण देव फार मत्सरी आहेत. ते आकाशांत मनुष्याला येऊं देत नाहीत. त्रिशंकु राजाला देखील अर्ध्या वाटेंत अडवण्यांत आले ! पण ते मनुष्याला अक्कल देऊन चुकलेले आहेत, आणि याबद्दल त्यांना लवकरच केव्हातरी पश्चात्ताप झाल्यावाचून राहणार नाही.—पण हे ताऱ्यांनो, आम्हाला वर येतां आले नाही, तर निदान तुमचे काय काय बेत चालले आहेत ते तरी मला कळू द्या. तुम्ही एकमेकांशीं काय बोलत आहा ? तुमचे विचार काय चालले आहेत ? तुमच्यावर जो राजा जुलूम करीत आहे, त्याचा तुमच्या देशांतून उच्छेद करून टाकण्यासाठी तुम्ही काय उपाय योजीत आहा ? तुमच्यापैकी कोणी एकमेकांच्या कानाशी लागून कांही कानगोष्टी करीत आहेत; कोणी हातांत हात घालून बसले आहेत; कोणी आपआपल्या पुढाऱ्यांच्या सभोवतीं वर्तुळ करून त्यांची सल्लामसलत ऐकत आहेत; आणि कोणी एकटेच एकीकडे जाऊन विचार करीत आहेत; पण या सगळ्या खलबतानंतर तुमचा अखेर निकाल काय ठरतो, तो कोणी तरी

मला आधी सांगा. आमच्या देशांत त्याची फार आवश्यकता आहे; म्हणून मी एवढचा काकुळतीला येऊन तुमची याचना करीत आहे. तुमची काय बोलणी चालली आहेत, तीं मी कान लावून ऐकत आहे; पण कांही ऐकू येत नाही. तेव्हा तुम्हींच होऊन कांही सांगितले तर ते मला कळण्याचा मार्ग आहे.—किंवा अजून पारतंत्र्याचे जोखड कसें मोडावे आणि स्वातंत्र्याचे निशाण कसें उभारावें, याच्याबद्दल तुमचा कांही निश्चय ठरलाच नाही? पण वास्तविक तुम्हाला इतकी अडचण पडू नये. प्रत्यक्ष बृहस्पतीसारखे वक्ते तुमच्या या सभेंत हजर आहेत. राजधर्म, दंडनीति, इत्यादिकांचा मुख्य प्रवर्तयिता जो देवयानीपिता शुक्र तो तुम्हाला मसलत सांगण्याला बसलेला आहे. सप्तऋषि आकाशगंगेच्या निर्मळ प्रवाहांत स्नान करून तुमच्या स्वतंत्रतेकरिता धृववृक्षाच्या पारासभोवतीं प्रत्यही प्रदक्षिणा घालून तपश्चर्या करीत आहेत. अरुंधतीसारख्या पवित्र स्त्रियांच्या पातिव्रत्याच्या तेजाचीहि तुमच्या देशकार्याला मदत आहे. शत्रूंशीं नेटाने टक्कर देणारे त्या अश्विनी नक्षत्राजवळील मेषासारखे योद्धे तुमच्यामध्ये आहेत. सर्व पशूंचा राजा आणि बलाने जो अतिबलाढच असा जो सिंह त्याचेहि साहाय्य तुम्हाला आहे. इतकी सामग्री जवळ असता तुमच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे बेत अजून कायम होत नाहीत, हे मोठे आश्चर्य आहे. याच्या निम्मी सामग्री माझ्या हातीं येती, तरी देखील मी आपला देश केव्हाच स्वतंत्र करून सोडला असता—अरेरे! हे मृगशीर्ष नक्षत्रांतील व्याधा, मी तुला असा हा बाण मारतांना किती तरी दिवस पाहत आहे! आता हे तुझे शरसंधान पुरे. तो बिचारा मृग कधीच मरण पावलेला आहे. मग आता रोजरोज तूं याच्या पाठीमागे कां धावत असतोस? आणि त्याच्या पोटांत रोज तूं आपला बाण कां फेकीत असतोस? मेलेल्यांना मारण्यांत किंवा गरीब मृगांची मृगया करीत बसण्यांत व्यर्थ कालक्षेप करून कांही मोठा पुरुषार्थ साधतो असे नाही. अरे, तुझे सगळे देशबांधव आपल्या देशाच्या स्वतंत्रतेकरता गुप्त बेत करीत असता तूं आपल्या भात्यांतील बाण या मृगयेमध्ये व्यर्थ दडवीत आहेस, त्या तुला काय म्हणावे? तुझ्या हातांत परमेश्वराने जे धनुष्यबाण दिले आहेत ते या गरीब मृगांना मारण्याकरता नव्हेत.

तर तुझ्या स्वतंत्रतेचे जे शत्रू असतील त्यांना मारण्याकरता ते आहेत.—हे कृत्तिकांनो, तुम्ही या गुप्त मंडळीमध्ये हजर असताना या मंडळीचे देशकार्य साधूं नये, हे शक्य तरी कोण मानील? जगांतील सगळ्या सेनापतींचा आदिगुरु—देवांचा शिवाजी—जो षडानन त्याला तारकासुराच्या वधाकरिता आणि देवांच्या स्वातंत्र्याकरता तुम्ही धात्रीप्रमाणे आपल्या दिव्य शक्तीचे दूध पाजून वाढविले, त्या तुमच्या दुधांतील शक्ति आजच कशी नाहीशी झाली? त्या पहिल्या दिव्य सेनानीच्या मुखस्पर्शाने पवित्र झालेला तो दुधाचा झरा कधीहि आटावयाचा नाही. जेव्हा जेव्हा जुलुमी दैत्य गरीब प्रजेला छळतील, तेव्हा तेव्हा त्याचे जोखड झुगारून देऊ इच्छिणाऱ्या भावी लोकांच्या चेतनेकरता दूरदर्शी आणि परोपकारी भगवान् षडाननाने तें अमृततुल्य दुग्ध मुद्दाम कांही तरी अवशिष्ट ठेवलेले असले पाहिजे. त्याच दुग्धाचे बिंदु प्राशन करून श्रीरामचंद्र, युधिष्ठिर, चंद्रगुप्त, भोज, मांधाता, पृथ्वीराज आदिकरून महान् महान् महाभाग महाराजांनी या आर्य महीचे स्वातंत्र्य परकीयापासून कायम राखण्याचे प्रयत्न केले. हे कृत्तिकांनो अशा त्या पूर्वनिकेच्या दुग्धापैकी मला एक थेंब तुम्ही दिला तरी मी या परकीय लोकांच्या जाचांतून आपल्या देशाला स्वतंत्र करीन!—पण थांबा. तें दूध माझ्या तोंडांत घालतांना कदाचित् एकदम फार पडेल असें मात्र करू नका. कारण या स्वतंत्रतेच्या रसायनाची हल्लीच्यापेक्षा पुढे जास्त गरज लागणार आहे. त्या वेळेकरता हा दिव्य रस फार जपून ठेवा.—हे ताऱ्यांनो ज्या दुग्धाच्या प्रभावाने इतर लोक स्वतंत्र होऊ शकतात तें तुमच्या इतके सन्निध असतांना मग तुम्ही इतक्या चिंतेंत कां पडला आहा? आणि शिवाय इतकेजण असून तुम्ही आधी परतंत्रतेंत पडलांच कसे? आणि पडल्यावर अजून त्यांतून निघूं शकत नाही कसे? मला वाटते आमच्या हिंदुस्थानापेक्षा तुमच्या देशाची लोकसंख्या पुष्कळच कोटींनी जास्त असली पाहिजे. तुम्ही इतके कोटि लोक एकत्र झाला तर आपल्या तेजाने वाटेल त्याचे भस्म करून टाकाल आणि वाटेल तसला अंधकार असला तरी तो प्रकाशित कराल. मग तुम्ही एकदिल कां करीत नाही? तुमची शरीरे फक्त एकत्र झालेली दिसतात; पण तुमची मनें आमच्या सारखीच एकमेकांपासून विलग आहेत

की काय ? मला जर आपल्या देशांतील इतके लोक गुप्तपणाने एकत्र करण्याला तुमच्यासारखी जागा मिळती तर मी सगळ्यांची मनें एका क्षणांत आपल्या देशाच्या स्वतंत्रतेच्या बाबतींत एक करून टाकिली असती. तुमच्यामध्ये परस्पराकर्षण आहे म्हणून म्हणतात. पण तुम्हाला परस्परांची मनें आकर्षण करून घेण्याची विद्या अद्यापि साध्य झालेली नाही असें दिसते. आणखी दुसरी गोष्ट अशी कीं, मी तुम्हाला असें रात्रींच्या प्रहरीं लपून छपून जमतांना येथे आज कित्येक वर्षें पहात आहे, तरी अजून तुमचे राज्य-क्रान्तीचे बेत कांहीच ठरत नाहीत हे कसे ? इतक्या सगळ्या रात्रीं तुम्ही विचार करण्यांतच फुकट दवडता ? अति विचार कार्यविघातक असतो. आणि राजकारणांत दीर्घसूत्रीपणा बिलकूल उपयोगी नाही. ही तत्त्वें तुम्हांला समजतात ना ? तुम्ही माझ्या प्रश्नांचे कांहीच उत्तर देत नाही. माझा आवाज तुम्हाला ऐकूं येत आहे ना ? किंवा तुमच्यामध्ये श्रवणशक्तिच नाही ? किंवा कोणी म्हणतात तसे तुम्ही खरोखरच जड तर नाही ? किंवा मी ज्यांना उद्देशून बोलत आहे ते त्या आकाशगंगेच्या वाळवंटांतील नुसते निरनिराळे पडलेले सोन्याचे कणच आहेत ? किंवा वर्षाऋतूच्या प्रारंभी जो विजेचा सोनेरी पत्रा आकाशांत लखलखत आणि कडकड वाजत होता, तो आताशा कोठे दिसत नाही, त्याचे तर कोणी लहान लहान तुकडे करून फेकून दिलेले नाहीत ? बहुतकरून हाच तर्क खरा असला पाहिजे. कारण, जेव्हा हे सोन्याचे कण दिसत असतात त्या वेळेला तो विजेचा पत्रा दिसत नाही. आणि तो विजेचा पत्रा दिसत असतो तेव्हा हे सोन्याचे कण दिसत नाहीत. मला वाटतें, वर कोणी तरी एक प्रचंड शक्तीचा सुवर्णकार आपली ऐरण आणि घण घेऊन बसलेला असला पाहिजे; व पावसाळ्याचे दिवस जवळ आले म्हणजे तो हे सगळे सोन्याचे कण एका ठिकाणीं ठोकून त्यांच्यापासूनच तो विजेचा सोनेरी पत्रा तयार करीत असला पाहिजे ! — पण असें म्हणावे तर सोन्यापेक्षाहि त्याचे तेज जास्त दिसत आहे. शुद्ध हिऱ्यासारखे हे दिसत आहेत. तेव्हा ही उपडी ठेवलेली अथवा खालून वर पोखरली जाणारी एखादी हिऱ्याची खाण तर नसेल ? हीच कल्पना बरोबर दिसते. कारण, हे हिरे वरून खाली पडतांना

पुष्कळ वेळां आढळतात. लोक त्यांना तारा तुटून खाली पडला असें म्हणतात. पण त्यांत कांही तथ्य नाही. हे हिऱ्याचे दगड वरच्या उपडच्या खाणींतून खाली जमिनीवर पडतांना त्यांची जी दूर पतनामुळे झालेली व जमिनींत खोल गेलेली लहान लहान छकले सापडतात त्यांनाच येथील लोक हिरे, माणके, पाच, शनीचे दगड वगैरे नांवे देतात. पण ही कल्पनाहि जुळत नाही. कारण त्यांच्या ठिकाणीं गति आहे. तेव्हां हे कोणी तरी दैदीप्यमान पुण्यवान पुरुषच असले पाहिजेत. जे पुण्यकर्म करतात ते मरणोत्तर दिव्य देह धारण करून आकाशांत तारे होऊन बसतात अशी लोकामध्ये एक समजूत आहे ती खरी असली पाहिजे. —तर मग हे पुण्यवान् पुरुषांनो, चालू द्या. तुमचे स्वतंत्रतेबद्दलचे गुप्त कट अव्याहत चालू द्या. पुण्यवान् लोकांच्या कोणत्याहि कृत्याला यश आल्यावाचून राहावयाचे नाही. परंतु मघाशीं पूर्वरात्रीं तुमच्या गुप्त बैठकींत जितकी माणसें दिसत होती तितकी आता पहाटेस कां दिसत नाहीत ? आणि तुमच्यातले हे कांही कांही लोक तुमच्या सभेंतून उठून कां जाऊ लागले आहेत ? —अहो ! काय हा चमत्कार ! मी पाहता पाहता तुमच्यांतील बरेच असामी सभास्थानापासून पार नाहीसे झाले ! तुम्हाला कोणी इशारत दिली ? आता उजाडण्याची वेळ होत आली, आपले शत्रू आपल्याला पाहतील, आता आपण चौघांनी चोहोकडे पांगून जाण्याची वेळ आली आहे. याबद्दलची सूचना तुम्हांला कोणी दिली ? —हं समजलो ! पृथ्वीतलावर कानोसा घेण्याकरता मुद्दाम दूरदूरच्या निरनिराळचा पाहऱ्याच्या ठिकाणीं तुम्ही जे पक्षी ठेविले होते ते तुमच्या खुणेच्या शब्दांची गाणीं भैरवी रागामध्यें गात गात आकाशांत तुमच्याकडे उंच उडत येऊन त्यांनीच बहुतकरून तुम्हाला ही इशारत दिली असली पाहिजे. —एकूण तुमच्या कटामध्यें हे पक्षी देखील सामील झाले आहेत ना ? अथवा त्यांत काय आश्चर्य आहे ? स्वतंत्रतेच्या पक्षाला कोण पाहिजे तो मदत करील ! —ठीक आहे ! ताऱ्यांनो, जा. तुम्ही आता लवकर जा. मागे उगीच रेंगाळत राहून शत्रूच्या दृष्टीस पडण्यांत कांही अर्थ नाही. जा —लवकर जा. स्वातंत्र्याबद्दल खटपट करणारा कोणताहि मनुष्य शत्रूच्या हातीं न सापडावा म्हणून मला तुमची फार काळजी वाटते.

की काय ? मला जर आपल्या देशांतील इतके लोक गुप्तपणाने एकत्र करण्याला तुमच्यासारखी जागा मिळती तर मी सगळ्यांची मनें एका क्षणांत आपल्या देशाच्या स्वतंत्रतेच्या बाबतींत एक करून टाकिली असती. तुमच्यामध्यें परस्पराकर्षण आहे म्हणून म्हणतात. पण तुम्हाला परस्परांची मनें आकर्षण करून घेण्याची विद्या अद्यापि साध्य झालेली नाही असें दिसते. आणखी दुसरी गोष्ट अशी कीं, मी तुम्हाला असें रात्रींच्या प्रहरीं लपून छपून जमतांना येथे आज कित्येक वर्षें पहात आहे, तरी अजून तुमचे राज्य-क्रान्तीचे बेत कांहीच ठरत नाहीत हे कसे ? इतक्या सगळ्या रात्रीं तुम्ही विचार करण्यांतच फुकट दवडता ? अति विचार कार्यविघातक असतो. आणि राजकारणांत दीर्घसूत्रीपणा बिलकूल उपयोगी नाही. ही तत्त्वें तुम्हांला समजतात ना ? तुम्ही माझ्या प्रश्नांचे कांहीच उत्तर देत नाही. माझा आवाज तुम्हाला ऐकूं येत आहे ना ? किंवा तुमच्यामध्ये श्रवणशक्तिच नाही ? किंवा कोणी म्हणतात तसे तुम्ही खरोखरच जड तर नाही ? किंवा मी ज्यांना उद्देशून बोलत आहे ते त्या आकाशगंगेच्या वाळवंटांतील नुसते निरनिराळे पडलेले सोन्याचे कणच आहेत ? किंवा वर्षाऋतूच्या प्रारंभी जो विजेचा सोनेरी पत्रा आकाशांत लखलखत आणि कडकड वाजत होता, तो आताशा कोठे दिसत नाही, त्याचे तर कोणी लहान लहान तुकडे करून फेकून दिलेले नाहीत ? बहुतकरून हाच तर्क खरा असला पाहिजे. कारण, जेव्हा हे सोन्याचे कण दिसत असतात त्या वेळेला तो विजेचा पत्रा दिसत नाही. आणि तो विजेचा पत्रा दिसत असतो तेव्हा हे सोन्याचे कण दिसत नाहीत. मला वाटतें, वर कोणी तरी एक प्रचंड शक्तीचा सुवर्णकार आपली ऐरण आणि घण घेऊन बसलेला असला पाहिजे; व पावसाळ्याचे दिवस जवळ आले म्हणजे तो हे सगळे सोन्याचे कण एका ठिकाणीं ठोकून त्यांच्यापासूनच तो विजेचा सोनेरी पत्रा तयार करीत असला पाहिजे ! — पण असें म्हणावे तर सोन्यापेक्षाहि त्याचे तेज जास्त दिसत आहे. शुद्ध हिऱ्यासारखे हे दिसत आहेत. तेव्हा ही उपडी ठेवलेली अथवा खालून वर पोखरली जाणारी एखादी हिऱ्याची खाण तर नसेल ? हीच कल्पना बरोबर दिसते. कारण, हे हिरे वरून खाली पडतांना

पुष्कळ वेळां आढळतात. लोक त्यांना तारा तुटून खाली पडला असें म्हणतात. पण त्यांत कांही तथ्य नाही. हे हिऱ्याचे दगड वरच्या उपड्या खाणींतून खाली जमिनीवर पडतांना त्यांची जी दूर पतनामुळे झालेली व जमिनींत खोल गेलेली लहान लहान छकले सापडतात त्यांनाच येथील लोक हिरे, माणके, पाच, शनीचे दगड वगैरे नांवे देतात. पण ही कल्पनाहि जुळत नाही. कारण त्यांच्या ठिकाणीं गति आहे. तेव्हां हे कोणी तरी दैदीप्यमान पुण्यवान पुरुषच असले पाहिजेत. जे पुण्यकर्म करतात ते मरणोत्तर दिव्य देह धारण करून आकाशांत तारे होऊन बसतात अशी लोकामध्ये एक समजूत आहे ती खरी असली पाहिजे. ––तर मग हे पुण्यवान् पुरुषांनो, चालू द्या. तुमचे स्वतंत्रतेबद्दलचे गुप्त कट अव्याहत चालू द्या. पुण्यवान् लोकांच्या कोणत्याहि कृत्याला यश आल्यावाचून राहावयाचे नाही. परंतु मघाशीं पूर्वरात्रीं तुमच्या गुप्त बैठकींत जितकी माणसें दिसत होती तितकी आता पहाटेस कां दिसत नाहीत ? आणि तुमच्यातले हे कांही कांही लोक तुमच्या सभेंतून उठून कां जाऊ लागले आहेत ? —अहो ! काय हा चमत्कार ! मी पाहता पाहता तुमच्यांतील बरेच असामी सभास्थानापासून पार नाहीसे झाले ! तुम्हाला कोणी इशारत दिली ? आता उजाडण्याची वेळ होत आली, आपले शत्रू आपल्याला पाहतील, आता आपण चौघांनी चोहोकडे पांगून जाण्याची वेळ आली आहे. याबद्दलची सूचना तुम्हांला कोणी दिली ? —हं समजलो ! पृथ्वीतलावर कानोसा घेण्याकरता मुद्दाम दूरदूरच्या निरनिराळ्या पाहऱ्याच्या ठिकाणीं तुम्ही जे पक्षी ठेविले होते ते तुमच्या खुणेच्या शब्दांची गाणीं भैरवी रागामध्यें गात गात आकाशांत तुमच्याकडे उंच उडत येऊन त्यांनीच बहुतकरून तुम्हाला ही इशारत दिली असली पाहिजे. —एकूण तुमच्या कटामध्यें हे पक्षी देखील सामील झाले आहेत ना ? अथवा त्यांत काय आश्चर्य आहे ? स्वतंत्रतेच्या पक्षाला कोण पाहिजे तो मदत करील ! —ठीक आहे ! ताऱ्यांनो, जा. तुम्ही आता लवकर जा. मागे उगीच रेंगाळत राहून शत्रूच्या दृष्टीस पडण्यांत कांही अर्थ नाही. जा —लवकर जा. स्वातंत्र्याबद्दल खटपट करणारा कोणताहि मनुष्य शत्रूच्या हातीं न सापडावा म्हणून मला तुमची फार काळजी वाटते.

म्हणून मी तुम्हाला विनंती करतो कीं, तुम्ही आता या संकेतस्थानापासून लवकर नाहीसे व्हा. ही पहा पूर्वदिशा आरक्त झाली आणि हा पहा जगांतील पहिला रंगारी जो भगवान् सूर्यनारायण तो आपल्या कलमाने सर्व उंच पर्वतांच्या शिखरांना संधिप्रकाशाचा तांबूस रंग देऊं लागला ! ”

असे म्हणून शिवाजी आकाशाकडे पाहतो तों बहुतेक सर्व आकाश स्वच्छ झालेले त्याला दिसले आणि कोणीहि कटवाला मागे उरलेला नाही असे पाहून त्याला आनंद झाला आणि नंतर त्याने आपल्या देशाच्या स्वतंत्रतेकडे फिरून लक्ष वळविले.

## ४. जशी संस्कृति तसें हत्यार !

— वि. का. राजवाडे

धोरण व इतिकर्तव्यता ह्यांचा खुलासा झाल्यानंतर ज्या साधनांच्या चाकांवर धोरण व इतिकर्तव्यता यांचा गाडा चालविणें शक्य होते व ज्या साधनांच्या अभावी मनांतले थोर राजकीय विचार जागच्या जागीं शुष्क होऊन जातात त्या साधनांची निर्मिति व जोपासना शहाजीने कशी केली तेंहि शोधिणें क्रमप्राप्त होतें. एवढे मोठे हजारोंने मोजता येण्या-सारखे प्रबल सैन्य शहाजीने कोठून आणिले आणि त्याला रोजमुरा कोठून दिला हा साधनसंबंधक पहिला प्रश्न. आणि दोनतीन वेळा स्वराज्य साधनिकेंत फसला असता खचून न जाता उत्तरोत्तर ज्या नव्या दमाने शहाजी कामास लागलेला दिसतो तो दम त्याला कोठून पैदा झाला हा दुसरा प्रश्न. हे प्रश्न सोडविताना प्रथम लक्षांत धरिले पाहिजे कीं, शहाजी हा प्राधान्येकरून व्यवहारचतुर व मुत्सद्दी होता, केवळ कल्पनातरंगावर वाहवत जाणारा शेख महंमद नव्हता. त्याच्या आधी व त्याच्या काली

राष्ट्रसुधारण्याचे प्रयत्न करणारे शेख महंमद थोडथोडके झाले नव्हते. कली मातला, सबब समाजाला दैन्य आले व तें भोगिल्याखेरीज गत्यंतर नाही, असें रडगाणें गाऊन स्वस्थ रडत बसणारे ऐदी कितीतरी होते. विठोबा सर्व कांही योग्य वेळीं नीट करील, त्याला जनतेची काळजी आहे, असें समाधान करून घेणारे भक्तिमार्गी तर असंख्य होते. मुसलमानी पेहराव, मुसलमानी चालीरीति, मुसलमानी भाषा व मुसलमानी धर्म स्वीकारून समाजाच्या यातना बंद करू पहाणारे कितीतरी हिंदू प्रांतोप्रांतीं पीर होऊन बसले होते. यवनांवर रुसून त्यांच्याशीं व्यवहार बंद करून त्यांचें मुखावलोकन न करणारी दासोपंतादि मंडळीहि आपल्याकडून यवनांच्या पारिपत्यांचें प्रयत्न करीतच होती. यवनसेवा करून जनतेचा परामर्ष घेऊं पाहणारे दामाजीपंतहि अनेक होऊन गेले. यवनांविरुद्ध बंड करून स्वराज्य मिळविणारेहि कांही वेडे निपजले. मंत्रतंत्रांनी यवनांना स्तंभित करण्याचा कित्येकांचा खटाटोप होता. यज्ञयागांचा व देवदेवालयांचा जीर्णोद्धार करून धर्मसंरक्षण करण्यांत कित्येकांनी सर्वस्व खर्चिलें. गोरक्षण करून प्रजेंत जोम उत्पन्न करू पाहणारे गोरखनाथीहि देशांत वावरत होते. कथाकीर्तनें व रामायणभारतें देशभाषेंत बनवून देशांतील लोकांच्या आंगीं स्फुरण चढवूं पहाणारे कीर्तनकार व ग्रंथकार तर त्या कालीं शेकडोनें मोजावे लागत. असे नाना प्रकारचे बरेबुरे उपाय जो तो आपापल्या परी करीतच होता. परंतु असले हे सर्व उपाय तीनशे वर्षें करूनहि यवनांचें काडीमात्र कोणी नुकसान करूं शकले नाही. तेव्हा जो तो समाधान असें करून घेई कीं, बी रुजत घातलें आहे, तें योग्य वेळीं रुजून त्याला फळें आल्याशिवाय राहणार नाहीत. ही भविष्यवादी विचारसरणी निरुत्तर करणारी असल्यामुळे भविष्यकाळीं तिची साफल्यता अनुभवास यायची असल्यामुळे व भविष्यकाळाला अंत नसल्यामुळे ह्या आशेची निराशा तीनशे वर्षे निघून गेली तरीहि कधीच झाली नाही. अशातला आशावादी शहाजी नव्हता. तो पक्के जाणत होता कीं, यवनांचें राज्य हें विधर्मी परदेशी अल्पसंख्यांकांचें राज्य आहे, तें हिंदूंच्या हत्याराहून श्रेष्ठतर हत्यारांच्या जोरावर व जरबेवर चालले आहे, आणि ह्या परदेशी अल्पसंख्यांक राज्यकर्त्यांत आपसांतील यादवीमुळे किंवा ऐषआरामोत्पन्न आलस्यामुळे

दौर्बल्य निर्माण झाल्यासहि त्यांच्याहून श्रेष्ठतर निदान त्यांच्या बरोबरीची हत्यारें जित लोकांनी पैदा केल्याशिवाय त्यांचा पाडाव होणें अशक्य आहे. तो हेहि आणिक स्वानुभवाने जाणत होता कीं, हिंदुस्थानांत व महाराष्ट्रांत अशा कितीतरी लढाऊ जाती आहेत कीं, ज्या वाटेल त्या स्वधर्मी किंवा परधर्मी धन्याची लष्करी नोकरी करून केवळ भाकरीकरिताहि स्वतःचा प्राण देण्यास व दुसऱ्याचा घेण्यास एका पायावर तयार आहेत. तो हेहि पहात होता कीं, महाराष्ट्रांतील एकाच गावांतल्या व एकाच कुळांतल्या व गोतांतल्या भाऊबंदांपैकी कांही लोक मराठ्या सरदारांच्या लष्करी तैनातींत आहेत व कांही मुसलमान सरदारांच्या व बादशहांच्या लष्करी तैनातींत आहेत आणि त्यापैकी कोणीहि धन्याच्या देशाची, राष्ट्राची, धर्माची, हेतूची किंवा कशाचीच विचारपूस, इष्टानिष्टता, आवडनिवड किंवा श्रेष्ठकनिष्ठता पाहात नाही. स्वतःचे भोसले कुळ पाहावे तर तो व त्याचा बाप हे निजामशाही नोकर होते, त्याचे चुलतभाऊ मोंगलाई नोकर होते व त्याचे कुळभाऊ आदिलशाही व बेरीदशाही सैन्यांत होते. अशा स्थितींत स्वतःचा स्वतंत्र पक्ष, स्वतःची स्वतंत्र फौज व स्वतःची श्रेष्ठतर हत्यारें कशी निर्माण करावीत या तीन बाबींचा त्याने खल केला. पक्ष निर्माण करणें म्हणजे ज्यांचा पक्ष निर्माण करावयाचा त्यांच्यांत कोणतीतरी सामान्य आकांक्षा अस्तित्वांत असली पाहिजे. धर्म, जाति, देव, देश ही चार स्थानें उत्तम पुरुषांच्या स्थायीं समान आकांक्षेचे विषय होऊं शकतात. परंतु त्या कालीं मराठ्यांच्या मनोरचनेंत ह्या स्थानांना, बिलकुल म्हटलें तरी चालेल, अवकाश नव्हता. अशा द्विपाद पशुतुल्य अधम लोकांत समानबंधनत्व फक्त एकच सापडण्याजोगे होते. तें हेंच कीं, ह्या द्विपादांच्या पोटापाण्याची व्यवस्था करून त्यांना आपल्या हुकमतींत बैलाप्रमाणे किंवा गाढवांप्रमाणे राबविणें आणि मनाजोगी कामगिरी करून घेतल्यावर दोन ममतेचे शब्द बोलून पाठ थोपटणें. तात्पर्य, पोटाला भाकरी देणारा धनी हा ह्या अधम संस्कृतीच्या लोकांचा समानबंधनत्वाचा विषय होता. तो पाठीवर असला म्हणजे हे लढावयाचे. तो मेला किंवा पळाला तर पोटाच्या भीतीने हे पळायचे. लढाईंत धनी मेला कीं, हिंदुस्थानांतील शिपुर्डी पळ कां काढितात, याचे खरे बिंग न

अनुक्रम २८०८५० विभाग ३३ क्रमांक २०७०

कळल्यामुळे अनेक परकीय इतिहासकार या पळपुट्यांना भेकड म्हणतात. परंतु हें म्हणणे अवास्तव आहे. हिंदुस्थानांतील शिपायांना मरणाचे भय इतके वाटत नाही. त्या पशूंना मुख्य भय पोटाचे. धनी मेल्यावर पोटाला घालणारा मेला, म्हणून हे लोक पोटाला घालणारा दुसरा धनी पाहण्याकरिता जीव बचावून पळतात. अशी ही यांच्या पळण्याची मीमांसा आहे. शहाजी हे सर्व जाणून होता. शहाजीस ह्या लोकांना पदरीं बाळगण्याची म्हणजे आपल्या फौजेंत त्यांची भरती मनसबदार ह्या नात्याने राजरोस करण्याची मुभा होती. हे सैन्य जमवून स्वपक्ष निर्माण करण्याच्या कामीं मनसबदारी त्याच्या आयत्या पथ्यावरच पडली. तो मनसबदार नसता व आपल्या पाटिलकीच्या गावीं पाटील किंवा देशमुख म्हणून असता व फौज जमविण्याचा उद्योग करता, तर त्याची गणना बंडखोर पुंडांत झाली असती व त्याचे शासन ताबडतोब झाले असते. जुलुमी परकीय राजांचा नाश करावयाचा म्हटला म्हणजे त्यांची नोकरी करून व विश्वास संपादून योग्य समयी त्यास गचांडी देण्याचा मार्ग जित लोकांना सदा श्रेयस्कर, सुरक्षित न्याय गणलेला आहे. तो मार्ग शहाजीच्या बापाने चोखाळून आपल्या मुलाला साफ करून ठेविला होता. तात्पर्य, निजामशाही मनसबदार असल्यामुळे त्याला फौज बिनबोभाट जमविता येणें सहज झालें होतें. आणि ही फौज म्हणजेच शहाजीचा पक्ष बनला होता. साधनांपैकी पक्ष व फौज बापाच्या मृत्यूनंतर त्याच्या हुकमतींत आल्यावर शहाजीने आपल्या गोड वागणुकीने फौजेला इतकी कांही ममता लाविली कीं, बखरकार लिहितो, “ फौजेंतील शिपायाला व अंमलदाराला असें वाटे कीं, नोकरी करावी तर ती राजा शहाजीची करावी, शहाजी केवळ आपला मायबाप आहे. मायेने फार तर शिपाई इमानी बनेल. परंतु इमानाइतकीच कर्तबगाराची किंमत असल्यामुळे आपल्या फौजेची कर्तबगारी व कार्यक्षमता जेणेकरून वृद्धिगत होतील तें साधन शहाजीने पैदा करण्याच्या योजना केल्या. तें तिसरे साधन म्हणजे श्रेष्ठतर हत्यारे.

हत्यार चोख पाहिजे आणि ते प्रतिपक्षांच्या हत्याराहून श्रेष्ठतर पाहिजे, या बाबीची जाणीव शहाजीच्या ठायीं स्वकालीन अनुभवाने

अत्युत्कट बाणलेली होती. पूर्वेतिहासहि त्याला तेच शिकवीत होता. कोणत्याहि राष्ट्राच्या संस्कृतीचा श्रेष्ठ कनिष्ठपणा त्या राष्ट्राच्या हत्याराच्या स्वरूपावरून ओळखता येतो. फार काय सांगावे, हत्यार हें राष्ट्राच्या एकंदर संस्कृतीचे मापक आहे. जशी ज्या राष्ट्राची संस्कृति तसे त्या राष्ट्राचे हत्यार. पशु-पक्ष्यांची हत्यारें म्हणजे नांग्या, दात, नखें, खूर, सोंड, व शेपट्या, पिसे वगैरे त्यांचे अवयव होत. त्याहून उच्चतर कोटींतला वानर क्वचित् धोंडे, फांद्या वगैरे सहजोपलब्ध बाह्य साधनांचा उपयोग करू शकतो. त्याहून श्रेष्ठ जो अर्धवट रानटी माणूस, तो गारेच्या बोथाट्या वगैरे ओबडधोबड दगडी हत्यारें घासून तयार करतो व प्रसंगी उपयोगी पडावे म्हणून संग्रही जमा करून ठेवितो आणि पशुपक्षांचा संहार करतो. त्याच्याहून श्रेष्ठ पायरीचा आर्य माणूस खाणी खणण्याचा व त्यांतून तांबे, लोखंड वगैरे धातू काढण्याचा शोध लावितो व त्या धातूंचे भाले, बरच्या, तिरांचे फाळ, सुऱ्या वगैरे धारेची दूरवर फेकता येण्याजोगी हत्यारें बनवितो व केवळ अंगलट करून झोंबाझोंबी किंवा मारामारी करणाऱ्या अर्ध रानटी समाजाला जिंकून गुलाम बनवितो. धनुर्धारी राम हा खनिकर्मकुशल आर्यांपैकी होता व तो आपल्या शेकडों लोखंडी बाणांनी एतद्देशीय रानटी भिल्ल, गोंड, कातकरी, राक्षस वगैरे लोकांचा नायनाट करी व त्यापैकी कित्येकांना शूद्र करून आपली कावाडकष्टाची कामे करवी. लोखंडी बाणाहूनहि दूर पल्ल्याच्या हत्यारांचा म्हणजे दारूने उडणाऱ्या वेळूच्या कांडांचा शोध लावणाऱ्या आर्यांनी केवळ लोखंडी तीरांनी लढणाऱ्या आर्यांचा पराभव करून आपले रसायन-मिश्रण-ज्ञान जगाच्या अनुभवास आणिले. त्याहि पुढे मजल मारून लोखंडी नळ्यांत दारू भरून अर्ध्या-पाव कोसावरून शत्रूचा पाडाव करणाऱ्या मुसलमानांनी, ख्रिस्ती, हिंदू वगैरे कनिष्ठ संस्कृतीच्या लोकांचा पराभव केला. पुढे युरोपियन लोकांनी नाना शास्त्रीय शोधांच्याद्वारा नेमके काम करणाऱ्या व दूरवर पल्ल्यांच्या तोफा, बंदुका वगैरे संगीन हत्यारांच्या जोरावर मुसलमानांची युरोपांतील स्पेन वगैरे देशांतून हकालपट्टी केली व पृथ्वीवरील अमेरिका, आफ्रिका व हिंदुस्थान हे देश जिंकण्याची खात्रीपूर्वक हिंमत बांधिली. एवढी मोंगलांची अफाट व प्रबळ सत्ता परंतु पोर्तुगीज चाच्यांनी कितीदातरी समुद्रावर

त्यांची इज्जत घेतली. याच काली कुस्तुंतुनियाच्या तुर्कांनी व्हेनिशयन लोकांपासून श्रेष्ठ बंदुका व तोफा आणि दारूगोळा तयार करण्याची सर्वश्रेष्ठ कला अर्धीमुर्धी व उष्टीमाष्टी किंचित् आपलीशी केली होती. त्या अर्धवट तुर्क कारागिरांना पदरी ठेवून दिल्लीचा मोंगल व दक्षिणेंतील शहा हत्यारें व दारूगोळा बनवून त्याच्या जोरावर देशांतील अर्धवट सुधारलेल्या टाळकुटचा हिंदूंना व परस्परांना भिववीत असत. हा सर्व चमत्कार शहाजी पाहात होता. उत्तम कारागीर हत्यार कोठून पैदा होते व कोण आणून देते याचा अनुभव जुन्नरच्या घाटाखालीं कोंकणांत त्याला आला होता. दमण, दीव, वसई, गोवा, सुरत, तेलिचेरी इत्यादि स्थलींच्या टोपीवाल्यांकडून कारागीर हत्यारें पैदा करून निजामशाही, आदिलशाही व मोंगलाई सैन्याहून शहाजी आपली फौज जास्त कर्तबगार ठेवू लागला. अशा तऱ्हेने, सैन्य व हत्यार शहाजीने निर्माण केले आणि त्यांच्या जोरावर प्रकट स्वराज्य, मांडलिकी स्वराज्य व निर्भेळ स्वतंत्र स्वराज्य उत्तरोत्तर स्थापित असता, वेळोवेळी येणाऱ्या विपत्तींत दम न सोडतां पूर्वीच्याहून जास्त हुरूपाने पुढील कर्तव्य तो बजावीत राहिला. सैन्य व हत्यार ह्यांच्यावरील त्याचा विश्वास मोठ्या विपत्तींतहि कधी ओसरला नाही. शेवटी ह्या साधनांच्या जोरावर आपण विजयी होऊंच होऊं अशी त्याची बालंबाल खात्री होती व परिणामावरून पाहता ही खात्री साधार होती. शहाजीच्या अलौकिक निर्धाराची व दमाची ही अशी मीमांसा आहे.

येथे एक आनुषंगिक प्रश्न असा निघतो कीं, टोपीवाल्यांकडून कारागीर बंदुका, तोफा व दारूगोळा जो शहाजी घेई तो त्याने महाराष्ट्रांत त्या बरहुकूम बनविण्याचीं व्यवस्था का केली नाहीं? अथवा शहाजीचा मुलगा शिवाजी त्याने तरी कां केली नाही? किंबहुना बाजीराव बल्लाळ, बाळाजी बाजीराव व नाना फडणवीस ह्या गृहस्थांनी का केली नाही? उत्तम हत्याराकरिता दुसऱ्यांचे मिंधे राहाण्याची लज्जा यांना कशी वाटली नाही? प्रश्नाला उत्तर एकच आहे व तें अगदी साधे आहे. तें हें कीं, उत्तम, रेखीव व नेमके हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्वतयारी राष्ट्रांत व्हावी लागत्ये ती त्या कालीं महाराष्ट्रांत नव्हती. शहाजीच्या हयातीत युरोपांत डकार्ट, बेकन इत्यादि विचारवंत सृष्ट पदार्थसंशोधनकार्याचे

वाली जारीने पंचमहाभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते. आणि आपल्या इकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपटनिरंजन इत्यादि संत पंचमहाभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारांत राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटीत होते. अशांना स्क्रू, टाचणी, बंदूक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यांत नवल कसचे ? थोडक्यांत्, आगस्ट कोंट याच्या भाषेंत सांगावयाचे म्हणजे महाराष्ट्र त्या काली Metaphysical अवस्थेंत होते आणि Positive अवस्थेंत येण्यास त्याला अद्याप पांचशे वर्षें अवकाश होता. म्हणजे शक २०००च्या सुमारास महाराष्ट्र Positive बनणार होतें. अशा अवस्थेंत आपल्याला बनविता येत नाहीत तीं हत्यारें दुसऱ्यांकडून विकत घेण्याखेरीज शहाजीला गत्यंतर नव्हतें. सध्या महमन्द, आफ्रीडी, चित्रळी, अफगाण, इराणी इत्यादि अर्धसुधारलेल्या लोकांची जी अवस्था आहे तीच आपली शहाजीच्या काली होती. उत्तम जर्मन, फ्रेंच किंवा रशियन बंदूक घेऊन जो आफ्रीडी माणूस चोऱ्या, दरवडे व हल्ले करतो, त्याहून शहाजीकालीन मराठा ज्यास्त सुधारलेला होता, हे खरें. परंतु शस्त्राकरिता तो युरोपियनांचा आफ्रीडीच्या इतकाच परावलंबी होता. ह्या परावलंबित्वाचा अर्थ शहाजीच्या कालीं कोणाच्या लक्षांत कितपत आला असेल तें सांगण्यास साधन नाही. परंतु वीष जें आहे तें जाणून खा कीं नेणून खा, आपला अंमल केल्याशिवाय जसें राहात नाही, तसेंच ज्याचें हत्यार त्याचें राज्य हा नियम––कोणाला समजो कीं न समजो––आपलें कार्य केल्याशिवाय राहात नाही. अर्थात् मूळ हत्यार करणारे जे फिरंगी, फ्रेंच, डच किंवा इंग्रज वगैरे युरोपियन त्यांना राज्य कमवून देण्याकरिता न जाणतेपणे शहाजी जिवापाड मेहनत करीत होता असा अर्थ झाला. आणि हा अर्थ शहाजी व त्याचे ब्राह्मण मुत्सद्दी यांच्या लक्षांत यावा तसा नव्हे तर मुळीच आला नाही. ज्या दिवशी व्हास्कोने कालिकतच्या चामुरीच्या थोबाडींत मारिली तोच हिंदुस्थानचे साम्राज्य युरोपियनांच्या हातांत जाऊं लागण्याचा पहिला दिवस होय. मूठभर फिरंगी लोकांनी एका हिंदु राजाला पहिले छुट कुंठित करावे असे त्यांच्याजवळ कोणते बरे सामर्थ्य होते ? काय त्यांना दहा तोंडे व वीस हात होते ? कीं ते इजार नेसत होते व बायबल पढत होते म्हणून ते इतके

प्रबल झाले? तर अनेक शोधांच्या साहाय्याने सिद्ध झालेली जी लांब घल्ल्याची कारीगार हत्यारें त्यांत त्यांचे सामर्थ्य होतें. ही हत्यारें म्हणजे युरोपियन शास्त्रीय संस्कृतीचा केवल निष्कर्ष होत. त्या हत्यारांच्या जोरावर एक युरोपियन हजार हिंदुमुसलमानांना भारी होता. हा अर्थ शहाजीसारख्या धोरणी, दूरदर्शी, मतलबी व जागरुक सरदाराच्या लक्षांत न यावा अशीच तत्कालीन महाराष्ट्रसमाजाची स्थिति होती. तेव्हां दोषाचा वाटा शहाजीप्रमाणेच तत्कालीन समाजावर पडतो, हे उघड आहे. सगळेच आंधळे, त्यांत एकालाच सुळावर चढविण्यात मतलब काय? ह्या बाबींत शहाजीच्या पंक्तीस अकबर, शहाजहान, मीरजुमला व औरंगझेब असे सारेच बसतात. तेव्हां हा तत्कालीन भारतवर्षीय संस्कृतींतलाच सर्वसाधारण दोष होय हें कबूल करावें लागतें.

## ५. विरोळयाने काय शिकविले ?

— वा. ब. पटवर्धन

पांचसात दिवस पाऊस पडत राहिल्यामुळे मुठा नदीला बराच पूर आला होता. आमच्या पुणें शहरचे रस्ते काय, नाले काय, सगळेच चहाडखोर ! म्युनिसिपालिटीच्या व्यवस्थेची सारी बिंगें जाणारांयेणारांस ऐकायाला नको असताहि, ते सांगत होते, आणि शिमग्याच्या सणाला अजून चारपांच महिने अवकाश असूनहि शिडकावाचे अंगरखे ज्याच्या त्याच्या अंगांत दिसत होते. विशेष गंमत ही कीं, मी मी म्हणणारे सुधारकहि या पावसाळयाच्या शिमग्यांत रंगत होते. पावसाची झिमझिम राहून राहून सुरू होती. अशा वेळी आम्ही चारपाच जण, तंगडया तोडीत, बंडावर पाण्याची मजा पहावयास गेलों. दोनहि नद्या पर्जन्याच्या प्रसादामुळे आणि

अवसरप्राप्त देहधर्मामुळे पाषाणहृदयी पित्याच्या कठोरपणास कंटाळून, माहेरास रामराम ठोकून, वेगाने आपल्या प्रियकराकडे धाव घेत होत्या. त्यांनी आपलीं वाळवंटें केव्हाच आक्रमून टाकिली होती. दोनहि काठांस थडाथड थपडा देऊन त्या झपाटयाने पुढे धावत होत्या. संगमावर दोघींची गाठ पडल्यावर दोघी एकमेकींस कडकडून भेटल्या आणि एकजूट करून पुढे चालल्या. काय त्यांचा वेग ! केवढा जोर ! "आम्हांला कोंडून घालून बाहेर खडा पहारा करणारे आमचे पहाडी वडील ! त्यांनादेखील आम्ही भीक घातली नाही; दोनहि अंगांनी अडवीत आम्हांला चिमटयांत धरू पाहाणाऱ्या दरडींस आम्ही जुमानिले नाही; आपल्या लांबच लांब फेकलेल्या बाहूंनी आम्हांला धरून ठेवू पाहणाऱ्या झाडांझोडांस आम्ही दाद दिली नाही ! त्या आम्ही, आमच्या वाटेंत आडव्या पडणाऱ्या या भिताडाला काय विचारतो !" धिक्काराने गर्जत गर्जतच ह्या आल्या आणि त्या बांधाला पायाखाली तुडवीत त्याच्या मानगुटावरून उडया टाकून पुढे चालल्या. त्यांना वाटेंत अडथळा केल्यामुळे त्यांचा किती संताप उडाला होता ! एकदा बांधाला खाली तुडवूनदेखील त्यांचें समाधान झाले नाही असे दिसले. कारण, चार पुरुष खोलींत उडी घेतल्यावरहि त्या उसळून पुनः परत बांधाला लाथाडायला धावत होत्या. त्यांच्या या आक्रस्ताळी सपाटयांत कितीक दगडागोटयांचा आणि विटाविटकरांचा चुराडा झाला असेल ! कितीक झुडपांना त्यांनी आपल्याबरोबर ओढीत नेले असेल ! कितीक मातीच्या ढिगाऱ्यांचा स्वाहा केला असेल ! कितीक किडया-किरडयांना जलसमाधि दिली असेल ! असेल कशाला ? आम्ही पहात उभे होती. तितक्यांतच एक मोठया विरोळयाची व त्यांच्या पसरलेल्या केसांच्या कांही बटांचीं झटापट चाललेली आम्हास दिसली.

**गोविंदराव** :— नको बोवा हें पाहाणें ! चला ! आपल्याच्याने आता पाहवत नाही ! बिचारा जरा डोकें वर काढितो न काढितो तों पुनः गुरफटला !

**शंकरराव** :— अहो, असे घाबरता काय ? त्यांची धडपड पाहण्यांतच एक प्रकारची मौज आहे ! ती जर पाहवयाची नाही तर मग इतक्य लांब आलात कशाला ?

**वामनराव :—** ओहो ! शाबास ! चांगला वीतभर चढला कीं भिंतीवर ! ती पहा— तेथेच चार बोटांवर भिंतींत एक फट आहे. ती जर बिचाऱ्याला दिसेल !...... अरे, अरे, अरे !

**कृष्णाजीपंत :—** गेला— दोन हात लांब गेला. आता कसची ती फट त्याला दिसते ! या भयंकर झोतापुढे त्याचे काय चालतें !

**शंकरराव :—** काय चालतें ! तो पहा आला, पुनः गिरका घेऊन परत भिंतीशीं आला ! त्याला जणो आपल्यामागे लागलेल्या प्रचंड शक्तीचें भानच नाही ! कोठे तरी बीळ मिळेल आणि आपण त्यांत शिरूं, ही त्याची एकच आशा केवढी दांडगी आहे ! ह्या आशेच्या जोरावर त्याची सारी झटापट चालली आहे. वरून, मागून, खालून, बाजूने इतके झोके व तडाखे बसताहेत, पण त्याची तडफड बंद झाली आहे का ?

**वामनराव :—** मला वाटतें, याची तडफड बंद होईल आणि तो जर नुसता स्वस्थ पडून राहील, तरच त्याचें कल्याण होईल. निदान तो या कैदासणींच्या केसांच्या फटकाऱ्यांत मरायचा तरी नाही. नाही तर—

**शंकरराव :—** मरतो काय हो ! त्याची चिकाटी केवढी जबर ! पाहाना ! येवढ्या दहा मिनिटांत तो किती वेळा तरी उलथापालथा झाला, किती वेळा तरी टोले खात पुढे लोटला, कितीदा पाण्यांत बुडाल्यासारखा दिसेनासा झाला, तरी त्याची आपली मुंडी पुनः वर आहे ती आहेच ! येवढासा जीव ! पण त्याचा दम केवढा ! शाबास ! फिरला परत चढला वर ! चांगला वीतदीडवीत चढला !

**कृष्णराव :—** कसला चढला ! झालें, संपलें बिचाऱ्याचें—ती पहा आली लाट— सापडला भोवऱ्यांत— झाला गडप !

**गोविंदराव:—** पाहिलेत ! बिचारा शेवटीं बळी पडला ! दोन तुफान नद्यांचा संताप कोणीकडे आणि हें वीतभर जीवाणू कोणीकडे ! त्याचा कसचा निभाव लागतो ! त्याला पाहिल्यापासूनच मला हे त्याचें पुढचे दिसत होतें ! खरेंच, मी येथून दूर जाऊन बसतों तर बरें होतें ! अशा लहानसहान प्राण्यांचें जीवान्तिक तडफडणें पाहाण्यांत तुम्हांला काय मौज वाटते कोण जाणे ! आपल्याला जशी भोवंड येते.

**वामनराव** :— अहो, ती बरोबर. ती तशी येतेच ? येवढ्या जोराने कांहीहि एकसारखे दृष्टीसमोरून जात राहिलें म्हणजे आपले डोळे फिरूं लागतात आणि भोवंड येते. येवढ्याला भिऊन जर येथून पळावयाचें, तर मग— काय हो, तुम्ही प्रत्यक्ष त्या भोवऱ्यांत सापडल्यावर तुमचें कसें होईल ?

**गोविंदराव** :—करा बोवा थट्टा ! तुम्हांला सुचते बरी ! माझ्या मनाला तर तो विरोळा, त्याचे मागे लागलेला तो पाण्याचा राक्षस आणि त्याचा शेवट, हीं सारी लागून राहिली आहेत ! त्या बिचाऱ्याचा काय अपराध ! सृष्टीचा तरी काय हा न्याय ! येवढासा जीव एवढ्या प्रचंड कल्होळांत सृष्टीने आणून सोडावा कां म्हणून ! तरी सृष्टींत सर्वत्र न्याय आणि प्रेम भरले आहे म्हणे ! भगवंताचें दयामय वास्तव्य सर्वत्र नांदत आहे म्हणतात..आहा ! तसें असतें तर या विरोळ्याला भगवंताच्या दयेनें या संकटांतहि हात दिला नसता काय ?

**कृष्णराव** :— गोविंदराव, येवढ्याशा गोष्टीवरून तुम्ही भगवंताच्या न्यायीपणावर कां घसरता ? तुम्हाला काय ठाऊक, त्या विरोळ्याचा अपराध होता कीं नव्हता ? त्याने पुष्कळशा बेटकुळ्या विनाकारण गट्ट केल्या असतील. शेवटीं आपणहि गट्ट झाला ! यांत भगवंताच्या घरचा न्याय कोठे बिनसला ? करावें तसें भरावें !

**गोविंदराव** :— असेल बोवा ! तसेंहि असेल ! 'अतर्क्य महिमा तुझा गुणहि फार बा हे विधी' ! आम्हा पामरांना काय समजतें ! तरी पण बेटकुळ्या व हे जीव त्यांची नेहमींच दे–घे सुरू आहे, त्यांच्यांत कांही साम्य तरी ! येथे शेकडो हत्तींच्या जोराचा लोंढा कोणीकडे आणि तो विरोळा कोणीकडे !

**शंकरराव**:— यांत तुम्हांला इतके नवीन काय वाटते ? हे नेहमी, जिकडे तिकडे चाललेच आहे, नाही का ? जिकडे तिकडे शांत आहे, पशु-पक्षी आनंदाने आपली कालक्रमणा करीत आहेत, बाग होताहेत, मळे उठता-हेत, शहरें वसलीं आहेत, घरे, वाडे, गिरण्या, कारखाने आहेत चालू आणि सर्व आबादानी आहे; तोच तळची जमीन हालू लागावी, पृथ्वीच्या पोटांत गडगडू लागावें, शेजारचे डोंगर जळती आग ओकू लागावे, सगळे वाता-

वरण तांबडया लाल अग्निरसाने भरून जावें, आणि क्षणांत सर्व वस्ती तप्त रसांत कढू लागावी, असे सृष्टीप्रकोप काय कमी होतात ? बोटीवर हजारों माणसें चढतात उतरतात, हजारो बोटी समुद्राच्या छातीवर नाचतात बागडतात, पण क्षणांत त्याची मर्जी जाऊन समुद्र खवळतो आणि बोटींच्या बोटी आपल्या अनंत उदरांत गडप करून टाकतो कीं नाही ? भूमाय तरी इतकी स्थिर, इतकी शांत आणि कनवाळू ना ? तिच्या पाठीपोटावर आम्ही हवें तसे खेळतों बागडतों, आमच्या मनांत कधी ती संतापेल अशी शंकाहि येत नाही; पण एकदम भूकंपाचा धक्का बसून गावांची गावें आणि तालुक्यांचे तालुके ती गिळून टाकते कीं नाही ? येथे कोणाचा अपराध असतो ? हे निसर्गाचे संचार अनंत आणि अगाध आहेत ! येथे आपली अक्कल फारशी चालत नाही ! पण प्रबळांनी दुर्बळांस खुशाल पायाखाली तुडवावे हा प्रकार जड सृष्टींतच का आहे ? जड सृष्टींतच कशाला ! खुद्द माणसांमाणसांमध्ये काय आहे ? येथे तर बऱ्याच अंशीं आपले आपण मालक असतों ना ! तरी आपल्या हातून काय होते! मी—मी तर म्हणतों, गोविंदराव, हा विरोळा पाण्यांत सापडावा व त्याचा असा शेवट व्हावा, यांत फार खोल अर्थ आहे. कृष्णरावाच्या म्हणण्याप्रमाणे येथे भगवंताचा न्याय असो नसो ! बाकी विरोळयाने बेटकुळया खाल्ल्या असतील म्हणून जलौघाने त्याला झपाटणे जर न्यायाचे, तर गोमाजीने सोमाजीचे डबोले बुडविले म्हणून गोल्डनगँगने गोमाजीचे घरावर दरवडा घालणें का न्यायाचे नव्हे ? मग तेथे पोलीस अन् मॅजिस्ट्रेट कशाला ? तें कांही असो, या विरोळयापासून घेणाऱ्यास फार बोध घेता येणार आहे, येवढे खरे !

**गोविंदराव** :— तो कोणता ?

**शंकरराव** :— कोणता ? या प्रचंड जलौघाच्या झपाटयांत सापडून इतका वेळ झगडत राहणाऱ्या व शेवटीं त्या झटापटींतच प्राणाची आहुति देणाऱ्या विरोळयाचा शेवट पाहून तुमच्या मनांत कांहीच विचार उत्पन्न होत नाहीत ?

**वामनराव** :— त्यांत विचार कसले उत्पन्न व्हावयाचे ? पाण्याचा ओघ जोराने खाली आपटे कसा, पुनः वर उसळे कसा, मागे वळे कसा

आणि आपल्याबरोबर त्या विरोळ्यालाहि वाचवी कसा, हे पाहण्यांतच आतापर्यंत काय ती मौज होती. तो विरोळा गेला. आता तिकडची दृष्टि काढावी आणि पाण्याच्या थयथयाटाकडे लावावी. अहाहा ! आपल्या धूसर जटा अस्ताव्यस्त फेंदारून हैदोस घालणाऱ्या या सैतानांचे थैमान तर पहा ! त्याचीं तीं वेडीवाकडीं टाळकीं, क्षणोक्षणीं बदलणारी आणि लहानमोठी होणारी हातापायांचीं भेंडोळीं, एकसारखी सुरू असलेलीं रंगणें— सारेंच विचित्र ! ह्या नद्या कसल्या ! पावसाच्या धारावर आरूढ होऊन पृथ्वीवर उलटलेल्या आणि जलप्रवाहाच्या मार्गाने धावत सुटलेल्या पिशाच्यांच्या सेना या ! सुमारे अर्धा मैलापर्यंत ह्या दोन नद्यांनी वाहात आलेल्या सेना अप्रतिहतपणे आल्या, तेथे त्यांना अटकाव करण्याची कोणाची छाती झाली नाही. सर्व प्रदेश मोकळा. त्यांचा भयंकर ओघ जाईल तिकडे मुभा. असे होतें तोंवर त्यांचा वेग नुसता उत्कंठेचा होता. पण येथे या बांधाने त्यांची वाट आडवली ! आता काय ? पिशाचेंच ती ! झिज्या पिंजारून आणि अंगाचे चेंडू करून त्याच्यावर सारीं तुटून पडलीं आणि त्याला खाली घालून स्वच्छंद नाचूं लागलीं. त्यांचा हा धिंगाणा पाहिल्याने मला तर तसाच धिंगाणा घालावा असें वाटायला लागलें आहे ! नायगाऱ्याचा धबधबा पाहून खरोखर त्यांत उडी घ्यावी आणि पाण्याच्या लोंढ्याबरोबर आपणहि उसळून वरतीं यावें, असें मनांत येत असेल नाही ? सृष्टीचें केवढे सामर्थ्य हें !

**शंकरराव** :— अहो, हें तर आहेच. नद्यांचे धबधबे, विजांचे चमचमाट, मेघांचा गडगडाट, पावसाचे दमदमाट इत्यादि सृष्टीचे आविर्भाव पाहिले म्हणजे तिच्या सामर्थ्याचा प्रत्यय यावा आणि क्षणभर क्षुद्रपणाचें भान व्हावें, हें तर सरळच आहे. किंवा तिच्या अनावर संचाराच्या संसर्गाने आपल्या ह्या वीतभरदेहांत कोंडून राहिलेला तिचा छावाहि स्वप्रत्ययाने क्षणभर आपल्या साखळ्या तोडून, कोंडमारा फोडून बाहेर पडावयास व तिच्याबरोबर स्वैर नाचावयास उत्सुक व्हावा हेंहि नवल नाही. येथे उभे राहिलें म्हणजे आपणहि या जलौघाबरोबर उडी घ्यावी आणि स्वतंत्र पोहावें ही मनाची भावना होते, तिचा हाच

अर्थ :— निसर्गाला आपण द्यावा तितका अवसर देत नाही, त्याचा कोंडमारा करितो. याची ही भावना म्हणजे साक्ष आहे ! पण त्या विरोळयाच्या क्षणाच्या इतिहासाने याहीपेक्षा खोल विचार— निदान मनुष्य समाजाला अत्यंत निकट असे विचार— माझ्या मनांत उभे राहतात ! तुमच्या कोणाच्या नाहीत का राहत ?

गोविंदराव:— मला वाटतें, आपल्या समाजांत अशाच तऱ्हेची धडपड सुरू असून तींत असेच करुणास्पद प्रकार प्रत्यहीं घडत आहेत असेंच तुमचें म्हणणें होय ना ? तसा विचार माझ्या मनांत येतो खरा ! पण काय करायचें? आपण काय करणार ! त्या विरोळयाने काय केलें ?

शंकरराव:— विरोळयाने काय केलें ? विरोळयाने आपल्या जन्माचें सार्थक केले ! तुम्हा आम्हासारख्या हताश सुधारकांस प्राणान्तिक प्रयत्नाचें आणि आजन्म उद्योगाचें उदाहरण घालून दिलें ! या विरोळयाप्रमाणेच हजारो निरपराध मानवी जीव हजारो वर्षाच्या साचत, फुगत आलेल्या लोंढयापुढे, आणि धर्माच्या, देवाच्या आणि पवित्रतेच्या भेसुर संमर्दापुढे तडफडत आहेत ! समाजाचा प्रवाह सनातन आहे, तसाच मानवधर्माचा आहे. पण या समाजाच्या प्रवाहाला आलेल्या पुरांत कितीक निर्बळ प्राणी प्रत्यही सापडत आहेत ! समाजाच्या सनातन जुलमाखाली त्यांचा बिचाऱ्यांचा इतका चेंदामेंदा होत आहे की, त्यांना स्वताला जरा हातपाय हलविण्याचीहि ताकद नाही. केवळ दैवदुर्विलासामुळे आपल्या स्त्रीवर्गापैकी किती-कितीजणी समाजाच्या पुरांत स्वाहा झाल्या आहेत ! हजारो वर्षाच्या परंपरेच्या दडपणामुळे कितीक जीव चेचून गेले आहेत ! व्यक्ति आणि समाज यांतील हा झगडा – झगडा कशाचा ? आमच्या येथे तरी व्यक्तीचा जीव कोठ आणि समाजाचा अपरंपार पूर कोणीकडे ? हा प्रकार किती शतके चालू आहे ? गोविंदराव, विरोळयाचा शेवट पाहून जर तुम्ही ' कोठें आहे भगवंताचा न्याय ' म्हणून ओरडता. तर गाईप्रमाणे हंबरडा फोडून लोळण घेता घेता ज्यांना फरफरा ओढून ज्यांवर संन्यास लादण्यांत येतो; गुरांप्रमाणे मुसक्या बांधून किंवा चारचौघांनी धरून पकडून ज्यांना विठ्ठलाची दीक्षा देण्यांत येते, घाण्याच्या बैलाप्रमाणे ज्यांना डोळे असून आंधळे ठेवण्यांत येते, जगावयाची — संसार करावयाची — इच्छा

असूनहि ज्यांना संसाराची बंदी करण्यांत येते, अशा थोड्याथोडक्या नाही पंचवीस लाख तरी प्राण्यांचा असा प्रकार तुमच्या पुढे–मागे आजू-बाजूस चोहोकडे बिनघोरपणे चाललेला पाहून सृष्टीला आणि भगवंताला किंवा खरे म्हटले तर माणसांना आणि समाजाला तुम्ही काय करणार? विरोळा तुमच्या जातीचा नव्हे, गोताचा नव्हे; अगदी यःकश्चित जीव. परंतु त्याचा असा स्वाहा झालेला पाहून तुमचें मन कळवळतें! मग तुमच्याच सारख्या चालत्या बोलत्या, तुमच्याच हाडामांसाच्या, तुमच्याप्रमाणेच अलभ्य नरजन्माला आलेल्या तुमच्या आयाबहिणींचा, लेकीसुनांचा, शेजारणी पाजारणींचा, तसाच शोचनीय प्रकार होत असल्यावर तुमच्या अंतःकरणाला किती पीळ पडला पाहिजे?

**कृष्णराव** :—काय हो शंकरराव, जेव्हा तेव्हा समाजाच्या जुलुमाचे पुराण वाचिता! जो तो आपापल्या कर्माची फळें भोगीत असतो. त्यांत जुलूम कोणाचा अन् कोणावर आला आहे!

**शंकरराव** :—कृष्णराव, आज तुम्हांला हें म्हणण्याला सोपे आहे. कां कीं, आमच्या बायका, त्यांवर होत आलेल्या युगानुयुगांच्या संस्कारांनी, पुराणिकांच्या, कथेकऱ्यांच्या, शास्त्रीपंडितांच्या, धर्मदीक्षितांच्या आणि शिंगें मोडून वासरांत शिरणाऱ्या सुशिक्षितांच्या उपदेशामुळे केवळ गाई बनल्या आहेत, पूर्वकर्मांमुळे आपल्याला स्त्रीजन्म आला आहे, तेव्हा भोक्तृत्व भोगिले पाहिजे, या एका वृत्तीशिवाय त्यांच्या मनांत दुसरे कांही येत नाही! आपण माणसें आहो, जनावरापेक्षा—कुत्र्यामांजरापेक्षा आपली निसर्गसिद्ध प्रतिष्ठा वरची आहे. 'मुकीं बिचारीं कुणी हांका' अशा मेंढरापेक्षा आपलें बळ निराळे आहे, आपले हक्क निराळे आहेत, हें त्यांना अजून कळू लागलें नाही. पण......काय करूं हो? आमचे सुधारक या गोविंदरावांसारखे तेव्हांच हताश होणारे आहेत! नाही तर—?—अहो, तो विरोळासुद्धा आमच्यापेक्षा अधिक नेटाचा. त्याच्यापेक्षा खरोखरच अनंतपट प्रचंड अशा लोंढ्यांच्या तडाख्यांत तो सापडला असूनहि त्याने आपली धडपड सोडिली नाही. शेवटचा स्वाहा होईपर्यंत—कोणाला ठाऊक! त्यानंतरहि असेल—त्यांचे प्रयत्न चालू होते. येवढ्या अजस्र शत्रूच्याहि हातांतून सुटावयाची खटपट त्याने बंद पडूं दिली नाही. त्याचा उद्योग सुरूच राहिला.

जणों काय आपला शत्रु कोण, केवढा, याचें त्यास भानच नाही ! तसा आपला उद्योग पाहिजे. आमची आम्हालाच ऐकू न येणारी कुई, सगळ्या जगाला खडबडून जागे करणारी विश्वगर्जना झाली पाहिजे ! आपला कोंडमारा कोंडू पाहणारा आमच्यांतील निसर्गांश आमच्यासारख्या हजारो स्त्री-पुरुषांतील निसर्गांशाशीं एकजीव झाला पाहिजे. या विरोळ्याप्रमाणे आमचे प्रयत्न आमरण -- एकान्तिक दृष्टीने — चालले पाहिजेत. बांधावरून उडी टाकिल्यामुळे खंडशः झालेल्या त्या जलौघाकडे पहा. आपल्या आड येणाऱ्या बांधावरून उडी मारून पुढे गेल्यामुळे त्याच्या शरीराचे राई येवढाले तुकडे होताहेत ! पण ते सर्व पुनः जमतात, पुनः सर्व वाळवंटभर कल्लोळ माजवितात आणि आपला पूर्वीचा जोर, पूर्वीचा जन्मभाग मिळविल्याशिवाय राहात नाहीत, त्यांचे उदाहरण आपण डोळ्यापुढे ठेविले पाहिजे. अडथळ्यांशीं टक्कर घेऊन स्वता घायाळ होऊनच हा जलौघ त्या त्या बांधाला लाथाडायला समर्थ होतो. आपल्यांतील ह्या हतभाग्य प्राण्यांच्या हालअपेष्टा पूर्वकर्मामुळे आलेल्या नाहीत — निदान त्यांच्या पूर्वकर्मामुळे आलेल्या नव्हेत. निर्घृण निसर्गाने आणिलेल्याहि नव्हेत — खरोखर निसर्गाच्या — अदृष्टाच्या अवकृपेने ओढवणाऱ्या आपत्तीपेक्षा आपण आपल्यावर ओढविलेल्या आपत्तीच फार आहेत ! आपण आपल्या बंधुभगिनींवर जे जुलूम, जे अन्याय करीत आलो -- करीत आहो, त्यापुढे निसर्गाचा स्वैराचार कांहीच नाही ! हे सनातन अन्याय आहेत, हे पूर्वकर्माचे जुलूम आहेत, असें म्हणून स्वस्थ बसणें म्हणजे स्वताची फसवणूक आहे ! हे आपणच जन्मास घातलेले जुलूम व अन्याय आहेत ते आपणच दूर केले पाहिजेत. त्यांचा लोंढा केवढाहि प्रचंड असो, आपण त्यांतूनहि सुटण्याची व त्यांतूनहि डोकें वर उचलण्याची धडपड केली पाहिजे. मृत्यूवाचून जन्म नाही. रुढीच्या अनावर लोंढ्यांत आज आपण सापडून विरोळ्याप्रमाणे नामशेष होऊं कदाचित् ! परंतु आपल्या मागून येणारास आपण वाट तरी करून ठेवूं. आपण खटपटींत धडपडीतच मरून जाऊं; परंतु आपला मृत्यु म्हणजे आपणापेक्षा खंबीर वीरांचा जन्म होय ! आज कोपऱ्यांत पडलेल्या आणि समाजाने निस्त्राण केलेल्या जीवांच्या जागीं उद्या नवे जीव येतील, आणि ते पावसांच्या धारांवरून उतरणाऱ्या या सैतानास

सूर्याच्या किरणांवर बसून शुष्क करणाऱ्या देवदूताप्रमाणे, आज या अनाथ प्राण्यांवर अधिकार गाजविणाऱ्या समाजास वठणीस आणितील ! जुलूम आणि अन्याय यांशीं झगडणें एवढें आपले काम. तें आपण आमरणान्त करावें म्हणजे झाले ! पुढच्याचा विचार आपणांस कशाला ?......

हें बोलत असता शंकररावांचा चेहरा आवेशाने आणि आवेगाने फुलला होता. त्यांची दृष्टि आमच्यापैकी कोणाकडे नव्हती. ती काळाच्या अफाट अरण्यांतील नवीनच गोचर झालेल्या एका रमणीय भागावर खिळल्या, सारखी व त्यामुळे उल्हसित झाल्यासारखी दिसत होती ! त्यांचा सगळा जीव एकवटून त्यांच्या चेहऱ्यांत उतरला होता असे पाहणारास वाटे. आम्हां सर्वांवर त्यांच्या शेवटच्या वाक्यांचा चांगलाच परिणाम झाला.

## ६. गरजा व वासना

— न. चिं. केळकर

सुधारणेचे कारण असे. देवाने प्राणिमात्राच्या गरजा व वासना या दोन्हींचे समाधान करण्याची साधनें उत्पन्न करून ठेवलेली आहेत, आणि त्या पूर्ण करण्याला त्यांना जगांत मोकळे सोडले आहे. देवाच्या घरी म्हणजे सृष्टींत कांही कमी नाही. पण प्राणी नुसत्या गरजा भागवून स्वस्थ बसेल किंवा वासना शमविण्याकरिता उद्योग करील, हे देवाने प्राण्यावर सोपविले आहे. आणि त्याची जशी बुद्धि किंवा परिस्थिति त्याप्रमाणे तें तें घडून येते. मुळांत प्रत्येक प्राण्याला देवाने सारखीच बुद्धि दिली होती किंवा कमजास्त दिली होती हे कोणी सांगावे ? पण पुढें त्यांच्यांतली बुद्धि कमजास्त दिसते हे खरे. तसेंच एक प्राणी मूळ या परिस्थितींत का व कसा पडला, हे कोणी सांगावे पण बुद्धींत आणि परिस्थितींत फरक पडल्यामुळे आज मनुष्यांत व इतर प्राण्यांत किंवा इतर प्राण्यांपैकी

प्रत्येक वर्गामध्येहि, त्यांच्यात्यांच्यांत सुधारणा ( परिणति ) कमजास्त दिसते खरी.

इतर प्राण्यांना मनुष्यापेक्षा कमी बुद्धि किंवा वासना असल्या, तरी कांही प्राण्यांचा उद्योग इतका मोठा, व व्यवहार इतका विस्तृत असतो कीं त्याचेंहि छोटेसे अर्थशास्त्र बनविता येईल. मुंग्यांचे जीवनचरित्र कित्येक शास्त्रज्ञानी इतकें तपशीलवार पाहून व लिहून ठेवलें आहे कीं, त्यांतून अर्थशास्त्राची कांही मूलतत्त्वें हुडकून काढता येतील. पण अर्थशास्त्र बनविण्याचा खरा मान सगळ्यांत अधिक सुधारलेल्या मनुष्य प्राण्यालाच मिळाला आहे. जगभर आपला संसार त्याने वाढविला आणि अर्थशास्त्रहि त्यावरून त्यानेच रचलें. रोज रोज नवे नवे उद्योग करणे, व रोज रोज यावरून नवे सिद्धान्त काढून शास्त्र बनविणे हा त्याचा क्रम एकसारखा अलीकडे सुरूच आहे. या दोन्ही बाबतींत गेल्या अवघ्या दोनशे वर्षांत त्याने इतकी मजल मारिली आहे कीं, तितकी त्या पूर्वींच्या दहा हजार वर्षांतहि मारिली नव्हती. माणसाचें सगळेच कांही विचित्र. उत्पति-काळचा मनुष्य आणि आजचा मनुष्य यांच्यामध्ये किती जमीनअस्मानाचे अंतर पडले आहे ! मनुष्य या नांवाला पात्र झालेला पहिला प्राणी व आजचा मनुष्य यांच्या शरीराच्या दृष्टीने कांही फरक पडलेला नाही. दोघांचे अवयव तेच व तितकेच आणि दोघांची शरीरचनाहि तीच. जुना मनुष्य शरिराने अधिक धिप्पाड व बळकट तर आताचा कदाचित् त्याहून थोडा खुजा व दुवळा, असा असेल; परंतु जुन्यांतल्या जुना मनुष्याचा जो सांगाडा सापडला आहे त्यांतहि मनुष्याला तीन हात किंवा तीन पाय किंवा तीन डोकीं असे आढळत नाही. किंवा डोके खाली व पाय वर असेहि आढळत नाही. परंतु पुराण पुरुषाचा संसार आणि आजच्या अत्यंत सुधारलेल्या देशांतल्या मनुष्याचा संसार — यांच्यामध्ये किती तरी अंतर दिसतें बरें ? एकाची सृष्टि त्याच्या दोन पायाखालच्या जमिनी-पुरती, तर आताच्या मनुष्याची सृष्टि सगळी या टोकापासून त्या टोकापर्यंतच्या पृथ्वीची झाली आहे !

तो डबक्यांत साचलेलें पावसाचें पाणी पीत असे. हा ‘ फिल्टर ’ केलेलें पाणी, सोडावॉटर, सरबतें, मद्यें पितो. तो डोंगराच्या कपारींत

किंवा गुहेंत निजे. हा सोन्यारुप्याने मढविलेल्या, हस्तीदंती किंवा चंदनी, शिसवी, व कलाकुसर केलेल्या, चित्रे काढलेल्या, पलंगावर निजतो. आणि त्याच्या पलंगावर जाळीदार मऊ कापडाची, कलाबतूच्या गोंड्यांची मच्छरदाणी पसरलेली असते. तो विश्रांतीकरिता दगडावर किंवा शेवाळावर बसे. हा मऊ कातड्याने किंवा मेणकापडाने मढविलेल्या 'स्प्रिंग' घातलेल्या कोचावर खुर्चीवर बसतो. तो रानांत सापडलेले मेलेल्या प्राण्याचें कुजट जाडे भरडे खरखरीत कातडें अंगावर घेई. हा कापशी, रेशमी, लोकरी कापडाने तयार केलेले निरनिराळ्या शिवणींचे मऊ मऊ कपडे घालतो. त्याला गुहेशिवाय किंवा वेलीच्या जाळीशिवाय घर नव्हते. याचें घर सात मजली व त्याला खिडक्या, दरवाजे, गच्च्या, इत्यादि निवाऱ्याच्या किंवा सुखाच्या सोई असतात. त्याला उघड्यावर वाहणारा वारा, तर याला विजेचे पंखे !

त्याच्या अंगावर बोटभर कीट वाढलेले. तर याचें अंग सुवासिक व मऊ साबणाने धुऊन तुळतुळीत केलेले. त्याला रानटी फुलाचा उग्र वास तर याला उष्ण भट्टी लावून तयार केलेलीं नाजूक सुवासिक अत्तरें. त्याला जागा बदलण्याला दोन पाय. तर याला बायसिकल, मोटार, आगबोटी, विमानें. त्याचा चाकर जासूद तोच स्वतः, तर याचे निरोप सांगण्याला बिनतारी तारायंत्र टेलिफोन. त्याचें अन्न म्हणजे रानटी फळें, कंदमुळें, झाडपाला व कच्चें मांस. तर याच्या ताटांत हरतऱ्हेचें धान्य, फळें, मध, साखर, मसाले, लोणचीं आणि मासे व मांस यांचीं बनविलेलीं तऱ्हेतऱ्हेचीं स्वादिष्ट पक्वान्न. त्याला रानटी पक्ष्यांच्या शब्दांचे संगीत. तर याला हरतऱ्हेची वायुवाद्यें, तंतुवाद्यें. याला बोलाचालायला बरोबरीचा रानटी मनुष्य. तर याला सगळ्या जगांतली बातमी सांगणारीं वर्तमानपत्रें, व शेकडो वर्षांत लिहून ठेवलेलीं पुस्तकें. त्याचें डोकें विचाराशिवाय रिकामें. तर याला अहोरात्र करमणुकीचीं साधनें व शिवाय स्वतःच्या डोक्यांत चाललेलें अखंड विचारभ्रमण.

सुधारलेल्या मनुष्याने एका अर्थाने सर्व पृथ्वीचा उपभोग कसा चालविला आहे तो पहा. सकाळीं उठतांच तोंड धुवायला विलायतेंतलें दंतमंजन व आफ्रिकन पशूच्या केसांचा ब्रश. हात धुवायला पॅरिसचे सुगंधी

साबण व पाणी सांडायला चिनांतील सुंदर मातीचीं भांडीं. सकाळीं पिण्याला दार्जिलिंगचा चहा किंवा सिलोनची कॉफी. बाहेर रपेटीला निघाला म्हणजे अरबस्थानचा घोडा आणि हातांत आफ्रिकन गेंड्याच्या कातड्याची बारीक कमची. जेवणाला टेबलावर स्वदेशी रोटी असेल पण त्याला लावून खायला विलायती मुरंबा, आणि मधून मधून सिलोनमध्ये पिकलेल्या फळांचे बनलेले चॉकलेट. तोंडांत टाकायला अरबस्थानांतला खजूर, इराणांतलें खिसमिस, आणि अफगाणिस्थानांतलीं द्राक्षें, फळांत इटलींतला अननस तर माल्टांतला सुका बेदाणा, लिहिण्याच्या टेबलावर नॉर्वे–स्वीडनचा कागद, तर त्यावर ठेवण्याला बेल्जिअममधले कांचेचे गोळे, ऑस्ट्रियन कारागिरीचा चाकू व शेफील्डची पोलादी कातरी. हातांत विलायती फाउन्टन पेन, तर तींत भरण्याला जर्मन शाई. त्याच्या अंगांतला कपडा चीन-जपानांतल्या रेशमाने व हिमालयांतल्या लोकरीने बनविलेला असून, त्याला लावलेला कलाबतू पारिस येथे तयार झालेला असतो. तोंडांत दक्षिण अमेरिकेंतला किंवा इजिप्शियन तंबाकूचा चिरूट, तर त्याला पेटविण्याला स्वीडन देशांत तयार झालेली आगकाडी, बसायला अमेरिकन लोखंडाची मोटार, तर तिच्या चाकांना सिलोन–मलायामधील रबराच्या धावा. दिवाणखान्यांत तर शेकडो देशांतील वस्तूंचें जसें प्रदर्शनच सजविलेले असते. त्यांत इराणांतले गालिचे, आफ्रिकन सिंहाचीं, बंगाली वाघाचीं कातडीं, इटालींतले संगमरवरी पुतळे, चिनांतलीं मातीचीं भांडीं. हिमालयांतल्या पशूंचीं शिंगें. त्याच्या अंगावरच्या अलंकारांत ऑस्ट्रेलियन सोन्यावर इराणी आखातांतलीं मोती, पारिसच्या कलाबतूंत विणलेलीं असतात. त्याचा कपडा पारिसचा शिंपी शिवतो व पारिसचा धोबीहि कदाचित् धुतो. त्याच्या खिशांत अमेरिकन डॉलर, विलायती गिनी, हिंदी रुपया अशीं नाणीं खर्चाला असलीं तर शोभेच्या कपाटांत शेकडो देशांतलीं जुनीं नाणींहि असतात.

अशा रीतीने वर्णन करीत बसलो तर सगळ्या जगाचा व्यापारी भूगोलच लिहावा लागेल ! या सर्व पदार्थांचा कच्चा माल मूळ कोणत्या देशांत निघाला, त्याचा अर्थ पक्का माल दुसऱ्या कोणत्या देशांत तयार

झाला, मग त्याचा पूर्ण पक्का जिन्नस कोठे बनून त्यावर रंग रोगण इस्तरी सफाई जिल्हई कोणत्या देशांत दिली गेली, तो कोणत्या देशांतल्या बाजारांत प्रथम विकायला निघाला व त्यानंतर कोणाच्या खाजगी घरांत जाऊन पडण्यापूर्वी त्याची बदली किती निरनिराळ्या बाजारपेठांतून झाली, या सर्व व्यवहारांत किती कोणा लोकांचे श्रम कारणीं पडले, कुणाचा किती पैसा खर्च पडला, कोणाला किती नफा कोणाला किती तोटा झाला, कोणाचा चेहरा आनंदाने खुलला तर कोणाचें काळीज दुःखाने करपून गेले, कोणा प्राण्याचे जीव खर्ची पडले, कोणाच्या बुद्धिकौशल्याचें चीज झाले, कोणाच्या कौशल्याला वाचा फुटली, कोणत्या देशाचें घर भरले, कोणत्या देशाला दारिद्र्य आले—याचा विचार करावयाला बसाल तर दिवसरात्र पुरणार नाही व विचारानेच वेडे होऊन जाल.

मग हा सर्व वस्तुप्रपंच, हा प्रचंड विश्वव्यवहार, हा कशाचा खेळ म्हणावा ? मनुष्य प्राण्याच्या गरजांचा कीं वासनांचा ? या प्रश्नाचें उत्तर देतांना 'हा सर्व खेळ वासनांचा' असेंच म्हणावे लागेल. गरज म्हटली म्हणजे तेथे फक्त देहधर्माचा संबंध येतो. आणि अगदी पुराणा रानटी मनुष्य काय, किंवा विसाव्या नव्हे एकविसाव्या शतकांतला तुमचा अगदी सुधारणेच्या श्रीमंतीच्या कळसाला जाऊन पोचलेला मनुष्य काय, दोघांचे देहधर्म निभावण्याला जवळजवळ तितकेच लागते व पुरते. त्याला पूर्वी भूक भागण्याला एका वेळेला शेरभर पौष्टिक अन्न लागत होते, तर आज तुम्हालाहि बहुधा तितकेंच लागतें. मनुष्य श्रीमंत झाला म्हणजे त्या मानाने त्याचें उदर मोठे होत नाही, किंवा जठराग्नि अधिक प्रदीप्त होत नाही. उलट अनुभव असाच कीं, श्रीमंतीने सुधारणेने मनुष्य जितका अधिक सुखावतो तितके त्याचे शारीरिक श्रम कमी होत जाऊन त्याला भूक कमीच लागते. फरक इतकाच कीं, त्याची जीभ चवचाल चावट होते, आणि त्या पायीं त्याचा पुष्कळसा पैसा व्यर्थ खर्च होतो. भुकेप्रमाणे तहान हीहि एक मुख्य गरज आहे. तिचें समाधान पाण्यानेच होणार. मग तें पाणी सोडावॉटर असो, किंवा फिल्टर्ड वॉटर असो, किंवा पाण्याची वाफ करून फिरून वाफेचें पाणी केलेलें डिस्टिल्ड वॉटर असो. खरी तहान फळांच्या रसाने तर भागत नाहीच व मद्याने तर भागत नाहीच नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

रानटी मनुष्य केव्हा डबक्यांतल्या कर्दमांतले पाणी पिईल, तर केव्हा डोंगरांतून वाहणाऱ्या स्वच्छ प्रवाहाच्या किंवा झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याचें पाणी पिईल. मनुष्याने इतर कितीहि द्रव सेवन केले तरी शेवटी एक भांडेभर पाणी म्हणून प्याल्याशिवाय त्याची तहान भागणारच नाही.

खाण्यांत जसा त्याने हजारो पक्कान्नें बनवून पैसा नासला तसा पिण्याच्या पाण्याकरिताहि वाटेल तर नासावा—त्याला नको कोण म्हणणार ? पण तहान भूक निवविण्याकरिता त्याने कुबेराची सर्व संपत्ति खर्चिली, तरी पोटांत काय किती जातें याचें मोजमाप केल्यास रानटी मनुष्य व सुधारलेला मनुष्य यांच्यामध्ये फारसें अंतर नाही, असेंच आढळून येईल. खेळ मोठा झाला, पण तो गरजेपेक्षा वासनेनेच अधिक केला. खाणें पिणें ही एकच गरज इतकी मोठी असते कीं, तिजवर मनुष्य-कुटुंबाच्या एकंदर खर्चापैकी शेकडा सुमारे पन्नास साठ टक्के खर्च होतो. श्रीमंतांच्या घरीं अवांतर परिवार मोठा, म्हणून कळत नाही. पण एखाद्या गरीब कुटुंबाचा जमाखर्च पाहिला तर हें प्रमाण कसें बसते, हें कळून येईल.

यानंतर दुसरी गरज म्हटली म्हणजे निवाऱ्याची. रानटी मनुष्य कपारींत हातपाय पोटाशीं धरून बसला, किंवा गुहेंत शिरला, किंवा जाळींत घुसला, तर त्याला जितका निवारा मिळतो तितकाच एखाद्या राजाला राजवाड्यांत मिळतो. मग तो सात मजली असला म्हणून काय झाले ! या निवाऱ्याकरिता, गरिबांचे नव्हे पण श्रीमंताचे काय, शेकडा सुमारे दहापासून पंधरा टक्के खर्ची पडतात. अशा रीतीने या दोन गरजांकरिता मिळून सत्तर पंचाहत्तर टक्के खर्ची पडल्यानंतर उरलेल्या पंचवीस-तीस टक्क्यांत त्याचा कपडालत्ता, शिक्षण, चैनी, धर्मदाय, देणगी, प्रवास यांचा निर्वाह होतो. पण इतका मोठा खर्च अवघ्या दोन गरजांवर होतो, याला कारण श्रीमंतांची गरज नसून वासना याच होत. खाणें, पिणें, घर, आच्छादन, वस्त्रप्रावरण या अगदी मूलभूत गरजा घेतल्या असता त्यांत त्याची इतकी पुष्कळ संपत्ति खर्च होते. याचें कारण असें कीं, त्या भागविण्याला त्याला अनेक इतर परिवाराची आवड उत्पन्न होते. भिकारी फकीर, संन्यासी यांची भूक नारळाच्या करटींत जेवून

जितकी भागते तितकीच सोन्या-रुप्याच्या भांड्यांतून जेवल्याने श्रीमंतांची भागते. स्वच्छतेच्या दृष्टीनेहि पाहता लाकडी भांडी सोन्याच्या भांड्यां-इतकींच काम देतात. पण स्वतःच्या डोळ्याला शोभा दिसावी, आपली श्रीमंती लोकांच्या नजरेला पडून आपण त्यांच्याहून श्रेष्ठ आहों, असे त्यांना वाटावे, इत्यादि अवांतर हेतूंनींच तो सोन्यारुप्याचीं भांडीं वापरतो. भूक भागणाऱ्या प्रत्यक्ष प्राथमिक गरजेशीं याचा कांही संबंध नाही. याचें दुसरें कारण असें कीं, एकाच पदार्थाचा मनुष्याला कंटाळा येतो म्हणून तो वारंवार पदार्थ बदलतो. आणि तिसरें कारण असें कीं, एका पदार्था-पेक्षा दुसरा अधिक चांगला असें ज्ञान त्याला अनुभवाने होत असते. अशा रीतीने–म्हणजे वैचित्र्य, तारतम्य, रुचिभेद, शोभेची आवड, श्रीमंतीचा गर्व, इत्यादि गोष्टी–वासना गरज भागविण्याच्या जोडीला येऊन बसतात.

एखाद्या शांत पाण्याच्या तळ्यांत सहज लीलेने कोणी एखादा दगड टाकला असता प्रथम त्या जागीं लहानशी लाट येते, तिच्या धक्क्याने दुसरी तिच्याहून मोठी लाट येते, त्यानंतर तिच्याहून दूरवर जाणारी तिसरी येते. व या क्रमाने तळ्याच्या अगदी टोकापर्यंत पोचणाऱ्या लाटा एकामागून एक उठतात. त्याचप्रमाणे शरीरधर्माने ज्या अगदी साध्या व मूलभूत गरजांच्या लाटा मनांत उठतात, त्यांच्या धक्क्याने पृथ्वीच्या अंतापर्यंत जाऊन पोचणाऱ्या वासनेच्या लाटा मनुष्याच्या मनांत उठतात, व त्याची शक्तिसाधने असतील त्या मानाने तो त्या पुरवून घेऊं शकतो. पण तळ्यांत उठणाऱ्या लाटा जर एकेरी असतात तर मनांत उठणाऱ्या वासना दुहेरी तिहेरी किंवा 'अनंतहेरी' असतात. प्रत्येक वासना ही तळ्यांत पडलेल्या दगडासारखी ठरून, तिजपासून मनाच्या भोवतीं वासनांची चक्रें व भेंडोळी उत्पन्न होतात. सप्तसुरांतून उपस्वर व अनुरणनात्मक ध्वनि उठून नादब्रह्म निर्माण होतें. किंवा साध्या पांच पन्नास अक्षरांच्या वर्ण-मालेंतून अनंत निरनिराळ्या रचनांनीं विश्वव्यापी वाङ्मयब्रह्म निर्माण होते. त्याचप्रमाणे गरजांतून वासना व वासनांतून उपवासना निर्माण होतात.

मुख्य गरजांतून उत्पन्न होणाऱ्या वासनांप्रमाणेच दुसऱ्याहि स्वतंत्र वासना कांही अशा असतात कीं, त्या गरजांसारख्याच भासतात. उदाहरणार्थ,

आत्मरक्षण. आपली गरज भागण्याचें साधन स्वतःजवळ नसले, व ते दुसऱ्याजवळ असलेले दिसले, तर ते हस्तगत करून घेण्याची उपजत बुद्धि ही जवळ जवळ देहधर्मशीच आहे. आणि ती बुद्धि सुधारलेल्या मनुष्या-प्रमाणेच रानटी मनुष्य, लहान मुलें, पशुपक्षी यांच्या मध्येहि दिसून येते. सुधारलेला मनुष्य या कामीं हत्यारें दारूगोळा तयार करतो, आरमारें, विनाशक बोटी बांधतो, तर रानटी माणूस, पशु व मुलेंहि जन्मसिद्ध हत्यारांचा—म्हणजे हात दात नखें इत्यादिकांचा— उपयोग कर-तात. आणि आत्मरक्षणांत बचाव व हल्ला दोन्ही येतात. आपली वस्तु आपणांजवळ राहावी किंवा दुसऱ्यापासून ती हस्तगत करावी या गरजे-प्रमाणे, निव्वळ शरीरस्वातंत्र्य राखणें होहि एक प्राथमिक गरजच आहे. स्वेच्छेने होणाऱ्या कोणत्याहि शरीराच्या व्यापाराला दुसऱ्याकडून प्रतिबंध झालेला कोणाहि प्राण्याला खपत नाही. आहार, निद्रा, भयनिवारण, यांच्याच बरोबरीच्या, " सामान्यमेतत् पशुभिर्नराणां " या वचनांत सांगित-लेल्या, इतर कांही वासनाहि जवळजवळ गरजेच्या स्वरूपाच्याच असतात.

देवाने स्त्री–पुरुष–द्वंद्व उत्पन्न कां केले, हें त्याचें त्यालाच माहीत. शेक्सपीयरच्या नाटकांतला एक माथेफिरू स्त्रीवैरी म्हणतो, " प्रजोत्पत्तीचा मार्ग स्त्रीशिवाय दुसरा कांही ठेवला नाहीस, ही ईश्वरा तुझी केवढी मोठी चूक झाली ! " होय झाली खरी. तूं स्वतः ब्रह्मदेव होऊन प्रतिसृष्टि निर्माण करशील तेव्हा वाटेल तर, आणि साधेल तर, ही चूक काढून टाक कशी ! पण आज आहे तें आहे खरे. म्हणून सहचारिणीची वासना ही प्राथमिक गरजेंत मोडते. पण स्त्रीने संततीची जोड करून दिली म्हणजे मग स्वतः-वरचें प्रेम त्या संततीवरहि बसते ! आणि अशा रीतीने आत्मबुद्धीचा विस्तार सहजच होतो. इतका कीं, स्वतः प्राण देऊनहि रानटी मनुष्य किंवा पशुपक्षी आपल्या संततीचें रक्षण करील. बिरबलच्या गोष्टींत वानरीने, पोर पायाखाली घालून, वर उभी राहून, तोंडांत पाणी जाण्याचें वाचविलें. ती गोष्टहि केव्हा केव्हा घडेल. पण सर्व नियमांना अपवाद असतातच. तसाच हा.

आपल्या देहधर्माचें समाधान व्हावें, आपल्या गरजा भागाव्या आपल्या वासनांची पूर्ती व्हावी, या गोष्टी आपलें जीवमान असेल तोंपर्यंत

अबाधित चालाव्या, दरम्यान त्यांना कोणाकडून बाध आल्यास जीवनकलहांत आपण यशस्वी व्हावे, हें तर मनुष्यमात्रास हवेंच असतें. पण आपले म्हणून जे कांही आहे ते आपल्या संततीला पुढे असेच अबाधित लाभावे, अशीहि त्याची इच्छा असते. रानटी मनुष्य व पशुपक्षी यांची मुलाविषयीची बुद्धि त्यांच्या बालपणीं तरी सुधारलेल्या माणसासारखीच असते. प्रौढपणीं त्यांना मुलांचा विसरहि पडू शकतो. अशा स्थितींत आपल्या मरणोत्तरहि मुलासंबंधी आपली वासना सफल व्हावी, इतका दूर विचार त्यांच्या मनांत येतो, असे वाटत नाही. याचें कारण त्यांना मनुष्याच्याप्रमाणे मृत्यूचे ज्ञानच नसते. ताम्रपट देणारा घेणारा मनुष्य प्राणी, यावच्चंद्र-दिवाकरौ कोणतीहि गोष्ट टिकविण्याची कल्पना येणारा प्राणी, हा याहून वेगळा आहे. आणि कायद्याच्या बळावर त्याच्या मरणोत्तर मृत्युपत्रान्वये त्यांच्या वासनांचा अंमल थोडाबहुत होतोहि.

वरील विवेचनावरून दिसून येईल कीं, जगभर मनुष्य–प्रपंचामध्ये वासनांचा सुकाळ व खेळ चालू आहे. “ गरजा इतक्याशा गर्जत नाहीत, पण वासना मात्र वसवसतात !” या वासनांच्या कारणामुळे मनुष्याच्या हातून सर्व उद्योग होतो. त्याचेंच फळ सुधारणा म्हणतात ती होय. त्यांतच आपलें कल्याण व सुख आहे, असें मनुष्यास वाटतें. आणि त्या गरजा व कल्याण बुद्धीच्या कार्यकारणभावाच्या निरीक्षणांतून अर्थशास्त्र उद्भवतें. पण पूर्वी एका ठिकाणी सांगितल्याप्रमाणे सुधारलेल्या समाजाच्या व्यव-हारांतून अर्थशास्त्राची मूलतत्त्वें हुडकून काढून त्यांच्या वाढीचा किंवा विकासाचा किंवा परिणतीचा योग्य क्रम सांगण्याचा प्रयत्न करूं तर गुंता पडून ब्रह्मघोटाळा झालेली गुंडी किंवा लड उकलण्यासारखे कठिण आहे. म्हणून रानटी मनुष्य, लहान मूल किंवा पशुपक्षी यांची उदाहरणें घेऊन त्या मूल तत्त्वांचा क्रम उलगडण्याचा थोडासा प्रयत्न होऊं शकतो. कोणांत कोणत्या तर कोणांत कोणत्या तत्त्वाचा धागा हाताला लागतो पाहूं.

जगांतील वस्तुजात हें वासनापूर्तीचें साधन होय. पण वासना ही केवळ वस्तुनिष्ठ नसते, तर ती आत्मनिष्ठहि असते. वस्तु दिसल्याने वासना उत्पन्न होऊं शकेल. पण ती त्या वस्तूला चिकटूनच बसेल, असे नाही.

अनुक्रम १८०७६
दि. ५/७/१९७०

म्हणजे वासनेला मर्यादा उत्पन्न झाली कीं वस्तूची गरजहि त्याप्रमाणे मर्यादित होते. प्रत्यक्ष देहधर्माना उपयोगी पडणाऱ्या वस्तूंविषयींची वासना फार लवकर शमते, पण मनाला समाधान देणाऱ्या वस्तूविषयींची वासना थोडक्यांत शमत नाही. भाकरी किंवा पक्वान्ने यांची देहाला गरज खरी, इतकी कीं भुकेने व्याकूळ झालेल्या उपाशी मनुष्यापुढें रत्नें मांडली तर तीं टाकून तो भाकरी उचलील ! पण फार तर चार दोन भाकरी किंवा दहा वीस जिलब्या खाऊन पोट भरले म्हणजे त्याच त्याला नकोशा होतील व त्या आणखी पुढे आल्या असतां त्याला वीट येईल, किंबहुना वांतीहि होईल. तहान लागली असता तो पाण्याकरिता जीव टाकील, पण आकंठ पान झाल्यावर त्याला तेंच पाणी डोळ्यापुढेहि नकोसे होईल. म्हणजे चार भाकरी, ताटभर जिलब्या आणि तांब्याभर पाणी येवढ्यांत त्याची वासना संपली. कुडकुडणाऱ्या थंडींतहि फार तर दोन दुलया खपतील, पण एकावर एक चार घातल्या तर उकडूं लागलें असें वाटून तो वरच्या दोन फेकून देईल.

याच्या उलट, शरिराला प्रत्यक्ष किंवा सद्यः उपयोगी नसणाऱ्या वस्तूंविषयींची त्याची वासना लवकर शमत नाही, शर्यतीचें वेड असणाराला दहा सोडून शंभर घोडे तबेल्यांत बांधता व पोसता आले तर ते हवेच असतात. दागिन्याची आवड असणाऱ्या स्त्रीला दहा पेट्या भरून दागिने असले तरी अकरावी मिळाल्यास ती हवीच म्हणेल. पुस्तकांचा शोक असणाऱ्या धनिकाला पुस्तकांच्या गर्दीने घर भरलें, किंबहुना निजा-बसावयाला जागा अपुरी पडूं लागली, तरी त्यांत आनंदच वाटतो. हौशी राजे-रजवाडे मरेपर्यंत नवे नवे वाडे बांधीतच असतात. जमिनी घेण्याची आवड उत्पन्न झाली की, गावच्या गाव खरेदी झाले तरी मनुष्य आणखी घेतच जातो. आणि पैसा हा तर काय, बोलून चालून सगळ्या सुखसोयींचें मायपोट ! तो मनुष्याला कितीहि मिळाला तरी पुरेसा होतच नाही. ज्याचा प्रायः वीटच कधी येत नाही अशी वस्तु म्हणजे पैसा. नवकोट नारायण ही म्हण खरी, पण खुद्द नवकोट नारायणाला विचारलें तर तो म्हणणार 'परार्ध संख्येपर्यंत अजून जागा आहे, तेथपर्यंत पोचल्यावर मग बोला. तेव्हा पाहूं !'

गरज ही आत्मनिष्ठ आहे वस्तुनिष्ठ नाही. म्हणूनच वस्तूंचा उपयोग सर्वत्र किंवा सर्वकाळ एकसारखा असत नाही. भाकऱ्या त्याच पिठाच्या. त्याच स्वयंपाक्यानें केलेल्या. परंतु खाणाराला पहिल्या भाकरीचें जें प्रेम तें ती खाऊन झाल्यावर दुसरीचें नाही. दुसरी खाऊन झाल्यावर तो तिसरीचे काठ किंवा तुकडे तोडून फेकून देत देत अळंटळं करीत ती खाईल. चवथी जराशी दूर सारील, तर पांचवी निरुपयोगी म्हणून कुत्र्याला फेकून देईल. गरीब मजुराला चांदीचा सबंध रुपया दृष्टीस पडला तर त्याचे डोळे आनंदाने चमकतील. हजार रुपयेवाला तोच रुपया उचलून निष्काळजीपणाने कोठेहि सांदी कोपऱ्यांत फेकून देईल. आणि लक्षाधीश तोच रुपया, त्याच्या डोळ्यापुढे खाली पडला तर, 'जाऊ दे कीं,' म्हणून उचलूनहि घेणार नाही. तात्पर्य, वासना ज्याप्रमाणे क्षीण होते त्याप्रमाणे तीच वस्तु निरुपयोगी ठरते. गरजेच्या वस्तूना ज्याप्रमाणे किमान म्हणून मर्यादित किंमत असते तशीच कमाल म्हणून कांही मर्यादित किंमत असतेच. तिच्या पलीकडे अत्यंत मौल्यवान् वस्तूलाहि काडीची किंमत उरत नाही.

गरजा व वासना यांचा धर्म आणखीहि एक असाच असतो कीं, एकाच वस्तूचा उपयोग मनुष्याला जन्मभर एकसारखा राहात नाही. कांही गरजा तर प्रतिस्पर्धी असतात. गरजा व वासना या पाठशिवणीचा किंवा खो खो चा खेळ खेळत असतात. जिची पाठ शिवली गेली ती मार खाल्लेल्या गड्याप्रमाणे बाजूला पडते. खो खोच्या खेळांतला धावणारा गडी धावून थकला म्हणजे तो दुसऱ्याला खो देऊन त्याला उठवून धावायला लावतो, आणि आपण खाली बसून विराम पावतो, लाकडांत खिळा रुतला असला तर दुसरा खिळा त्यावर मारून ठोकला म्हणजे पार निघून जातो. तसेंच नवी आवड उत्पन्न झाली कीं, ती जुनीला मागे टाकते. घरीं सायकल आली म्हणून बसायचा घोडा मागे पडला आणि पुढे मग मोटार विकत घेतली म्हणून सायकल धूळ खात पडली, असें श्रीमंतांच्या घरचीं तरुण मुलें नेहमीं करतांना दिसतात ना ! दारूची सवय सुटणें कठिण, पण दारूच्या दुकानासमोर चहा-कॉफीचा क्लब निघाल्याने अनेकांची दारू सुटल्याचीं उदाहरणें आहेत. आणि कथापुरा-

णाची गोडी लागल्यामुळे क्लब सोडलेले म्हातारे पेन्शनर कोणी पाहिले नाहीत ?

कांही कांही गरजा व वासना एकमेकांना पूरक असतात. एकीमुळे दुसरी उत्पन्न होते व दुसरी पहिलीचें कार्य पुरे करते. म्हणून त्या अनुबंधी होत. त्यांना 'जोडीदार' किंवा 'नातेवाईक' किंवा 'संगतखोर' असें म्हणता येईल. लेखकाच्या दृष्टीने खुर्ची म्हटली कीं, तिच्याबरोबर टेबलाची गरज सहजच उत्पन्न होते. मोटार घेतली म्हणजे शोफर-शिवाय चालेल पण पेट्रोलशिवाय चालणार नाही. लग्नकार्य म्हटलें कीं, वाजंत्री बोलावलेच पाहिजेत. रावसाहेब आणि रावबहादुर यांची जोडी. "अरे आज रावसाहेब जेवायला आले मग रावबहादुर कसे नाहीत ?" विलायती माणूस थाटाने टेबलावर जवायला बसायचा म्हणजे काटे चमचे तर हवेतच. पण टेबलावर खाण्याच्या फळाबरोबर दिखाऊ फुलांच्या करंड्याहि हव्या. मोठी मेजवानी हॉटेलांत दिली कीं, बँड गायनवादन जोडीला हवेंच. अशा जोडीदार गरजा व वासना असतात त्यांची मग सवयच लागते. या सवयी व्यक्तींना सोडून कुटुंबानांहि लागतात. आणि त्यामुळे त्यांचेच पिढीजाद कुलाचार बनतात. राजेरज-वाडे दसऱ्याला शिलंगणाला निघाले कीं, प्रथम बकरा मारलाच पाहिजे. तो नसला कीं, समारंभ अपुरा वाटतो !

---

# ७. वाङ्मयविषयक माझी दृष्टि

— वा. म. जोशी

प्रो. फडके यांनी साहित्याचे दोन प्रकार मानिले आहेत. एक शिकविणारें साहित्य आणि दुसरे रिझविणारें साहित्य. शिकविणारें साहित्य रिझविणारें होऊं शकेल. उदाहरणार्थ, मेकॉलेचे निबंध, विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला, शिवरामपंत परांजपे यांचे कांहीं निबंध इत्यादि. त्याचप्रमाणे रिझविणाऱ्या साहित्याला शिकविण्याचें वावडे नाही, त्याने शिकविलें तर तें पाप आहे असें प्रा. फडके कधीहि म्हणाले नव्हते आणि म्हणत नाहीत. 'कलेकरिता कला' असे ज्या वेळी ते म्हणतात त्या वेळी त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ एवढाच असतो की कलावंताने कलाकृति करतांना आपल्या कलेचे नियम आपण पाळतों किंवा नाही आणि आपली कृति सुंदर होते किंवा नाही याकडे मुख्यतः लक्ष द्यावें, आणि यांत गैर काय आहे ? साधी घरगुती उदाहरणे घेऊन बोलावयाचें म्हणजे टेनिस खेळणाऱ्याने टेनिसचे नियम सांभाळून डाव कसा जिंकता येईल इकडे लक्ष द्यावे. प्रतिपक्षाचा पराभव झाला तर त्याला वाईट वाटेल कीं काय, त्याला हूल दाखवून चेंडू दुसरीकडे मारणें हें पाप आहे कीं काय, असल्या गोष्टीचा विचार करूं नये हें म्हणणें सरळ आहे. तसेंच कलावंतानेहि आपल्या कलेच्या दृष्टीने विचार करावा. इतर असंबद्ध विचारांच्या भोवऱ्यांत सापडूं नये, हें प्रा. फडक्याचे म्हणणें हिशेबी आहे. गुलाबाचें चित्र पाहिल्यावर त्यापासून कांहीं बोध मिळत नाही अशी कोणी तक्रार करतो काय ? बरें एखाद्या सापाचें, वाघाचे किंवा गाढवाचें हुबेहुब चित्र काढलें तर त्यावरहि कोणी आक्षेप घेत नाही. एखाद्या नग्न स्त्रीचें चित्र काढलें तर मात्र वादाचें वादळ उठतें. साहित्यामध्ये देखील असेंच आहे. एखाद्या गद्यलेखकाने किंवा कवीने वनश्रीचें किंवा राजवाड्याचें किंवा एखाद्या गरिबाच्या झोपडीचें चांगलें चटकदार वर्णन केलें तर त्यावेळी कोणी असा प्रश्न काढीत नाही कीं या वर्णनापासून काय बोध घ्यायचा ?

पण रूढ कल्पनांना, नीति-नियमांना, चालीरीतींना धक्का देणारें वर्णन कितीहि चांगलें असलें कीं--किंबहुना चांगलें असतें म्हणूनच--वाद निघतो कीं असले लिखाण योग्य कीं अयोग्य ?

या विषयासंबंधी माझें मत दहापंधरा मिनिटांत सांगायचें आहे म्हणून मी असें म्हणेन कीं 'कलेकरिता कला' हें प्रमेय मला सामान्यतः मान्य आहे. 'सामान्यतः' या शब्दावर मी जोर देत आहे. कारण मी या प्रमेयाला कांही अपवादात्मक परिस्थितींत थोडीशी मर्यादा आणि मुरड घालूं इच्छितों. मघांशीं आपण खेळण्याचें एक उदाहरण घेतलें. खेळतांना प्रतिपक्षाला हूल देऊन फसविण्यांत कांही पाप नाही हें खरें आहे, त्याचप्रमाणे त्याचा पराभव झाला असतां त्याला ज दुःख होईल तिकडे पाहावयाचें नसते हेहि खरें आहे; पण त्याचा जीव जाईल किंवा त्याला मोठी दुखापत होईल अशाप्रकारचें आततायीपणाचें 'अंग-झोडपें' म्हणजे ( Bodyline ) बोलिंग बरेच लोक अशिष्टपणाचें समजतात तें उगाच नाही. कलेचा खेळ खेळताना 'तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो' असें गोष्टींतल्या बेडकांप्रमाणे म्हणण्याची पा ी जनतेवर येऊं नये इतकी काळजी कलाक्रीडा करणाऱ्यांनी घ्यावी असें मला वाटतें.

साहित्यकलेला स्वातंत्र्य असावें, तिला पायबंद कोणी घालूं नये. आनंद देणें हेंच तिचें अवतारकृत्य आणि तेंच तिचे सौभाग्य. आपल्या मंदिरांत तरी तिला राणीचा मान पाहिजे, जराजर्जर रूढीचा, निर्दय नीतीचा किंवा कल्पनाशून्य सत्यप्रीतीचा तिला सासुरवास नसावा, या आणि अशा सर्व गोष्टी मला मान्य आहेत. पण कलेचा आणि साहित्यकलेचा मी भक्त असलों, तरी मी अनन्य भक्त नाही. मला केव्हांहि हें विसरतां येत नाही कीं मनुष्याचा जन्म केवळ कलेचा आनंद लुटण्याकरितां येत नाही. कला नसेल तर मनुष्याच्या जीवनांत ज्या अत्यंत रम्य आणि वंद्य गोष्टी आहेत त्यांत कलेबरोबर नीतीचा आणि सत्याचाहि समावेश होतो आणि त्यांचें जर एकमेकांत पटलें नाही तर जीवनांतली ती मोठीच आपत्ति म्हटली पाहिजे. जीवनांत कला नसेल तर तें बेचव, नीरस, कळाहीन होईल हें खरें; पण सत्य नसेल तर तें लुळे, आंधळें, पांगळें होईल, आणि नीति नसेल तर तें रोगट, कुजकें, नासकें होईल. अर्थात् या तिहीपैकी

कोणाचेहि अनिर्बंध असें स्तोम माजविण्यांत आणि कोणालाहि शेफारूं देण्यांत अर्थ नाही. कलेला काय, नीतीला काय किंवा सत्याला काय, आपापल्या, क्षेत्रांत सामान्यतः स्वातंत्र्य असावे. हें एक ध्यानांत धरावें कीं कलेचा कलह पुष्कळ वेळां होतो तो खऱ्या नीतीशीं किंवा उच्चतम सत्याशीं नसतोच मुळी. पुष्कळ वेळा मी असें पाहिलें आहे कीं नीतीचा आणि सत्याचा मक्ता जणू कांही आपल्याकडेच आहे असें समजणाऱ्या आकुंचित बुद्धीच्या भक्तगणांनी नसता कलह उत्पन्न करून उगाच वावटळ उत्पन्न केलेलें असते. कांही प्रामाणिक नीतिभक्तांना विनोदबुद्धीच नसते आणि आपल्या उणी-वेची त्यांना जाणीव नसल्यामुळे ते नाकाने कांदे सोलून डोळयांतून उगाच आसवे गाळतात आणि पावित्र्य-विडंबनाची वगैरे कोल्हेकुई उठवून देतात. असल्या विनोदबुद्धीहीन नीतिभक्तांना ताळयावर आणण्याकरिता कांही एकांतिक कलात्मक व कलैकपुरस्कारक लोक असणें समाजाच्या दृष्टीने फार उपयुक्त आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं कलेच्या दृष्टींने पाहता येणें ही गोष्ट सोपी नाही.

हें प्रांजलपणें कबूल केल्यानंतर ' कलेकरिता कला ' या प्रमेयाला मुरड कशी घातली पाहिजे हें थोडक्यांत सांगण्यास हरकत नाही, ' कले-करिता कला ' हे जितकें खरें आहे त्याहून कला हे एक जीवनाचें अंग आहे, तें जीवनसर्वस्व नव्हे हें अधिक खरें आहे. ' आनंद ' हें कलेचें अवतारकृत्य खरें; पण नीतीच्या नरडयाला नख लावून किंवा सत्य पायाखाली तुडवून कला जाच करूं लागली तर सात्त्विक आनंद मिळूं शकेल काय ? अर्थात् नाही.

आता मला असें कोणी विचारील कीं " वामनराव, सत्याला किंवा नीतीला दुखविणारे किंवा चिरडणारे कलेचे बेबंद तांडवनृत्य तुम्हाला नको हे वादाकरिता क्षणभर आम्ही कबूल करितों. आता यापुढे तरी तुम्हाला कलेकरिता कला या प्रमेयाला दुसरी कांही मर्यादा किंवा मुरड घालायची नाही ना ? " मला जर कोणी प्रश्न केला तर मी म्हणेन की " नाही. आणखी कांही मुरड-बिरड घालायची नाही; पण एक मुद्दा मात्र मला स्पष्ट करायचा आहे. तो असा कीं ज्या कलावंताला कांही सांगावयाचें नाही, ज्याच्याजवळ सांगण्यासारखें कांही नाही त्याची

कला लहान मुलांच्या रबरी फुग्यासारखी दिसण्यांत सुंदर, पण अगदी पोकळ असेल. अशा कलेला विशेष कांही किंमत नाही. प्रा. फडक्यांच्याच कलात्मक कादंबऱ्या घेतल्या तरी त्यांमध्ये प्रा. फडक्यांना संसारांत जीं चमत्कृतिजनक दृश्यें दिसली आणि जी त्यांना इतरांना सांगावीशीं वाटली तींच त्यांनी कलात्मक रीतीनें वर्णिलेली आहेत ना ? संसारांतील ही चमत्कृतिजन्य दृश्यें हुडकून काढण्यांत त्यांचा मार्मिकपणा दिसून येतो. हा मार्मिकपणा त्यांच्यामध्यें नसता तर त्यांची वर्णनें विशेष आनंददायक झाली असतीं काय ? वाङ्मयीन कलावंत जे सांगेल त्यांत जितका खोलपणा, जितका मार्मिकपणा, जितकें अर्थवैभव असेल त्या मानाने त्याची योग्यता. कमीअधिक कर्णमधुर शब्दावडंबर, शुष्क कोटया, क्षणभर चकित करणारे शब्दश्लेष इत्यादिकांमध्ये जी थोडीबहुत चमत्कृति आहे तिच्यामुळें मनाची क्षणभर करमणूक होते एवढेंच तिचे महत्त्व. डोंबाऱ्याचे खेळ किंवा माकडाच्या उलटयासुलटया उडया पाहून क्षणभर आपण हसतो त्यांतलाच तो प्रकार. अशा लोकांची किंमत बेताचीच. शेक्सपिअर, थॉमस हार्डी, आपले फडके, इत्यादिकांनी आपल्या कलाकृतीमध्ये मानवी स्वभावविशेष, मानवी संसारांतील पेचप्रसंग, मानवी मनामध्ये आंतल्याआंत चाललेले कलह किंवा उलटसुलट प्रवाह, मानवी मनांतील बऱ्यावाईट विचारांची, भावनांची आणि प्रवृत्तींची विलक्षण गुंतागुंत, इत्यादिकांची जी शब्दचित्रें काढिली आहेत त्यांवरून अशा रीतीनें वागा किंवा वागू नका असें सांगितले नसेल, पण तीं शब्दचित्रें पाहिल्याबरोबर जें पूर्वी आपणांस दिसलें नव्हते, किंवा निदान स्पष्टपणें दिसलें नव्हते, तें आपण आज पाहिलें असे आपणांस वाटतें आणि आपल्या अनुभवांत चांगली भर पडली असा प्रत्यय येऊन आनंद वाटतो ही गोष्ट निर्विवाद आहे. कित्येक वेळां अनुभवामध्यें भर पडत नाही तर स्वानुभवाचा पुनः प्रत्यय आणून देऊन म्हणा, साहित्यिक कलावन्त आपणांस ऋणी करतात. हे कलावन्त केवळ शाब्दिक वेलबुट्टीने आणि रंगी बेरंगी चकाकीने मन रमवू म्हणतील, तर क्षणभर मन रमेल कदाचित; पण लगेच आपण म्हणू कीं या कलावंतांची बुद्धि कांही विशेष किंवा खोल किंवा मार्मिक नाही. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे कला ही उपदेशगर्भ

असलीच पाहिजे असें नाहीं हे त्रिवार सत्य आहे. कलाकृतीमध्ये कलेचे नियम सांभाळले पाहिजेतच आणि हे नियम सांभाळून कलात्मक आनंद देणें हेच त्याचे खरें कार्य. पण कलाकृतींत कलावन्ताच्या मनाची खोली, प्रगल्भता, विवेकशीलता, मार्मिकता, ज्या मानानें दिसेल त्या मानाने त्या कलाकृतीची किंमत कमी अधिक ठरेल. या गुणांच्या अभावी ती कलाकृति सुंदरहि दिसू शकेल; पण ते सौन्दर्य दिखाऊ, पोकळ असण्याचा संभव आहे. क्वचित् प्रसंगी हें सौंदर्य सापाच्या किंवा वाघाच्या किंवा कलावन्तिणीच्या सौंदर्याप्रमाणें घातुकहि होऊं शकेल. असे होऊं न देण्याचा प्रयत्न न करणें अवश्य आहे. कलाकृति मोहक असावी, पण भलता मोह तिने घालूं नये हे सर्वांगीण जीवनाच्या दृष्टीनें उचित आहे."

---

## ८. श्रद्धा-सरितेची गंगोत्री

**— श्री. म. माटे**

बुद्धिप्रामाण्य याला इंग्रजी शब्द **Rationalism** असा आहे; आणि Rationalism म्हणजे Opinions deduced from reason as distinct from inspiration or revelation — तर्काने प्राप्त झालेलीं मतें; एकदम स्फुरलेलीं किंवा अपौरुषेय अशीं मतें नव्हत. इंग्रजींतला श्रद्धावाचक शब्द Faith असा आहे; आणि Faith चा अर्थ हा कीं, Assent of the mind to the truth of what is declared by another— म्हणजे जें दुसऱ्याने सांगितलें असेल, तें खरें किंवा बरोबर आहे असें मनाने मानणें. यालाच आप्तवाक्य असेंहि नांव देता येईल.

बुद्धिप्रामाण्य आणि श्रद्धा या दोन तत्त्वांचें संगर जगाच्या आरंभापासूनच सुरू झालें असलें पाहिजे; आणि तें जगाच्या अंतापर्यंत चालू राहील, असें वाटतें. कितीतरी लोक स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादी समजतात;

आणि बहुतेक सारे लोक नकळत श्रद्धावान् बनलेले असतात. बुद्धिप्रामाण्यवादी केव्हा ना केव्हा तरी श्रद्धेला शरण जातात; आणि जे श्रद्धेला शरण गेल्यासारखे दिसतात, त्यांनीं बुद्धिप्रामाण्याचा आश्रय आधी केलेला असतो हें या दोघांना कळत नाही असें नाही. पण आपल्या मनाचा मुख्य धर्म अमुक एक असावा अशी जी हौस त्यांना वाटते, ती बुद्धिप्रामाण्यवादी किंवा सश्रद्ध या नांवानें ते व्यक्त करतात.

बुद्धिप्रामाण्य आणि श्रद्धा यांची ही जोडी केव्हांहि फुटेल असें वाटत नाही. यापैकी कोणता तरी एक मनोधर्म कायमचा मिळालेले लोक सहसा सापडावयाचे नाहीत. इतका भोळा कोणीच नसतो कीं, जो आपली बुद्धि कधीच चालवीत नाही; आणि इतका हट्टी कोणीच नसतो कीं, जो दुसऱ्याचें मत कधीच प्रमाण मानत नाही. पण येवढे मात्र खरें कीं बुद्धिप्रामाण्यवादी स्वताला श्रेष्ठ समजतात; आणि सश्रद्ध लोक बुद्धिप्रामाण्यवाद्यांना वादंगी आणि निरुपयोगी मानतात.

या दोन्ही प्रवृत्तींचें साहचर्य एकाच मनांत दिसून यावें ही मात्र फार मौजेची गोष्ट आहे; म्हणजे तोच मनुष्य बुद्धिवादीहि असतो, आणि श्रद्धावादीहि असतो, असें दिसून येईल. त्याची बुद्धि संपली म्हणजे त्याच्या श्रद्धेला आरंभ होतो; आणि श्रद्धेचा स्वीकार तो बुद्धीला विचारूनच करतो; म्हणजे शेवटी बुद्धिप्रामाण्य त्याला पसंतच असतें. बुद्धि चालेनाशी झाली म्हणजे दुसऱ्याचें म्हणणें कुरकुर न करता त्याला पत्करावें लागतें. आपल्याला जर कळत नाही, तर दुसऱ्या शहाण्या माणसाचें म्हणणें आपल्याला पत्करलें पाहिजे, हा बुद्धिवाद तो प्रमाण मानतो; आणि यांत त्याचें कांही चुकत नाही. तो जर हें करीना तर त्याची प्रगति कधी होणार नाही; आणि प्रपंचांतहि याला कधी सुख लाभणार नाही. कितीतरी ज्ञानें अशीं असतात, कीं ज्यांची उपपत्ति त्याला माहीत नसते; इतकेंच काय, ती उपपत्ति त्याला सांगितली तर ती त्याला कळत सुद्धा नाही. ही ज्ञानें त्याला पत्करावींच लागतात; आणि आपलें हें पत्करणें तारतम्याला धरून आहे; असा बुद्धिवाद तो स्वतःशीं करतो.

असलीच पाहिजे असें नाहीं हे त्रिवार सत्य आहे. कलाकृतीमध्ये कलेचे नियम सांभाळले पाहिजेतच आणि हे नियम सांभाळून कलात्मक आनंद देणें हेच त्याचे खरें कार्य. पण कलाकृतींत कलावन्ताच्या मनाची खोली, प्रगल्भता, विवेकशीलता, मार्मिकता, ज्या मानानें दिसेल त्या मानाने त्या कलाकृतीची किंमत कमी अधिक ठरेल. या गुणांच्या अभावी ती कलाकृति सुंदरहि दिसू शकेल; पण ते सौन्दर्य दिखाऊ, पोकळ असण्याचा संभव आहे. क्वचित् प्रसंगी हें सौंदर्य सापाच्या किंवा वाघाच्या किंवा कलावन्तिणीच्या सौंदर्याप्रमाणें घातुकहि होऊं शकेल. असे होऊं न देण्याचा प्रयत्न न करणें अवश्य आहे. कलाकृति मोहक असावी. पण भलता मोह तिने घालूं नये हे सर्वांगीण जीवनाच्या दृष्टीनें उचित आहे."

---

## ८. श्रद्धा-सरितेची गंगोत्री

— श्री. म. माटे

बुद्धिप्रामाण्य याला इंग्रजी शब्द **Rationalism** असा आहे; आणि Rationalism म्हणजे Opinions deduced from reason as distinct from inspiration or revelation — तर्काने प्राप्त झालेलीं मतें; एकदम स्फुरलेलीं किंवा अपौरुषेय अशीं मतें नव्हत. इंग्रजींतला श्रद्धावाचक शब्द Faith असा आहे; आणि Faith चा अर्थ हा कीं, Assent of the mind to the truth of what is declared by another— म्हणजे जें दुसऱ्याने सांगितलें असेल, तें खरें किंवा बरोबर आहे असें मनाने मानणें. यालाच आप्तवाक्य असेंहि नांव देता येईल.

बुद्धिप्रामाण्य आणि श्रद्धा या दोन तत्त्वांचें संगर जगाच्या आरंभापासूनच सुरू झालें असलें पाहिजे; आणि तें जगाच्या अंतापर्यंत चालू राहील, असें वाटतें. कितीतरी लोक स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादी समजतात;

आणि बहुतेक सारे लोक नकळत श्रद्धावान् बनलेले असतात. बुद्धिप्रामाण्य-वादी केव्हा ना केव्हा तरी श्रद्धेला शरण जातात; आणि जे श्रद्धेला शरण गेल्यासारखे दिसतात, त्यांनीं बुद्धिप्रामाण्याचा आश्रय आधी केलेला असतो हें या दोघांना कळत नाही असें नाही. पण आपल्या मनाचा मुख्य धर्म अमुक एक असावा अशी जी हौस त्यांना वाटते, ती बुद्धि-प्रामाण्यवादी किंवा सश्रद्ध या नांवाने ते व्यक्त करतात.

बुद्धिप्रामाण्य आणि श्रद्धा यांची ही जोडी केव्हांहि फुटेल असें वाटत नाही. यापैकी कोणता तरी एक मनोधर्म कायमचा मिळालेले लोक सहसा सापडावयाचे नाहीत. इतका भोळा कोणीच नसतो कीं, जो आपली बुद्धि कधीच चालवीत नाही; आणि इतका हट्टी कोणीच नसतो कीं, जो दुसऱ्याचें मत कधीच प्रमाण मानत नाही. पण येवढे मात्र खरें कीं बुद्धिप्रामाण्यवादी स्वताला श्रेष्ठ समजतात; आणि सश्रद्ध लोक बुद्धि-प्रामाण्यवाद्यांना वादंगी आणि निरुपयोगी मानतात.

या दोन्ही प्रवृत्तींचें साहचर्य एकाच मनांत दिसून यावें ही मात्र फार मौजेची गोष्ट आहे; म्हणजे तोच मनुष्य बुद्धिवादीहि असतो, आणि श्रद्धावादीहि असतो, असें दिसून येईल. त्याची बुद्धि संपली म्हणजे त्याच्या श्रद्धेला आरंभ होतो; आणि श्रद्धेचा स्वीकार तो बुद्धीला विचारूनच करतो; म्हणजे शेवटी बुद्धिप्रामाण्य त्याला पसंतच असतें. बुद्धि चालेनाशी झाली म्हणजे दुसऱ्याचें म्हणणें कुरकुर न करता त्याला पत्करावें लागतें. आपल्याला जर कळत नाही, तर दुसऱ्या शहाण्या माणसाचें म्हणणें आपल्याला पत्करलें पाहिजे, हा बुद्धिवाद तो प्रमाण मानतो; आणि यांत त्याचें कांही चुकत नाही. तो जर हें करीना तर त्याची प्रगति कधी होणार नाही; आणि प्रपंचांतहि याला कधी सुख लाभणार नाही. कितीतरी ज्ञानें अशीं असतात, कीं ज्यांची उपपत्ति त्याला माहीत नसते; इतकेंच काय, ती उपपत्ति त्याला सांगितली तर ती त्याला कळत सुद्धा नाही. ही ज्ञानें त्याला पत्करावींच लागतात; आणि आपलें हें पत्करणें तारतम्याला धरून आहे; असा बुद्धिवाद तो स्वतःशीं करतो.

भारतांतील माणसांचें प्रत्येकी वार्षिक उत्पन्न किती हें असंतुष्ट असलेल्या प्रत्येक माणसाला माहीत नसते किंवा माहित असलें तर, तें कोणच्या गणिताने प्राप्त होतें, हे त्याला सांगता येतें असें मुळीच म्हणता येणार नाही. पण एवढ्यासाठी त्याने आपला असंतोष प्रकट करावयाचें सोडून द्यावें, असें जर कोणी सांगूं लागला तर ते बरोबर ठरणार नाही. दादाभाई नौरोजी यांनी किंवा श्री. चिंतामणराव देशमुख यांनी 'भारतांत दर माणशीं वार्षिक उत्पन्न अमुक अमुक आहे' असें लिहिल्याचें मी वाचलें आहे, एवढे त्याला सांगता आलें म्हणजे पुरे. तें सिद्ध करणें त्याच्या आवाक्याच्या बाहेरचें असतें.

एकदा लोकमान्य टिळक हे शेतकऱ्यांच्या मोठ्या सभेपुढे बोलत असताना म्हणाले, 'आडवे तिडवे प्रश्न विचारून कोणी अधिकारी तुम्हांला विचारतील कीं इंग्रजाच्या राज्यांत हिंदुस्थान देश गरीब होत आहे हें कशावरून; तर त्याला तुम्हीं बेलाशक उत्तर द्या कीं 'पुण्याचा बामण आला होता. तो सांगत होता, म्हणून.' टिळकांनीं सांगितलेला हा तोडगा अत्यंत समर्पक आहे. प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट अथपासून इतिपर्यंत कळलीच पाहिजे, आणि कळली तरच त्याने तीवरून कांही अनुमान काढावें, तिच्याप्रमाणे वर्तावें, असें जर ठरलें, तर जगाचे बहुतेक सारे व्यवहार बंद होतील. म्हणून आपल्याला जें कळत नाही, तें दुसऱ्या शहाण्या माणसाकडून घ्यावें; आणि त्याच्या शहाणपणावर तेवढी श्रद्धा ठेवावी, हें ओघानेच येतें. आप्तवाक्य प्रमाण मानावे, असें पूर्वीच्या शास्त्रकारांनी सांगितलें आहे, तें बरोबर आहे. यांत श्रद्धा ठेवणारा माणूससुद्धा बुद्धीने म्हणजे तर्काने चालतो, हे विसरून चालावयाचें नाही.

बरें, जेथपर्यंत त्याला कळत असतें, तेथपर्यंत तो श्रद्धेची मातब्बरी मानणार नाही. बुद्धि चालवण्याची त्याला उपजतच हौस असते. 'माझें असें मत आहे कीं,' 'मला असें वाटतें कीं,' 'तुम्हांला कळत नाही म्हणून सांगतो' अशीं वाक्यें अगदी सामान्य बुद्धीच्याहि माणसाच्या तोंडीं असतात. कारण जी काय बुद्धि त्याच्या वाटचाला आलेली असते, ती चालविण्यांत त्याला हौस वाटते. मात्र त्याच्या बुद्धीची झेप संपली म्हणजे तो वरिष्ठाच्या बुद्धीला श्रद्धेने शरण जातो. म्हणजे बुद्धीपासून

श्रद्धेकडे आणि श्रद्धेपासून बुद्धीकडे असा मानवी मनाचा प्रवास नेहमींच चालू असतो.

मानवी मनाची ही प्रगति बारकाईने पाहण्यासारखी आहे. वडील माणूस एखादी गोष्ट करून देऊं लागलें तर लहान मुलें म्हणतात, 'मी करतों' 'मी करतों'. त्याप्रमाणेच एखादी माहित असलेली गोष्ट सांगावयाची झाली तर ती गोष्ट 'मी सांगतों', 'मी सांगतों' असा हट्ट तीं धरतात. याचा अर्थ असा कीं, स्वतःचीं इंद्रियें आणि स्वतःची बुद्धि चालवावी असें लहान मुलांना आपोआपच वाटतें. पण तीच गोष्ट त्यांना करतां येईनाशी झाली तर 'तुम्हीं हें करून देता का? असें तीं म्हणू लागतात; किंवा सांगता येईनाशी झाली तर 'पुढे काय हो?' असें तीं विचारूं लागतात; म्हणजे आपली बुद्धि चालविणें आणि चालेनाशी झाली म्हणजे लोकांवर श्रद्धा ठेवणें; व ठेवावयास हवी हें उमगणें, हें बुद्धिप्रामाण्याचेंच लक्षण आहे. मुलाची बुद्धि वाढत चाललेली असते; पण तिचा आवाका असतो त्यापेक्षा त्याची हाव किंवा वांछा जास्त असते; आणि मग त्याची बुद्धिहि थकल्यासारखी होते; तिच्या अपुरेपणाचा बोध त्याला होतो. आई, बाबा, दादा, ताई व मग मित्र हे त्याच्या साहाय्याला येतात; आणि हळूहळू त्याला शेजारीहि भेटूं लागतात. कांही कांही वेळा असें होतें कीं, स्वतःची बुद्धि चालविण्याची त्याची हौस जास्त प्रखर होते; आणि लोकांना शरण जाण्यांत त्याला अवमान वाटतो. आपलें चुकत आहे, असा वहीम त्याचा त्याला येतो; पण स्वाभिमानाला वश होऊन तो म्हणतो, 'मी काय वाटेल ते करीन; तुम्ही कोण मला सांगणार?' पण त्या त्याच्या शब्दांवरून व आविर्भावावरून लोकांना हें स्वच्छ दिसून येतें कीं, आपल्या बुद्धीचा कमकुवतपणा याला पटलेला आहे; व केवळ स्वाभिमानानें हा हट्टी बनलेला आहे. कांही कांही वेळा वर्गांतला एखादा विद्यार्थी गुप्तपणे दुसऱ्याचें पाहून लिहितो; पण यांतहि 'आपल्यालाच यावयास हवें होतें पण येत नाही' ही बुद्धीच्या दुर्बलत्वाची जाणीव त्याला आलेली असते, एवढेच दिसून येतें. अर्थात् अधिक शहाण्या माणसावर बिनतक्रार विसंबलें पाहिजे, हें त्याला कळून चुकतें.

Man is a social animal या वचनाचा अर्थ बारकाईने पाहण्या-सारखा आहे. लांडगे, रानम्हशी अन् रानघोडे हे सुद्धा social animal च म्हणजे समूहप्रेमी प्राणी असतात. माणूसहि तसाच आहे. समूहाने वागलें असता स्वसंरक्षण होतें, हें या पशूंना व माणसांना सारखेच कळतें. पण स्वसंरक्षणाच्या पलीकडे आणखी एक प्रगतीचा टापू आहे; व ही प्रगति समूहांत वागल्याने साध्य होते, हें माणसाला प्रथम सहजगत्या व मग जाणिवेने कळूं लागतें. आपल्या ठिकाणीं जें कमी पडतें, ते दुसऱ्याच्या उपदेशाने, उदाहरणाने किंवा दृष्टान्ताने भरून निघतें व अशा रीतीने आपली प्रगति होते, असा प्रत्यय सर्वच माणसांना येतो. Man is a social animal हें अशा रीतीनेहि सिद्ध होतें. पण प्रस्तुताच्या दृष्टीने हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, समाजांत वागून, त्याच्या द्वारा जर प्रगति साधावयाची असली तर आपलें बुद्धिसामर्थ्य संपलें आहे आणि लोकांवर बिनतक्रार विसंबलें पाहिजे, म्हणजे श्रद्धा ठेवली पाहिजे हें तत्त्व या प्रगतिप्रिय माणसाच्या वागणुकींत दिसून येतें.

'वडिलांचें ऐकावें' असें पौगंड दशेंतील मुलांच्या कानी पडूं लागतें. वडिलांचें ऐकावें हें वडील माणसें खाऊं-पिऊं घालतात म्हणून नव्हे तर तीं जास्त जगलेलीं असतात, त्यांना चार पावसाळे जास्त गेलेले असतात म्हणून होय. त्यांच्या अनुभवाचा फायदा तुम्हीं करून घेतला पाहिजे, एवढाच या शिफारसीचा अर्थ असतो. पण पुष्कळदा होतें तें असें कीं, वडील माणसें जास्त जगलेलीं असतात इतकेंच काय तें ! ती जास्त शहाणीं झालेलीं असतात, असें मात्र नव्हे. म्हणून रामदासस्वामी एकदा उपहासाने म्हणाले, 'आधी उपजले तयांसी थोर म्हणती !' पुन्हा एकदा निषेधाने ते म्हणाले, 'गुणेविण वडीलपण। हें तो अवघेची अप्रमाण ॥' तथापि, आपल्याला या बाबीचा थोडा विचार करावयास हवा. प्रत्येक वडील माणूस अनुभवाचें शहाणपण जमा करीत चाललेलें असतें, असें मुळीच म्हणतां येत नाही. पण अपेक्षा मात्र अशी असते कीं, तें शहाणें होत चाललेलें असलें पाहिजे. म्हणून अशी शिफारस करण्यांत येते कीं, 'वडिलांचे ऐकावें.' पण बुद्धिमान् मुलांना पुष्कळदा शंका येते कीं, वडील माणसें असावीत तितकीं शहाणीं नाहीत. तीं 'आधी उपजली' आहेत इतकेंच काय तें. म्हणून तीं त्यांचें

ऐकावयाचें नाकारतात. पण तीं जर जास्त शहाणीं आहेत, असें या मुलांच्या प्रत्ययाला आले असतें तर त्यांनी त्यांचें विनबोभाट ऐकलें असतें. याचा अर्थ असा कीं, त्यांना बुद्धिप्रामाण्याची हौस असते आणि दुसऱ्यांवर श्रद्धा ठेवण्याचीहि त्यांची तयारी असते.

वडील माणसांच्या शहाणपणाचें स्तबक संपलें म्हणजे तरुण मुलगा शिक्षकाकडे वळतो; आणि शिक्षक जर खरोखरच चांगला ज्ञानी असला तर आपल्याला एक मोठा ठेवाच सापडलेला आहे, असें विद्यार्थ्याला वाटू लागतें. तो त्या शिक्षकाचें म्हणणें संथपणानें ऐकून घेतो आणि शिक्षकाच्या मुखांतून पडणाऱ्या पाण्याने आपला मनःकटाह भरत चाललेला पाहून त्याला पराकाष्ठेचा आनंद होतो. शिक्षकावर त्याची श्रद्धा बसते. घर हें त्याचें प्रेमाचें ठिकाण राहतें. पण शिक्षकाचें सान्निध्य ही त्याची प्रगतीची शाळा बनते. आपलीं मुलें शिक्षकावर भाळलीं आहेत, हें पाहून वडील माणसांना पुष्कळदा मत्सर वाटतो; पण याच वेळी त्यांच्या ध्यानांत यावयास हवें कीं, आपली बुद्धि चालवून आईबापांच्या ज्ञानाचा ठाव मुलाने घेतलेला असतो; पण शिक्षक मात्र त्यांच्या बुद्धिप्रांगणाच्या फार पलीकडे असतो; आणि म्हणून त्याच्यावर मुलांची श्रद्धा बसते. हाहि Rationalism च असतो पण शिक्षकाशिक्षकांत अंतर असतें. ' थोडें-बहुत समजले, पोटापुरते शिकले. प्राणी उगीच गर्वें मेले, मी ज्ञाता म्हणोनि ' या वर्णनाला पात्र असलेले शिक्षक कितीतरी असतात. अर्थात् कोणच्या शिक्षकावर श्रद्धा ठेवावी, हें विद्यार्थी बुद्धि चालवूनच ठरवतो; म्हणजे तो बुद्धीचाहि वापर करतो आणि निःसंकोचपणे श्रद्धाहि ठेवतो.

बुद्धीप्रमाणे चालावें हें खरें; पण तें कुणाच्या बुद्धीप्रमाणे चालावें हा फार महत्त्वाचा प्रश्न असतो. सगळ्यांची बुद्धि सारखी नसते; आणि म्हणून जिज्ञासू आणि प्रगतिप्रिय माणसाला आपली बुद्धि चालवून येवढे तरी ओळखता आलें पाहिजे कीं अमुक एक माणूस आपल्यापेक्षा जास्त बुद्धिमान् आहे, आणि म्हणून वादंग न माजवता त्यांचें ऐकलें पाहिजे. अनेक वेळा बौद्धिक झटापट झाल्यावर त्याच्या ध्यानांत येऊन चुकतें कीं, आपल्यापेक्षा हा माणूस जास्त बुद्धिमान् आहे, आणि म्हणून शेवटी बुद्धि प्रामाण्यच--पण त्या श्रेष्ठ माणसाच्या बुद्धीचें प्रामाण्य—तो मानूं लागतो

अनुभवाने त्या श्रेष्ठाच्या बुद्धीचा आवाका थोर आहे, असें दिसूं लागल्या-वर निमूटपणे श्रद्धा ठेवणें एवढेंच त्याच्या हातीं राहातें. एका प्रांतिक परिषदेच्या वेळीं, मनांत नसतानाहि डॉ. मुंजे आणि श्री. खाडिलकर यांनी टिळकांचें निमूटपणे ऐकलें. या शरणागतीचें रहस्य त्यांना विचारता त्यांनी सांगितलें कीं, 'लोकमान्य आमच्यापेक्षा बुद्धिमान् आहेत.' याचा अर्थ असा कीं, बुद्धीचें प्रामाण्य खरें, पण तें 'कोणाच्या बुद्धीचें प्रामाण्य' हा प्रश्नहि ज्याने त्याने आपल्या बुद्धीचें प्रामाण्य मानूनच सोडवावा लागतो. हाहि Rationalism च आहे.

'ऐकावें जनाचें, करावें मनाचें' या उपदेशाचें रहस्य फार सावधगिरीने उमगून घ्यावयास हवें. हा उपदेश जर का दर वेळी प्रमाण मानला तर माणसाचा नाश होईल. लोकांचें ऐकूनहि दर वेळी आपल्याच मनाप्रमाणे वागण्याचा त्याने हेका ठेवला तर त्याच्या हातून अनेक प्रमाद होतील; आणि लोक त्याला 'हेकट' म्हणूं लागतील. सुदैवाने या उपदेशाप्रमाणे चालणारे लोक फार थोडे असतात. बहुतेकांना हें पटलेलें असतें कीं आपल्या मनाप्रमाणे आपण चालतच होतों; पण तें नीट चालतां येईना म्हणून लोकांना वाट पुसूं लागलों; म्हणजे बुद्धीचा टापू संपवून श्रद्धेकडे वळलों.

'ऐकावें जनाचें, करावें मनाचें' या शिफारशींत अशी एक गृहीत गोष्ट आहे कीं, लोकांनी दिलेले सल्ले पारखून पाहण्याचें सामर्थ्य संबंधित माणसाच्या अंगीं असतें; इतकेंच नव्हे तर लोकांच्या शिफारसी बाजूला सारून आपलें स्वतंत्र सामर्थ्य प्रकट करणें, हा उच्च धर्महि त्या माणसाच्या मनाला प्राप्त झालेला आहे. पण ही शिफारस करणाऱ्या लोकांचा हा समज बहुतेक प्रसंगी अयुक्त ठरण्याचा संभव असतो. क्रियेला हात घालण्याचें स्वतंत्र सामर्थ्य माणसाच्या अंगीं नसतें म्हणून तर तो लोकांना विचारावयास जातो; आणि सल्ला देणारे लोक तर म्हणतात कीं, 'ऐकावें जनाचें, पण करावें मनाचें !' म्हणजे जें सामर्थ्य आपल्यापाशीं नाहीं असें संबंधित मनुष्य आपण होऊन म्हणतो तें तुझ्यापाशीं आहेच, असें सल्ला देणारा गृहीत धरतो ! अर्थात् म्हणींतली ही शिफारस अगदी चूक आहे. मग असा

एक प्रश्न उद्भवतो कीं, या म्हणीचें उगमस्थान तरी कोणचें ? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, अनेक लोक अनेक प्रकारचे सल्ले देतात; त्यांनीं ते विचारपूर्वक दिलेले असतात असेंहि नाही; ऐकणारा भांबावून जातो म्हणून त्याला सांगितलें आहे कीं, आता तुला जें भावेल तें तूं कर.

यांत आणखी एक बारीक विचार आहे. लोकांच्या मताप्रमाणे वागल्यामुळे जर एखादी गोष्ट फसली, तर माणसाच्या जिवाचा अगदी कहार होतो; आणि तो लोकांना दोष देतो. पण जर का तो आपल्या मनाप्रमाणे वागला असला आणि त्याचा प्रयत्न फसलाहि असला तर आपल्या मनाप्रमाणे चालल्याचें समाधान तरी त्याला होतें; आणि त्याला दुसऱ्या कोणाला दोषहि देता येत नाही. तथापि आपलें प्रस्तुत लक्षांत घेता ‘ चार-चौघांना विचारून एखादी गोष्ट करावी ’ यावर माणसाची जितकी श्रद्धा असते, तितकी ‘ ऐकावें जनाचें, करावें मनाचें ’ या म्हणीवर बसत नाही, आणि ही न बसूं देण्यांत तो आपल्या बुद्धीचेंच प्रामाण्य मानतो; आणि दुसऱ्याच्या बुद्धीवर श्रद्धा टाकतो. ‘ उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययीं पहावें । खरें खोटें निवडावें । अंतर्यामीं ।। ’ ‘ ऐसें हें अवघेंची ऐकावें । परी सार शोधून घ्यावें । असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ति ।। ’ या रामदासस्वामींच्या ओव्या सामान्य माणसांनी आचारांत आणावयाच्या नसतात. जे लोक आचारानें पुष्कळ उन्नत झालेले आहेत, ज्यांची विवेकशक्ति विशेष जागृत झाली आहे, व ज्यांना निर्णय करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालेलें आहे त्यांनींच स्वामींचा हा उपदेश पत्करला पाहिजे; बाकीच्या सर्वांनी चार-चौघांना विचारून करावें, हा न्याय पत्करणेंच बरोबर आहे.

To profit by other men's experience म्हणजे दुसऱ्यांच्या अनुभवाचा लाभ करून घ्यावा, History is a mighty teacher इतिहास हा एक मोठा प्रबल शिक्षक आहे इत्यादि वचनांचें सार हेंच आहे. परंतु जे या वचनाच्या साराप्रमाणे वागतात, ते सुद्धा आपल्या बुद्धीचें प्रामाण्यच मानतात. स्वतःला कळेना, तर दुसऱ्यावर विसंबलेंच पाहिजे. जो हेंहि करीना, तो मूर्ख किंवा पढतमूर्खहि होय.

वय जसजसें मोठें होत जातें तसतसा तरुण मनुष्य वाङमय, म्हणी, दाखले यांच्या संभारांत शिरूं लागतो. परंतु याहि कामीं त्याची फसगत होते. कारण या संभारांत अर्धसत्यें फार असतात; प्रतिप्रश्न विचारता येण्यासारखा नसतो; चर्चा होऊं शकत नाही; आणि म्हणून त्याला दुसऱ्या कोणातरी माणसाकडे जावें लागतें. एका मार्गानें जावें तर एकांडा म्हणतात; अनेक चौकशा कराव्या तर चांभारचौकशा कशाला म्हणून हिणवतात; 'अति तेथें माती' हें खरे मानावे तर 'उत्कट तेंचि घ्यावें। मळमळीत अवघेंचि टाकावें' हें स्वामींचें वचन त्याच्यापुढे उभें रहातें! समानशीलाकडे जावें तर पुष्कळदा 'एकादशीच्या घरीं शिवरात्र' असा प्रकार होतो; आणि 'मढ्यासीं भेटले मढें। करील काय बापुडें? ॥' अशी आपत्ति प्राप्त होते.

यापुढचा टापू केवळ दलदलीचाच असतो; आणि सरसकट जनता या प्रदेशांत प्रवास करण्याला सर्वथा असमर्थ असते. 'सर्वत्र समानता आहे' 'बहुमताला मान द्यावा' 'सर्वांचें अंतर एकच आहे.' इत्यादि वचनांचा जुलूम इतका विलक्षण असतो कीं, आचरणाच्या कामी सामान्य लोक केवळ भांबावूनच जातात. या वचनांचा जाच होऊनच रामदासांनी एकदा त्वेषाने विचारलें, 'अंतर तो एक खरें। पण राजहंस आणि कोंवडें॥ राजा आणि माकडें। एक कैशीं? ॥' तात्पर्य, ज्याचें त्याने पाहिलें पाहिजे; पण पाहूं जावें तर नेमकें कळत नाही; म्हणून दुसऱ्यावर श्रद्धा ठेवावी लागते. बहुमताचा जाच तुकारामबोवांना सुद्धा सहन होईना. म्हणून तर ते रागाने म्हणाले, 'बहुमतापासून निराळा। होऊन राहिलों सोवळा॥' आणि जेव्हा त्यांना कोणी म्हणाले कीं, 'लोक असें म्हणतात,' 'लोक तसें म्हणतात' तेव्हां ते तिरस्काराने उद्‌गारले, 'लोक तैसा ओक.' या सर्वांचें तात्पर्य असें कीं, ठराविक सूत्रांची आणि शब्दसंहतींची जाचणूक या पुढल्या टापूंत फार होऊं लागते; आणि ही भल्याभल्या बुद्धिमंताना सुद्धा व्यग्र करून टाकते.

शेवटी कंटाळून माणूस सुवर्णमध्यावर येतें, पण त्यांत व्यवहाराचें सुख लाभलें तरी तत्त्वाप्रमाणे वागल्याचें समाधान लाभत नाही. शेवटी

त्याला अधिक बुद्धिमान् माणसाच्या निर्णयावर विसंबून राहणें हेंच बरोबर वाटतें. उबगून जाऊन तो म्हणतो कीं, ‘महाजनो येन गतः स पन्थाः।’ म्हणजे थोर लोक ज्या मार्गानें गेले तोच मार्ग खरा. म्हणजे महाजनांवर श्रद्धा ठेवण्यास तो तयार असतो. पण नवलाची गोष्ट ही कीं, महाजन कोणाला म्हणावे हें तो आपल्या बुद्धीने ठरवतो; व स्वतःच्या बुद्धीचेंच प्रामाण्य मानतो! म्हणून तर एकाच काळीं अनेक ‘महाजन’ दिसत असतात. याचा ‘महाजन’ हा, त्याचा ‘महाजन’ तो, असा देखावा दिसत असतो. फार पुढारी आणि त्या प्रत्येकाचे निराळे अनुयायी हें कांही देशाचें खरें वैभव नव्हे, असें आपण समजतों. पण प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें पाहता लोकांना बुद्धिप्रामाण्य हवें असतें आणी श्रद्धाहि हवी असते. त्यामुळे अशी परिस्थिति निर्माण होते. लोक आपापली बुद्धि चालवतात; पण निर्णयाच्या बाबतींत ते पुढाऱ्यावर विसंबतात.

याच्या पुढचें विचाराचें स्तबक मोठे नवलाचें पण अटळ असते. अनुयायीहि पुढाऱ्याशीं सुद्धा खूप चर्चा करतात; कांही कांही वेळा ते त्याला आडवतातहि. पण नवा विचार सुचण्याचा धर्म जर का पुढाऱ्याच्या ठिकाणी उत्कटत्वाने वसत असला तर अनुयायी एकदम हतवीर्य होतात; आणि त्यांच्या मनावर पुढाऱ्याची छाप हातोहात बसते. पुढाऱ्याला नवा विचार सुचलेला असतो, याचाच अर्थ असा कीं, तो पारखण्याची बौद्धिक तयारी अनुयायांच्या ठिकाणी झालेली नसते; अर्थात् या विचाराच्या दीप्तीनें ते अगदी दिपून जातात; कांहीतरी नवे हाताशीं लागलें आहे हें पाहून हर्षभरित होतात; आणि टाळ्या पिटीत पुढाऱ्याच्या मागे धावतात.

‘हिंदुस्थानांत अनेक जाति आहेत; अनेक पंथ आहेत; अज्ञानाचा खच पडला आहे; शेतकरी अडाणी आहेत; अमंगळ सामाजिक चाली अजूनहि रूढ आहेत——म्हणून तुम्ही स्वराज्याला अपात्र आहा; मग स्वराज्य कसलें मागता?’ असें इंग्रज मुत्सद्दी म्हणत असत; आणि आमच्यांतले, बरेच भोळे लोक त्यांची री ओढत असत. या वैचारिक दलदलींतून लखनौ येथें लोकमान्यांनीं एकाच वाक्याने जनतेला मुक्त केलें. गंभीर बौद्धिक आवेशाने ते म्हणाले, ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.

हे त्यांचे शब्द ऐकतांच, ' भिद्यते हृदयग्रंथिः, छिद्यन्ते सर्वसंशयाः । ' अशी सर्व श्रोत्यांची स्थिति झाली; आणि या त्यांच्या वचनाला भारताच्या राजकारणांत सोन्याचें स्थान मिळालें.

महात्मा गांधींनीं असाच बलवत्तर पराक्रम करून दाखवला. ध्येय-प्राप्तीच्या साधनांत कुचंबणा उत्पन्न झाली होती. अशा वेळीं, 'निर्बंधभंग' आणि ' सत्याग्रह ' या नव्या कल्पना लोकांपुढे मांडून त्यांनी तेव्हा कुचंब-लेलें राजकारण मुक्त केलें; आणि मग पुढे काय झालें, हें आपणां सर्वांना माहीत आहे. त्यांच्या नव्या विचारांनी जनता केवळ मंत्रमुग्ध होऊन गेली. कवीच्या एखाद्या नव्या कल्पनेने जर आपण इतके वेडावून जातों तर अखिल मानवाच्या सुखदुःखांना स्पर्श करून जाणाऱ्या एखाद्या नव्या विचाराने मानव्य मोहून जावे यांत कार्य आश्चर्य आहे ?

आता येवढे मात्र खरें कीं मोहून जाणें आणि मूढ बनणें हीं दोन्हीं एकाच धातूपासून निघालेली आहेत ! पण बुद्धि चालेनाशी होणें आणि दुसऱ्याच्या सर्वस्वीं आधीन होणें, यांत कोणाचा कांही दोष नसतो. जें मागे सांगितलें आहे तेंच येथे पुन्हा सांगावयास हवें की माणसें आपल्या बुद्धीचें प्रामाण्य मानतातच; पण शेवटी थकून जाऊन आणि तीच बुद्धि चालवून सश्रद्ध होत्साती तीं दुसऱ्याच्या स्वाधीन होतात. या नव्या विचाराच्या प्रसूतीलाच Inspiration असें म्हणतात. Inspired म्हणजेच नवसूत्रांचा उच्चार करणारा माणूस एखाद्या श्रेष्ठतर शक्तीच्या सामर्थ्याने प्रस्फुरित झालेला आहे, असें लोकांना वाटूं लागतें; आणि तो त्याचें दैवत बनतो.

याच्या पुढे आता एकच स्तबक शिल्लक उरते. आताच सांगित-लेल्या Inspiration मधून म्हणजे प्रतिभाशालित्वांतून व्यक्ति जर वगळली गेली--म्हणजे ती कोण आहे, हें माहीत नसलें पण प्रतिभेचा तेजःपुंजपणा टिकूनच असला--तर त्या उद्‌गारांना Revelation म्हणजे अपौरुषेय वाणी ही पदवी प्राप्त होते. निरनिराळ्या धर्मांतील मुख्य प्रमेयें हा अधिकार संपादून बसलेलीं आहेत. ती कुणाच्या मुखांतून निघालीं, हें निश्चित् माहीत नाही; पण त्यांचें तेज मात्र जसेंच्या तसें आजमितीला टिकून राहिलें आहे.

येथपर्यंत आपण तर्कानेच प्राप्त होतो. युद्धाच्या गडबडींत जसा एखादा बुद्धिमान् माणूस सर्वाधिकारी म्हणून नेमावा लागतो, तसेंच आत्मिक विचाराच्या बाबतींत सुद्धा घडून येतें. त्याच्या बुद्धीचा आणि प्रतिभेचा प्रत्यय अनेकदा आलेला असतो; म्हणून तोच पुढारी, तोच शास्ता, तोच गुरु बनतो. पण हें सारें तर्कप्राप्त आहे, हें विसरून चालायचें नाही. 'सांगतों'; 'विचार करून सांगतों'; आणि 'विचारून सांगतों' अशी सामान्य माणसांच्या विचाराची उतरती भांजणी असते; पण हेंहि बुद्धि-प्रामाण्यच आहे. म्हणून असें वाटतें कीं, श्रद्धेची जन्मभूमीसुद्धा बुद्धिप्रामाण्य हीच आहे.

## ९. जीवनाचा यात्रेकरू

—— प्र. के. अत्रे

मी जीवनाचा यात्रेकरू आहें. माझ्या खांद्यावरची पताका अजून खाली होत नाही. माझ्या पायाचें चक्र अद्याप सुटत नाही. पण जगाला माझ्या-सारखीं माणसें आवडत नाहीत. धीम्या आणि एकमार्गी माणसाचें जगांत कौतुक होतें. शालेय सृष्टींत त्याचा आदर्श मुलांच्यापुढे ठेवण्यांत येतो. पण मुलांना कांही हीं माणसें आवडत नाहीत. मुलें माझ्यासारख्या भटक्या माणसावरच खूष असतात. म्हणून 'एक ना धड भाराभर चिंध्या' किंवा 'सर्वांत जाई अन् कशांत नाही' ह्या म्हणी मुलांना दम देण्यासाठी शाळेच्या पुस्तकांत मुद्दाम घातल्या जातात.

कोणत्याहि क्षेत्रांत मी फार काळ राहिलों नाही, ह्याबद्दल मला खेद होत नाही. आपल्या हातून चूक झाली असेंहि मला वाटत नाही. मी जन्मभर कविता करीत बसलों असतों किंवा मुलांना शिकवीत बसलों

असतों तर मला कोणीं नको का म्हटलें असतें ? कोणत्याहि उद्योगांत मला अपेश आलें किंवा मी नालायक ठरलों, म्हणून कांही तो मी सोडला नाही. मी ज्या ज्या गोष्टी केल्या त्या सर्वांचें अजूनहि मला आकर्षण आहे. त्यांमध्ये मिळविलेलें प्रावीण्य मी कांही गमावलेलें नाही. चित्रपटाच्या व्यवसायांत मी शिरलों, म्हणून शिक्षणशास्त्र थोडेंच विसरलों ? किंवा माझी नाट्यप्रतिभा थोडीच आटली ?

शिक्षक होण्यापूर्वी मी कवि होतों. फुलांवर प्रेम करणाऱ्याला मुलांवर प्रेम करणें फार सोपें जातें. किंवा फुलांकडून माणूस मुलांकडेच वळतो असेहि म्हणा. शिक्षक असतांना मी नाटकें लिहूं लागलों. मुलांचे मन जो जाणतो, तो यशस्वी शिक्षक होतो. प्रेक्षकांचें मन जो ओळखतो, तो प्रभावी नाटककार होतो. मी उत्तम शिक्षक होतों म्हणून चांगला नाटककार झालों. नाटकें लिहिता लिहिता मला जीवनांतलें नाटक समजूं लागलें. म्हणून मुलांचें लहान जग सोडून मी माणसांच्या मोठ्या जगांत शिरलों. परिणामकारक 'नाटक' कसें निर्माण करावयाचें हें मला माहीत होतें. म्हणूनच मी लोकप्रिय वक्ता आणि यशस्वी पत्रकार होऊं शकलों. माझ्या एका व्यवसायांतून दुसरा व्यवसाय उमगला. म्हणून पहिल्याचें सामर्थ्य दुसऱ्यांत आलें. पण व्यवसाय हें कांही माझें जीवन नाही. जीवन हाच माझा व्यवसाय आहे. निरनिराळ्या व्यवसायांनीं माझें जीवन समृद्ध केलें आहे.

लहान मूल शाळेंत जसें रमतगमत जातें ना, तसा मी आयुष्यांतून रमतगमत चाललों आहें. वाटेंत फूल दिसलें, त्यावर कविता कर. मूल दिसलें, त्याला गोष्ट सांग. उदास चेहऱ्याचा माणूस भेटला, त्याला हसव, दुःखी स्त्री भेटली, तिच्या जीवनावर नाटक रच. बोकेसंन्यासी चालला, त्याची टवाळी कर. गर्दी दिसली, तिच्यापुढे व्याख्यान दे. कोणी महापुरुष भेटला, त्याचा जयजयकार कर. एखादा मोर्चा आढळला, त्याच्यांत सामील हो. आयुष्यांतल्या प्रत्येक गोष्टीबद्दल मला जिज्ञासा आहे. खिडकी उघडी दिसली कीं, मांजर जसें तिच्यांत डोकावतें, तसें जीवनांत डोकावण्याची मला फार हौस आहे. सारे आपल्याला दिसलें पाहिजे, सारें समजलें पाहिजे अन् सारें आलें पाहिजे असें मला वाटतें.

आयुष्याला जीवन म्हणतात तें उगीच नाही. जीवन म्हणजे पाणी. आयुष्य हें पाण्यासारखे प्रवाही असावें. तें सारखे वहावें. तरच तें जीवन. जें एका ठिकाणीं साचून राहतें तें कसलें जीवन ? तें डबकें. जगांत जीवन थोडें, डबकींच फार. मी 'उगम' पावल्यापासून सारखा वहातो आहें. आणि वाहवतोहि आहें. जो वहातो तो वाहवणारच. त्यामुळेच माझ्या जीवनामध्ये एवढे तरंग, एवढी वळणें, एवढा खळखळाट अन् एवढे धबधबे.

जीवनाचें हें विलक्षण वेड माझ्यामध्ये कसें आलें ? लहानपणापासून निसर्गाची अन् इतिहासाची मला सोबत मिळाली. नद्या, डोंगर, झाडें, किल्ले, देवळें अन् पडके वाडे ह्यांच्या संगतींत मी वाढलों. सकाळीं उठलों कीं अंगावर सोनेरी उन्हें पांघरावयाचीं. रात्र झाली कीं अंगावर चांदण्यांची निळी चादर ओढून अंगणांत झोपीं जावयाचें. मध्यरात्रीं भैरोबाची सनई अन् चौघडा वाजायला लागला म्हणजे परमेश्वराचा हातच जणू डोक्यावरून फिरत आहे असें वाटे. उशाला अष्टौप्रहार शिवाजीमहाराजांच्या पुरंदर किल्ल्याचा पहारा असे. अन् शेजारीं श्री. सोपानदेवांची भक्तिवीणा सदैव वाजत राही.

शक्तीचें आणि भक्तीचें पावनतीर्थ होतें माझें गाव. उदात्त नि ओजस्वी जीवनाचा रोज तिथे साक्षात्कार घडे. हृदयांत नि मस्तकांत नाना तऱ्हेचे संचार होत. रस्त्यांतून जाऊं लागलें कीं, उंच उंच वाड्यांच्या पडक्या भिंतीवरून दोनतीनशे वर्षांचा इतिहास कानांत कुजबुजूं लागे. अन् भडकलेल्या वासराप्रमाणे कल्पना भूतकाळाच्या भुयारांतून धावत सुटे. ज्ञानोबांची पालखी दर वर्षी गावांतूनच पंढरीला जाई. त्यावेळी दिंड्या-पताकांची अशी गर्दी उठे. टाळमृदंगांच्या नि ग्यानबा तुकारामांच्या गजराने गाव दुमदुमून जाई. अन् चंद्रभागेचें स्नान अंगणांतच घडल्यासारखे वाटे. खरोखर संतांनीं आणि वीरांनीं कृतार्थ केलेल्या ह्या महाराष्ट्रांत जन्माला येण्यासारखें भाग्य नाही दुसरे.

शहरांत राहावयाला आलों, तरी निसर्गाची संगत मी सोडलेली नाही. मुंबईंत समुद्र हा माझा सोबती आहे. त्याच्या लाटांची अहोरात्र चाललेली मर्मर हें माझ्या जीवनांतलें पार्श्वसंगीत आहे.

भरतीच्या आणि ओहोटीच्या तालावर माझ्या मनोवृत्ती अक्षय नाचत असतात. किनाऱ्यावरच्या उंच उंच माडांच्या आणि नारळींच्या झाडांप्रमाणे मीहि वाऱ्याच्या सोसाटचामध्ये धुंद होऊन अष्टौप्रहार डोलत असतो. पहाटेच्या वेळीं अंगावर लाटांचे तुषार झेलीत ओल्या आणि भुसभुशीत वाळूवरून अनवाणी पांवलांनीं चालण्यांत केवढें काव्य आहे ! पण पुष्कळ लोक पायांत बूट घालून अन् सारें अंग लोकरी कपडचांत पॅकबंद करून समुद्रावर हिंडायला येतात. मी त्यांना म्हणतों, " अरे, परमेश्वराचें तीर्थ उडूं द्या थोडें अंगावर. त्याचा श्वास शिरूं द्या तुमच्या नाकातोंडांत. निसर्गाच्या देवळांतहि बाहेर जोडे ठेवून शिरायचें असतें ! " पण कोण ऐकतोय ? निसर्गाला कोणी संधीच देत नाही. समुद्र म्हणजे त्यांना शत्रु वाटतो. अंगांत 'चिलखतें' घालून त्याला भेटायला येतात.

मुंबईच्या सागराप्रमाणे खंडाळचाचा डोंगरहि माझा मित्र आहे. मी वारक्या-सारक्या लोकांशीं मैत्री करीतच नाही. ह्या डोंगरावर माझें एक घर आहे. पुष्कळदा मी तिथे राहतो. माझें सारें लेखन मी तिथेच करतो. मला कांही 'योग' येत नाही. पण खंडाळचाला गेलों कीं तावडतोब माझी 'समाधि' लागते. माणसांचें जग मी पार विसरून जातों. उंच उंच डोंगरावर निळेंभोर आभाळ बसलेलें असतें. तासन् तास मी त्यांच्याशीं गोष्टी करीत असतों. आभाळाच्या कापसांत बुबुळें गुंडाळून ठेवलीं म्हणजे उघडचा डोळचांनीं झोपल्यासारखे वाटते. झाडाझुडुपांच्या आणि झऱ्यांच्या संगतींत दिवस कसा निघून जातो हें कळत नाही.

झाडांना हलता येत नाही, बोलता येत नाही. तीं एकाच जागेवर उभीं असतात. पण त्यांच्या जगांत नेहमीं कांही ना कांही तरी उलाढाली चाललेल्या असतात. जुन्या झाडांचीं पानें गळत असतात. नवीन नवीन पानें फुटत असतात. कांहीना फुलें येतात. तर कांहीना मोहर येतो. झुडुपांवर तुरे डोलत असतात. वेलींवर कळचा हसत असतात. हिरव्या सृष्टींतल्या ह्या लहानमोठचा रहिवाशांना स्वस्थपणा कसा तो माहीत नसतो. उन्हाळचांत वाऱ्यांच्या झुळुकाशीं ते थट्टामस्करी करीत असतात. तर पावसाळचांत मुसळधार पावसाशीं त्यांची दंगामस्ती चाललेली असते. अन् हिंवाळचांत

अनुक्रम ७७ २०७० २०।११।४४

धुक्याची दुलई अंगावर ओढून आंतल्या आंत ते कांही तरी गडबड करीतच असतात.

निसर्गाइतकेच मला वाङ्मयाचें वेड आहे. जीवनाच्या आनंदामधून तें निर्माण झालें आहे. वाङ्मयापेक्षा मला अधिक प्रिय कांही नाही. वाङ्मय म्हणजे जीवनांतला मधु. जीवनांत सर्वत्र मधु भरला आहे. विषहि आहे. पण मधमाश्यांप्रमाणे वाङ्मयकार उत्तम मधूच गोळा करतात. वाङ्मय म्हणजे मधाचें पोळें. कोळ्याचें जाळें नव्हे. मधाच्या पोळ्यापेक्षा कोळ्याचें जाळें दिसतें सुंदर. त्याचे धागे किती नाजुक, रचना किती कलात्मक. पण माश्यांना मारण्याचा तो फास आहे दुसरें काय? त्या जाळ्यांत अडकणें म्हणजे मरण.

वाङमय म्हणजे जीवनाचा अनुभव. कलेचा विकास नव्हे. मधमाशी मध कशी गोळा करते? तिला हिंडावें लागतें. फुलाफुलाकडे जावें लागतें. मध हें सत्य आहे, कल्पना नाही, तें शोधावें, तेव्हा मिळतें. पण कोळी कांही हिंडत नाहीं. तो बसल्याबसल्याच जाळें विणतो. त्यांच्या तोंडांतून तंतू निघतात. कोळ्याचें जाळें म्हणजे निव्वळ कल्पना.

पुष्कळसे लेखक घरांतच बसतात. पुस्तकें वाचतात आणि जाळीं विणतात. पण हें त्यांचें लेखन क्षणजीवि असते. त्यांत सत्य नसते. जीवनाचा शोध नसतो. वाङ्मयकारांनीं जीवनाकडे जायला पाहिजे. जीवनाचें संशोधन केलें पाहिजे. सेवेच्या कोणत्या ना कोणत्या तरी क्षेत्रामध्ये उडी घेतली पाहिजे. साहित्यांत जीवनाचा साक्षात्कार घडावयाला पाहिजे. जीवनाचा अनुभव असल्याखेरीज हें कसें होईल?

विनोबा आणि साने गुरुजी ह्यांच्या साहित्यामध्ये तेज आहे. त्याचें कारण आधी ते सेवक आहेत. अन् मग साहित्यिक. आजकाल साहित्याची आणि सेवेची फाळणी झालेली आहे. म्हणून साहित्याचा अधःपात झाला आहे. हा कोण तर म्हणे कवि. तो कोण तर म्हणे कादंबरीकार. धंदा काय करता? तर म्हणे नुसत्या कविता अन् कादंबऱ्या लिहितों.

लेखन ही कांही वेठ नाही. लिहिता येतें म्हणून काय लिहिलेंच पाहिजे? त्यापेक्षा वाचावे. वाङ्मयाच्या अमृतांत यथेच्छ डुंबावें. सर्वांगानें

वें शोषून घ्यावें. अंतर्बाह्य शुद्ध व्हावें. कपड्याला कसर लागूं नये म्हणून आपण त्यांत केवड्याचीं कणसें घालतों. वाङमयाचें हेंच काम आहे. तें जीवन सुगंधित करतें; जीवनाचा अधःपात होऊं देत नाही.

ह्या दृष्टीने पुष्कळसें 'आधुनिक वाङमय' व्यर्थ आहे. जीवनावर परिणाम करण्याचें सामर्थ्य त्यांत नाही. मानवतेच्या कल्याणासाठी प्राचीन काळांतील महापुरुषांनीं देवभाषेंत आणि लोकभाषेंत 'केवड्याची बेटें' लावून ठेवलीं आहेत. त्यांचा सुगंध शतकानुशतकें दरवळतो आहे.

संत गाडगेमहाराज नेहमीं सांगतात, "घरोघर तीर्थक्षेत्र आहे. त्यासाठी भटकण्याची जरुरी नाही. गंगेंत स्नान केल्याने पाप जात नाही. त्याने पापें नाहीशीं होतात असें जे सांगतात, ते शास्त्रांचा काळा बाजार करतात." दीनांच्या आणि दलितांच्या उद्धाराची ही दृष्टि संतांनी सदैव बाळगलेली आहे.

जगाच्या उद्धारासाठी भगवंतांनी 'गीता' सांगितली. 'गीता' म्हणजे सर्व उपनिषदांचे गोपालनंदनाने पिळून काढलेलें दूध. नव्हे अमृत. पण हें अमृत जनतेला कुठे प्यायला मिळालें? संन्याशांनी आणि पंडितांनी स्वतःची अक्कल त्यांत ओतून तें नासविले. त्यामुळे गीतेची भलतीच शिकवण जनतेला मिळाली. अर्थाचा अनर्थ झाला. म्हणून लोकमान्यांनी गीतेचें रहस्य उद्घोषून सांगावे लागले.

मोक्ष मिळविण्यासाठी संसार सोडण्याची जरुरी नाही. संसारांत राहून प्रत्येकाने आपलें कर्तव्य करावे. पण तें करतांना स्वार्थाचा विचार करू नये. लोककल्याणाची दृष्टि बाळगावी. परमेश्वरावर श्रद्धा ठेवावी. त्यांतच ऐहिक आणि पारलौकिक कल्याण आहे हें गीतेचे रहस्य आहे.

संन्यास आणि वैराग्य या कल्पनांचा विपर्यास झालेला आहे. त्याचा विनोबांनी फारच सुंदर अर्थ सांगितला आहे. जो कर्म सोडतो तो संन्यासी नव्हे. सर्वांपेक्षा जो जास्त कर्म करतो तो संन्यासी. तो कर्म करीत आहे असे लोकांना वाटत नाही. चाक जोराने फिरत असलें म्हणजे तें नाही का स्थिर वाटत? तसें संन्यासाचें कर्म हे बाह्यतः अकर्म वाटते. त्याचप्रमाणे लोकसेवेसाठी स्वतःचे पाश तोडणे ह्याचें नांव वैराग्य. नवीन बीज

पेरण्यापूर्वी जमिनीतले तण तोडून ती शुद्ध करावी लागते. पण जमिनीत पेरणी करावयाची नसेल तर हे शुद्धीकरण निरर्थक आहे. वैराग्य म्हणजे लोककल्याणाच्या कार्यासाठी केलेली आत्मशुद्धि.

देवधर्माप्रमाणे नीतिधर्माचाहि आज विपर्यास झाला आहे. त्यामुळे बहुजनांची फार नागवणूक झाली आहे. 'नीती'चा खरा अर्थहि पुष्कळांना माहीत नाही. पाश्चात्य भाषेंत तर 'नीती' ला समान अर्थी शब्दच नाही. म्हणून 'नीती'च्या अर्थाबद्दल फार गैरसमज आहे. 'नीति' म्हणजे साधु किंवा बैरागी ह्यांची जगण्याची 'रीति', अशी पुष्कळांची समजूत आहे. अनेक व्रतवैकल्यांनी आणि यमनियमांनीं जो स्वतःला आयुष्यांत बांधून घेतो तो नीतिमान् असे कित्येकांना वाटते. पण तसा नीतीचा खरा नाही.

नीति म्हणजे शहाणपणाने जीवन जगण्याची रीति. संसार किंवा समाज न सोडता व्यवहारी माणसाने जीवनामधला जास्तीत जास्त आस्वाद कसा घ्यावयाचा हें जिच्यामुळें समजतें ती 'नीति'.

मी उपदेशक नाही. उपासक आहें. सिद्ध नाही. साधक आहें समाजांतील अनंत दुःखांची आणि दैन्यांची मला जाणीव आहे. त्यांजवर फुंकर घालण्याचाच माझ्या लेखणीने मी सतत प्रयत्न केला आहे. जनतेचा कैवार घेण्यात मी माझें सामर्थ्य खर्च केलें आहे. जगांतील म्लान वदने प्रफुल्लित कशीं होतील. ह्याचीच मी सदैव चिंता केली आहे. माझ्या दोषांची आणि चुकांची मला जाणीव आहे. माझ्या हातून अनेक अपराध घडले आहेत. पण असद्भावनेचा प्रचार करून जनगंगेचें जीवन गढूळ करण्याचा प्रयत्न मात्र मी कदापि केलेला नाही.

# १०. दोन तात्या

—ग. त्र्यं. माडखोलकर

— १ —

१९२० सालच्या मे महिन्यांत श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्याशीं माझी ओळख झाली. तो दिवस मी कधीहि विसरणार नाही. त्या दिवशीं दुपारीं अकस्मात् 'विविधज्ञानविस्तारा' चे संपादक रावसाहेब मोरमकर यांच्याकडून एक मनुष्य मला बोलवावयास आला; व त्याने मला असें सांगितलें कीं, "कोल्हटकर मोरमकरांकडे बसलेले असून, त्यांनी तुम्हांला तिथे बोलावलें आहे."

रावसाहेबांच्या दिवाणखान्यांत त्या दिवशीं पाहिलेली त्यांची ती भव्य मूर्ति आजहि माझ्या डोळ्यापुढे उभी आहे. वार्धक्याची विदारक छाया अद्याप त्यांच्या शरीरावर पडावयाची होती. आणि रंगेल चेहऱ्यावर सदैव खेळणारें उपरोधमिश्र हास्य, कोटी स्फुरूं लागतांच डोळ्यांत झळकणारी प्रतिभेची दीप्ति, संभाषणांत क्षणोक्षणीं उधळले जाणारे नर्मतुषार, सौंदर्यचिंतनाच्या नादामुळे वृत्तींत विलासणारी अनवधानता, कधीहि न कोमजणारें मनाचें वासंतिक यौवन इत्यादि कारणांमुळे ते त्या वेळीं अतिशयच आकर्षक वाटत असत. माझे तेव्हा फार तर तीनचारच लेख प्रसिद्ध झालेले असतील. पण, ओळखीच्या त्या पहिल्याच दिवशीं ते माझ्याशी इतक्या आत्मीयतेने बोलले कीं, माझी तत्काळ त्यांच्यावर भक्ति जडली. आणि मला वाटतें, त्यांच्याविषयीं जें इतकें आकर्षण नवीन पिढींतील लेखकांना वाटतें, त्याला त्यांचा हा दिलदार स्वभावच कारण असावा. त्यांच्यापेक्षा थोर किंवा लोकप्रिय ग्रंथकार महाराष्ट्रांत झाले नाहीत असें नाही. थोरवीच्या दृष्टीने श्री. चिं. वि. वैद्य आणि लोकप्रियतेच्या दृष्टीने कै. रा. ग. गडकरी हे त्यांच्यापेक्षा निःसंशय सरस ठरतील. पण, सूर्य अधिक तेजस्वी असला किंवा शुक्र सुंदर दिसला, म्हणून काय झालें? चंद्राच्या मोहकतेची सर त्यांना कधी तरी येणें शक्य आहे काय? तसाच

प्रकार याहि बाबतींत आहे. सन्निध आलेल्या नवीन लेखकाला त्यांनी आत्मसात् केला नाही, असें क्वचितच घडतें. तो त्यांना आवडला मात्र पाहिजे. आपल्याला आवडलेल्या लेखकाला ते इतक्या आत्मीयतेने वागवतात कीं, मग तो त्यांच्या अगदी भजनीं लागतो. माझाच अनुभव असा आहे, असें नव्हे. खांडेकराचा अनुभव असाच आहे आणि गडकऱ्यांचाहि पण असाच होता म्हणतात. म्हणूनच त्यांच्या शिष्यांची आणि मित्रांची परंपरा इतकी उज्ज्वल आणि इतकी विस्तृत आहे. श्री. तात्यासाहेब केळकर हे नेहमीच त्यांच्याविषयीं इतक्या आपुलकीने आणि आदराने बोलतात कीं, त्यांचे त्या उद्गारांतून व्यक्त होणारें सौहार्द पाहून अंगावर रोमांच उभे रहावे; व गडकऱ्यांच्या ' प्रेमसंन्यास 'ची उत्कटतापूर्ण अर्पणपत्रिका तर प्रसिद्धच आहे. पण हे दोघे किती झाले तरी समानशील आणि सहानुभवी. हुशंगाबादचे सेशन्स जज्ज रा. ब. हरि शिवराम मुंजे यांचा साहित्याशीं बादरायणसुद्धा संबंध नाही. परंतु तात्यासाहेबांविषयींचा त्यांचा स्नेहभाव हा केळकरांच्या स्नेहभावापेक्षाहि कदाचित् अधिक सांद्र ठरेल.

त्यांच्या स्वभावाइतकेंच त्यांचें संभाषणहि आकर्षक असतें. प्रथमदर्शनीं, विशेषतः स्तब्ध असले म्हणजे, ते गंभीर किंबहुना किंचित् उग्र वाटतात. पण, त्यांनीं बोलावयाला आरंभ केला कीं, कोटया आणि कल्पना यांचें विलोल नर्तन सुरू होऊन, मनुष्य अगदी मोहित होऊन जातो. त्यांच्या वृत्तींत काय किंवा भाषणांत काय, गांभीर्य आणि विनोद यांचें मोठें चमत्कृतिजनक मिश्रण झालेलें असतें. आजाच्या बोटाला धरून नातू जसा दुडदुड धावत असावा, तसा त्यांच्या संभाषणांत विनोद हा नेहमीं गांभीर्याच्या भोवती बागडत असतो; व त्यांच्या गंभीर वाक्याचें पर्यवसान विनोदी कोटींत इतक्या नकळत आणि इतक्या लवकर होतें की, नवख्या माणसाच्या ते पुष्कळदां अजीबात लक्षांतहि येत नाही. त्यांच्या जोडीला सौंदर्यचिंतनाच्या बेसुमार आसक्तीमुळे येणारी विमनस्कता आणि स्मरणशक्तीचा लहरीपणा बसविला, म्हणजे तात्यासाहेबांच्या वैचित्र्यपूर्ण स्वभावाची घडण पुरी होते. सभोवती बसलेली मंडळी कोणत्या तरी महत्त्वाच्या विषयावर चर्चा करीत असावयाची, आणि हे ' तुजविण गमे वृथा संसार ' यासारखे एखादे

सुंदर पद तोंडाने गुणगुणत किंवा एखाद्या रम्य दृश्याचें चिंतन करीत असावयाचे, असा प्रकार नेहमी दृष्टीस पडतो. अर्थात् तोंडाने हुंकार मात्र अविरत चालू असतात. अशा वेळीं जर त्यांना आपण हटकलें कीं, "तात्या, आमच्या बोलण्याकडे आपलें लक्ष नाही," तर ते लगेच हसून उद्गारतात, "तुमच्या बोलण्यापेक्षा अधिक महत्त्वाच्या गोष्टीकडे माझें लक्ष गेलें होतें !" या त्यांच्या उत्तराने स्वतःच्या अवधानतेचें तर समर्थन होतेंच; पण विनोदाचाहि आभास उत्पन्न होतो. एकदा तर त्यांनी असें स्पष्टच उत्तर गमतीने दिले होतें कीं, "सुंदर वस्तूंच्या मागून माझे चित्त भटकत असल्यामुळे इतरांच्या बोलण्याकडे केव्हा केव्हा माझें दुर्लक्ष होतें."

त्यांची स्मरणशक्तीहि अशीच मोठी छांदिष्ट आहे. शंभर वस्तू लक्षांत ठेवण्याचा त्यांचा प्रयोग ज्यांनी पाहिला आहे, त्यांना तिच्या सामर्थ्याचें कौतुक वाटल्याशिवाय राहिलें नसेल. पण त्यांची स्मरणशक्ति जरी तीव्र आणि संग्राहक असली तरी निवडानिवडीच्या बाबतींत ती मोठी चोखंदळ आहे. त्यांना आवडलेली एखादी गोष्ट, जणूं कांही पूर्वी कधी सांगितलेलीच नाही अशा आविर्भावाने, केव्हा केव्हा ते दिवसांतून तीन वेळांसुद्धा सांगतात. आवडत्या गोष्टींच्या पुनरुक्तीच्या बाबतींत जसें विस्मरण त्यांना सोईचें पडते, तसेंच नावडत्या व्यक्तींची ओळख विसरण्याच्या बाबतींतहि तें त्यांच्या पथ्यावर पडत असल्याचा अनुभव पुष्कळ येतो. या कारणामुळे, अनेकदा भेट होऊनहि, पुन्हा प्रत्येक वेळी स्वतःचो नव्याने ओळख करून देण्याचा प्रसंग आल्याबद्दल पुण्याच्या एका नव्या कवीचा त्यांच्यावर फार राग झाला होता. तसेंच ते नादीहि पण अतिशय आहेत. एखादी गोष्ट एकदा त्यांच्या मनांत भरली, म्हणजे पुरतें समाधान होईपर्यंत ते तिचा छंद सोडीत नाहींत. ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करीत असताना, आकाशांतील ताऱ्यांचें निरीक्षण करण्याच्या नादामुळे, त्यांना कांही दिवस निद्रानाशाचा दुर्धर विकार जडला होता. या विकारावरून बोलतांना त्यांनी एकदा असे मार्मिक उद्गार काढले होते कीं, तारका आणि तारकाक्षी यांच्या अवलोकनाइतकें जगांत दुसरें आनंददायक काय आहे ?" त्यांच्या स्वभावांतील या विचित्र विषयामुळे तिन्हाइतांची, आणि केव्हा केव्हा तर खुद्द त्यांची स्वतःचीहि, फार धांदल

उडते व अंतेवासी स्नेहीमंडळीला पुष्कळ गमतीदार प्रसंग पहावयाला मिळतात. परंतु, स्वभाववैचित्र्यामुळे एखाद्याची न कळत अवज्ञा जरी त्यांच्या हातून क्वचित् घडत असली, तरी ते बुद्धिपुरःसर मात्र कधीच कोणाचे मन दुखवीत नाहींत. इतकेंच नव्हे, तर आपल्या सुहृन्मंडळींत बोलतांनाहि एखादा ग्रंथ किंवा ग्रंथकार त्यांचा कितीहि नावडता असला, तरी ते स्पष्ट कधीहि बोलून दाखवावयाचे नाहीत. फार तर, एखाद दुसरें सूचक विधान करतील एवढेंच. अप्रिय बोलणें हें मुळीं त्यांच्या स्वभावांतच नाही.

गुरु या नात्याने त्यांची योग्यता केवळ अनन्य आहे. ज्याला त्यांनी एकदा आपला म्हटला, त्या शिष्याच्या लेखनांत सुधारणा व्हावी म्हणून ते जे श्रम घेतात त्यांचे मोल करणें शक्य नाही. त्यांच्या तोडीचा कल्पक लेखक महाराष्ट्रांत आज एकहि सांपडणार नाही, व त्यांची बुद्धि जितकी कल्पक तितकीच कुशाग्रहि आहे. 'साहित्यबत्तिशी'तील विनोद हा जसा त्यांच्या नवनवोन्मेषशाली कल्पकतेची, तसेंच 'तोतयाच्या बंडा'वरील टीकेंतील नाट्य-घटकांचे पृथक्करण हें त्यांच्या बुद्धीच्या मूलगामी कुशाग्रतेची उत्कृष्ट साक्ष देते. विनोदी लेखनाप्रमाणेच कल्पकताप्रधान निबंधलेखनाचाहि प्रघात प्रथम त्यांनींच पाडला; व त्यांच्यानंतर केळकरांपासून तों खांडेकरांपर्यंत त्यांच्या अनेक ऋणानुबंधी लेखकांनी गेल्या पंचवीस वर्षांत तो पूर्णतेला नेला आहे. पण त्यांच्याइतक्या निर्दोष आणि सुंदर उपमा प्रायः कोणीच देऊं शकत नाही. केळकरांच्या उपमा अत्यंत विविध असतात; व खांडेकरांनी तर उपमांच्या बाबतीत आता अगदी अतिरेक केला आहे. कमलांच्या दाट रांगांतून जसा राजहंसाने कष्टाने संचार करावा, तशी उपमांच्या अप्रस्तुत गर्दीतून त्यांची तरल प्रतिभा मोठ्या मुष्किलीने मार्ग काढतांना दिसते. तथापि, उपमांच्या क्षेत्रांतील तात्यासाहेब केळकरांचें प्रभुत्व मान्य करूनहि असे म्हणावयाला हरकत वाटत नाही की, त्यांच्यापेक्षा कोल्हटकरांच्या उपमा अधिक समर्पक आणि उच्च दर्जाच्या असतात. मला वाटते, तात्यासाहेब सुद्धा ही गोष्ट कबूल करतील. याचें कारण एकच. तें हें कीं, आपले एकंदर लेखन प्रमाणशुद्ध असावें, म्हणून कोल्हटकर विलक्षण काळजी घेतात, किंबहुना ते जितके कल्पक तितकेच कष्टाळूहि असल्यामुळेच, त्यांना साहित्याच्या क्षेत्रांत इतके

लोकोत्तर यश मिळालें. आणि आपल्या शिष्यांनीहि लिहिण्याच्या बाबतीत शक्य तितके परिश्रम घ्यावे, असा त्यांचा फार कटाक्ष असतो.

मला त्यांच्या या स्वभावाचा अनुभव चिपळूणकरांवरील निबंध लिहिताना फार आला. त्या निबंधांतील बऱ्याच उपमा त्यांनी अप्रस्तुत सांप्रदायिक किंवा सदोष म्हणून काढून टाकल्या; व तो इतक्या बारकाईनें तपासला कीं, त्यांत जर कांही गुणांश असेल तर त्याचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. आपल्या एका विनोदी लेखाविषयी लिहिताना त्यांनी एकदा एका खाजगी पत्रांत असे उद्गार काढले होते कीं, 'लोकांना हसविण्यासाठी मला माझ्या डोळ्यांतून प्रथम टिपें काढावीं लागतात.' यावरून त्यांच्या परिश्रमाची कल्पना येईल. ते लिहावयाला बसले म्हणजे फार जलद लिहितात व त्यांनी आपली बहुतेक नाटकें आठपासून पंधरा दिवसाच्या आंत लिहिलेलीं आहेत. पण, त्यांचें त्या त्या विषयाचें चिंतन मात्र महिनो-गणती चालू असतें; व विषयाचें स्वरूप मनांत निश्चित झाल्यावर, मगच ते लेखणी हातांत घेतात. कोणत्याहि विषयाच्या अंतरंगांत खोलवर शिरून त्याचा पद्धतशीर विचार आणि व्यासंग कसा करावा, या गोष्टीचें त्यांच्या सहवासांत मोठें मार्मिक ज्ञान होतें. इतरांच्या दोषांसंबंधी ते सामान्यतः मुग्ध असतात. पण आपल्या शिष्यांचे दोष दाखविण्याच्या बाबतींत मात्र ते यत्किंचितहि चालढकल करीत नाहीत. या बाबतींत ते इतके स्पष्ट असतात कीं, आपल्या कविता त्यांना आवडत नाहीत असें आढळून आल्यामुळे त्यांच्या एका शिष्याने कविता लिहिण्याचें अजीबात सोडून दिलें. पण स्वतःच्या शिष्यांविषयींचा त्यांचा प्रेमा इतका उत्कट असतो कीं, खाजगी रीतीने जरी ते त्यांचे दोष स्पष्ट दाखवीत असले तरी तिऱ्हाइतांशी त्यांच्याविषयी बोलण्याचा प्रसंग आला असता मात्र तात्यासाहेबांच्या तोंडून नेहमीं प्रशंसेचेच शब्द बाहेर पडतात.

शिष्यांविषयींची ही त्यांची आत्मीयता केवळ त्यांच्या वाङ्मय-जीवनापुरतीच मर्यादित असते असें नाही. ज्या व्यक्तीवर त्यांचा लोभ जडतो, तिच्या भोवतालच्या सर्वच माणसांना ते अतिशय आपुलकीने वागवितात, किंबहुना त्यांची ही आत्मीयता असीम आणि सर्वस्पर्शी असते, असें म्हटलें तरी शोभेल. गेल्या वर्षीं याच दिवसांत घडलेला एक प्रसंग

आठवला म्हणजे माझें अंतःकरण भरून येतें. गेल्या ऑक्टोबरांत मी नागपुरच्या तुरुंगांत असतांना मेजर जटार यांची मुद्दाम परवानगी काढून माझ्या पत्नीबरोबर ते मला भेटावयाला आले होते. त्या वेळीं त्यांची ती व्यथित मुद्रा पहाताच मला क्षणभर कांही सुचेना; व तेहि कांही वेळ स्तब्धच होते. तुरुंगांतून परत जाताना मुद्दाम मेजरसाहेबांना भेटून मला चांगल्या रीतीने वागविण्याबद्दल त्यांनी परोपरीने त्यांना आग्रह केला.

परमेश्वराने मला अनेक स्पृहणीय देणग्या दिल्या आहेत. पण त्या सर्वांत तात्यासाहेबांचा मजवरील लोभ ही मी परमोच्च देणगी समजतों.

— २ —

श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याशीं माझी ओळख होण्याचा योग १९२१ च्या जानेवारीमध्यें आला. त्या सुमारास मी माझे आयर्लंडांतील सिनफेन चळवळीवरील लेख ‘ केसरी ’ कडे पाठविले होते. त्या लेखांबद्दल प्रशंसापर पत्र लिहून त्यांनी मला सरदारगृहांत भेटावयास बोलाविलें. येथून आमच्या ऋणानुबंधाला प्रारंभ झाला.

त्याच्या या पत्रानुसार त्यांना भेटण्यासाठी ज्या वेळी मी सरदारगृहांत गेलों, त्या वेळची माझी बावरलेली मनःस्थिति मला अजूनहि आठवते. कोल्हटकरांची कीर्ति नाही म्हटले तरी एकविध. शिवाय वाङ्मयाच्या क्षेत्रांतील कीर्ति ही अशा स्वरूपाची असते की, तिचा कैफ डोळ्यावर चढून मनुष्य कितीहि उन्मत्त झाला तरी त्याचा तो उन्माद एका विवक्षित मर्यादेपलीकडे जाऊं शकत नाही. कारण बोलून चालून सत्ताहीन कीर्ति ती. पण पुढारीपणाच्या कीर्तीचे स्वरूप आगळें असतें. कर्तृत्वाचा दर्प हा तिच्या रोमरोमीं भरलेला असतो; व सत्तेच्या जाणिवेने तिचे भान हरपलेलें असतें. अशा स्थितीत केळकरांच्या भेटीला जाताना जर मला थोडा धाक वाटला असला तर त्यांत काय आश्चर्य ? पण आश्चर्य हें कीं, ती भीति अनाठायी ठरली. कोल्हटकरांच्या मनाने मला ते प्रथमदर्शनीं किंचित् उग्र आणि तुटक वाटले हें खरें. परंतु, क्षितिजावर गडगडत

आलेल्या मेघांची सांवली पडून शेत जरी क्षणभर काळवंडल्यासारखे दिसलें, तरी त्यांतून अमृतधारा बरसूं लागताच जशी त्याची हरितकांति द्विगुणित व्हावी, तसाच प्रकार याहि बाबतींत घडला. संभाषणाच्या शेवटी माझी खाजगी चौकशी करून, जे उत्तेजनपर शब्द त्यांनी एक प्रकारच्या जिव्हाळ्याने एकदम उच्चारले, तें मी कधीहि विसरणार नाही. त्या शब्दांत व मला त्यांच्याविषयी वाटणाऱ्या उत्कट प्रेमादराचें बीज आहे.

कोल्हटकरांच्या इतकाच तात्यासाहेबांच्याहि सहवासाचा परिणाम माझ्या वाङमय-जीवनावर झाला आहे; व त्या दृष्टीने तेसुद्धा मला गुरु-स्थानींच आहेत म्हटलें तरी चालेल. त्यांच्याजवळ मी पांच महिने होतों. या अवधींत जन्मभर पुरेल इतकें लेखनकलेचें शिक्षण त्यांनी मला कळत नकळत दिलें आहे. किंबहुना त्यांचा सहवास हेंच मुळी एक प्रकारचें शिक्षण असतें. बकुळीच्या वृक्षाखाली बसणाऱ्या मनुष्याला जसा छायेबरोबर परिमळाचाहि लाभ घडतो, तसा त्यांच्या सहवासांत राहणाऱ्या मनुष्याला ज्ञानाबरोबर वाङमयाच्याहि उपभोगाचा आनंद लाभतो. त्यांच्या बुद्धीला अविषय नाही, सहानुभूतीला मर्यादा नाहीत आणि उद्योगाला खंड नाही, त्यांच्या एका मित्राने त्यांना एकदा गमतीने असें म्हटलें होतें की, "दिवसाच्या प्रत्येक बदलत्या तासागणिक आपण निरनिराळ्या व्यक्तींशी निरनिराळ्या विषयांवर बोलत असता. जणूं कांही विषय, व्यक्ति आणि तास यांचा आपला वेळ केव्हा, कोणी किती घ्यावयाचा, याबद्दल संकेत ठरून सारे व्यवहार चाललेले असतात!" दुपारची वामकुक्षी आणि रात्रीची झोप यांना वाटून दिलेला मोजका वेळ सोडला, तर बाकीच्या त्यांच्या वेळाचा प्रत्येक क्षण बोलण्यांत, लिहिण्यांत, वाचण्यांत किंवा मनन करण्यांत जात असतो. कोल्हटकर हे आयुष्याकडे उपभोगाच्या दृष्टीने पाहातात, तर केळकर हे आयुष्याकडे उपभोगाच्या दृष्टीने पाहातात. आणि या दोघा साहित्या-चार्यांच्या या विशिष्ट दृष्टिकोनाचा परिणाम त्यांच्या वाङमयावर झालेला स्पष्ट बघावयाला मिळतो. कोल्हटकरांचें वाङमय मुख्यतः रंजनप्रधान, तर केळकरांचें वाङमय मुख्यतः ज्ञानप्रधान आहे; व कोल्हटकरांकडे गेले असता तो उद्बोधित होऊन परत येतो. कोल्हटकरांच्या साध्याहि बोलण्यांत जशी कल्पकता व्यक्त झालेली असते, तसा केळकरांच्या साध्याहि बोलण्यांत

त्यांचा बहुश्रुतपणा प्रतिबिंबित झालेला असतो; व त्यामुळे त्यांचे अगदी स्वैर कथालापसुद्धा उपदेश होऊन बसतात.

पण, या दोघा मित्रांच्या आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टींत जरी फरक असला, तरी त्यांच्या स्वभावांत मात्र पुष्कळच साम्य आढळतें. सौंदर्यासक्ति आणि मनाचा हळवेपणा हे विशेष दोघांच्याहि स्वभावाला सामान्य आहेत. मनाचा हळवेपणा हा आपल्या प्रेमांतल्या माणसांच्या बाबतींत जरी गुण असला, तरी एकंदर व्यवहारांत तो अवगुणच ठरतो. त्यांतून समाजाच्या नेतृत्वाची जबाबदारी ज्या मनुष्याच्या शिरावर असते त्याच्या बाबतींत तर या हळवेपणाला मनोदौर्बल्याचें स्वरूप येतें. पुढाऱ्याचा स्वभाव हा हिऱ्याप्रमाणे जसा तेजस्वी आणि पैलूदार तसाच कठोरहि असला पाहिजे. थोरल्या तात्यासाहेबांच्या हळवेपणाचें मला फारसें नवल वाटत नाही. त्यांचें सर्व आयुष्य सौंदर्याच्या उपासनेंत आणि आविष्कारांत गेलेलें आहे. त्यांच्यावर टीका झालेली नाही असें नव्हे. पण, मधुपानासाठी फुलावर झेप घालणाऱ्या भ्रमराच्या नाजूक पंखांना जसा त्याच्या देठाचा ताठर स्पर्श क्वचित् जाणावा, तशा तऱ्हेचे ते टीकेचे आघात. तसें धाकट्या तात्यासाहेबांचें नाही. त्यांचें आयुष्य हें तोफांच्या मारगिरीच्या टप्प्यांत बुद्धिपुरःसर वीरासन घालून बसणाऱ्या सेनानीसारखें गेलेलें आहे. तरीसुद्धा त्यांनीं इतकें हळवें रहावें, हें चमत्कारिक नव्हे काय? पण त्यांच्या या हळवेपणाचें पृथक्करण केलें म्हणजे त्यांच्याविषयीचा आदर द्विगुणित होतो. हा हळवेपणा त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या उत्कट आत्मौपम्य वस्तींतून उद्भवलेला आहे. त्याला दौर्बल्य मानणे किंवा म्हणणें चुकीचें होईल. शत्रूविषयीं सुद्धा त्याच्या भूमिकेशीं समरस होऊन विचार करावयाचा, ही जी त्यांची प्रवृत्ति, त्या प्रवृत्तीमुळेच त्यांच्यावर अविचारी स्वकीयांच्या उपहासाचा विषय होऊन बसण्याचा प्रसंग अनेकदा आलेला आहे. त्यांच्या या प्रवृत्तीचें प्रत्यंतर टिळकचरित्रांत पुष्कळ ठिकाणी पहावयाला मिळतें. राजकारणी मनुष्याच्या ठिकाणीं ही प्रवृत्ति केव्हांहि वाईटच. पण या प्रवृत्तीमुळेच त्यांच्या व्यक्तित्वाला आणि वाङ्मयाला इतकी आकर्षकता आणि इतकें उद्बोधक स्वरूप प्राप्त झालें आहे, हें विसरून चालणार नाही. सहृदयता हा त्यांच्या सर्व जीवनाचा आत्मा आहे. आणि आत्मौपम्यबुद्धि म्हणजे तरी सहृदयतेचेंच अधिक परिणत स्वरूप नव्हे काय?

त्यांच्या या सहृदयतेला मर्यादा नाहीत. घरट्यांत चिवचिवणाऱ्या चिमणीच्या अपंग पिलापासून तों येरवड्याच्या तुरुंगांत आयुष्याचे क्षण मोजीत बसलेल्या सोलापूरच्या असहाय हुतात्म्यांपर्यंत सर्वांविषयी तिला उत्कट सहानुभूति वाटते. किंबहुना सृष्टीच्या व्यापारांतील काय किंवा मानवी व्यवहारांतील काय, हरएक घटनेकडे सहृदयतेने पाहणारा इतका समदर्शी निरीक्षक महाराष्ट्रांत आज दुसरा आढळणार नाही. त्यांच्या उपमांची विविधता ही त्यांच्या या सहृदयतेच्या व्यापकतेचीच द्योतक आहे. कोल्हटकरांचीं उपमाने हीं बव्हंशीं त्यांच्या या कल्पकतेचीं अपत्यें असतात; उलट केळकरांच्या बहुतेक साऱ्या उपमानांचा उगम त्यांच्या निरीक्षणांत सांपडतो. सौंदर्याकडे त्यांचा ओढा कोल्हटकरांपेक्षा कमी आहे असें नाही. पण, असुंदर किंवा असमशील वस्तूंविषयीं कोल्हटकरांना जो एक प्रकारचा तीव्र उबग वाटतो, तो तितक्या प्रमाणांत केळकरांना खास वाटत नाही. कदाचित् त्यांच्या जीवनक्रमाला लागलेल्या अत्यंत भिन्न वळणाचाहि हा परिणाम असेल. वर्तमानपत्राची कचेरी म्हणजे साऱ्या सार्वजनिक चळवळीचा चवाठा. त्या चवाठ्यावर फड घालून बसलेल्या त्यांच्यासारख्या पुढाऱ्याला कोल्हटकरांइतके चोखळंद होऊन कसें चालेल? त्यांच्या उपमानांच्या या वैशिष्ट्यामुळेच त्यांचें वाङ्मय हें कोल्हटकरांच्या वाङ्मयापेक्षा एकंदर वाचकवर्गाला अधिक जवळचें वाटतें. तथापि त्यांत सैलपणा मात्र पुष्कळच दृष्टीस पडतो. याचें कारण अगदी उघड आहे. त्यांचा व्याप फार मोठा; त्यांच्या मागे विवंचनाहि पुष्कळ आणि त्यांच्या वेळेला व्यवधानें अति. त्या साऱ्या व्यवधानांचा उपद्रव आनंदाने सोसून ते इतकें प्रसाद-सुंदर वाङ्मय निर्माण करतात, हेंच नवल. कोल्हटकरां-प्रमाणे तेहि लेखनाच्या बाबतींत अतिशय परिश्रम घेतात. 'केसरी'तील अग्रलेख तर राहोच; पण एखाद्या ग्रंथाला प्रस्तावना जरी लिहावयाची झाली, तरी त्यांतील प्रतिपाद्य विषयाची माहिती स्वतंत्र रीतीने मिळवून व त्या माहितीचा स्वतंत्र दृष्टीने विचार करून, नंतरच ते लेखणी हातांत घेतात. या त्यांच्या दुर्दम्य व्यासंगप्रियतेमुळेच त्यांचा बहुधा प्रत्येक लेख हा त्या त्या विषयाची तपशीलवार माहिती आणि तिच्यावरून सुचलेले मार्मिक विचार यांचें भांडार होऊन बसला आहे. उत्कृष्ट शिल्प निर्माण करण्याच्या

आकांक्षेने प्रेरित झालेला कलावंत हा जसा प्रत्येक पाषाणावर सुंदर नकसकाम करतो, तशी केळकरांनी आपल्या अगदी साध्याहि विषयावरील लेखांतून स्वतःची लेखनकुसर व्यक्त केली आहे. वर्तमानपत्राच्या रकान्यांत पैदा झालेल्या त्यांच्या हंगामी लेखांनाहि जे इतकें निरुपम सौष्ठव आणि चिरंतन महत्त्व प्राप्त झाले आहे तें याच कारणामुळे. व्यक्ति, समाज, वाङ्मय, इतिहास आणि राजकारण यांचा इतका सहृदय पण चिकित्सक टीकाकार महाराष्ट्रांत अद्याप एकहि झालेला नाही.

व्यक्तिशः मला ते जवळ जवळ कोल्हटकरांइतकेच प्रिय आणि आदरणीय वाटतात. त्यांच्याजवळ असताना त्यांनी मला स्वतःच्या मुलांसारखा वागविला; व नंतर कांही दिवस मी जरा राजकीय दृष्टीने त्यांच्या प्रतिपक्षी असलेल्या संस्थेंत जाऊन राहिलों होतों, तरीहि त्यांच्या मजवरील लोभांत अंतर पडलें नाही. किंबहुना, मी जेव्हां त्यांना माझा हा विचार कळविला, तेव्हा मला धाडलेल्या पत्रांत त्यांनी असे उद्गार काढले होते कीं, "वाङ्मयाची भूमिका ही इतकी उच्च आणि पक्षातीत आहे कीं, तिच्यावर जडलेले संबंध इतर कारणामुळे तुटण्याचें कारण नाही." हें आश्वासन अक्षरशः खरें झाल्याचा माझा अनुभव आहे. त्यांना मतभेदाचा किंवा प्रामाणिक टीकेचा राग नाही. त्यांच्या टिळकचरित्रांतील शुद्धलेखनावर मी जेव्हां 'महाराष्ट्रां'तून टीका केली, तेव्हां इतरांच्या कल्पनेप्रमाणे, ते मजवर रागावले तर नाहीतच पण उलट त्यांनी माझें कौतुकच केलें. इतरांच्या गुणांचीं योग्य बूज करावयाला ते नेहमीच उत्सुक असतात. कै. अच्युतराव कोल्हटकर यानी त्यांच्यावर जितकी अभद्र टीका केली आहे तितकी प्रायः कोणीच केलेली आढळणार नाही. पण आपल्या साहित्यसंमेलनांतील भाषणांत त्यांनी अच्युतरावांचा स्मरणपूर्वक सादर उल्लेख केला आहे. आदर्श साहित्यसेवक कसा असावा, असें जर मला कोणी विचारलें, तर मी केळकरांकडे बोट दाखवीन.

कोल्हटकरांनी मला सुसंगत व्यासंग आणि विचार करण्याची सवय लावली. पण, लेखनकलेच्या इतर सर्व अंगोपांगांचें शिक्षण मी केळकरांपासूनच प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने घेतलेलें आहे; आणि त्यांच्या सहवासांत गेलेले माझ्या आयुष्याचे क्षण हे नेहमींच सुवर्णकणासमान समजेन.

# ११. बुद्धीचा महिमा

**-- पां. स. साने गुरुजी**

भारतीय संस्कृतींत अंधश्रद्धेला स्थान नाही. विचाराचा महिमा सर्वत्र गाइलेला दिसून येईल. भारतीय संस्कृतीचा वेद हा पाया मानिला जातो. परंतु वेद म्हणजे काय ? वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार आहे. ज्ञानावर उभारलेली ही भव्य संस्कृति आहे.

वेद किती आहे ? वेद अनंत आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद एवढेच वेद नाहीत. भारतीय संस्कृतीचा एकच ऋषि नाही, एकच पैगंबर नाही, एकच वेद नाही. भारतीय संस्कृति गगनाप्रमाणे विशाल व सागराप्रमाणे अपार आहे.

जीवनाला सुंदर करणारा प्रत्येक विचार म्हणजे वेद आहे. आपले आयुष्य आनंदी व उत्साही कसें राहील हे आयुवद सांगेल. समाजाचें रक्षण कसे करावे, ते धनुर्वेद सांगेल, समाजाची करमणूक कशी करावी, समाजाला दुःखाचा विसर कसा पाडावा, ते गांधर्ववेद सांगेल. हे सारे वेदच आहेत.

काल अनंत आहे व ज्ञान अनंत आहे. नवीन नवीन ज्ञान उदयास येईल व भारतीय संस्कृति सर्वाआधीं त्या ज्ञानाचा सत्कार करावयास उभी राहील. भारतीय संस्कृतीला ज्ञानाहून दुसरें कांहीहि पवित्र वाटत नाही. ज्ञानोपासकांबद्दल भारतीय संस्कृतीला नितान्त आदर आहे.

भारतीय संस्कृति एकाच काळीं सारे ऋषी झाले असें कधीहि मानणार नाही. असे म्हणणें अहंकार आहे. तो परमेश्वराचा अपमान आहे. सारे ज्ञान जर खलास झाले असेल, तर सृष्टीच्या अस्तित्वाची कांही जरुरीच नाही. कणसें आलीं कीं ज्वारी कापून टाकायची एवढेच उरतें. त्याप्रमाणें शोधावयास कांही शिल्लकच नसेल, तर मानवाच्या उत्पत्तीला कांही अर्थ उरत नाही.

नवीन नवीन विचार उत्पन्न होतात, नवीन नवीन ज्ञान आपणांस

मिळतें, युरेनस व नेपचून पूर्वी दिसत नव्हते, ते आता दिसूं लागले. खगोलांत ज्याप्रमाणे नवीन नवीन तारे दिसतात, त्याप्रमाणे जीवनाच्या शास्त्रांतहि नवीन नवीन विचार उत्पन्न होत असतात. खरे पाहिले तर इतर सर्व शास्त्रांच्या मानाने हें जीवनशास्त्र फारच प्रयोगावस्थेंत आहे असें म्हणावें लागेल. ह्या जीवनाच्या शास्त्रांत अद्याप कांहीहि ठरले नाहीं. भूमितीमध्यें स्वयंसिद्ध, शंकातीत, संशयातीत अशीं कांही तत्त्वें आहेत. गणितशास्त्रांत पृथ्वीच्या पाठीवर कोठेहि गेलात, तरी दोन नि दोन चार यांत फरक होणार नाही; परंतु जीवनाच्या शास्त्रांत असें एकहि तत्त्व विशंकपणे अपवादरहित असें मांडता येणार नाही. सत्य चांगलें कीं वाईट, अहिंसा योग्य कीं अयोग्य, ब्रह्मचर्य असावें कीं नसावें, यांची निश्चित उत्तरें अद्याप मानवी मनास देता येत नाहींत.

असें असल्यामुळे भारतीय संस्कृति कशाचा आग्रह धरीत नाही. "बुद्धेः फलमनाग्रहः" कोणत्याहि तत्त्वाचा आग्रह बुद्धिमान् मनुष्य धरणार नाही. श्रीकृष्णांनी शेवटीं अर्जुनाला "यथेच्छसि तथा कुरु" असें सांगून त्याच्या बुद्धीला महत्त्व दिले. वेदधर्म म्हणजे विचाराप्रमाणे वागणे; बुद्धि सांगेल त्याप्रमाणे वागणें. "अंतरिचा ज्ञानदिवा मालवूं नको रे" असें भारतीय संस्कृति सांगत आहे. तुझ्या स्वतःच्या हृदयांतील बुद्धि काय सांगतें ते बघ. त्या बुद्धीचा जो विशंक आवाज येईल त्याप्रमाणे वाग. "मनःपूतं समाचरेत्" या वचनाचा अर्थ हाच. अमुक ऋषि सांगतो म्हणून नाहीं, तमुक तत्त्वज्ञानी सांगतो म्हणून नाही, तर तुझ्या मनाला जें पवित्र वाटेल तें तूं कर. तूं तुझ्या आत्म्याचा अपमान करूं नकोस. तूं तुझ्या बुद्धीचा गळा दाबूं नकोस.

वेद अपौरुषेय आहेत वगैरे सर्व कल्पना भ्रामक आहेत. मानवी बुद्धीचा हा सारा पसारा आहे. वेदाला मानणें म्हणजे बुद्धीला मानणें. वेदांतील सर्वांत पवित्र मंत्र म्हणजे गायत्री मंत्र. या गायत्री मंत्राला एवढे महत्त्व कां; या मंत्राची उपासना करूनच मनुष्याचा पुनर्जन्म होतो, या मंत्रांत एवढे काय आहे ? या मंत्रांत बुद्धीची निर्मळता मागितली आहे.

"त्या तेजस्वी प्रेरणा देणाऱ्या सूर्याच्या परमश्रेष्ठ तेजाची आम्हीं उपासना करतों. तो सूर्य आमच्या बुद्धीस चालना देतो." विश्वामित्र

ऋषीने देवाजवळ आपल्या समाजासाठी निर्मळ बुद्धीची देणगी मागितली. वेदांमध्ये गायी दे, पुत्र दे, यश दे, इत्यादि शेकडो याचना देवाजवळ केलेल्या आहेत; परंतु त्या सर्व मंत्रांपेक्षा हा लहान मंत्र परमश्रेष्ठ ठरला. यावरून भारतीय पूर्वज कोणत्या वस्तूला सर्वांत अधिक महत्त्व देत होते, तें दिसून येईल

मनूने एके ठिकाणीं स्वच्छ सांगितलें आहे कीं, " माझें म्हणणे तर्कास पटत असेल तर घ्या. नाही तर फेकून द्या." शंकराचार्य म्हणतात, " शेकडो श्रुती येऊन अग्नि थंड आहे म्हणून सांगूं लागल्या तरी त्याला कोण महत्त्व देईल ? " तर्काच्या कसोटीवर घासून घासून जें शंभर नंबरी असेल, तेंच ज्ञानधन पूज्य माना, असें ते प्राचीन कवी सांगत आहेत.

महाभारतांत " कोऽयं धर्मः कुतो धर्मः " असा भीष्माला प्रश्न करण्यांत आलेला आहे. हा धर्म कोठून येतो ? हा धर्म का ईश्वर कानांत येऊन सांगतो ? भीष्मांनी सांगितलें, कीं विचारवंत लोक चिंतन करून, अभ्यास करून हा धर्म निर्माण करतात. " मतिभिरुध्दृतम् । " आपापल्या मतींनी ते तत्त्वें शोधून काढतात. वेदधर्म म्हणजे विचारधर्म. वेदधर्म म्हणजे बुद्धिप्रधान धर्म. श्रुतीचें श्रुतीला पटत नाही, स्मृतीचें स्मृतीला जुळत नाही, एका ऋषीचें दुसऱ्या ऋषीला संमत नाही, याचा अर्थ काय ? याचा अर्थ एवढाच कीं, प्रत्येकजण स्वतंत्रपणें विचार करी. त्याच्या त्याच्या काळांत जी परिस्थिति असे, त्याप्रमाणे तो विचार करी ऋषी आंधळे नव्हते. ते पोपट नव्हते. ते तेजस्वी गायत्री मंत्राची उपासना करणारे होते. पदोपदीं ते फरक करीत. 'बाबावाक्यं प्रमाणं'ची त्यांना अपार चीड येई. ते चर्चा करीत. बैठका भरवीत. ज्ञानाचा शांतपणे खल करीत.

प्राचीन काळांत सहज ओझरती नजर फेकली, तरी विचारांची प्रचंड चळवळ दिसून येईल. यास्काचार्यांच्या नुसत्या निरुक्तांत पाहिलें तर वेदांच्या अभ्यासासाठी निरनिराळ्या दृष्टींचीं शेकडो मंडळांची नांवें त्यांत आलेलीं आहेत. इति नैरुक्तिकाः, इति आख्यायिकाः, इति ऐतिहासिकाः, अशीं निरनिराळी अभ्यास-मंडळें यास्क देत आहेत. तसेंच उपनिषत्काली सर्वत्र तत्त्वज्ञानाची प्रचंड व अखंड चर्चा चाललेली दिसते. शेकडो मतें,

शेकडो पंथ, शेकडो सूक्ष्म छटांचे तत्त्वज्ञानी आपणांस दिसून येतात. प्रांजलपणे वाद करीत आहेत, पटलें तर घेत आहेत, त्याप्रमाणें वागू लागत आहेत, असा तो देखावा दिसतो. निःशंकपणे व निर्भयपणे विचारांची मांडणी करण्यांत येत असे. त्या चर्चा ऐकावयास लोक जमत असत.

मीमांसक ईश्वर मानीत नसत; चार्वाकपंथी परलोक वगैरे मानीत नसत. कणाद वगैरे सारी सृष्टि परमाणूपासून झाली असें म्हणत. बुद्धपंथी सारे क्षणिक आहे असे मानीत. शेकडो मतें होती; परंतु कुणाचा छळ झाला नाही. युरोपमध्ये नवविचार देणाऱ्यांच्या होळ्या करण्यांत आल्या. भारतांत तसें झालें नाही. प्रत्येकाच्या प्रामाणिक मताला येथे मान देण्यांत येत असे.

ज्ञान म्हणजे पोरकटपणा समजण्यांत येत नसे. एकेक गोष्ट समजून घ्यावयास तपेंच्या तपें देत. उपनिषदांत अनेक ठिकाणी ज्ञानासाठी ब्रह्मचर्यपालन करून कशी तपश्चर्या करीत, कसें चिंतनांत गढून जात, तें आलें आहे. ज्ञान मागण्यासाठीं वाटेल त्याच्याकडे जात. ब्राह्मण, क्षत्रियाकडे जाई, क्षत्रिय ब्राह्मणाकडे जाई. ब्राह्मण तुलाधारासारख्या वैश्याकडे ज्ञानासाठी नम्रपणें जाई. ज्ञान कोठेहि असो, तें पवित्र आहे. सूर्याचा प्रकाश कोठूनहि आला तरी तो घेतला पाहिजे. झाडांची मुळें मिळेल तेथून ओलावा घेण्यासाठीं घडपडत असतात. त्याप्रमाणेच ज्ञानोपासकाची दृष्टि हवी. देवांचा कच दैत्यांच्या गुरूकडेहि जाईल आणि दैत्यांचा गुरूहि शत्रूकडच्या शिष्याला प्रेमाने सारें ज्ञान देईल. ज्ञानाच्या प्रांतांत शत्रु-मित्र नाही.

नचिकेता प्रत्यक्ष मृत्यूजवळहि ज्ञानाचीच भिक्षा मागता झाला! याच्याहून ज्ञानाची थोरवी आणखी कोणती असावी ? ज्ञानासाठी मृत्यूजवळहि जावें लागेल ! ज्ञानाला कशाची भीति नाही. ज्ञान मिळवूं पाहणारा साऱ्या त्रिखंडांत जाईल व त्यासाठी वाटेल तो त्याग करावयास तयार होईल.

समाजाला नवविचार देणें म्हणजे फार थोर साधनाच आहे. विचाराचा डोळा समाजाला देणें याहून धन्यतर दुसरें काय आहे ?

चिंतन करून आपणांस जो विचार सुचला, त्याला पूज्य मानून तो सर्वांसमोर निर्भयपणे मांडला पाहिजे. तो सोडता कामा नये.

ज्ञानाचें बाह्यस्वरूप कोणतेहि असेल. त्या त्या बाह्यांगाची पूजा करण्यासाठी मनुष्य निःस्वार्थीपणे कसा धडपडतो आहे, ते पाहिलें पाहिजे. ज्ञानाचे बाह्यांग व्याकरण असेल. व्याकरणरूपी परब्रह्माची एखादा पाणिनी अहोरात्र पूजा करूं पाहील, त्या पाणिनीस भगवान् ही पदवी भारतीय संस्कृति देईल. शंकराचार्य पाणिनीचा उल्लेख भगवान् पाणिनी असा सदैव करतात. पाणिनी ज्ञानाच्या एका स्वरूपांत रमले. त्यांना दुसरे-तिसरें कांहीच सुचत नव्हते, रुचत नव्हते. व्याकरण म्हणजे त्यांचा वेदान्त. जे कोणी येतील त्यांना ते व्याकरण शिकवीत. एके दिवशी तपोवनांत ते व्याकरण शिकवीत असता एकदम वाघ आला. वाघाला पाहून पाणिनी पळाले नाहीत. वाघाला पाहून व्याघ्र शब्दाची ते व्युत्पति सांगू लागले. वाघ हुंगत हुंगत येत होता. पाणिनी म्हणाले, " वास घेत घेत येणारा हा पहा वाघ." " व्याजिघ्रति स व्याघ्रः ।" पाणिनी व्युत्पति सांगण्याच्या आनंदांत होते. शिष्य केव्हाच पळून गेले होते. वाघानें पाणिनीवर झडप घालून त्याला खाऊन टाकले ! ज्ञानाची किती थोर उपासना ! ज्ञानाची उपासना करणारा सर्व कांही विसरून जातो. त्या त्या विचारांशी तो तन्मय होतो. त्याची जणू समाधि लागते. समाधि म्हणजे सर्वत्र ध्येयाचाच साक्षात्कार होणे. समाधि म्हणजे ध्येये-तर सृष्टीचें विस्मरण ! समाधि म्हणजे सर्व सृष्टीचें विस्मरण नव्हे.

ज्ञानाचा प्रांत कोणताहि असो. त्या ज्ञानाच्या पाठोपाठ जाऊन त्या बाबतींतील शेवटचे टोक जो गांठतो, परमोच्च स्थान जो मिळवितो, तोच ऋषि. ज्याची पैशावर किंवा सुखावर दृष्टि असते, तो अशा फंदांत कधी पडणार नाही. तपस्वीच ज्ञान देतात. ज्ञान असो विज्ञान असो, तें सिद्ध करण्यासाठी, जीवनांत आणण्यासाठी महात्मेच मरतात. ज्ञानोपासक सारखा पुढे जाईल. ज्ञानदेवाचें दर्शन घेतल्या-शिवाय तो थांबणार नाही. जीवनाच्या नानाविध क्षेत्रांत अपार संशोधनास वाव आहे. भारतीय संस्कृति त्या त्या संशोधकाचा सन्मान करावयास उभी आहे. ज्ञान-संशोधनांत खाणेपिणे विसरणारा न्यूटन

हा ऋषीच होता. पन्नास वर्षें अध्ययन करून, विचार करून नवी दृष्टि देणारा कार्ल मार्क्स हा महर्षीच आहे. जगाच्या विचारांत क्रान्ति घडवणारा चार्लस डार्विन याला ऋषि कोण म्हणणार नाही ? इंग्लंड-मधील एका झोपडींत राहून सहकार्याचे नवीन नवीन मार्ग जगाला दाखविण्यासाठी धडपडणारा तो हद्दपार झालेला थोर क्रॉपॅटकिन्—त्याला ऋषि म्हणावयाचें नाही तर कोणाला ?

भारतीय संस्कृति या सर्वांची पूजा करील, रवीन्द्रनाथ टागोरांनी जगांतील ऋषींची भारत आपलेपणाने पूजा करतो हे विश्वभारती विद्या-पीठ काढून दाखविले आहे. जगांतील महान् महान् आचार्यांना ते तेथे बोलावून घेत होते व त्यांचा सन्मान करीत होते. रवींद्रनाथ भारतीय संस्कृतीचा आत्मा ओळखीत होते; भारतीय संस्कृतीचे ते खरे उपासक होते.

भारतीय संस्कृतींत ज्ञानाला कधी विरोध नव्हता. अगदी क्रांतिकारक मत मांडणाऱ्याचाहि येथे गौरव होई. तें मत ऐकिलें जाई. त्या मताच्या पाठीमागे किती तळमळ, किती व्यापकता, केवढा अनुभव, किती चिन्तन आहे हें पाहण्यांत येई. त्या त्या मतासाठी मतस्थापक किती त्याग करावयास तयार आहे हें पाहण्यांत येई. भारतीय संस्कृति प्रत्येक नवीन मत पटकन् उचली असें नाही. परंतु प्रत्येक मतास वाव असे. सत्य असेल, तर काळाच्या ओघांत टिकेल. असत्य असेल तर अदृश्य होईल.

परमेश्वराचें स्वरूपच मुळी ज्ञान, असें भारतीय संस्कृतींत सांगितले आहे. परमेश्वराची, ब्रह्माची व्याख्या काय ? "ज्ञानं ब्रह्म." ज्ञान म्हणजेच ब्रह्म. ज्ञान म्हणजेच परमेश्वर. ईश्वराची याच्याहून थोर व्याख्या जगाला कोणीहि दिली नाही. ईश्वराची उपासना करणे म्हणजे ज्ञानाची उपासना करणे, ज्ञानाची उपासना अनंत रूपांनी करणे. समाजशास्त्र असो, खगोलशास्त्र असो, भूगोल असो, इतिहास असो, आयुर्वेद असो, तत्त्वज्ञान असो, योग असो, कर्मयोग असो, गणित असो, संगीत असो, ती ती ज्ञानस्वरूप परमेश्वराचीच पूजा होय. एकाच ज्ञानसूर्याचे हे अनंत किरण आहेत. महाभारतांतील श्लोकांइतकींच गणितांतील प्रमेयेंहि पूज्य आहेत. श्रुति-

स्मृतीच्या अभ्यासाइतकेच सृष्टिशास्त्राचें अध्ययन पवित्र आहे. सनातन धर्मांतील ही थोर दृष्टि आपण पुन्हा उचलली पाहिजे. परमोच्च बौद्धिक विकासाची ज्वाळा पुन्हा पेटविली पाहिजे. भारतीय संस्कृति तरच पुन्हा नवतेजाने नटेल. आज संस्कृति-रक्षणाच्या चळवळी होत आहेत. नवीन विचारांचे वारे येऊं नयेत म्हणून सनातनी नांवाची मंडळी किल्लेकोट बांधू पाहात आहेत. परंतु हे संस्कृति-रक्षक नसून संस्कृति-भक्षक आहेत. भारतीय संस्कृतीचें मढें ते कवटाळू पहात आहेत व आंतील प्राण गुदमरवीत आहेत हे सनातनी नसून असनातनी आहेत.

सनातन या शब्दाचा अर्थच काय? "सनातनो नित्य नूतनः" जें नेहमी नवीन नवीन स्वरूप प्रगट करील तेंच टिकेल. ज्या झाडाला नवीन पालवी फुटेनाशी झाली, तें झाड मरणार असें समजावें. ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या अध्यायांत ज्ञानेश्वर लिहितात :—

**"हें नित्यनूतन देखिजे । गीतातत्त्व"**

गीतेंतील शब्दांचे अर्थ निरनिराळे दिसूं लागतील. कारण त्या शब्दांकडे आज विसाव्या शतकांतील परिस्थितींतून आपण पाहणार! अर्थाचा विकास होत असतो. शब्द लहान असतो; परंतु त्यांतील अर्थ अनन्त आहे. विचारांची उत्क्रांति सदैव होत असते.

भारतीय संस्कृतीची भव्य इमारत नवीन विचारांच्या वाऱ्याने पडेल अशी का या संस्कृति-रक्षकांना भीति वाटते? या नवीन विचारांच्या वाऱ्यांनी जर ती पडण्यासारखी असेल, तर ती टिकण्यांत तरी अर्थ काय? जरा आलेली वाऱ्याची झुळूक ज्याला सहन होत नाही, तो क्षयी लवकरच मरणार, असाच नाही का ध्वनि निघत? भारतीय संस्कृति का अशी लेचीपेची आहे? आमच्या दृष्टीने ती तशी नाही. ज्ञानावर, अनुभवावर ज्या संस्कृतीचा पाया रचला आहे, त्या संस्कृतीला कधीहि भय नाही. किल्लेकोट बांधून, भिंत बांधून, ती बुरखा घेऊन बसणार नाही. हे बुरख्यांतील बावळट पावित्र्य भारतीय संस्कृतीस नको आहे. नवीन विचारांचें भारतीय संस्कृतीस वावडें नाही. जगांतील कोणत्याहि अनुभवाच्या कसोटीस उतरलेली, ज्ञानावर उभारलेली संस्कृति आणा; भारतीय संस्कृतीचा तिच्याशीं विरोध नाही.

जगांतील प्रयोगांचा भारत उपयोग करून घेईल. भारतीय संस्कृतीचे दरवाजे मोकळे आहेत. साम्यवादाचे विचार आले तर त्यांत श्रीकृष्णाचें बालचरित्र भारतीय संस्कृतीस दिसेल. गोकुळांतील लोणी चोरणारा श्रीकृष्ण, सर्व पददलितांची बाजू घेणारा श्रीकृष्ण, सर्व साम्राज्यें धुळीस मिळविणारा श्रीकृष्ण, त्याचेंच दर्शन साम्यवादांत भारतीय संस्कृतीचा आत्मा ओळखणाऱ्यास होईल. "सत्या-असत्यासि मन केलें ग्वाही" असें म्हणणाऱ्या तुकारामाचेंच दर्शन, 'स्वतःच्या बुद्धीला पटेल तें करा' असें सांगणाऱ्या ध्येयवादी नवविचारवंतांत खऱ्या संस्कृतीच्या उपासकाला घडेल ! भारतीय संस्कृतीस भीति, नाश व मरण हे शब्द माहीत नाहीत. कारण ज्ञानाला नाश नाही आणि ज्ञानावर ही संस्कृति उभी आहे.

भारतीय संस्कृति प्रत्येक पाऊल बुद्धिपूर्वक टाकावयास सांगत आहे. "दृष्टिपूतं न्यसेत्पादम् वस्त्रपूतं पिबेज्जलम् ।" विचार करून वागा, पाहून पाऊल टाका, गाळून पाणी प्या. भारतीय संस्कृति सांगते कीं, विचार सर्वत्र घेऊन जा. धर्म म्हणजे काय ? धर्म म्हणजे प्रत्येक क्रिया डोळसपणें करणें. सकाळीं सात वाजता स्नान करून संध्या करणे, एवढाच धर्म या शब्दाचा अर्थ नव्हे. धर्म म्हणजे चोवीस तास होणारीं कर्मे. जन्मभर होणारीं कर्मे. धर्म का देवघरापुरता असतो ? धर्म सर्वत्र आहे. हवा ज्याप्रमाणे आपण जेथे जेथे जाऊं तेथे तेथे पाहिजे, त्याप्रमाणे धर्म सर्वत्र हवा. तुम्ही विधिमंडळांत जा, कारखान्यांत जा, कोठेहि जा; जें जें कर्म कराल तें धर्ममय पाहिजे.

धर्ममय पाहिजे म्हणजे वेदमय पाहिजे, विचारमय पाहिजे. याचाच अर्थ प्रत्येक कर्म बुद्धिपूर्वक करा. परंतु बुद्धि शुद्ध व्हावयास हृदयाचीहि जरुरी असते. हृदय शुद्ध व्हावयास बुद्धीची जरुरी असते. हृदय व बुद्धि यांच्या एकतानतेंतून जो महाविचार निर्माण होईल तो धर्म होय. अशी एकतानता ज्याची होते, त्यालाच आपण धर्मस्थापक म्हणतो. समर्थांनी एकच धर्मस्थापक सांगितला नाही.

**"धर्मस्थापनेचे नर । झाले आहेत पुढें होणार"**

त्या त्या काळांतील परिस्थितीचा खोल विचार करून, त्या त्या

काळांतील बहुजनसमाजाच्या सुखदु:खांचा एकरूपतेने विचार करून, महापुरुष त्या त्या काळांतील युगधर्म देत असतो. त्या काळाला नवीन दृष्टि देतो, नवीन विचार देतो. अशा रीतीने धर्म वाढत जातो.

भारतीय धर्म हा वर्धिष्णु धर्म आहे. नवीन नवीन तो घेईल व पुढे जाईल. नवीन नवीन क्षेत्रांत घुसेल. सारें ज्ञान आपलेसें करून समाजाचें धारण करूं पाहील. विचाराशिवाय समाजाचें धारण कसें होणार ? ज्ञान ही शक्ति आहे. खरा सनातन धर्म तें ज्ञान घेतल्याशिवाय कसा राहील ?

मारुती ज्याप्रमाणे लाल दिसणाऱ्या सूर्याला धरावयास उडाला, त्याप्रमाणे भारतीय संस्कृति क्षितिजावर दिसणाऱ्या भव्य, दिव्य, नव्य विचारांना कवटाळू पाहील. भारतीय संस्कृति ही स्थाणूंची स्थाणू संस्कृति नाही. ती गतिशील आहे, पुढें जाणारी आहे. ती कधी थांबणार नाही. सत्याचीं नवनवीन दर्शनें घ्यावयास भारतीय आत्मा तडफडेल. सत्याचा संशोधक "आता बस् झालें" असें कधी म्हणणार नाही. अनंत क्षेत्र त्याच्या डोळ्यांसमोर उघडे असतें. आज महात्मा गांधीच पहा. जीवनाचें असे एकहि क्षेत्र नाही, कीं ज्या क्षेत्रांत ते बुद्धीचा दीप घेऊन शिरले नाहीत ! राजकारणाच्या क्षेत्रांत नवीन प्रयोग त्यांनी चालविलेच आहेत. उद्योगधंद्यांची गोष्ट ध्या, त्यांतहि ते शिरतीलच. राष्ट्रीय शिक्षण असो, राष्ट्रभाषा असो, ग्रामोद्योग असो, समाजसुधारणा असो, धार्मिक प्रश्न असो, आरोग्य असो, खाण्यापिण्याचे प्रयोग असोत, ब्रह्मचर्यादि मानसिक प्रश्न असोत, प्रत्येक क्षेत्रांत ते शिरतील. ते बुद्धीचे उपासक आहेत. शुद्ध हृदयाची शुद्ध बुद्धीला जोड देऊन ते प्रयोग करीत असतात. खऱ्या सनातनी वेदधर्माचे ते खरे अनुयायी आहेत.

बुद्धिवादी मनुष्य निर्भय असतो. तो कुणाचें तुणतुणें वाजवीत बसणार नाही. तो आपल्या विशंकतेने पुढे पाऊल टाकील. जुने लोक कलियुग कलियुग म्हणतात. नवीन लोक यंत्रयुग यंत्रयुग म्हणतात. गांधी म्हणतील, "मी माझें युग निर्माण करीन. मी चरख्याचें युग आणीन. ग्रामोद्योगाचें युग आणीन." बुद्धिमान् मनुष्य री ओढीत बसणार नाही. तो स्वत:च्या विचारांचें युग आपल्याभोवती निर्माण करूं पाहतो.

जगांत स्वतंत्र बुद्धि फार थोडी असते. सनातनी लोक दहा हजार

वर्षांपूर्वीच्या ऋषींचे गुलाम होतात, तर नवीन लोक पाश्चिमात्यें पंडितांचे गुलाम होतात. परंतु भारतीय संस्कृति स्वतंत्र दिवा लावावयास सांगत आहे. तुमच्या देशाच्या स्थितीचा विचार करा, परंपरेचा विचार करा, आजूबाजूच्या देशांचाहि विचार करा, आणि स्वतःच्या समाजाला काय हितकर तें बघा.

सत्याची तहान या सत्यकामाच्या भूमींत आज उत्पन्न झाली आहे कीं नाही ? मानवजातीने जे जे उद्योग सुरू केले आहेत, जे जे विचारप्रांत उत्पन्न केले आहेत, त्या सर्व ठिकाणी आपण गेलें पाहिजे. यंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र, शिक्षणशास्त्र, साहित्य, कला, रसायन, व्यायाम, क्रीडांगणें, समाजशास्त्र, अर्थशास्त्र सर्व सत्याच्या साक्षात्कारांच्या क्षेत्रांत न थकता, न दमता पुढे घुसणारे लोक भारतीय संस्कृतीच्या उपासकांत निर्माण झाले पाहिजेत. सहकारी चळवळी असोत, मजुरांची संघटणा असो, शेती सुधारणें असो, नवीन उद्योगधंदे सुरू करणें असो, सर्वत्र आपण गेलें पाहिजे, अभ्यास केला पाहिजे, नवीन प्रयोग केले पाहिजेत. हीच परमेश्वाची पूजा. देवाने दिलेलें वाढविणें म्हणजेच त्याची पूजा. परमेश्वराने दिलेल्या बुद्धीचा विकास करणें म्हणजेच खरा धर्म.

त्या त्या काळांतील प्रश्न त्या त्या विचारवंतांना सोडवावयाचेहि असतात. अर्वाचीन बुद्धीसमोर अर्वाचीन प्रश्न आहेत. भारतीय संस्कृतींत हिम्मत नाही का ? जगांतील राष्ट्रांच्या मांडीशी मांडी लावून बसण्याचा हक्क वेद घोकून मिळणार नाही, पूर्वजांचीं स्तुतिस्तोत्रें गाऊन मिळणार नाही. नवीन प्रश्नांस आपण हात घातला पाहिजे. प्रयोगालयें म्हणजे होमशाळा काढल्या पाहिजेत. होऊं देत सुरू प्रयोग--सत्यदेवाचें सर्वांगीण स्वरूप समजून घेण्याचे प्रयोग !

आता कोठेहि अडता कामा नये. आपले घोडे सर्वत्र दौडत जाऊं देत. ग्रामसंघटन, खादीशास्त्र, समाजशास्त्र, नवनीतिवाद, कोणतेहि क्षेत्र असो; त्या त्या विषयांत घुसूं व नवीन ज्ञान निर्मूं. ठिकठिकाणी संग्रहालयें, प्रयोगालयें, ग्रंथालयें स्थापूं. बौद्धिक व वैचारिक सहकार्य मिळवूं. ज्ञान ही सहकार्याची वस्तु आहे. प्रत्येक विचार हा सहकार्यांतून निर्माण झाला आहे. पूर्वींच्या शेकडो विचारांच्या खांद्यावर नवीन विचार उभा राहात

असतो. गांधी टिळकांच्या कल्पनांचा विकास करतील. जवाहरलाल गांधींना पुढें नेतील. ज्ञानाच्या प्रत्येक प्रांतांत अशी स्थिति आहे. तेथे अहंकार नाही. तेथे नम्र व निष्ठापूर्वक ज्ञानेश्वराची पूजा आहे.

भारतीय संस्कृति सांगत आहे, " माझ्या मुलांनो ! जगांत ज्ञानासाठी जीवनेंच्या जीवनें देणारे शेकडो लोक निर्माण होतात. येथेहि होऊं देत. येथेहि विचारपूस सुरू होऊं देत. "

विचार तलवारीपेक्षा प्रखर आहे. विचार नवजीवन देतो. " वन्हि तो पेटवावा रे." विचारांचा वन्हि पुन्हा प्रखरतेने पेटविल्याशिवाय कश्मलें जळून जाणार नाहीत.

भारतांत आज क्रांतीचा समय आलेला आहे. ही क्रांति केवळ राजकीय नाही. ही शतमुखी क्रांति आहे. सारा संसार धांडुळावयाचा आहे. साऱ्या कल्पना पारखून घ्यावयाच्या आहेत. नवीन काळ, नवीन दृष्टि ! मजुराला पोटभर घास कसा मिळेल हें पाहणें म्हणजे आज महान् धर्म आहे. राष्ट्राच्या एखाद्या नवीन उद्योगांत रात्रंदिवस गढून जाणें म्हणजे संन्यासी होणे आहे.

निर्मळ विचार व शुद्ध दृष्टि यांची आज नितान्त आवश्यकता आहे. येथे अधीरता नको उतावीळ नको, स्वार्थ नको, आळस नको. निर्मळता हवी असेल, तर खोल अभ्यासाची आवश्यकता आहे. प्रयत्न व कष्ट यांची जरुरी आहे. समाजाबद्दल प्रेम व कळकळ यांची जरुरी आहे. समाजाला सुखी कसे करता येईल, ही तळमळ लागली म्हणजे मग तुम्ही विचार करूं लागाल. मग जो विचार स्फुरेल, त्याचा आचार सुरू होईल; आणि त्या विचाराला व आचाराला 'युगधर्म' असें नांव दिले जाईल.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. 6432
संदर्भ शाखा

# १२. बाजार

— ना. सी. फडके

असे पुष्कळदा होते. मला अमुक वस्तु अगदी निकडीने हवी असते म्हणून नव्हे, तर बाजारांत जाऊन कांही तरी खरेदी करण्याची मला लहर येते. म्हणून मी जातों. अन् ज्या वस्तू आणखी आठ-पंधरा दिवस घेतल्या नसत्या तरी चालले असतें. अशा वस्तू विकत घेऊन मी घरीं येतों. घरीं कागद शिल्लक असतात; पण मी ते घेऊन येतों. मनाशी मी म्हणतों, आज नाही तरी आणखी चार दिवसांनी ते लागतीलच ना ! वस्तऱ्याच्या ब्लेड्स सरलेल्या नसतात; तरी मी त्या आणतों. अन् अशाच प्रकारे शाई, पेन्सिली, नोटपेपर, इत्यादि किती तरी वस्तू नेहमी आणीत असतों. कित्येकदा असेहि होते, कीं दुकानांत शिरतांना ज्या वस्तू घेण्याचा माझा यत्किंचित्हि बेत नसतो अशा वस्तू खरेदी करून मी दुकानाबाहेर पडतों. मला हवे असलेले नोटपेपर बांधता बांधता दुकानदार विचारतो, ' आणखी काय देऊं ? सेंट वगैरे ? '

मी सांगतों, ' नको. '

' पण पॅरीसचे नवे सेंट आले आहेत. दाखवूं ? '

माझ्या मनांत येतें, बघायला आपले काय जातें ? नोटपेपरांचे बंडल मी उचलीत नाही, तेवढ्यावरून दुकानदार माझ्या मनांतला विचार ओळखतो. तो लगबगीने कपाटांतून एक मोठी कागदाची पेटी काढतो, व दुसऱ्याच क्षणीं सेंटच्या दहा-पंधरा सुंदर मोहक बाटल्या माझ्यापुढे मांडल्या जातात. मी त्यांवरचीं नांवें वाचूं लागतों, मध्येच एखादीचे टोपण काढून तिच्या सीलबंद तोंडांतून तिच्यांतल्या सुगंधाची कल्पना यावी म्हणून ती नाकाजवळ नेतों, व तें पाहून दुकानदार म्हणतो, ' बघायलाच नको. अगदी गॅरंटीचा माल आहे. हा ' जस्मिन ' घ्या. आपल्याला आवडेल... '

मी ती बाटली घेतों.

दुकानदार मनांत कदाचित् म्हणत असेल, ' कसं बनवलं ! '

पण तो असें समजत असेल, तर तो खुळा आहे. मला माझ्या मनाविरुद्ध त्याने एखादी गोष्ट करायला लावलेली असते असें मुळीच नाही. ज्यावाचून अडले आहे, तेवढेच घ्यायसाठी मनुष्य दुकानांत जातो असे त्याला वाटत असेल तर ती चूक आहे त्याची. दुकानदाराने आपल्याला कांही तरी घेण्याचा आग्रह करावा अशी माणसाची इच्छा असते. अशा आग्रहाने माणसाच्या ठिकाणची मोठेपणाची हाव पुरी होत असते. या इच्छापूर्तीच्या सुखासाठी माणसे बाजारांत जातात. नको त्या वस्तू दुकानदाराच्या आग्रहाखातर विकत घेतल्या, कीं आपण कोणी बडे शेठ आहोंत असें घटकाभर वाटतें. 'वस्तू' नव्हे; तर या जाणिवेचे सुख मनुष्य विकत घेत असतो. आपण बनलों, असे दुकानदार समजत असेल हें माणसाला समजतें; पण जें सुख त्याला हवें असतें, तेवढ्यासाठी ही किंमत द्यायची त्याची तयारी असते.

निदान माझी तरी असते. बाजारात जायचे अन् नेमकी हवी तेवढीच वस्तु घेऊन परत यायचें म्हणजे शुद्ध वेडेपणा म्हटला पाहिजे. कारण 'बाजारांत जाणे' हा एक खेळ आहे. वेळ घालविण्यासाठी लोक पत्ते खेळतात, बुद्धिबळे, कॅरम खेळतात. मला कंटाळा आला, अन् दुसरें कांही करण्यासारखे नसले, कीं मी उठतों अन् बाजारांत जातों. दहा-पाच दुकानांत हिंडले, दोन-चार वस्तू खरेदी केल्या, कीं बरें वाटतें. खिशांतले पैसे गेलेले असतात येवढेंच वाईट.

पण 'बाजारांत जाण्या'चा हा खेळ पैसे खर्च न करता खेळता येत नाही असें समजूं नका. दुकानदाराने चार शिव्या दिल्या तरी त्या मनावर न घेण्याचा अभ्यास केला, तर हा खेळ अगदी फुकटांत हवा तेवढा खेळता येतो. ज्या गावीं आपल्या ओळखीपाळखीचें कोणी नाही, अन् प्रतिष्ठेची झूल अंगावर ठेवण्याचें आपल्याला प्रयोजन नाही, अशा गावीं या खेळाला फार रंग चढतो. अगदी परप्रांतांतल्या शहरांत गेल्यावर तिथलीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्यांत जितकी गंमत आहे, तितकीच उगीचच्या उगीच बाजार पेठेंतलीं दुकाने धुंडाळण्यांत आहे कीं नाही, अनुभव घेऊन पहा. साध्या कापडापासून तों जवाहिऱ्याच्या दुकानापर्यंत वाटेल तिथे शिरावे, तऱ्हेतऱ्हेचा माल

पहावा, अन् अखेर नापसंतीची मुद्रा करून बाहेर पडावें. येवढेच, ही बाहेर पडण्याची क्रिया फार कौशल्याची गोष्ट आहे, दुकानांत शिरणे फार सोपे; पण कांही खरेदी न करता शिरसलामत बाहेर पाऊल टाकणे वाटतें तितकें सोपे नाही.

एकदा दिल्लीस असतांना मी एका शालविक्याच्या दुकानांत शिरलों. लोडाला टेकून बसलों. बड्या गिऱ्हाइकाचा आव आणला. पांचपन्नास शालजोड्यांचा ढीग माझ्यापुढे पडला. मला अर्थात् एकहि पसंत पडेना. दुकानदाराला वाटलें असावें, फार चोखंदळ गिऱ्हाईक आहे. त्याने आणखी शाली काढल्या. पण एकीचें अंग नापसंत, तर एकीच्या कोपऱ्यांतले नारळ नापसंत; हिची किनार वाईट, तर तिचा रंग फार भडक; अशा शेऱ्यांच्या माऱ्याने मी ते ढीग गारद केले. दुकानदाराने मग अगदी ठेवणींतल्या शाली काढल्या. मला जरा शरम वाटूं लागली. मी अखेर एक पान पसंत केलें. दुकानदाराने त्याची किंमत पंचावन्न रुपये सांगितली. 'शीः ! कांही तरीच काय ?' असें म्हणून मी उठलों व पादत्राणे घालूं लागलों. मनांत वाटलें, सुटलों. पण दुकानदार शाल पुढे करून म्हणाला, 'जाता काय एकदम ? आपण बोला की !' भलतीच कमी किंमत सांगितली कीं आपण सुटूं असा मी विचार केला, अन् सारा सज्जनपणा धुंडाळून ठेवून म्हटले, 'वीस रुपये देईन.' दुकानदाराने शाल माझ्या अंगावर फेकून म्हटलें, 'चला, काढा पैसे. भवानी होऊं द्या आपल्या हातून !' शाल अंगावर असूनहि मी थंडच झालों ! शालीऐवजी शालजोडींतले मिळाल्या-सारखा चेहरा खचित झाला असेल माझी पैसे देताना !

असला प्रसंग टाळण्याची एक नामी युक्ति माझ्या एका मित्राने शोधून काढलेली आहे. तो मुळी दुकानांत शिरल्याबरोबर दुकानदाराला प्रथमच सांगून टाकतो, 'मला आताच कांही खरेदी करायची नाही हो. फक्त माल पाह्यचा आहे.' दुकानदाराला मग म्हणणे भागच पडते, कीं 'कांही हरकत नाही. बघा, बघा; काय दाखवूं ?' अशा प्रकारे दुकानदाराला निःशस्त्र केल्यावर मग काय ? त्याचें दुकान म्हणजे माझ्या मित्राचें राज्यच की. अगदी उंची रेशमी, गरम, कापडाचे तागेच्या तागे त्याने खुशाल पाहावे. 'हें छान आहे. याचा भाव काय ?' असें मधून मधून विचारलें

म्हणजे झाले. शर्टिंग, कोटिंग, रेशमी लुगडीं, नाना प्रकारच्या डिझाइनचीं सहा वारी पातळें, हवें तें बघावें; दुसऱ्या दुकानांत शिरून पांचपन्नास छत्र्यांची उघडझांक करावी; पुढच्या दुकानावर स्वारी करून आरसे, कंगवे, ब्रश, निरखावे; साबणाच्या पेटचा उघडायला लावून प्रत्येक पेटींतल्या एका वडीचा सुगंध मनमुराद घ्यावा; अन् 'या हं शेठ' अशी सन्मानपूर्वक संभावना प्रत्येक दुकानदाराकडून मिळवीत दोन घटकांची बाजारपेठेची फेरी आटपून प्रसन्न चित्ताने घरीं परत यावें; असे विलक्षण 'टेक्निक' माझ्या या चतुर मित्राने साध्य केलेलें आहे. हें तुम्हांला शिकता आले तर पहा.

मी अजून असला प्रकार केला नाही. दुकानदार काय म्हणेल अशी उगीच भीति वाटते, त्याला काय करायचे ?

भाजी व फळबाजारांत मात्र मी पुष्कळदा हा प्रयोग थोडाफार पाहतो. कारण तो बोलून चालून चालून रस्त्यावरचा उघडा बाजार. दुकानदाराच्या खाजगी हद्दीत आपण शिरलों आहोंत, अशी जाणीव तिथे मनांत येत नाही. ओल्या भुईभुगाच्या किंवा मटाराच्या शेंगांच्या ढिगांत खुशाल हात घालावा, भावाची चौकशी करावी, अन् पुढें जावे. आंबे, सफरचंद, संत्रीं, मुसंबी उचलून पाहावी, ठेवावी; आणि एवढाहि धीर होत नसेल तर नुसती चौफेर नजर टाकीत साऱ्या स्टॉलमधून चक्कर मारावी. त्यांतहि आनंद कमी नाही. मला तर मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केट किंवा पुण्याच्या मंडईंत घटका अर्धी घटका रेंगाळण्यांत विलक्षण मौज वाटते. हरतऱ्हेच्या ताज्या ताज्या भाज्यांचे ते प्रचंड ढीगच्या ढीग अन् कपड्याने वरच्यावर पुसून ज्यांचीं कांती वाढविली आहे, व झिरझिरीत रंगाबेरंगी कागदांच्या बैठकींत ज्यांची स्थापना केली आहे, अशा सतरा प्रकारच्या फळांनी शिगोशिग भरलेले ते करंडे पाहिले, कीं डोळ्यांचें पारणें फिटल्यासारखें वाटतें. धरित्रीच्या उदरांतून बाहेर आलेल्या त्या फुलसृष्टीचा सुगंध मिळाला कीं चित्तवृत्ति ताज्यातवान्या होतात. आणि या बाजारांतला तो अखंड कोलाहल ! तो कानांवर पडला कीं, अंतः-करणांत दडून राहिलेला कोणता तरी एक चमत्कारिक अनामिक संस्कार संतुष्ट झाल्यासारखें मला वाटतें ! मी त्या कोलाहलाशीं क्षणभर एकरूप

होतों. माझें व्यक्तित्व विरतें. माझ्या वैयक्तिक सुखदुःखांचे प्रश्न मी पार विसरून जातों. मला बरे वाटतें !

ती पहा, ती माळीण आपल्या भाजीची टवटवी कायम राहावी म्हणून तिच्यावर पाणी शिंपता शिंपता किती उल्हासाने 'पैशाला दोन लावल्या' म्हणून ओरडते आहे ! कोवळ्या लुसलुशीत खिऱ्याच्या ढिगामागे बसलेला तो माणूस बघा कसा हसतो आहे व ऐटीने तागडी झुकवितो आहे ! लालसर पिवळसर टपोरीं बोरें विकणारी ती बाई पाहिलीत, कशी उच्च रवाने सांगते आहे, 'साखरलाडू ! सस्ते लावले !' या साऱ्या माणसांना काय प्रपंचाच्या चिंता नसतील ? पण त्यांनी त्या सगळ्या टाकून दिल्या आहेत, अन् जगाच्या कोलाहलांत तीं सामील होऊन घडीभर आनंद लुटताहेत ! गर्दी, गलगला, धावपळ या गोष्टी माणसाच्या जीवनाला आवश्यक आहेत. त्यांच्या योगानेच अंतःकरणाचा कोठा साफ राहतो. एकान्तांत मनुष्य चिंतन करूं शकतो, अन् बाजाराच्या उल्हासी गर्दींत त्याच्या चिंता निवळतात. ओढे नद्या, नाले धावत समुद्राला जाऊन मिळतात व आपल्या उदरांतलें सारें किल्मिष टाकून देतात, तद्वत्च आपल्या मनाचा कोंडमारा झाला, चिंतेचें अथवा दुःखाचें किल्मिष फार साचलें, कीं घटकाभर बाजारात जावें. मानवी जीविताची धांदल अन् मुग्ध प्रसन्नता तिथे अविरत खेळत असते. ती आपल्या अंतर्यामांतलें सारें किल्मिष शोषून घेते. कृष्णलीलांच्या बहुतेक गीतांत गोपी मथुरेच्या बाजाराला निघालेल्या असतात, व बाजाराच्या वाटेवरच सर्व दुःखांचा परिहार करणारा 'कान्हा' त्यांना भेटतो, यांतलें मर्म हेंच आहे. बाजारांत हजारों वस्तूंचा क्रयविक्रय चालतो हें तर खरेंच; पण तिथे सारीं माणसें गुप्त संकेताने अकारण प्रसन्नतेची व उल्हासाची जी देव-घेव मुबलकपणे करतात, तिला फार महत्त्व आहे. जिथे आपण एकमेकांचे धक्के मनावर घेत नाही, ओळख नसताहि एकमेकांकडे पाहून हसतों, नसत्या चौकशा करूं शकतों, गर्दींत व गलग्यांत सामील होतों, त्या स्थलाचा मोह कोणाच्याहि मनाला पडावा; नव्हे काय ?

मला तरी हा मोह आवरता येत नाही, व म्हणून उगीचच्या उगीच बाजारांत जाण्याची हौस मी वारंवार भागवून घेतों.

# १३. श्रावण

— वि. स. खांडेकर

'तुमचा आवडता चित्रपट कोणता ?' माझी स्वाक्षरी घेता घेता एका विद्यार्थ्यानें मला प्रश्न केला.

मी चटकन् उत्तर दिलें, 'बडी दिदी !'

तो हसत म्हणाला, 'तुमचा आवडता चित्रपट म्हणजे तुम्ही लिहिला असून तुम्हाला आवडणारा चित्रपट !'

'तसा चित्रपट अजून निघायचाय् !'

'बरं, तुमची आवडती कादंबरी—'

'माझ्या तीन चार कादंबऱ्या मला आवडतात. त्यांतून एकीचीच निवड केली, तर दुसरीला अन्याय केल्यासारखं नाही का होणार ?'

मी अचूक उत्तर देण्याचें टाळतोय् असें वाटून तो मुलगा निघून जाईल अशी माझी कल्पना होती. पण शिवाजीने ज्या वयांत तोरणा सर केला, त्याच वयाचा विद्यार्थी होता तो ! त्याच्या चिकाटीची आरंभी कल्पना आली नाही मला !

न डगमगता त्याने पुन्हा मला प्रश्न केला, 'तुमचा आवडता महिना कोणता ?'

मी एकदम उद्गारलों, 'श्रावण !'

माझी सही घेतलेली वही पुढें करीत तो म्हणाला, 'तेवढं लिहून द्या इथं !'

तोरणा सर करणारा शिवाजी नुसता वीरपुरुष नव्हता, तो मुत्सद्दीहि होता, हें आता मला पुरेपुर कळून चुकलें ! सहीच्या वर मी मुकटयाने लिहिलें, 'माझा आवडता महिना—श्रावण.'

हे शब्द मी झरझर लिहून गेलों खरा ! पण लगेच माझ्या मनांत एक शंका आली. ही स्वाक्षऱ्यांची वही अनेक साहित्यिकांच्या हातांत सहज जाणार. आपली ही महिन्याची निवड पाहून त्यांतले बडे बडे पंडित

आपल्याला हसल्यावाचून राहणार नाहीत. वासंतिक वनश्रीने नटलेला वैशाख किंवा शारदीय श्रृंगाराने शोभून दिसणारा आश्विन सोडून देऊन श्रावणाला आवडता महिना म्हणून मिठी मारणाऱ्या मनुष्याची ते निःसंशय अरसिकांत गणना केल्याशिवाय राहणार नाहीत.

या साहित्यिकांनीच काय, पण साऱ्या जगाने जरी मला वेडा ठरविलें, तरी यापुढे श्रावण हाच माझा आवडता महिना राहील, याविषयीं मला मात्र मुळीच शंका वाटत नाही. ही आवड म्हणजे माझ्या मनाची एक लहर आहे असें अनेकांना वाटेल. पण लहानपणापासून इतर अनेक महिन्यांवर मी मनःपूर्वक प्रेम केलें असूनहि आता श्रावणापुढे ते सारे मला फार फिक्के वाटतात !

फाल्गुनाचीच गोष्ट घ्या ना ! बाळपणी हा महिना मला अत्यंत प्रिय होता. ज्या खोड्यांबद्दल बाकीच्या अकरा महिन्यांत मुलाला हटकून मुष्टिमोदक मिळायचे, त्या या महिन्यात राजरोस करता येत असत. लष्करी गणवेश अंगावर चढविला म्हणजे मनुष्याला अनेक सवलती मिळतात ना ? फाल्गुनात पोरापासून थोरापर्यंत सर्वांची तशीच सोय होत असे त्या वेळी ! एरवी रात्रीअपरात्री आम्हा अर्ध्या तिकिटवाल्यांना घराबाहेर जाऊन कोण खेळूं देणार होतें ? पण माघी पौर्णिमा झाली कीं तब्बल महिनाभर रस्त्यारस्त्यावर आमच्या आट्यापाट्या मोठ्या जोराने सुरू होत आणि सारे बाळगोपाळ त्यांत उत्साहाने भाग घेत. डावांत कुणाचाहि विजय झाला तरी 'शंखं दध्मुः पृथक् पृथक्' हें गीतावचन लक्षांत आणून दोन्ही पक्ष साऱ्या गल्लीची झोपमोड होईल अशा रीतीने तो साजरा करीत असत. चोरी करणे आणि आग लावणे हे पीनल कोडाच्या भाषेंत गुन्हे असतील. पण आमच्या चिमण्या जगाच्या दृष्टीने ते मोठे पराक्रम होते ! शिमग्यांत तें लीलेने करणाऱ्या बालवीरांना मोठी माणसें सुवर्णपदकें कां देत नाहीत याचेच आम्हाला त्या वेळीं आश्चर्य वाटे ! होळीकरिता लाकडे चोरतांना आम्ही ज्या क्लृप्त्या लढवीत असूं, त्या आजकाल गनिमी काव्याने शत्रूशीं लढणाऱ्या चिनी देशभक्तांना सुद्धा सुचत नसतील ! एकदा कृष्णेवरून स्नान करून येणाऱ्या संन्याशाच्या खडावा लांबविण्याकरिता आम्ही त्याला मुद्दाम शिवलो होतो ! बिचारा

वाळवंटांत खडावा ठेवून पुन्हां आंघोळ करायला गेला. त्याने तिकडे नदींत बुडी मारतांच आम्हीं इकडे त्याच्या पवित्र पादुकांसकट जी दडी मारली--

होळीच्या दुसऱ्या दिवशीं धुळवड साजरी होई. उठल्या सुटल्या स्वच्छता शिकविणाऱ्या वडील माणसांच्या विरुद्ध बालकांनी उभारलेले बंडच असे तें ! त्या वेळी हल्लीप्रमाणे गावोगाव फोटोग्राफर बोकाळले नव्हते. नाही तर माकड हाच मनुष्याचा पूर्वज आहे हा सिद्धान्त माझा धुळवडी दिवशींचा एखादा फोटो दाखवूनच मी सिद्ध केला असता ! धुळवडीनंतर येणारी रंगपंचमी हा तर आम्हाला आयुष्यांतील सर्वांत मोठा असा सण वाटे. त्या दिवशी शाळेला अर्धी सुटी देणारे मास्तर मुलखाचे अरसिक असले पाहिजेत, असें माझें ठाम मत झालें होतें. एरवी सतरंजीवर किंवा सदऱ्यावर एवढीशी शाई सांडली तरी मला आईकडून बोलून घ्यावें लागे. पण रंगपंचमीच्या दिवशीं माझ्या सदऱ्यावर आणि चड्डीवर सर्व भडक रंगाचे संमेलन भरले, तरी आमच्या मातृदेवतेला तें मुकाट्याने पाहण्याखेरीज दुसरे कांहीच करतां येत नसे. कुठलीहि शाई हा तळहाताचा मळ वाटे. मला त्या दिवशीं ! आणि माझी मुलें मी सांगत असलेला गुप्त प्रयोग माझ्यावरच करतील अशा जोराने सध्या रंगपंचमी साजरी होत नसल्यामुळे त्यावेळचे आम्हा बाळगोपाळांचें एक ट्रेडसिक्रेटहि प्रकट करायला कांही हरकत नाही. रंगपंचमीच्या दिवशी प्रत्येक घरांतील वडील माणसें मुलांना फाटके तुटके सदरे घालायला देत असत. पण त्यांचा डोळा चुकवून आम्ही फारसे जुने न झालेले कपडे हळूच अंगावर घालून मगच रंग उडवायला सुरवात करीत असूं. संध्याकाळीं आमच्या कपड्याचा अस्सल स्वदेशी असा रंगीत चित्रपट झालेला पाहून वडील माणसांचे हात आणि आमच्या पाठी यांच्यांत बरीच बोलाचाली होई. पण मोहरममधील वाघासारखी दिसणारी पोरें शाळेला पाठविणें शक्य नसल्यामुळे सर्व पालकांना दांतओठ खात आम्हांला नवे कपडे करून द्यावे लागत. त्या वेळचे शिंपी इतर सणापेक्षा रंगपंचमीला अधिक मान देत असत, असेंच पुढील पिढीचे इतिहाससंशोधक सिद्ध करतील अशी माझी खात्री आहे.

पण जसजसा मी मोठा होऊं लागलो, तसतसा फाल्गुनातील हा उद्दाम आनंद मला पोरकट वाटूं लागला. त्या सर्व खेळांत आणि दंग्यांत अवखळ हास्य होतें. पण हास्य ही जीवनवृक्षाची पालवी आहे, त्याची फुलें निराळीच आहेत, तीं आपण अद्यापि पाहिली सुद्धा नाहीत, या कल्पनेने मी अस्वस्थ होऊं लागलो. धुळवडीच्या माती ऐवजी बागेंतील फुलाविषयी माझ्या मनांत अधिक आपलेपणा निर्माण झाला. पूर्वी मी फुलें चुरगाळीत असें. आता मी त्यांना कुरवाळू लागलों. रंगपंचमीच्या भडक रंगाची आवड हा हा म्हणता मागे पडली. गुलाबाच्या आणि सोन-चाफ्याच्या फुलांच्या सौम्य रंगांत मी सौंदर्य पाहायला शिकलो. स्वप्नाळू दृष्टीने प्रेमगीतें वाचण्यांत आणि ती गुणगुणण्यांत आपले दिवस कसे जातात, हें त्या वेली पाहून मला समजत सुद्धां नसे ! कालिदासापासून गडकऱ्यां-पर्यंतच्या अनेक कवींच्या सहवासांत मलाहि वाटूं लागले—वसंताचा जीवश्च कंठश्च मित्र असलेला वैशाख हाच जगांतील सर्वांत सुंदर महिना आहे.

पण कवींनी केलेलें वैशाखांतील वासंतिक सौंदर्याचें दर्शन बहुधा मला घरीं बसूनच घ्यावें लागे. भर दुपारीं कोपऱ्यांतील आम्रवृक्षावरून कोकिळेचें कुहुकुहु असें संगीत सुरू होई; नाही असे नाही ! त्या झाडा-खाली ताडकन् जाऊन ‘ अवेळ तरिही बोल. कोकिळे, अवेळ तरिही बोल ’ या चालीवर प्रेमभंगाचें दुःख प्रकट करण्याची मलाहि राहून राहून लहर येई. पण हा अर्ध्या फर्लांगाचा प्रवास दोन अडचणीमुळे माझ्या हातून कधीच पार पडला नाही ! पहिली अडचण रणरणाऱ्या उन्हाची आणि दुसरी जी मिळत नसल्यामुळे कवितेंत सुस्कार सोडायचे असतात, ती प्रणयिनी अजून पाहिली सुद्धा नसल्याची !

पहिल्या पहिल्यादा कविलोकांवर पूर्ण विश्वास ठेवून वैशाख हा श्रृंगाराचा सखा आहे या कल्पनेने मी त्याचा अंधभक्त झालों. पण या महिन्यांत अनवाणी घराबाहेर पडल्याबरोबर पायाला जे चटके बसत त्यामुळे माझे डोळे लवकरच उघडले. वैशाखात लग्नाचा कडाका उडत असल्या-मुळेच कवींनी दडपून त्याचा श्रृंगाराशी संबंध जोडून दिला असावा अशी हळूहळू माझी खात्री होऊं लागली. शंकराच्या डोळ्यांतून निघालेल्या अग्नींत चांगला भाजून निघालेला मदन तितक्याच भयंकर अशा उन्हा-

ळचांत आपले पुष्पबाण सज्ज करून पृथ्वीवर भटकत सुटतो ही कवि-कल्पना बहुधा वेडयांच्या इस्पितळातूनच बाहेर पडली असावी ! पुढे पुढे तर आंब्याच्या व्यापाऱ्यांनी आपला माल मंडईंत पडून राहूं नये म्हणून घरातून गिऱ्हाइकें बाहेर काढण्याकरिता कवींना लाचलुचपत देऊन वसंत-ऋतूची भपकेदार वर्णने त्यांच्याकडून लिहून घेतली असावीत याविषयी मी निःशंक झालो.

मात्र हास्याइतका शृंगार हा जीवनातील वरवरचा रस नाही ही जाणीव या वेळी मला होऊन चुकली होती. पण हृदयाला उन्मत्त करून सोडणाऱ्या अशा शृंगाराचें दर्शन तरुण मनाला वैशाखांत होत नाही ! तो रसराज ज्येष्ठांत प्रगट होतो. मृग हें त्याचें वाहन असते. त्या वेळी स्वर्ग पर्जन्यधारांच्या सहस्र बाहूंनी पृथ्वीला प्रेमाने जवळ ओढतो आणि वल्लभाच्या त्या चिरवांछित आलिंगनाने पुलकित झालेली पृथ्वी आनंदाचे सुगंधित निःश्वास सोडूं लागते. मृत्तिकेच्या त्या एका मूक उद्‌गारांत वसंतांतील सर्व फुलांचा सुगंध साठलेला असतो, हा अनुभव मी कॉलेजात असताना पहिल्यादा घेतला. खूप लांब फिरायला गेलों होतों मी त्या दिवशी. आभाळाप्रमाणे माझे मन भरून आलें होतें. विजेच्या योगाने चमकून जाणारे विचित्र विचार मधून मधून त्यांच्यांत आपले अस्तित्व प्रगट करीत होते. आकाश काळेकुट्ट झाले होतें, सारी सृष्टि काळवंडली होती. या जगांत मी एकटाच आहें, या भावनेने माझ्या मनावर उदासीन-पणाची छाया पसरली होती. ज्याला आईच्या तोंडचे दोन गोड शब्द उभ्या जन्मात ऐकायला मिळत नाहीत, ज्याच्या आप्तेष्टांना माणसाला मन असतें याची कल्पनाच करता येत नाही, अशा मनुष्याने जगावे तरी कशाकरता, हा प्रश्न पुनः पुन्हा मला सतावून सोडीत होता ! त्या प्रश्नाच्या मागे कदाचित् आत्महत्येचा विचारसुद्धा दडून बसला असेल !

मी एका खडकावर असा सुन्न होऊन बसलों असताना एकदम मुसळधार पाऊस सुरू झाला. पर्जन्यधारांचें गंभीर संगीत आणि विद्युल्लतेचें स्वच्छंद नृत्य यांचा तो अद्‌भुत आणि अपूर्व विलास पाहण्यांत मी गुंग होऊन गेलों. भिजलेलीं पाखरें झाडाच्या आश्रयाला येऊन किलबिलाट

करूं लागलीं, तेव्हा कुठे मी सुद्धा भिजून ओला चिंब झालो आहे हें माझ्या लक्षांत आलें !

तरी मी जागेवरून हललों नाही. साऱ्या वातावरणांत एक सूक्ष्म विलक्षण सुगंध दरवळत होता. मी आभाळाकडे पाहिलें. तें निवळलें होतें. त्याच्यापासून अतिशय दूर असलेल्या पृथ्वीच्या प्रेमाने त्याच्यांत परिवर्तन घडवून आणलें होते. वातावरणांतील मधुर सुगंध प्रीतीच्या त्या अदृश्य पुष्पांचा होता.

अंगावरील सारे कपडे भिजले असून त्या दिवशीं मी घाईघाईने खोलीकडे परत आलो नाही. 'पहिला पाऊस' या कवितेच्या भराभर सुचणाऱ्या ओळीं गुणगुणत किती तरी वेळ मी त्या खडकावर बसून राहिलो होतो. बालकवींच्या धर्तीवर लिहिलेली ती दोनशे ओळींची कविता पुढे दहा-पंधरा वर्षें ज्येष्ठाच्या आरंभी मला हटकून आठवत असे. ती प्रसिद्ध करण्याचे धाडस मला कधीच झालें नाही. पण पहिल्या पावसांत दूर दूर फिरायला जाऊन भिजायचा आणि भिजता भिजता कुणाला ठाऊक नसलेल्या त्या कवितेतील प्रणयरम्य कल्पना आठवण्याचा आनंद पुढे मी कैक वर्षें लुटला. तो उन्माद आठवला म्हणजे विशीपासून चाळीशी-पर्यंत प्रत्येकाला ज्येष्ठ महिनाच अधिक आवडत असावा असें मला वाटतें. माझी स्वाक्षरी घेणारा तो विद्यार्थी दहा वर्षांपूर्वी माझ्याकडे आला असता, तर त्याच्या वहीत 'माझा आवडता महिना—ज्येष्ठ' हे शब्द क्षणाचा विचार न करता मी लिहून दिले असते.

पण चाळिशी उलटल्यानंतर ज्येष्ठावरच्या माझ्या प्रेमाला ओहोटी लागली आहे. अजून मी मृगाचा पहिला पाऊस मोठ्या कौतुकाने पाहतो. वल्लभेच्या दीर्घविरहाने आकाश काळवंडून गेलें आहे, त्याच्याकरिता उत्कंठित झालेली पृथ्वी त्याच्याकडे पाहता पाहता अधिक अधिक धुंद होत आहे, मेघगर्जनेच्या गंभीर तालावर चंचलेचें नृत्य सुरू आहे, हे दृश्य अजून मला आनंदित करतें. पण ज्येष्ठांतला पाऊस कोसळूं लागला म्हणजे तो पाहता पाहता माझ्या मनांत हल्लीं एक विचित्र कल्पना आल्यावाचून राहत नाही. मला वाटतें—पहिला पाऊस हा पहिल्या प्रेमासारखा आहे. आंतरिक आनंदापेक्षा शारीरिक उन्मादाचा विलास आहे हा ! या

शृंगारांत उपभोगाची आसक्ति आहे, त्यागाच्या भूमिकेवर उभी राहू इच्छिणारी उदात्त प्रीति नाही. त्या उज्ज्वल प्रीतीचें स्वरूप जगांत फक्त वात्सल्याच्या स्वरूपानेच प्रगट होतें.

या वात्सल्याचा साक्षात्कार बाराहि महिन्यांत मला फक्त श्रावणांत उत्कटत्वाने होतो. या वेळीं पृथ्वीला आकाशाला प्रेमवर्षावांत मग्न होऊन जाण्यांत पूर्वीसारखी मौज वाटत नाही. आपल्या मीलनांतून निर्माण झालेल्या बालकांना सांभाळण्यांत आणि वाढविण्यांतच तिला अधिक आनंद होऊं लागतो. शिरोड्याला असतांना श्रावणांत भाताच्या मळ्यांतून मी शाळेकडे येऊं लागलो, कीं मोत्याच्या कणसांप्रमाणें दिसणारी पण किंचित् वाकलेलीं असंख्य लोंबरें पाहून माझ्या मनांत एकच कल्पना येत असे : आईला सोडून आपणांला लवकरच दूर जावें लागणार म्हणून हीं सारीं बालकें तिने आपलें शेवटचें चुंबन घ्यावें या इच्छेने अशीं वाकून खाली पाहत आहेत !

श्रावणांत संध्याकाळीं नदीवर फिरायला गेलें तरी तेथेहि वात्सल्याचा असाच सुंदर आविष्कार माझ्या दृष्टीला पडतो. ज्येष्ठ-आषाढां-तील महापुरांत मनाला चकित करून सोडणारी भयानक शोभा असते. पण त्या प्रचंड लोंढ्यातून वाहून येणारे साप पाहिले किंवा भोवतालचा मळ्चा बुडवून टाकणाऱ्या त्याच्या उन्मत्त आणि गढूळ लाटांचा खळ-खळाट ऐकला कीं माझे मन बावरून जातें. निसर्गाच्या कुठल्याहि क्रीडेंत रम्यतेबरोबर रुद्रता असायचीच; हें कळत असल्यामुळे त्या महापुरापासून दूर दूर पळून जायची इच्छा माझ्या मनांत उत्पन्न होत नाही. पण पोहण्याची आवड असूनहि नदीच्या या तांडवनृत्यांत भाग घ्यावा असे मला सहसा वाटत नाही. ज्येष्ठ-आषाढांतील नदीकडे मी आदराने पाहतों. पण या आदराच्या मागे भीतिहि लपलेली असते !

श्रावण आला कीं माझ्या मनांतली ही भीति कुठल्या कुठे पळून जाते. आणि उरलेल्या आदराचें हा हा म्हणता प्रेमांत रूपान्तर होते. या वेळी नदीकांठच्या मळ्या हिरव्या वेषभूषा करून मोठ्या उत्सुकतेने माझे स्वागत करतात. पात्रांत पाणी अगदी भरपूर असते ! पण तें निवळलें असल्यामुळे जणु कांही शुभ्र वस्त्र धारण केलेली जलदेवताच

आपल्याला स्वच्छंदाने खेळायला बोलावीत आहे असा भास मला होतो. निसर्गाच्या स्वैर रुद्रतेला आळा घालणारी उज्ज्वल मानवी संस्कृतीच आपल्यापुढून सरितेच्या रूपाने गात गात जात आहे अशी कल्पना या वेळी माझ्या मनांत येते आणि हें दृश्य पाहण्यांत मी तल्लीन होऊन जातों. पण लवकरच दुसरी अधिक सुंदर कविता मला मोहित करते. ती म्हणते—महापुराने नटलेली नदी हें वल्लभाला भेटण्याकरिता धावत जाणाऱ्या प्रेमातुर अभिसारिकेचें प्रतीक होते; पण श्रावणांत मोठ्या डौलाने मंद मंद पदक्षेप करीत जाणारी परिपूर्ण नदी ही मातृ-देवतेची मंगल मूर्ति आहे!

श्रावणांत वात्सल्याचें दर्शन फक्त हिरव्यागार शेतांत आणि सरितांच्या परिपूर्ण पात्रांत होतें असें नाही. आकाशांतहि त्याचेंच मनोहर प्रतिबिंब पडलेलें दिसतें. आभाळ आलेलें पाहून बाहेर पडतांना छत्रीचें लटांबर हातांत घेऊनच आपण मंडई करायला निघतो. पण आपण चार पावलें चालून जातों न जातों तोंच ढगांच्या पड्याआड लपलेलें ऊन हळूच डोकावून पाहतें आणि जणू कांही टाळ्या पिटीत म्हणतें,—‘ कशी फजिती झाली एका माणसाची ! ’ या खेळकर उन्हाचा आपल्याला मुळीच राग येत नाही. उलट असें वाटतें, तेजस्वी डोळ्यांच्या पण नाजुक गालांच्या या पोरग्याला जर आपणाला पकडता आलें असतें, तर आपण त्याचे खूप खूप गालगुच्चे – छे: पापे घेतले असते !

संध्याकाळीं बाहेर पडताना सकाळसारखी फसगत होऊं नये म्हणून आपण खिडकींतून आभाळाकडे पाहतो. अगदी लख्ख ऊन पडलेलें दिसते बाहेर ! छत्री ही पदवीप्रमाणे असते, म्हणजे अनेकदा तिचा उपयोग होण्याऐवजी तिचें ओझें मात्र माणसाला वाहावें लागतें, अशा कल्पनेने आपण तिच्याकडे तुच्छतेने पाहत ऐटीने हात हालवीत घराबाहेर येतो. पण आपण चार पावलें चालून जातों न जातों, तोंच पांढऱ्या शुभ्र मलमलीच्या सदऱ्यावर शाई ओतून घेणाऱ्या पोरा-प्रमाणे दिसणारा एक छोटा ढग हळूच आपल्या डोक्यावर येतो, आणि

भराभर पाण्याचे तुषार आपल्या अंगावर उडवूं लागतो. ‘ कशी फजिती झाली एका माणसाची ! ’ असे म्हणत सकाळच्या उन्हाप्रमाणे संध्याकाळचा हा ढगहि टाळया पिटीत सुटतो !

श्रावण मला अतिशय आवडतो तो या गोड लपंडावामुळे. ऊनपावसाच्या या नाजुक खेळांत मानवी जीवनाचें प्रतिबिंबच पडलें आहे असा मला नेहमी भास होतो. स्वतःची दुःखें, संकटे आणि अपघात यांचा विचार करताना आपल्या आयुष्यांत अगणित अनाहूत सुखे येऊन गेलीं आहेत, अनेक गोड गोड अपघात घडले आहेत आणि अनपेक्षित दिशांनी आनंदाच्या असंख्य शीतल लहरी आपल्याकडे वाहत आल्या आहेत ही गोष्ट मनुष्य हटकून विसरून जातो. जीवन हा हास्य आणि आणि अश्रु यांचा सुरेख संगम आहे ही जाणीव फक्त श्रावणच त्याच्या मनांत निर्माण करूं शकतो. अशा वेळी क्षणभर कां होईना, आपल्या अनुभवांकडे उदात्त दृष्टीने पाहण्याचें सामर्थ्य त्याला येतें. आणि मग जन्म-मृत्यु, प्रीति-भीति, प्रातःकाल-संध्याकाल, डोंगर-दरी, यांच्याप्रमाणे सुखदुःख ही सुद्धा जीवनांतली अभेद्य जोडी आहे हें कळून चुकल्यामुळे संसारांत राहूनहि सामान्य मनुष्य तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने आपल्या आयुष्याकडे पाहूं लागतो.

एका बादशहाने आपल्या रोजनिशींत ‘ आयुष्यांत सुखाचे फक्त चवदा दिवस मला मिळाले ’ असें लिहून ठेवलें आहे. त्या बादशहाचे सारे मंत्री महामूर्ख होते, असें मला वाटतें. मी त्याच्या पदरीं असतो, तर ‘ माझ्या आयुष्यांतले निम्मे दिवस अतिशय सुखांत गेले ’ असेंच त्याने लिहून ठेवलें असतें अशी माझी खात्री आहे. त्याचें डोकें ताळयावर आणायला मी दुसरें तिसरें कांही केलें नसतें ! फक्त सबंध श्रावण महिनाभर त्याचा पलंग राजवाडयाच्या गच्चीवर अगदी उघडयावर नेऊन ठेवला असता !

---

# १४. दोन मेणबत्त्या

— अनंत काणेकर

स्वाक्षरी घेण्याकरता म्हणून माझ्याकडे त्या दिवशी आलेल्या त्या मुलाने मला खरोखरच मोठ्या पेचांत टाकलें. द्यावी स्वाक्षरी आणि एकदा मोकळे व्हावें म्हणून त्याच्या हातांतलें पुस्तक घेऊन मी सही करणार तों तो एकदम म्हणाला, " छे, छे, मला नुसती स्वाक्षरी नको; माझा एक प्रश्न आहे, आणि त्याला उत्तर म्हणून पांचसहा ओळी लिहून नंतर तुम्ही सही केली पाहिजे."

" कसला प्रश्न ? " मी म्हणालों.

" मनुष्याच्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा क्षण कोणता ? " तो पोरगा गंभीरपणें उद्‌गारला, " या प्रश्नाला एक चारपांच ओळींचे उत्तर लिह्य, आणि नंतर सही करा."

त्याचा प्रश्न ऐकून मी थक्कच झालों. " अरे बाबा," मी म्हणालो, " ज्या प्रश्नाचं उत्तर देतांना मोठमोठ्या तत्त्वज्ञान्यांच्यासुद्धा नाकी नऊ आले त्या प्रश्नाचं उत्तर तूं माझ्याकडे मागतोस ? काय वेड लागलंय् तुला ? मला नाही कांही उत्तर देता येत या प्रश्नाचं. पाहिजे तर सही घे, आणि जा."

" तत्त्वज्ञान्यांचीं मतं मला नको आहेत." तो म्हणाला, " तुमच्यासारख्या लोकांचींच हवीं आहेत. तुम्हांला काय वाटेल तें लिहा. ही पहा, पुष्कळ लोकांनी या प्रश्नाला उत्तरं लिहिली आहेत."

" मी नाही त्यांच्याइतका शहाणा." मी त्रासून म्हणालो, " मला खरंच कांही सुचत नाही. काय थट्टा आहे काय अशा प्रश्नाचं ताबडतोब उत्तर द्यायचं म्हणजे ? '

" आत्ताच देऊं नका." तो काकुळतीला येऊन म्हणाला, " ही चोपडी इथंच राहूं द्या. मी उद्या येतों, परवा येतों—तुम्ही सांगाल तेव्हा येतों.

त्या हुषार छोकऱ्याच्या पाणीदार डोळ्यांत इतकी कळकळ दिसत होती, की मला नाही म्हणवेना. " बरं, बरं ठेवून दे ती चोपडी इथं." मी म्हणालों, " आणि ये उद्या परवा."

त्या दिवशीं दुपारपर्यंत मी कामांत असल्यामुळे त्याच्या प्रश्नाचा विचार करायला मला वेळच झाला नाही. पण त्यानंतर संध्याकाळी एकामागून एक तीन प्रसंग घडले. ते मात्र माझ्या मनांत घोळत असलेल्या त्या प्रश्नाचे उत्तर घेण्याकरतांच घडले असे मला वाटते. खूप श्रीमंत असलेल्या माझ्या ओळखीच्या एका गृहस्थाकडे कांही कामाकरता मी गेलो. तो घरीं नव्हता. त्याची बायको चिंतातुर चेहरा करून बसली होती.

" काय हो, कुठं गेले ?" मी विचारलें.

" तो नवीन जर्मन डॉक्टर आला आहे ना, त्याच्याकडे गेलेत. मी जा म्हणून आग्रह करून पाठवलं त्यांना." ती म्हणाली,

" म्हणजे झालं काय ?" मी म्हणालो.

" अहो काय नी काय ! त्यांच्या मागली एक काळजी जाते तर दुसरी लागते ! खडकीच्या बंगल्याची राखण करायला पठाण ठेवला; तो पठाणच चोरी करून पळाला ! तें तुम्हाला माहीतच आहे. ती भानगड संपली नाही तों आता इन्कमटॅक्सची केस उभी राहिली आहे. त्यांना अलीकडे झोपसुद्धा कशी ती लागत नाही. अन्नपाण्यावर तर वांछाच नाही. तेव्हा मी म्हटलं : निदान त्या नवीन डॉक्टरच्या औषधानं तरी जरा बरं वाटेल."

" अस्सं होय ?" मी म्हणालों.

तिथून निघालों तो आगगाडींत बसून मी घरीं परत येत होतों. मजूर चळवळींत काम करणारा माझा एक जुना मित्र डब्यांत भेटला. खूप आनंदांत होता तो. आपले काम कसे शिस्तींत चालले आहे आणि चळवळीला कसा जोर चढतो आहे याचें रसभरीत वर्णन करीत असता त्याच्या डोळ्यांत विलक्षण चमक दिसत होती. त्याचे डोळे खोल गेले होते, आणि त्याची दाढीहि बोटभर वाढली होती.

"तुझे डोळे किती खोल गेलेत!" मी म्हणालों, "काय झालंय रे तुला?"

"हट्," तो उद्गारला, "मला काय झालंय? मी चांगला मजेंत आहे. डोळे खोल गेले आहेत कीं वर आले आहेत तें मला माहीत नाही. गेल्या पंधरा दिवसांत आरशांत तोंड पहायला मला वेळच झाला नाही. आता दाढीविषयी म्हणशील तर दाढी करायला सध्या आपल्या खिशांत पैसे नाहीत बुवा!"

इतक्यांत परळ स्टेशन आलें; आणि माझ्याशी हस्तांदोलन करून मोठ्या चैनींत शीळ घालीत तो निघून गेला.

एकामागून एक घडलेल्या या दोन प्रसंगांचें मला मोठें आश्चर्य वाटत होतें. स्वतःच्या अपरंपार सुखांत आणखी भर घालण्याकरता इन्कमटॅक्स चुकवून पंधरा लाखांचे सोळा लाख करण्याकरता जीव पाखडणारा आणि ठिकठिकाणच्या अनेक बंगल्यांत हजारो रुपयांचें फर्निचर धूळ खात पडलेलें असताना खडकीच्या बंगल्यांतलीं चार खुर्च्याटेबलें पठाणाने पळवली म्हणून हाय खाणारा आमचा हा श्रीमंत दोस्त दुःखी आणि चिन्ताग्रस्त! आणि एम्. ए. झाल्यावर घरीं चालत आलेल्या लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या लाथाडणारा, आणि कधी काळीं दलित जनता स्वतंत्र होऊन सुखी होईल म्हणून स्वतःच्या सुखाची यत्किंचितहि पर्वा न करता इतरांच्या सुखासाठी कधी उपाशी तर कधी अर्धपोटी वणवण फिरणारा हा कॉम्रेड मजेंत आणि सुखी!

हे आणि असेच दुसरे विचार करीत मी रात्रीं घरीं परत आलों. आणि तो तिसरा प्रसंग घडला. मला मेणबत्तीच्या थंड प्रकाशांत वाचीत बसणें फार आवडतें. म्हणून खुर्चीवर उभा राहून फळीवरल्या मेणबत्या मी शोधू लागलो. एक मेणबत्ती सबंध जळून गेलेली होती. मेणबत्ती अशी क्वचितच जळते. तिचें अस्तित्व दाखविण्यापुरता फक्त पैशाएवढा मेणाचा अवशेष शिल्लक होता; दुसरी मेणबत्ती कित्येक दिवस फळी-वर धूळ खात पडल्यामुळे मुंग्याझुरळांनी ती कुरतडून अजिबात निरुपयोगी केली होती. तशा स्थितींत पडलेल्या त्या दोन मेणबत्त्या पाहून कां कुणास ठाऊक मला थोडेसें हसूं आले; आणि दुसऱ्याच क्षणी एक चमत्कारिक

विचार माझा डोक्यांत आला. ज्या दोन माणसांचा मी विचार करीत होतो तीं दोन माणसें या दोन मेणबत्त्यांसारखी आहेत ! आपला जीव निर्धोक ठेवण्यांत–स्वतःच्या सुखाची राखण करण्यांत गुंतून पडलेल्या एकाचे आयुष्य कुरतडलें जात आहे, आणि इतरांना मंद, सुखकर प्रकाश देत दुसऱ्याची जीवन-ज्योत जळत चालली आहे.

समजा, त्या मेणबत्त्यांना जीव असता तर आपला कुणाला कसलाच उपयोग झाला नाही—आपलें आयुष्य कुजून गेलें, हा दुःखमय विचार मरता मरता एकीच्या मनांत आला असेल आणि आपल्या जीवनाचे सार्थक झालें—शेवटच्या घटकेपर्यंत आपण सर्वांना प्रकाश दिला या सुखदायी तंद्रींत त्या दुसरीच्या आयुष्यांतला शेवटचा क्षण संपला असेल. मनुष्याच्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा क्षण कोणता, या प्रश्नाचें उत्तर त्या मुलाला पाहिजे होते, नाही का ? मिळाले मला उत्तर. मनुष्याच्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा क्षण म्हणजे हा अशा प्रकारचा शेवटचा क्षण ! टेबलावर पडलेली त्याची चोपडी मी घेतली, आणि त्यावर लगेच खरडलें, " हा खरा सुखाचा क्षण ! स्वतःसाठी जगलास तर मेलास; दुसऱ्यासाठी जगलास तरच जगलास ! "

## १५ रेल्वे-लाइन्स

— वि. पां. दांडेकर

रेल्वे-लाइन्स ! विलक्षण आकर्षण मला वाटत आले आहे रेल्वे-लाइन्सविषयी. इतकें आकर्षण तुम्हाला तुमच्या प्रिय वस्तूविषयी क्वचित्‌च वाटत असेल ! जिवाला ओढणी लागल्यासारखा मी रेल्वे-लाइन्सकडे जातो. काळाभोर, चकचकीत, सरळ आणि दूरदेशीं जाणाऱ्या त्या लोखंडी रुळांच्या कडेकडेने जात असतांना अगदी जादूने भरल्यासारखे

वाटते मला ! संध्याकाळ झाली आणि लांब पसरलेल्या सावल्या अंधुक होऊं लागल्या, कीं माझे पाय काळ्याभोर चकचकीत रुळांकडे आकर्षिले जातात. वासरांच्या ओढीने गोठ्यांत येणाऱ्या गाईचे किंवा बायकोमुलांच्या प्रेमाने घरीं येणाऱ्या मध्यम स्थितींतल्या गृहस्थाचे पाय कदाचित् अशा प्रकारें आकर्षिले जात असतील ! माझे दुःख, माझ्या काळज्या, माझ्या अडचणी, माझ्या विवंचना--या सर्वांचा मला विसर पडतो या वेळी. अशा प्रकारचा विसर पाडण्याचें सामर्थ्य संगीतांतहि असते असे आपण म्हणाल; पण स्वर्गीय आणि हुकमी संगीत नेहमीं कसें ऐकायला मिळणार ? आपणाला आकाशवाणीच्या द्वारे ऐकूं येणाऱ्या संगीताची आठवण झाली असेल; पण मीच आपणाला विचारतों, कीं आकाशवाणीचे संगीताचे कार्यक्रम पुष्कळ वेळा अगदी भयंकर असतात कीं नाही ? लोकशाहीचे तत्त्व संगीतासारख्या मिजासखोर कलेला लावल्याने तिची अगदी अवकळा झाली आहे.

पण तो वेगळा मुद्दा म्हणून सोडून देतो. रेल्वे-लाइन्सच्या बाजूने जात असतांना भोवतालच्या परिस्थितीचा विसर पडतो असे मी सांगितलें. तेवढ्याने संपलें नाही. अगदी वेगळ्या विश्वांत गेल्यासारखे वाटते. त्या चकचकीत, काळ्याभोर रुळांच्या सान्निध्यांत आल्याबरोबर कां बरे आपणाला असें वाटतें ?

मनुष्याच्या मनाची अशी मौज आहे, कीं त्याला वेगळे, दूरचें, अनंतांतले कांही तरी हवे असते. निदान त्या वेगळ्याचे, दूरच्याचे, अनंताचे ओझरते दर्शन हवे असतें. त्या चकाकणाऱ्या परंतु पुढे पुढे अस्पष्ट होत जाणाऱ्या रेल्वे-लाइन्सकडे पाहिले, कीं दूरच्या आणि वेगळ्या मुलुखाची सारखी आठवण होते, मनांत त्याच्याविषयीं कल्पनातरंग उभे राहतात. विश्वामित्री स्टेशनपासून बडोदा स्टेशनपर्यंत जात असताना पेशावर-रावळपिंडीची मला आठवण होते, तो प्रदेश पाहिला नसल्याने त्याच्याभोवती कल्पनेचे धुके माझ्या मनांत पसरलेले आहे. त्या धुक्याकडे पाहायलाहि मला गंमत वाटते. उलट हरिद्वार-हृषिकेशीचा टापू मीं पाहिला असल्याने त्याची स्मृति होताच पुनः-प्रत्ययाचा आनंद वाटतो. हृषिकेशच्या वाटेवरील निबिड अरण्य, त्यांतील ते उंच व सरळ वृक्ष,

तातडीने धावणारी गंगा नदी आणि तिचे बालमनाप्रमाणे असणारे निर्मळ पाणी ही सर्व पुन्हा दिसू लागतात. आणि आपल्याकडे येण्याची खूण करतात, नेहमी कसे जाणार त्या देवभूमीकडे? पण रेल्वे-लाइन्सने जाताना तिचे पुण्यस्मरण होते आणि मनाला माहेरी जाऊन आल्याचा आनंद वाटतो. असल्या आनंदाचा घेतला आहे ना आपण अनुभव? घेतला नसल्यास आजच घेऊन पाहा. प्रवास न करता प्रवास केल्याचे श्रेय आपणाला मिळेल.

माझे एक स्नेही आहेत. सकाळ—संध्याकाळ ते रेल्वे-लाइन्सच्या बाजूने फिरावयास जातात. ऋतु कोणताहि असो; हातात काठी घेतलेली आणि काचा मारलेली त्याची मूर्ति मला हमखास भेटते, अगदी बेहद्द खूष आहेत ते त्या लोखंडी रुळावर! मी त्यांना एकदा विचारले, ‘ रावसाहेब, आपण एखाद्या बागेंत फिरावयास न जाता या ओसाड रुळाच्या बाजूने का फिरावयास येता ? ’ माझा हा प्रश्न ऐकून ते मोठ्याने हसले व म्हणाले. ‘ माझी मुलाखत कुठं प्रसिद्ध करणार आहात वाटतं ? पण तसा थांग नाही लागू देणार मी. एवढंच सांगतो, की इकडे या रुळांच्या सान्निध्यांत विचार करायला सुलभ जातं, ’ ‘ तेच तर माझं विचारणं आहे. कुठले विचार येतात आपल्या मनांत ? ’ अधिक माहिती मिळविण्याच्या आशेने मी विचारले. पण म्हातारेबुवा असे खमंग! ते मला म्हणाले, ‘ओळखला तुमचा डाव; असे फसायचे नाही आम्ही. तुम्ही विचार केलात तर तुम्हांलाहि कळेल. बरं आहे, रामराम !’

माझा स्नेह्याने युक्तीने उत्तर देण्याचे टाळले असले, तरी तितक्याच सफाईने त्याने उत्तर शोधून काढण्याची जबाबदारी आपल्यावर टाकली आहे. ती आपण पार पाडली पाहिजे. खरेच, कां आपण रेल्वे-लाईन्सच्या बाजूने जाण्याचे पसंत करतों ?

आपण म्हणाल, रुळांच्या दुतर्फा पसरलेल्या निसर्गसौंदर्यामुळे ते विविध प्रकारचे वृक्ष, ती हिरवीगार शेते, ते खळखळ वाहणारे ओढे, त्या सळसळणाऱ्या नद्या, मुनीप्रमाणे तटस्थ बसलेले ते डोंगर आजीबाईप्रमाणे जरा वाकलेल्या त्या टेकड्यावर छताप्रमाणे शोभणारे आकाश यांच्यामुळे त्या लोखंडी रुळांच्या कडेकडेने जावेसे आपल्याला वाटते. आपलें म्हणणे

बरेचसे बरोबर असले, तरी सर्वस्वी बरोबर नाही. याचे कारण असे, कीं आपण म्हणता तसले सौंदर्य इतरत्रहि असते. कां वाटत नाही त्याची रेल्वे-लाईन्सइतकी जादू आपणाला ? मला वाटते खरी जादू, खरे आकर्षण, कामिनीच्या पापण्याप्रमाणे दिसणाऱ्या काळ्याभोर आणि तकतकीत रुळांतच आहे.

त्या रुळांकडे पाहिलें, कीं कसल्या तरी भव्य उदात्त भावना मनांत उत्पन्न होतात. बऱ्हंशी सरळ मार्गानें जाणारे ते लांबचलांब दोन रूळ म्हणजे आगगाडीचे दोन डोळेच होत. त्यांच्या विश्वासावर एंजिन आपली चक्रे भरधाव फिरवीत असते.

रेल्वे–लाइन्सना इंग्रजीत ' परमनंट वे ' असे म्हणतात. किती योग्य आहे तो शब्द ! परमनंट वे– नेहमीची किंवा कायमची वाट ! हिंदुस्थानभर आणि जगभर पसरल्या आहेत असल्या कायमच्या वाटा. ह्या कायमच्या वाटांनी आजपर्यंत कोटचवधि लोक आले नी गेले, या पुढे येतील आणि जातील. या वाटा मात्र कायम राहतील ! वाटसरूंना नेण्याआणण्याचे त्यांचे काम आता जगाच्या अंतापर्यंत––निदान यांत्रिक सुधारणांच्या अंतापर्यंत––चालत राहणार. दूरदूरच्या देशांना जवळ आणण्याचे केवढे प्रचंड सामर्थ्य आहे या कायमच्या वाटेंत !

मनुष्य हा प्रवासप्रिय प्राणी आहे. किंबहुना मनुष्य हा प्रवासी आहे, असें म्हटले असताना अधिक शोभेल. प्रवासी मनुष्याची केवढी मोठी सोय केली आहे या कायमच्या वाटेने ! या वाटेच्या बाजूने जात असताना प्रवासाच्या कल्पना डोक्यांत घोळू लागतात. मनांत एक प्रकारचे सुखद चांचल्य उत्पन्न होते. शरीराला एक प्रकारचा उत्साह वाटतो आणि यांचा संमिश्र परिणाम म्हणून चित्तवृत्ति उल्हसित होतात.

पण मी जो रेल्वे-लाइन्सच्या बाजूने फिरावयास जातो तो आणखी एका वेगळ्या कारणाने. आपणाला ते कारण पटत असल्यास पाहा. रेल्वे-लाइन्सच्या बाजूने बरेच अंतर चालून झाल्यावर आडमार्गाने थोडा आंत जाऊन एखाद्या शेतांत किंवा मोकळ्या जागेत जाऊन मी बसतो. तेथे त्या वेळी कोणी नसते. मी, माझ्या समोर पसरलेला भूभाग आणि वर तरंगणारे आकाश इतकीच आम्ही तेथे असतो. तेथून रेल्वे-लाइन्सकडे

बघण्यांत एकप्रकारची मौज वाटते. सृष्टिसुंदरीने आपल्या पाठीवर दोन वेण्या सोडल्यासारखे ते काळेभोर नी तकतकीत रूळ दिसतात. त्यांच्याकडे आणि दाट होत चाललेल्या काळोखाकडे बघत असताना बसल्या जागे-वरून उठावेसे देखील वाटत नाही. इतकी मोहिनी वाटते त्या जागेची मला.

वर उल्लेखिलेल्या आडमार्गांवरून एक कल्पना सुचली मला. ती आपल्या विचाराकरिता रुजू करतो. सरळ मार्गाने एकसारखे जात असताना, जरा आडमार्गाने जाऊन पाहण्याचा मनुष्याला एक प्रकारचा मोह वाटतो. सारखेपणाला कंटाळल्यामुळे म्हणा किंवा नाविन्याच्या आवडीमुळे म्हणा, त्याला थोडेसें आडरस्त्याने जावेसे वाटत असावे. आपले कांही तरी वेगळे असावे, या आवडीनेहि कदाचित् आपण आड-मार्गाने जात असू. कारण कांहीहि असो; पण ही सर्वांच्या परिचयाची गोष्ट आहे, की सरळ मार्गाने कांहीहि करीत असताना थोडयाशा आड-रानांत शिरल्याशिवाय आपणाला बरेच वाटत नाही. निदान मला तरी बरे वाटत नाही. त्या आडरानांत शिरून सरळ रस्त्याकडे बघण्यांत मला मौज वाटते. सरळ रस्त्याचे खरे स्वरूप, त्याचे खरे महत्त्वहि अशा वेळी कळायला मला सुलभ जाते. शिवाय सरळ रस्त्याला साक्ष ठेवून आड-मार्गाने जात असताना खाचखळगे लागले, तरी वाट चुकण्याची भीति मुळीच नसते. कितीहि वेडेवाकडे आंत गेलों, तरी मागे फिरून सरळ रस्त्याला लागण्याची हमखास खात्री असते. दायांच्या बरोबर बागेंत आलेली मुलें इतस्ततः कितीहि बागडली, तरी त्यांना जशी वाट चुकण्याची भीति नसते. तसेच हे असते म्हणानात. आणि म्हणून तर मला रेल्वे-लाइन्सच्या बाजूने फिरायला जाण्याचें एवढे आकर्षण वाटते. नाही वाटत आपणांला असले आकर्षण ?

---

# १६. रिकाम्या बाटल्या

— ना. म. संत

गेंगाण्या स्वरांतला त्याचा तो ओळखीचा पुकार ऐकतांच लेखनांतलं माझं लक्ष चळलं. दुरून त्याचा शब्द कानावर आला तेव्हापासूनच माझं लक्ष उडालं होतं. पण लेख पुरा करायचा म्हणून उडणारं लक्ष खेचून मी तें विषयाकडे लावीत होतों. तो जसजसा जवळ येऊं लागला तसतसा मी अस्वस्थ होऊं लागलों, आणि माझ्या खिडकीखाली त्याचं खाकरणं घुमलं तेव्हा मी जागेवरून उठलोंच. खाली येऊन मी कोपऱ्यांतल्या फडताळाकडे नजर टाकली आणि दारांत येऊन त्याच्या येण्याची वाट पाहूं लागलों.

रद्दी बाटल्या विकत घेणारा माणूस होता तो.

घरांत साचलेल्या रिकाम्या बाटल्या देऊन टाकण्याचे मी त्याच्याशीं अनेक वायदे केले होते. तो ज्या ज्या वेळी या बाजूस येई त्या त्या वेळीं दारांतून साद देई, " साहेब, बाटल्या देता ना ? " पण आजपर्यंत प्रत्येक वेळीं मी त्याला परतवून लावलं होतं. तो आला त्या त्या वेळीं मी कामांत तरी होतो, नाही तर कामावरून येऊन मी विश्रान्ती घेत होतों, त्याची मागणी लक्षांत न घेतांच त्याला परतवून लावीत होतों. तो मात्र एखाद्या कर्तव्यपरायण महाभागाप्रमाणं, त्याचा विषाद न मानता पुनः पुन्हा फेरी टाकन आपलं कार्य बजावीत होता. हे त्याच्याबद्दलचे विचार—त्याची साद ऐकली कीं माझ्या मनात चमकून उठत. पण घाई, आळस आणि विश्रान्ती यांचा लगेच वरचष्मा होई, आणि माझा नाइलाज ठरे, पण जो जो मी त्याजबरोबर अधिकाधिक वायदे करूं लागलों तो तो त्याजविषयीचे हे विचार तीव्र होऊं लागले. मनाची अस्वस्थता वाढू लागली आणि आज तर त्याचा आवाज जेव्हा मी ऐकला तेव्हा त्या विचारांची तीव्रतर आवृत्ति होऊन तिने वाढलेल्या अस्वस्थतेमुळं काम करणं अशक्य होऊन

मी खाली येता येता विचार केला, " या बाबाचा सवाल पुरा करून टाकू आज. "

दाराकडे येता येता हसतच तो मला म्हणाला, " देऊन टाका ना साहेब आज. "

त्याच्या हसण्यांतली खोच मला समजली. मी म्हणालो, " होय बाबा, तेवढ्याकरिताच खाली उतरलोय. पण भाव सांगशील की नाही तुझे ? "

त्याला मी कपाटांतल्या बाटल्या दाखविल्या, आणि त्याच्या शब्दाची वाट पाहूं लागलो. आपल्या मुंडाशांत खोवलेली काडीविडी काढून त्यानं ती पेटविली आणि एक जोरकस दम मारून तो चर्पटपंजरी करूं लागला:--

मी त्याला म्हटलं, "मला नाही वेळ. झटकन् भाव सांग आणि या बाटल्या घे. "

पण मग ओढेवेढे घेत त्यानं जे भाव सांगितले ते ऐकून मी सर्दच झालो. मी त्याला म्हटलं, " तूं मला समजतोस काय ? गावांत बाटल्या इतक्या महाग विकताहेत अन् तूं हा भाव मला देणार ! जरा नीट विचार करून सांग. "

" इचारून बघा साहेब. लढाई संपली आता. कुणीबी इचारीत नाय बाटल्यांना. इचारून घ्या अन् मग उद्या-पर्वा कवाबी द्या. "

" मला विचाराबिचारायची जरुरी नाही. तूंच भलेपणानं बोलणार असलास तरच--"

" पण साहेब, भाव होता तवा तुमी दिल्या नाय, अन् आता भाव उतरला तवां-- "

मग त्याचं तेंच तेंच बोलणं मी ऐकून घेतलं नाही. त्याला वाटेला लावलं आणि मी आपल्या उद्योगाला लागलों.

उद्योगाला लागलों असं म्हटलं खरं,—पण तसं म्हणण्याऐवजी उद्योगाला लागण्याचा प्रयत्न केला असं म्हटलं पाहिजे. कारण मग लिहायला लागलों तर मन घेईना. त्याला दामटून पाहिलं पण तें बधेना.

त्या बाटल्यांबद्दल आणि त्या बाटलीवाल्यानं काढलेल्या शब्दांबद्दलच विचार मनांत घोळू लागले.

मी स्वतःलाच प्रश्न केला, " मला बाटल्या देऊन टाकायच्या आहेत कीं नाहीत ? "

' होय. ' मीच उत्तर केलं.

' मग कां नाही देऊन टाकल्या आज ? ' मी विचारलं.

' हं ! तो भलत्याच स्वस्त मागत होता, मग कशा द्यायच्या ? ' मीच उलट प्रश्न केला.

' लढाई संपली ना, मग भाव उतरणारच. ' मी म्हणालो.

' भाव उतरला असेल, पण तो इतका ? छे ! इतक्या स्वस्त दरानं मी बाटल्या देणार नाही. ' मीच ठासून उत्तर दिलं.

' इतक्या स्वस्त द्यायच्या नाहीत तर,– मागं भाव खूप चढला होता तेव्हांच कां दिल्या नाहीत ? त्या वेळेस सांगितलं नव्हतं त्यानं तसं,– आणि आला नव्हता तो मागायला ? ' जरा खडसावून विचारलं.

' होय भाव चढला होता तेव्हां, आणि तो मागायलाहि पण आला होता तेव्हां पण–' मीच अडखळलों.

' पण काय ? ' मी दटावून विचारलं.

' त्या वेळी वाटलं बाटल्या इतक्या दुर्मिळ झाल्या आहेत, औषधाला सुद्धां मिळत नाहीत, – तेव्हां कशाला–– ' मीच चाचरलों.

' वा ! म्हणजे त्या वेळीं दुर्मिळ झाल्या म्हणून दिल्या नाहीत, आणि आता विपुल झाल्या म्हणून देववत नाहीत. मग आता खरं सांगा बच्चमजी, आता तुम्हाला बाटल्या द्यायच्या आहेत की नाहीत ? द्यायच्या नसतील तर त्या बिचाऱ्याला कां टल्ले ?' मी सडेतोड सवाल टाकला.

' द्यायच्या नाहीत असं कसं ? पण––' मीच.

' पण ! पण कशाला ? द्यायच्या नाही हेंच खरं ' मी हसलों.

' म्हणजे असं कीं–– ' असं म्हणत मी तो संवाद तात्पुरता मिटवला आणि खाली आलों.

ते कपाट उघडतांच तिथं साचलेली ती अडगळ पाहून मला वाटलं कीं– ‘ मी ही अडगळ राखून ठेवीत आहें ! यांनी हें कपाट तर अडवलं आहेच, आणि यांवर धूळ तरी किती साचली आहे ! धूळच काय पण कोळिष्टकेंहि वाढलीं आहेत कितीतरी इथं. त्यांतच झुरळं आणि त्यांचीं अंडीं ! छे ! यांत हात घालून बाटल्या खाली काढण्याचीहि सोय नाही. हात धुळीनं माखायचा, कोळयांच्या जाळयांनीं लिडबिडायचा, आणि हमखास चिरडल्या जाणाऱ्या अंडयांनीं राड व्हायची, शीः ! नकोच ती भानगड ! ’

पण या घाणीला जबाबदार कोण–बाटल्या ? बाटल्यांवर धूळ साचली, कोळिष्टकं जमलीं, आणि अंडयांची वसाहत झाली हा काय बाटल्यांचा दोष ? छे ! बाटल्या काय करणार याला ? दोष असला तर तो बाटल्यांचा नव्हे,–माझा आहे; माझ्या आळशीपणाचा–बेपर्वाईचाच पुरावा आहे ! हो, बेपर्वाईच नाही तर काय ? पहा या बाटल्यांकडे. या धुळीनं माखल्या असल्या आणि कोळिष्टकांनीं वेढल्या असल्या तरी किती विविध आणि सुबक आहेत आकार यांचे ! गोल, चौकोनी, अष्टकोणी, बुटके, उंच, चिंचोळे ! त्यांतहि पुन्हा कलादृष्टि दाखविलेली. ही चपटी पण मध्येच चिंचोळलेली बाटली पहा, किंवा वर निमूळत जाणारा हा नमुना बघा, स्फटिकांत खोदलेली ही आणि हंसाचा आकार दिलेली ती कुपी पहा ! आकारांचे किती विविध आणि सुबक प्रकार आहेत हे !

आकारांचेंच काय पण रंगाचेहि तितकेच किंवा अधिक प्रकार यांत आढळतील. आम्हा पुरुषांच्या लक्षांत न आलेला पण बायकांच्या रंगशोधक नजरेंतून न सुटलेला हा शिशाचा काळसर हिरवट रंग पहा. या बाटलीच्या रंगाचं कोणतंहि वस्त्र स्त्रियांना किती प्यार असतं तें कापड–दुकानदारालाच विचारलेलं बरं. तसाच हा गडद निळा आणि निळसर, किरमिजी आणि पिवळसर रंग. मला जर सर्वांत कोणता रंग आवडत असेल तर तो पांढरा स्वच्छ पारदर्शक रंग. अशा बाटल्यांत तुम्ही जें कोणतें द्रव ओतून ठेवाल त्याचा रंग आणि आशय त्या अगदी सचोटीनं दाखवितील किंवा तो तसा दाखवितात. त्या आपलं स्वत्व देखील विसरतील आणि तन्मय बनतील.

पण बाटल्यांच्या अंगी हा एवढाच गुण आहे काय ? केवळ आशय आणि रंग सचोटीनं दाखविणं एवढाच बाटल्यांचा गुण असं म्हणणारा नितान्त कृतघ्न म्हटला पाहिजे. बाटली आणि गुण यांचा जो अविभाज्य संबंध आहे तो केवळ याच संदर्भात नाही; तो निराळ्या आणि आजीव महत्त्वाच्या संदर्भात आहे हें सांगायची जरुरी आहे असं नाही. मनुष्याच्या जीवनांत सुख निर्माण करण्याच्या बाबतींत बाटलीला केवढं मोठं स्थान आहे पहा ! सुख निर्माण करणे हा शब्द तितकासा रुचत नसेल तर दुःख-निरास करण्यांत म्हणा पाहिजे तर. पण दुःखनिरास म्हणजे सुखाची सुरवातच ना ? मग झालं तर ! दुःखनिरास आणि सुखसंवर्धन हेच बाटलीचे सर्वांत मोठे गुण आहेत. आणि त्यांच्या जोरावर आपण आपली संसारयात्रा निरामयतेनं तरून जाण्याची आशा बाळगतों. असा एक मास सुना जात नाही, कीं ज्यांत बाटलीबाईची आराधना करावी लागली नाही. लहान असो थोर असो, राव असो रंक असो, मनुष्य असो प्राणी असो, सर्वांना हिचे पाय धरावे लागतातच; आणि हिच्याच कृपाप्रसादानं स्वास्थ्य मिळवावं लागतं. हीहि इतकी उदार आणि शीघ्रफलदायी आहे कीं नवीन युगाची देवता म्हणून हिची प्रतिष्ठापना केली तरी तिचे पांग पुरते फिटले असं होणार नाही.

आता यांतल्याच कित्येक बाटल्या पहा. त्यांनीं केव्हा ना केव्हा तरी माझी किरकिरणारी प्रकृति सुदृढ केली आहे; क्षीणतेची जाणीव घालवून नवा उत्साह निर्माण केला आहे; रोगटपणाची भावना निपटून निरोगी-पणाचा आल्हाद उत्पन्न केला आहे; अकारण खिन्नता घालवून चमकदार आशावाद दिला आहे. ही ही—चौकोनी बसकट गळ्याचीच बाटली घ्या. ही आता दिसायला बेडौल दिसते आहे खरी, पण ती केमिस्टच्या दुकानांतून आणली तेव्हा तिचा रुबाब काय होता पण ! आकर्षक रंगाचं भरीव सुबक खोकं, आंत लाटाकृति पुठ्ठ्याचं वेष्टण, आणि तोंडाशीं कापसाचं आच्छादन. शिवाय बाटलीवर तलम आणि नाजुक बुटीदार कागदाचं वेष्टण होतं तें निराळंच. तें काढतांच बाटलीच्या स्वच्छ स्वच्छ घोटीव काचेंतून आतल्या जांभळ्या किरमिजी रंगाच्या तरल द्रवाचं जें दर्शन झालं तें मन प्रसन्न करणारं खचित होतं, दुखण्यानं पिचलेल्या मनः-स्थितींत डॉक्टरनीं एखादी बाटली आणायला सांगितली म्हणजे रुग्ण ती

किती अधीरतेनं आणि आशावादीपणानं आणतो याची जाणीव प्रत्येकाला असतेच. भोगाचा नाश आणि निकोपतेचं सुख औषधरूपानंच जणूं कांही त्या बाटलींत साठवलं आहे, असं दुखणेकऱ्याला वाटत असतं. डॉक्टर-प्रमाणं औषधाच्या रूपरंगाचा परिणाम रोग्याच्या मनावर होत नसला, किंवा रोगी तशी आपेक्षा बाळगीत नसला तरी औषधाचं रंगरूप सुरेख असलं तर रोग्याच्या मनःस्थितीवर त्याचाहि परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. औषधाचा दर्शनीच अनुकूल असा परिणाम माझ्या मनावर झाला, आणि जेमतेम गेलेल्या जेवणावर पहिल्या दिवशीं मी जेव्हां तें घेतलं तेव्हां त्याची तुरट कडवट चव बराच वेळ माझ्या तोंडांत रेंगाळत राहिली. पण जों जों दिवस उलटूं लागले तों तों वाढूं लागलेल्या जेवणा-वर त्याची चव मला रुचूं लागली. आणि अखेरीस तर भरपूर गेलेल्या जेवणावर जर मी तें घेतलं नाही तर भरपूर जेवायचं समाधान मला मिळेनासं झालं, या असमाधानांत त्या औषधाची चटक लागल्याचं मला दिसून आलं. आणि ती भागविण्याकरितांच कीं काय—प्रकृति झक्क झाली असतांहि आणखी एक बाटली मी घेत राहिलों.

ही दुसरी चपटी बाटली पहा. ही इनोज फ्रूट सॉल्टची आहे हें न सांगताहि तुमच्या लक्षांत येईल; आणि टाईम्स पत्रांतून येऊन गेलेल्या फ्रूट सॉल्टच्या अनेक जाहिराती तुमच्या नजरेपुढून तरळून जातील. इनोजची बाटली चोरीस गेलेल्या त्रस्त कप्तानानं आपले सारे खलाशी एकत्र बोलावले आहेत, आणि त्यांना रांगेंत उभे करून तो त्यांची तपासणी करीत आहे. प्रवासानं अन् दगदगीनं सारेच मरगळले आहेत. मात्र एकच छाती पुढं काढून उत्साहानं मुसमुसून हंसतो आहे. त्याला पाहताच कप्तानाला शंका उरली नाही. या आणि अशा अनेक खुबीदार जाहिरातींनी त्या वेळीं अनेकांचे लक्ष वेधून घेतलं होतं. मीहि या जाहिराती मोठ्या उत्सुकतेनं पहात असे. मात्र त्यांना भुलून मी इनोजची बाटली आणली असं मात्र समजूं नका. जाहिरातींना दाद देणारा प्राणी मी नाही. मी इनोजची बाटली विकत घेतली ती ते पेय घेण्याची आणि घेताना गंमत वाटते म्हणूनच. उन्हाळ्याच्या दिवसात तर हें पेय घेण्यात निराळीच लज्जत असते. सकाळी उठावं तर हवेंत उष्मा आढळून येतो.

मग एक लखलखीत काचेचा ग्लास घेऊन त्यात स्वच्छ गार पाणी घ्यावं. मग दोन चहाचे चमचे भरून इनोजचं पांढरं शुभ्र द्रव्य तळहातावर घ्यावं आणि तें त्या पाण्यात टाकावं. तें पाण्यांत पडताच त्याची जी नाजूक फसफस होते ती किती बहारीची आणि रुचि वाढविणारी असते. ती संपण्यापूर्वींच ग्लास तोंडाला लावला पाहिजे. मग फसफसणारं हें पेय आपली आंबुस मधुर चव देत देत पोटांत उतरूं लागलं कीं आंतहि जी एक गार मधुर संवेदना होते ती मला तर फारच रुचते. इनोजच्या जाहिरातींत शपथेवर सांगितलेले शारीरिक फायदे मला झाले आहेत कीं नाहीत कुणास ठाउक. पण हें पेय घेताना आणि घेतल्यानंतर मला कांही वेळ तरी एक गोड समाधान लाभलं खरं! म्हणूनच मी तें वारंवार घेतो. डोकं दुखलंसं वाटलं, पोटांत बरं नाही असा संशय आला, अस्वस्थ वाटत असलं—तर घ्या इनोज. ब्रिजच्या खेळांत नियम आहे ना, कीं 'संशय वाटत असल्यास हुकूम खेळावा' म्हणून, तद्वत् कसलाहि संशय वाटत असला कीं इनोजचं हुकमी पेय मी घेतों. म्हणून इनोजच्या बाटल्यांची रांगच्या रांग तुम्हांला या कपाटांत दिसेल.

इनोजप्रमाणंच दुसऱ्या चपटया बाटल्या पहा. यांचा वास जरा घेऊन पाहिला तरी तुम्हांला कळेल कीं लव्हेंडरच्या बाटल्या आहेत. या लव्हेंडर इतकं दुसरं कोणतंहि सुवासिक द्रव्य मला प्रिय नाही. लव्हेंडरचा शान्त थंड सुवास मनाला विलक्षण आल्हाद देणारा आहे. बाहेर जातांना त्याचे चार थेंब कपड्यावर आणि हातरुमालावर शिंपडले कीं आपलं आणि दुसऱ्याचंहि मन प्रसन्न राहतं. लव्हेंडरच्या अनेक बाटल्या तुम्हांला यांत दिसतील; पण त्यांत ही फिरकीचं सोनेरी टोपण असलेली आणि चपटी पण मधून चिचोळलेली बाटली मला विशेष प्यार आहे. ही यार्डलेच्या लव्हेंडरची बाटली आहे. मी आतापर्यंत अनेक प्रकारचीं लव्हेंडरं वापरली असली तरी या बाटलींतल्या लव्हेंडरची सर त्यांना नाही. त्याची जातच उंची आणि अस्सल आहे. हें टोपण खोलून पहा, यांत अजूनहि रेंगाळणारा वास मी म्हणतो त्याची खात्री पटवील. यार्डलेचं लव्हेंडर आज मिळत नाही, तेव्हा त्याची रिकामी बाटली पाहूनच समाधान मानणं प्राप्त आहे.

'रिकामी बाटली पाहूनहि समाधान होतं तर ! ठीक. मग मी तरी हेंच म्हणत होतों मघा. म्हणून तुला या रिकाम्या बाटल्या देऊन टाकवत नाहीत. बाटल्या फार दुर्मिळ झाल्या आहेत, अन् त्या फार स्वस्थ झाल्या आहेत—या केवळ सबबी आहेत. महाराज, करा आता हें कबूल.' अन् ज्या बाटल्यांतून मला त्यांच्याविषयी वाटणारं प्रेम आणि कौतुक तुडुंब भरून राहिलं आहे,—त्या रिकाम्या म्हणायच्याच तरी कशा ?

"खरंच की—!" असं म्हणत मीच मान डोलावली.

---

## १७. मुखवटे

— म. ना. अदवंत

आपणाला जीवनांत अनेक वेळा अभिनयकुशल नटाची भूमिका करावी लागते. आपल्या मनांत निर्माण झालेल्या भावना दडवून निराळयाच भावनेचा मुखवटा आपणांला चेहऱ्यावर चढवावा लागतो आणि त्या चढवलेल्या मुखवटयाशी सुसंगत असा अभिनयहि करावा लागतो.

त्या दिवशींची गोष्ट पहा ! संध्याकाळीं साडेसहा वाजता 'दीदार' या चित्रपटाला जाण्याचा बेत आम्ही सकाळपासून ठरविला होता. त्यासाठी मी कॉलेजांतून लवकर घरीं यावयाचे, तिनेहि घरांतले सर्व काम आटोपून तयारींत राहावयाचे अशी योजनाहि आखून तयार झाली होती. त्याप्रमाणे कॉलेजांत त्या वेळीं एक समारंभ असतांनाहि कांहीतरी निमित्त सांगून मी लवकर घरीं सटकलो. सौभाग्यवतीहि खाद्य पदार्थ वगैरे तयार करून माझी वाटच पाहात होती. खाणे वगैरे आटोपून आम्ही बाहेर जाण्यासाठी चपला पायांत सरकाविल्या.

इतक्यांत दारावरची घंटा वाजली. आम्ही एकमेकांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. दोघांच्याहि कपाळांवर आठयांचे जाळे उमटले...

'कोण धडपडलं बुवा या वेळी!' अशा त्रासिक विचाराने मी दरवाजा उघडला! बाहेर भुसावळचा माझा मित्र बाळू व त्याची पत्नी उभी होती.

'काय? आलो ना अकस्मात् तुला कबूल केल्याप्रमाणे?' आंत येत हसत हसत बाळू म्हणाला, 'आज ऑफिसला दांडी देऊन मुद्दाम तुझ्याकडे येण्याचा बेतच ठरविला होता आम्ही. झालास कीं नाही आश्चर्यचकित?'

आश्चर्यचकित तर खरंच झालो होतो मी; पण तसं कांही न दाखविता सुहास्य वदनाने मी त्यांचे स्वागत केले. आम्ही दोन तीन तास खूप गप्पाहि मारल्या. गप्पा मारतांना, चहा-कॉफी घेताना आम्ही सतत भासवीत होतो कीं, ती दोघं आल्यानं आम्हांला फारच आनंद झाला. आमच्या चेहेऱ्यावरचा उल्हास व हास्य शेवटपर्यंत आम्ही ढळूं दिलं नाही. त्या हास्याच्या मागे केवढी तीव्र निराशा दडलेली होती याची त्या दोघांनाहि कल्पना नसेल. बोलपटाचा ठरविलेला कार्यक्रम चुकला म्हणून तर निराशा झाली होतीच; पण बाळू व त्याची पत्नी यांनी आम्ही भुसावळला गेलो असतांना आमची संभावना केली होती. पांचच मिनिटांत आम्हांला घराबाहेर काढून ते जे एका कार्यक्रमाला निघून गेले होते, तो प्रसंग आमच्या स्मरणांत ताजा होता. त्यांनी येऊन आमच्या कार्यक्रमाला मोडता घालावा याची आम्हा दोघांनाहि चीड आली होती. तरी पण चेहेऱ्यावर हास्याचे मुखवटे चढवून आम्ही त्यांचे स्वागत करावयास सिद्ध झालों होतो. केवळ शिष्टाचारासाठी व लौकिकासाठी हे मुखवटे आम्हांला चेहेऱ्यावर चढवावे लागले होते. अभिनयकुशल नटाची भूमिका आम्ही त्या वेळीं पार पाडली होती.

पण याचशा काय–जीवनांत अनेक प्रसंगी आपणाला ही अशी भूमिका करावी लागते व खोटे मुखवटे चेहेऱ्यावर चढवावे लागतात. जीवनांतील अगदी क्षुल्लक प्रसंगापासून ते अगदी गंभीर प्रसंगापर्यंत हे खोटे मुखवटे चेहेऱ्यावर चढविल्याशिवाय आपणांस गत्यंतरच नसते. आपले खरे मनोभाव जर प्रत्येक वेळी चेहेऱ्यावर प्रगट होऊं लागले तर आपणांला जीवन असह्यच होईल.

परवाचा अगदी क्षुल्लक प्रसंग पाहा ! बस चुकल्याने मी चालतच कॉलेजला निघालो होतो. नुकताच पाऊस झाला होता. रस्त्यावर खूप चिखल झाला होता. कॉलेजच्या जवळ आलो, तशी एक मोटार खूप वेगाने माझ्या जवळून गेली. आणि गेली ती माझ्या अंगावर चिखलाचा संपूर्ण शिडकाव करून. माझे सर्व कपडे त्यामुळे चिखलाने बरबटले. तोंडावरहि थोडासा चिखल उडाला. मनांत मी अतिशय चिडलो. इतक्या लांब घरीं जाणे आता अशक्य होते. शेवटी तसाच कॉलेजांत गेलो. पण कॉलेजांत जो तो माझ्या कपड्याकडे कुतुहलाने पाहूं लागला. कुणी हसूं लागले. ' काय हो, काय उडाले हे तुमच्या कपड्यावर ? ' अशी खोचक पृच्छा करून ते हसत होते. या सर्वांना मला चेहऱ्यावर हास्याचा मुखवटा चढवून तोंड द्यावे लागले. मनांतील चीड चेहेऱ्यावर दाखविणें शक्यच नव्हते. दाखविली असती तर अधिकच हास्याचा विषय बनलो असतो. मनांतून जरी मी संतापलो होतो, तरी मला याची गंमतच वाटत आहे असेच मी वरवर दाखवीत होतो.

असे स्वतः हास्यास्पद बनण्याचे प्रकार ज्या ज्या वेळी माणसावर येतात, त्या त्या वेळी हे मुखवटे माणसाला चेहऱ्यावर चढवावे लागतात. मनांत कितीहि संताप असला तरी मित्रांच्या चेष्टेला तुम्हांला हास्याचा बुरखा घालूनच तोंड द्यावे लागते. तो बुरखा त्या वेळी जरा निसटला तर तुम्हांला अधिकच हास्याचा विषय व्हावे लागते.

नको असलेले लोक ज्या वेळी आपणाकडे येतात त्या वेळी तर हे चेहेऱ्यावर चढविलेले मुखवटे मोठ्या कसोशीने सांभाळावे लागतात. कारण जरा मुखवटा बाजूला झाला कीं, भेटायला किंवा पाहुणा म्हणून आलेल्या व्यक्तीचा अपमान होईल कीं काय अशी सारखी भीति वाटत असते. तसा अपमान झाल्याने आपले नुकसान होत नसले तरी आपल्या भिडस्त मनाला ते पटत नाही. माझी पत्नी या बाबतींत मोठी कुशल आहे. मला जे साधत नाही, ते ती अनेकदा साधून दाखविते. मला अप्रिय वाटणारी व्यक्ति आली तर मी हास्यमुद्रेने स्वागत करीन; पण हळूहळू ते हास्य लोप पावून त्या जागी कंटाळा येऊं लागेल. जांभया येऊं लागतील. काय बोलावे ते सुचेनासे होईल. त्या अप्रिय व्यक्तीला सूचना

मिळण्याइतका बदल पटकन् माझ्या चेहऱ्यांत होतो. माझ्या चेहऱ्यावरील खोटा मुखवटा मी फार वेळ टिकवूं शकत नाही; पण माझ्या पत्नीच्या कौशल्याचे व चिकाटीचें मात्र मला कौतुक वाटते. तिला ज्या स्त्रीविषयी अत्यंत तिटकारा आहे, अशी स्त्री तिच्याकडे एकदा आली. मी मोठ्या अपेक्षेने आतील संभाषणाकडे कान लावून बसलो. आता या दोघींची खडाजंगी ऐकू येईल. अशी माझी अपेक्षा होती; पण दोन तास झाले तरी स्वर चढलेला ऐकूं येईना. म्हणून आंत जाऊन पाहतो तो दोघीहि हास्यमुद्रेने गप्पा मारीत बसल्या होत्या! माझ्या पत्नीने विणकाम, भरतकाम दाखविले होते व तिचे त्या स्त्रीने कौतुक केले होते. आता ती जोराचा आग्रह करीत होती व ती स्त्री 'नको नको' म्हणत असून समोर ठेवलेले खाद्य पदार्थ खाण्याचा तिला आग्रह करीत होती. जणू फार दिवसांनी जिवाभावाच्या मैत्रिणी भेटल्या असें ते दृश्य होते. दोघींनाहि एकमेकींविषयी काय वाटते ते दोघीहि ओळखून होत्या; पण चेहऱ्यावर मात्र त्याची छटाहि नव्हती. अभिनय-कौशल्यांत त्या दोघीहि एकमेकीशीं चढाओढ करीत आहेत कीं काय असाच मला क्षणभर भास झाला!

त्याच्या उलट, माझं मत ज्याच्याविषयी विशेष चांगले नव्हते असा एक विद्यार्थी आला, त्या वेळी 'मी कामांत आहे. मला वेळ नाही मला कॉलेजांत भेटा.' असें सांगून अर्ध्या मिनिटांतच त्याला मी वाटेला लावले. माझ्या पत्नीला ते तितकेसें आवडलें नाही. एखादी व्यक्ति आपणाला कितीहि आवडत नसली तरी तसे आपण दाखविता कामा नये, असे तिचे स्पष्ट मत होते. आपल्या मनोभावना इतक्या उघडपणे व इतक्या प्रामाणिकपणे आपण दाखवूं लागलों तर व्यवहारी जगांत आपण टिकणार नाही. जगांत सगळीकडेच अशी फसवणूक चालली आहे, त्यांत आपणांलाच प्रामाणिक राहणं कसं जमेल? असं ती नेहमी बोलून दाखवी.

या तिच्या विधानाचा अनुभव खरोखरच योगायोगाने मला आला. एकदा एका लहान गावांत व्याख्यानासाठी मला आमंत्रण आले होते. त्याप्रमाणे मी त्या गावाला गेलो. संध्याकाळी व्याख्यान झाल्यावर

रात्रीच्या गाडीने मी निघण्याचे ठरविलें. ज्या गृहस्थांकडे मी उतरलो होतो, ते त्या व्याख्यानमालेचे चिटणीस होते. रात्रीची गाडी गैरसोयीची होती, पाऊसहि थोडा पडत होता. तेव्हा त्या गृहस्थाने रात्री तेथेच मुक्काम करण्याचा मला खूप आग्रह केला. माझ्यासारख्या विद्वान् (?) माणसाचे पाय नाही तरी त्याच्या घरीं कशाला लागणार होते ? रात्रीं मुक्काम केला तर तेवढाच अधिक सहवास लाभेल व अधिक आदरातिथ्य करता येईल असेहि आर्जवाने तो सांगू लागला. त्याच्या चेहेऱ्यावरील ती उत्कटता व आर्जवीपणा पाहून माझेंहि मन डळमळूं लागले. जेवण झाल्यावर हात धुण्यासाठी मी अंगणांत गेलो. पण तपेली विसरल्याने परत फिरलो, तेवढयांत स्वयंपाकघरांतील खालील संवाद मला ऐकूं आला--

' कशाला ही पीडा ठेवून घेताय ! जाऊं द्या त्याला रात्रीं ! ' चिटणिसांची पत्नी त्यांना दबलेल्या आवाजांत म्हणत होती.

' अग कोण ठेवून घेतंय ! मी आपलं आग्रहाचं चंद्रबळ आणलंय ! हवीय् कुणाला ही कटकट घरीं !' चिटणिसांचा आवाज आला.

मनाशीच हसत मी पाऊल न वाजवता परत मागे आलो व तेथूनच ओरडून चिटणिसांना हात धुण्यासाठी तपेली नसल्याचें सांगितले.

तावडतोब तो धावत तपेली घेऊन बाहेर आला. आपल्या पत्नीच्या वेंधळेपणाबद्दल जरा स्वर चढवून त्याने नापसंती व्यक्त केली व जणू कांही तपेली ठेवण्याचे विसरण्यांत आपण पाहुण्याचा किती अनादर केला असा भाव चेहऱ्यावर आणून तो उभा राहिला.

' मी जाणार बरं का आज रात्रीच्या गाडीने ! ' मी हात धुता धुता आपला निर्णय जाहीर केला.

' आं ! ' तोंडावर आत्यंतिक आश्चर्याचा मुखवटा चढवून त्यानें म्हटलें, ' अहो असं कुठं झालंय ! कधी नव्हे ते आमच्याकडे तुम्ही आलांत. इतक्या घाईनं आम्ही कसं सोडू तुम्हांला ? बरं कां ग, प्रोफेसरसाहेब आताच्या गाडीनं निघायचं म्हणतात ! मी साफ सांगितलं कीं आज आता राहायलाच पाहिजे म्हणून.'

'अय्या ! आत्ताच्या गाडीने ?' त्याच्या पत्नीनेहि त्याच्या अभिनयाला साथ दिली– 'छे छे ! रात्रीं अपरात्रीं कुठे जाताय् ? आमच्या गरिबांच्या घरची मीठभाकरसुद्धा धड खाल्ली नाही तुम्ही. उद्या पुन्हा तुमच्यासाठी चक्का सांगून ठेवलाय्.'

दोघांनी राहण्याचा आग्रह करण्यांत अहमहमिका चालविली होती. मी मात्र मनांतल्या मनांत हसत होतो. एकदा तर यांची चांगली जिरविण्यासाठी करावाच मुक्काम, असाहि दुष्ट बेत मनांत येऊन गेला; पण तो क्षणभरच. मी त्यांना अनेक सबबी सांगून माझे रात्रीचे निघण्याचे महत्त्व पटवून दिले. माझ्या चेहऱ्यावर मी असा कांही भाव आणला होता कीं, त्यांना वाटावे यांचा आग्रह मोडून जाण्यांत मला केवढे तरी दुःख होत आहे ! शेवटी नाइलाजाने त्यांनी टांगा आणला व माझे सामान टाकले.

'पहा बुवा ! आम्हांला फार वाटत तुम्ही अद्याप रहावं असं ! अहो, तुमच्यासारख्या थोरांचा सहवास आम्हांला तरी कधी मिळायचा आहे काय ?' त्यांनी दुजोऱ्यासाठी पत्नीकडे पाहून म्हटले.

'हो तर काय ! पण प्रोफेसरसाहेबांनी आमचं अगदी ऐकायचं नाही असं ठरविलेले दिसतंय !' तिने दीर्घ सुस्कारा टाकीत नवऱ्याला साथ दिली. मी त्यावर हसत कांहींतरी उत्तर दिले व टांग्यांत बसलो. दोघांनी मला नमस्कार करून म्हटले, 'आता पुन्हा जरूर आलंच पाहिजे हं !'

मी कांही उत्तर देण्याच्या आतच टांगा चालू झाला, अन् माझी खात्री आहे कीं, टांगा दृष्टीआड होताच त्या दोघांनी आपल्या तोंडावरील मुखवटे काढले असले पाहिजेत व एकमेकांना म्हटले असले पाहिजे. 'गेली पीडा एकदाची !' मला त्या दोघांचा अभिनय आठवून गाडीत सारखे हसूं येत होते.

संकटाच्या किंवा आत्यंतिक दुःखाच्या प्रसंगी मात्र सामान्य माणसाला खोटे मुखवटे चेहेऱ्यावर चढविणे कठिण जाते. अंतःकरणांत निर्माण झालेली भीति किंवा उत्पन्न झालेला शोक चेहेऱ्यावरून पुसून टाकून त्यावर हास्याचा, गांभीर्याचा मुखवटा चढविणे हे सोपे काम नाही.

पण तेहि अनेकदा करावे लागते. माझा एक मित्र या बाबतींत फार कुशल नट आहे. एकदा त्याला परगावी असलेली त्याची पत्नी अतिशय आजारी असल्याची तार आली. ही बातमी समजल्यावर आम्ही सर्वजण त्याच्या खोलीवर जमलो. त्याला जरा धीर द्यावा हाच आमचा त्याच्या खोलीवर जाण्याचा उद्देश होता. पण गंमत अशी झालीं कीं, आम्हा सर्वांची तोंडे रडकी होती; तर त्याच्या चेहेऱ्यावरचे हास्य कांही ढळले नव्हते. एकीकडे आपल्या प्रवासाची तयारी करीत असतांना दुसरीकडे त्याचा नेहमींचा हास्यविनोद चाललाच होता. एकदा तर आमच्या वृत्तींतील गांभीर्य पाहून तो विनोदाने म्हणाला, 'हे काय लेकांनो, स्वतःची बायकोच मरणाच्या दारांत असल्यासारखे सुतकी चेहेरे करून बसलां आहांत !' आपल्या पत्नीवर त्याचें किती प्रेम आहे याची आम्हांला कल्पना नसती, तर खात्रीने आम्ही त्याची दगडांत गणना केली असती, आणि त्यामुळेच त्याच्या या अभिनयाने आम्ही दिपून गेलों. आम्ही थोडया वेळाने बाहेर पडलों आणि त्याच क्षणी त्याने धाड्दिशी दार लावून घेतले. माझी खात्री आहे कीं, इतका वेळ अतिप्रयासाने दाबून ठेवलेल्या अश्रूंना आमची पाठ फिरताक्षणीच त्याने वाट करून दिली असेल. पण त्याचा निग्रह अलौकिक खराच ! संकटाच्या प्रसंगी गडबडून गेलें असतांनासुद्धा धैर्याचा मुखवटा चेहऱ्यावर चढविणे फार थोडयांना साधतें. शोकप्रसंगी तर सहानुभूतीच्या चार साध्या शब्दांनी आपल्या डोळयांतून गंगा-यमुना येऊं लागतात. अशा प्रसंगी शांत व धीरोदात्त मुद्रा ठेवणाऱ्या व्यक्तींविषयी मला अतिशय कौतुक वाटतें आणि मला ते कधीच जमत नाही म्हणून त्याच्याबद्दल मला थोडाफार हेवाहि वाटू लागतो. संकटाचा लहानसा ढग जरी माझ्या मस्तकावर आला, तरी माझा चेहरा गोरामोरा होतो, आणि प्रयत्न करूनहि माझ्या भावना मला लपविता येत नाहीत. ज्यांना ही गोष्ट साधते त्यांच्याविषयी त्यामुळे साहजिकच मला कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही.

दररोजच्या जीवनांत तर असे निरनिराळे मुखवटे चेहऱ्यावर चढविण्याचे प्रसंग कितीतरी वेळा येत असतात. अधिकाऱ्याने अपमान केला असतानाहि लाचारीचें हास्य चेहऱ्यावर ठेवणारे कारकून,

एकमेकांच्याविषयी एकमेकांच्या मनांत संतापाचा ज्वालामुखी धुमसत असतांनाहि चेहऱ्यावर हास्याचा मुखवटा चढवून एकमेकीशीं बोलणाऱ्या जावा जावा, तीव्र संतापाची ऊर्मि मनांतल्या मनांत दाबून चेहऱ्यावर नम्रभाव धारण करून खाष्ट सासूपुढे काम करणाऱ्या सुना–एक ना दोन ! जरा भोवताली नजर टाकली कीं, राजकारणाच्या क्षेत्रापासून तो शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रापर्यंत जिकडे तिकडे खोटे मुखवटे चढविलेले चेहरे दिसतील. अभिनयसंपन्न नटाची भूमिका करण्याचा प्रसंग दिवसांतून किती तरी वेळा माणसावर येत असतो !

चेहऱ्याला मनाचा आरसा समजतात; पण तें कितपत खरे आहे याचा मात्र हे मुखवटे पाहताना प्रश्न पडतो. आपल्या अंतःकरणांतील भावनांचें प्रतिबिंब चेहऱ्यावर न उमटूं न देण्याचा प्रयत्न आजचा मानव अधिक करीत असतो. त्यामुळे माणसाच्या चेहऱ्यावरून त्याच्या मनांतील भावना आपणांला आज कळतीलच असे नाही. त्याच्या चेहऱ्यावर आपणाविषयी आदराची भावना दिसत असली तरी मनांत आपल्या-विषयी द्वेषाची भावना असण्याचा संभव अधिक. त्यामुळे आपलें जीवन गुंतागुंतीचे झालें आहे. आपल्या भोवतालच्या माणसाची खऱ्या स्वरूपांत ओळख पटणें आपणाला अशक्य झालें आहे. 'दिसतें तसें नसतें' ही म्हण यथार्थतेने माणसाच्या बाबतींत अधिक खरी ठरूं लागली आहे.

धूर्त व लबाड माणसांच्या बाबतींत तर हे मुखवटे फारच धोक्याचे ठरतात. त्यांच्या चेहऱ्यावरील निष्पाप भावनेवर—सौजन्याच्या भावनेवर—विश्वास ठेवणाऱ्या भोळ्या लोकांना त्याबद्दल अनेकदा अद्दल घडली असेल. माझ्या ओळखीच्या एका गृहस्थाला त्यामुळे नोकरीला मुकण्याचा प्रसंग आला. त्याच्या ऑफिसांतील एक गृहस्थ सतत त्यांच्या-कडे येत असे, त्याच्याबद्दल आस्था, सहानुभूति दाखवीत असे, त्याच्यावर अन्याय झाला तर त्याबद्दल चीड व्यक्त करीत असे. अधिकाऱ्याबद्दलच्या त्याच्या तक्रारी, तो सहानुभूतिपूर्वक ऐकून घेत असे. त्यामुळे आपला अत्यंत जिव्हाळ्याचा मित्र म्हणून त्या गृहस्थानीं याला वागविण्यास सुरुवात केली. आणि एके दिवशी त्याच्या हातांत नोटीस पडली. कारण माझ्या त्या ओळखीच्या गृहस्थाची जागा आपणाला मिळावी

म्हणून पद्धतशीर रीतीने तो गृहस्थ त्याच्या संभाषणांतील शब्द न् शब्द त्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पोहोचवीत असे. आणि इतके करून नोकरी गेल्याबद्दल सहानुभूति दाखविण्यास यावयालाहि या गृहस्थाने कमी केले नाही. तेव्हा असे मुखवटे मोठे धोक्याचेच समजावयास हवेत.

पण अशी कांही उदाहरणें सोडून दिली तरी आपल्या दररोजच्या जीवनांत मुखवटयाचें महत्त्व आपल्याला मान्यच करावे लागेल. मनांतील भावनांवर ताबा ठेवणे हेहि तितकेच सुसंस्कृतीचें लक्षण आहे, त्याचप्रमाणे भावनाविष्कारावर ताबा हेहि तितकेच सुसंस्कृतीचें लक्षण आहे. हरघडी आपल्या मनांतील भावना आपण चेहेऱ्यावर दाखवूं लागलो, तर मोठा कठिण प्रसंग येईल. प्रा. चिं. वि. जोशांच्या चिमणरावांना स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग करतांना जो अनुभव आला, तो आपणांला सतत येऊं लागेल आणि फारसा सुखदायक ठरणार नाही हें निश्चत.

पशु व मानव यांमध्ये हाच तर फरक आहे. संताप आला कीं, कुत्रा भुंकूं लागतो, मांजर फिसकारूं लागतें, बैल शिंगें रोखतो, नाग फणा उभारतो; पण रागावलेला माणूस अनेक वेळा हास्यमुद्रेने आपल्या प्रतिपक्षाचें स्वागत करतो. अंत.करणांत तेज असेल तर चेहऱ्यावर कधी तो राग दाखवील, शोक असेल तर चेहऱ्यावर गांभीर्य, कदाचित् हास्यहि दाखवील, भीतीची भावना मनांत असेल तर चेहऱ्यावर बेडर वृत्ति दाखवील. आपल्या मनाचा ठाव लागूं न देणाऱ्याला आंतल्या गाठीचा असें म्हणण्याची पद्धत आहे. पण कमीअधिक प्रमाणांत प्रत्येकाला असा मुखवटा घ्यावा लागतोच. क्षणाक्षणाला आपल्या अंतःकरणांतील भावनांचें चेहऱ्यावर प्रतिबिंब पाडणारा मनुष्य उथळ स्वभावाचा असतो आणि व्यवहारांतहि तो फारसा यशस्वी होतोच असें नाही ! मग ‘साधा भोळा’ म्हणून त्याची तुम्ही स्तुति करा हवी तर !

म्हणून माणसाची व्याख्या करावयाची झाली तर ‘मुखवटे घालणारा प्राणी’ अशी मी तरी करीन. मुखवटे कृत्रिम असतात. खऱ्या स्वरूपाची ते ओळख होऊं देत नाहीत. हें खरें असलें तरी अनेक वेळा हे मुखवटे त्यामागील अत्यंत कुरूप चेहरा झाकून टाकतो हें तरी आपणाला मान्य

करावयास हवें. आपल्या अंतःकरणांतील अनिष्ट भावनांना हे मुखवटे असेच झाकून टाकतात आणि त्यामुळेच मानवास जीवन जगणें शक्य होतें.

आपल्या जीवनांतील विविध प्रसंग आठवून पहा. तुम्हांला निश्चित आढळेल कीं, आपल्या अंतःकरणांतील खऱ्या भावना आपण चेहऱ्यावर त्या त्या प्रसंगी व्यक्त केल्या असत्या, तर नाही नाही त्या प्रसंगांना आपणाला तोंड द्यावें लागलें असतें. सतत खटके उडाले असते. स्वतःच्या पत्नीचाहि रोष अनेकदा तुम्हांला ओढवून घ्यावा लागला असता. थोडक्यांत, तुम्हांला जीवन असह्य झालें असतें. या सर्व प्रसंगी या खोटया मुखवटयांनी तुम्हांला वाचवलें आहे आणि आपण अभिनयकुशल नटाची भूमिका किती कुशलतेने करतों याची तुम्हांला जाणीव करून दिली आहे.

‘ मानव म्हणजे खोटे मुखवटे धारण करणारा प्राणी ’ ही व्याख्या आता तरी मान्य होईल ना तुम्हांला ?

---

# १८. सावळाच रंग तुझा !

— के. ज. पुरोहित

परवा आम्ही गाण्याच्या एका बैठकीला गेलो होतो. आम्ही म्हणजे चिपळूणकरांच्या काळच्या प्रतिष्ठित वाक्प्रचाराप्रमाणे मी एकटाच नव्हे तर माझे मित्र आणि मी. गायिका ‘ सावळाच रंग तुझा ’ हें भावगीत गात होती आणि मी सारखा डोलत होतो. माझे डोलणे कदाचित् आवश्यकतेपेक्षा जास्त होत असावें. कारण माझ्या शेजारीच बसलेल्या माझ्या एका जाणत्या मित्राने मला टोकलें. “ ए, बावळटासारखा डोलतोस का ? तूं डोलतोयस का झिंगतोयस ? ” मी त्याला उत्तर दिले, “ हे डोलणं आहे कीं झिंगणं हे ठरवावयाला तुझी जीभ मोकळी आहे. पण मी एकटाच डोलत नाही. सगळे श्रोते माझ्यासारखेच डोलताहेत. ”

" तूं इतरांसारखा डोलतोयस. गाण्यांत आज रंग नाही हें ठाऊक आहे तुला. गायिकेची तब्वेत नादुरुस्त आहे व ती नुसती वेळ मारून नेतेय हें माहित आहे ना तुला ? " माझ्या मित्राला आलेला बोलण्याचा झटका थोडक्यात् थांबणारा नव्हता. मलाहि बोलणे भाग पडले.

" हें बघ, गायिकेची तब्येत कशी आहे, तिचे आणखी काय बिघडलंय या बारकाया आगाऊ जाणण्याइतके लोक तुझ्या-माझ्यासारखे चौकस कुठं आहेत ? त्यांना जें ऐकायला मिळतंय ते कामापुरते गोड आहे की नाही एवढंच ते पाहणार. रंगतीबद्दल म्हणतोस तेंहि बरोबर नाही. त्यांच्या डोलण्यांत तूं टीका करावी असं कांहीच नाही. भावगीत रंगवायला फार मोठी तयारी लागते असं नाही. अर्थाला उठाव आणण्याइतपत समज असली की पुरे. थोडासा अर्थ आणि थोडासा गोडवा यांचं माफक मिश्रण मैफलीला पुरतं. तेवढं गाण्यांत नक्की आहे. "

" पण त्यासाठी एवढं डोलायला नको "

" खरं सांगू ? तुझं लक्ष नसतांना मघा मी तुझ्याकडे बघितलं तेव्हा तूं देखील डोलत होतास. "

" मी ? छट् असल्या मामुली गाण्याला मी चुकून मान डोलवणार नाही. "

" माझं बोलणं ऐकून घ्यायचं नसलं तर वादच मिटला. तेवढाच श्रोत्यांच्या एकाग्रतेंत व्यत्यय कमी होईल. पण तूं ऐकणार असशील तर मी तुला पटवूं शकेन की डोलण्यांत चूक नाहीच मुळी, तूं किंवा मी काय सगळा श्रोतृवृंद— शेकडा नव्वद श्रोते तरी डोलत आहेत, अगदी मनोमन खूष आहेत. ते कां ? "

माझ्या मित्राच्या प्रश्नाला मी जें उत्तर दिलें तेंच मी आता सांगणार आहे. पण त्यापूर्वी मी त्याला विचारलेला एक प्रश्न सगळ्यांना विचारणार आहें. कारण त्या प्रश्नांतच माझें उत्तर सामावलेले आहे. मी माझ्या मित्राला मिस्किलपणे प्रश्न विचारला, " मालक, तुमचा स्वतःचा रंग कोणता ? " ' सावळाच रंग तुझा ! हें गाणे ऐकतांना माझ्या जाणत्या मित्राची सुद्धा मान हलली होती, हें ज्यांच्या लक्षांत असेल त्यांना आता माझ्या मित्राचा रंग कळला असेलच.

श्रोत्यांतील बहुतेक लोक खूष होते याचे कारण तरी हेच. अगदी गोऱ्या भराऱ्या वर्णभिमानी बायका, आणि त्याच बायकांच्या वळणावर गेलेले पांचपंचवीस शेलके पुरुष सोडले तर बाकीच्या बहुसंख्य श्रोत्यांनी खूष व्हावे असंच ते गाणं नव्हतं का ? 'सावळाच रंग तुझा !' हे श्रीकृष्णाच्या निमित्ताने आपल्या वर्णालाच आवाहन आहे, आपल्यालाच उद्देशून आहे, असेच बहुतेकांना वाटले असेल. अगदी काळचाकुळकुळीत लोकांनी सुद्धा ते गाणे ऐकतांना आपल्या हाताकडे—सोयीच्या दृष्टीने तळहाताकडे— पाहिले असेल; आणि मनांतल्या मनांत म्हटले असेल, "आपण इतके काळे नाहीच मुळी; आपला तळहात तरी सावळाच आहे. वरची कातडी उन्हामुळं तापून थोडीशी काळवंडली आहे इतकंच. बाकी आपला रंग एकंदरीत सावळाच हं." या विचारानं खूष होत आवडीने त्यांनी वें पालुपद श्रवण केलं असेल— 'सावळाच रंग तुझा !'

गाण्यांतील गोडवा आणि अर्थांतले सौहार्द यांच्या मीलनामुळे प्रभावित होऊन नुसत्या कृष्णवर्णी लोकांनाच तें गाणे आवडलें नसेल. आपली गणना गोऱ्यांत व्हावी असा एरवी विचार करणाऱ्या लोकांनी देखील मनांत म्हटलं असेल, "मी कांही तसा अगदीच गोरा नाही. खरं म्हणजे मी सावळाच; थोडा उजळ सावळा म्हणतां येईल मला फार तर." मध्यम वर्णाचे लोक — ज्यांचा रंग ना काळा ना गोरा — तर त्यावेळी बेहद्द खूष झाले असतील आणि समजत असतील, "बस याला म्हणतात काव्य आणि यालाच म्हणतात गायन."

'सावळाच रंग तुझा !' या गाण्यावर लोक कां डोलतात या प्रश्नाचे मी शोधून काढलेले कारण ऐकून माझा तो मित्र म्हणाला, "एक तर तूं मूर्ख असला पाहिजे किंवा लोक तरी."

माझे म्हणणे असे कीं माझा मूर्खपणा असलाच तर तो असले कारण शोधून काढण्यांत आहे. मी दिलेले कारण चूक असेल तर बोलणंच संपलं; पण तें तसे नसेलहि कदाचित्, आणि माझी कारणमीमांसा खरी असली तरी लोक मूर्ख आहेत हा माझ्या मित्राचा आक्षेप उरतोच. त्यावर माझी स्पष्ट कबुली अशी कीं

लोक मूर्ख बनले याबाबत माझा वाद नाही. पण या मूर्ख लोकांबद्दल मला एकच गोष्ट अभिमानाने सांगावयाची आहे. शेलीबद्दल स्टीव्हनसनने कुठं तरी म्हटले आहे की, " शेली हा एक मूर्ख तरुण होता " आणि लगेच दुसऱ्या दमांत त्याने उद्‌गार काढले आहेत, " शेलीसारखे जास्तींत जास्त मूर्ख या जगांत असते तर किती चांगले झाले असते. " मैफलींतल्या ' सावळाच रंग तुझा ' या गाण्यावर डोलणाऱ्या ' मूर्खाबद्दल ' मला अगदी हेच म्हणावसं वाटतं. त्या गाण्यावर डोलणारे लोक एकापरी मूर्खच नाहीत का ?

सावळा म्हणून ओळखला जाणारा रंग नेमका सांगा असा जर कुणाला प्रश्न केला तर मला नाही वाटत, " हाच तो रंग " असे कुणी ठामपणे सांगूं शकेल. कारण लाल गव्हाचा रंगहि सावळाच आणि पावसाळी नभाचा रंगहि सावळाच. धड गोराहि नाही आणि धड काळाहि नाही अशा या रंगाचे बारा नमुने माझ्या एका चित्रकार मित्राने मला एकदा काढून दाखवले होते. माझ्या चित्रकार मित्रापेक्षा तरबेज असा एखादा कुशल चित्रकार कदाचित् बाराशे नमुने काढून दाखवूं शकेल. पण विवक्षित रंग म्हणजे सावळा असे माझा चित्रकार दोस्त सांगूं शकला नाही; सांगता येणे सोपेहि नाही. कारण उघड आहे. सावळ्या रंगाबद्दलची कल्पनाच मुळांत अत्यंत लवचिक आहे. कृष्णाचा रंग त्याच्या नांवांतच व्यक्त होतो असे एकीकडे समजायचे; तर त्याला श्याम हें नांव देऊन दुसऱ्याच रंगाची कल्पना करायची. रामपंचायतनाच्या सुप्रसिद्ध जर्मन चित्रांतल्या रामाचा रंग पाहावा तो थेट चकचकीत निळा. आमच्या विठ्ठलानें तर कमालच केली. नांव काय तर पांडुरंग; रूप पहावे तर तें स्वच्छ काळे आणि वर्णन ऐकावे ते सावळे ! इतका हा रंग मोघम आहे. एखाद्या चक्क काळ्या माणसाविषयी आपला ग्रह चांगला असेल तर त्याच्या दुर्दैवी रंगाला पोटांत घेण्याइतकी उदारता या सावळ्यांत आहे, तेंच एखादीबद्दल नाक मुरडायचे असेल तर तिला दुखवण्याइतपत दंशहि या सावळ्यांत आहेच. एखाद्या सावळ्या व्यक्तीला आपण बिनदिक्कत विचारूं शकतो, " अमुक एक तुझ्यासारखा गोरा आहे की काळा ? " इतका हा

सावळा रंग ऐसपैस व सोईचा आहे. माझ्या परिचयांतल्या एका अँग्लो-इंडियनाने आपल्या बायकोची माहिती सांगतांना Brunette ब्रूनेट—म्हणून वर्णन केलें. शब्दकोशावर वाढलेल्या माझ्या इंग्रजी ज्ञानाप्रमाणे मला वाटले ती असेल पक्क्या रंगाची; प्रत्यक्ष तिला पाह्यले तों ती चांगली गोरी भरारी. पण अँग्लोइंडियनांच्या कल्पनेप्रमाणें ती होती म्हणे Brunette ब्रूनेट—सावळी.

सावळ्या रंगांत मनोरम असे कांहीच नसते असे मात्र मला म्हणावयाचे नाही. किंबहुना आपल्या मनाला मोहविण्यासाठीच या कल्पनेचा जन्म झाला आहे असे मी म्हणेन. काश्मीरपासून कन्याकुमारी-पर्यंत पसरलेल्या निरनिराळ्या वर्णछटा घेऊन जन्मलेल्या आम्हा लोकांना पडलेले तें एक स्वप्न आहे. वर्णवर्णांतील भेदामुळे उत्पन्न झालेलें अंतर मिटविणारा तो एक सुंदर व सहानुभूतीने भरलेला आभास आहे. या गोड आभासाचा उपयोग नुसत्या शामसुंदराच्या मूर्तीसाठी न करतां हाडामासाच्या बाबतींतहि आम्ही करीत असलो तर त्यांत गैर कांहीच नाही. उलट वास्तवतेला हूल देऊन तिच्यावर मात करण्याचा कुशल प्रयत्न त्यांत आहे. काळ्या रंगांवर पांढऱ्या पावडरीचा पोत मारून कृत्रिम व अस्थिर वर्णसंकर करण्याच्या भाबड्या खटाटोपापेक्षा सावळ्या रंगाच्या उपयोगी व उपकारी कल्पनेने काळ्या आणि गोऱ्यांतील विरोध नष्ट करणाऱ्या आमच्या दृष्टींत काव्य नाही असे कोण म्हणेल ? किंबहुना सावळ्या रंगांतील सुंदरतेचे अस्तित्व जर कुठं खरोखरच असेल तर तें आमच्या काव्यमय दृष्टींतच.

जीवन रसमय व्हायचे असेल तर अशा काव्यमय दृष्टीची, असल्या अनेक आभासांची अत्यंत आवश्यकता आहे. आजकाल जीवनाविषयी सर्वसाधारण अनास्थाच आहे असे विचारवंतांना वाटते. या उदासीन-तेचे एक कारण हें की असले आभास दवसेंदिवस कमी होत आहेत. आमची किती तरी स्वप्ने परिस्थिति जमीनदोस्त करीत आहे आणि त्यामुळे जीवन म्हणजे एक प्रचंड, अपरिहार्य कंटाळवाणी कटकट वाटू लागली आहे. या रोगट वृत्तीचा नायनाट करायचा तर मनुष्याच्या मनाला मोहविणारे, गुंतविणारे जास्तींत जास्त आभास निर्माण व्हायला

हद्देत. देश म्हणजे दगड-धोंड्यांनी भरलेले अमुक एक क्षेत्रफळ या रूक्ष अर्थापेक्षा राष्ट्र ही कल्पना अधिक कार्यप्रवण नाही काय ? एकचतुर्थांश जमीन आणि तीनचतुर्थांश पाणी--नुसतंच पाणी -- या भौगोलिक सत्यापेक्षा जग म्हणजे एक मोठे कुटुंब ही कल्पना उदात्तनाही का ? या सगळ्या कल्पना आहेत आणि त्या मानण्यावरच अवलंबून आहेत. सावळा रंग ही सुद्धा कल्पनाच आहे. त्या कल्पनेची जात जरा निराळी असेल; पण तिच्या मुळाशी एकच प्रवृत्ति आहे--माणसाची आभास-प्रियता. पण या नीरस वादापेक्षा थेट हृदयाला भिडणाऱ्या कला-संवादाची पद्धत अधिक रोचक नाही का ? मानवी जीवनांत कलांचे महत्त्व आहे ते याच कारणामुळे ! मानवी जीवनाच्या रिकाम्या फुग्यांत आभासाची, कल्पनेची हवा भरून त्याला आकाशांत उडायला लावण्याचे काम कलाच करीत असतात. या कलात्मक वृत्तीनेच आपल्याला सावळा रंग दिला आहे; अशाच अनेक स्पृहणीय कल्पना दिल्या आहेत. त्या केवळ जुन्या म्हणून टाकाऊ ठरत नाहीत किंबहुना कलेच्या क्षेत्रांतल्या कल्पना जितक्या जुन्या तितक्या त्या अधिक मुरलेल्या, अधिक चविष्ट.

स्वतःला उगीचच विज्ञानवादी समजणाऱ्या कांही लोकांना माझे हे विचार कदाचित् धोक्याचे वाटतील. कल्पनांची, आभासांची ही तरफ-दारी विज्ञानाला पटत नाही असा त्यांचा गैरसमज झाला असल्यास माझें त्यांना एकच उत्तर आहे. विज्ञान मनुष्याच्या जीवनांत अधिकाधिक सोयी आणि वस्तु निर्माण करते--काव्य नव्हे. माणूस जगतो मरतो ते काव्यासाठी, वस्तूंसाठी नव्हे. वस्तूंसाठी जगणाऱ्यांना मी माणसे म्हणणार नाही. त्यांना फार तर सुसज्ज द्विपाद म्हणता येईल. तथाकथित वास्तववादावरील किंवा विज्ञानवादावरील हा कोरडा किंचित् जोराचा आहे, याची मला कल्पना आहे. थोड्या नरम शब्दांत समजावयाचे तर असे म्हणता येईल कीं वास्तववादी किंवा विज्ञानी झाला तरी तो चोवीस तास तसाच राहणार नाही. त्याच्या वैवाहिक संबंधांत त्याला प्रिय असणाऱ्या अनेक कल्पना असतील. भास असतील; ध्येयं असतील. नाहीतर शास्त्रज्ञ, तर्कशास्त्री, तत्त्वज्ञ यांच्या एकांगी दृष्टीने पहायचे म्हटले तर जग म्हणजे अणुरेणूंचा एक प्रचंड व्यापार, निरनिराळ्या

आकारांचा ( Forms ) प्रचंड समूह, नाहीतर मायेचा अशाश्वत पसारा यापलीकडे जीवनाला अर्थ उरणार नाही. म्हणूनच आभासांचें, स्वप्नांचें, कल्पनांचें महत्त्व आहे. आभासावर जगणाऱ्या लोकांना कुणी भलेहि मूर्ख म्हणो. पण आयुष्य भोगणारे खरे लोक म्हणजे असे मूर्खच. ' सावळाच रंग तुझा !' या गाण्यावर डोलणारे मूर्ख मला आवडले ते यामुळेच.

कल्पनेने निर्मिलेला परिणाम किती रम्य असतो. जेव्हा एखादा कवि म्हणतो, " मला मोही माझी प्रिया सावळी !" तेव्हां तो आपल्या प्रियेचा रंग लपवीत नसतो, बदलवीत नसतो. आपल्या हृदयांतील सहानुभूतीचा केवळ मोहक आविष्कार तो शब्दांत व्यक्त करीत असतो. या आविष्कारांतच त्याला समाधान मिळतें--वास्तवतेंतील कुठलीहि गोष्ट देऊं शकणार नाही इतकें अमोल समाधान हवें असेल तर विचार कवीला. पण त्याला विचारण्याची काय आवश्यकता? मी सांगतों--अगदी स्वानुभवाने सांगतों ' सावळाच रंग तुझा ' किंवा ' मला मोही माझी प्रिया सावळी !' या कल्पनेंत जेवढा मूर्खपणा आहे, वेडगळपणा आहे त्याहून कितीतरी अधिक सुख आहे, आनंद आहे— एवढें वास्तववादांतील कुठल्या गोष्टींत खचित् खचित नाही.

# चरित्रात्मक टीपा

(१) **विष्णु कृष्ण चिपळूणकर,** बी. ए. (१८५०–१८८२) :--मराठी भाषेंतील युगप्रवर्तक लेखक. सरकारी नोकरीचा त्याग करून लोक-शिक्षणाच्या कार्याचा आरंभ केला. १८७४ सालीं "निबंधमाला" सुरू केली. "बाळगोपाळां" ना ( टिळक–आगरकरांना ) बरोबर घेऊन "न्यू इंग्लिश स्कूल" ची स्थापना केली. "केसरी" व "मराठा" या वर्तमानपत्रांच्या द्वारे लोकांत स्वधर्म, स्वभाषा आणि स्वदेश यांचा अभिमान जागृत केला.

(२) **गोपाळ गणेश आगरकर,** एम. ए. ( १८५६–१८९५ ) :—चिपळूणकर व टिळक यांच्या बरोबरीने आगरकरांचें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत चिरकाल टिकणारें आहे. घरची अत्यंत गरिबी; पण शिक्षणाची व समाजसेवेची फार मोठी आवड, यामुळे वरील दोघा सहकाऱ्यांबरोबर समाजसेवेचें व्रत त्यांनीं पत्करलें. न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेजांत शिक्षक, केसरीचे संपादक अशीं कामें केलीं. १८८२ सालीं कोल्हापूर प्रकरणांत शिक्षा भोगिली. १८८८ सालीं त्यांनी 'सुधारक' पत्र काढलें. त्यांतून त्यांनी आपले समाजसुधारणाविषयक विचार निर्भीड रीतीने व तर्कशुद्ध पद्धतीने समाजापुढे मांडले.

(३) **शिवराम महादेव परांजपे** एम. ए. ( १८६४–१९२९ ) :—शिवरामपंत प्रभावी वक्ते, तेजस्वी लेखक आणि त्यागी देशभक्त असा त्यांचा लौकिक आहे. संस्कृत भाषेंतील त्यांचें प्रावीण्य वाखाणण्याजोगे होतें. १८९८ सालीं त्यांनी आपलें 'काळ' हें वर्तमानपत्र सुरू केलें. "उपहास" आणि "वक्रोक्ति" या साधनांनी त्यांनी लोकांचीं मनें आकर्षित केली होती. १९२९ साली ते बेळगांव येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

(४) **विश्वनाथ काशिनाथ राजवाडे,** बी. ए. (१८६३–१९२६) :—मराठी भाषा, संस्कृति व इतिहास यांचे अत्यंत अभिमानी. इतिहास-संशोधकाचें कार्य त्यांनी आयुष्यभर चालविलें. प्रखर बुद्धिमत्ता, राष्ट्रीय

अनुक्रम १०० ... विभाग ... क्रमांक ... दि. ...

अभिमान, ओजस्वी भाषाशैली हीं त्यांचीं वैशिष्ट्यें होत. मराठ्यांच्या इतिहासाची साधनें अनेक खंडांत त्यांनी एकत्रित करून भावी इतिहास-लेखनाची पूर्वतयारी करून ठेवलेली आहे. इतिहासाप्रमाणेच मराठीच्या भाषाशास्त्रावरील त्यांचें लेखनहि मूलगामी ठरलें आहे.

(५) **वासुदेव बळवंत पटवर्धन**, बी. ए. ( १८७०–१९२१ ):— समाजसुधारक आगरकरांचें शिष्य, रसिक टीकाकार, कवि व निबंध-कार म्हणजे वा. ब. पटवर्धन होत. फर्ग्युसन कॉलेजांतील इंग्रजीचे प्राध्यापक व आगरकरांच्या पश्चात 'सुधारक' पत्राचे संपादक म्हणूनहि त्यांनी लौकिक संपादन केला. 'विरोळयाने काय शिकविलें ?', 'थोडे वेडे व्हा वेडे' इत्यादि त्यांच्या निबंधांत त्यांच्या रसिकतेचा, सुधारकी वृत्तीचा, पुरोगामित्वाचा जसा प्रत्यय येईल तसाच लघुनिबंधाचीं बीजें यांत सामावलीं गेलीं आहेत असाहि अनुभव येईल.

(६) **नरसिंह चिंतामण केळकर**, ( १८७२–१९४७ ) :— निबंध, नाटक, इतिहास, कथा, कादंबरी, चरित्र, विनोद या सर्व प्रकारच्या वाङ्मयक्षेत्रांत तात्यासाहेबांचें नांव चमकलें. लोकमान्यांचे सहकारी शिष्य, केसरीचे संपादक, राजकारणपटु इत्यादि अनेकविध नात्यानी त्यांची ओळख सर्वांस होती. 'मराठे आणि इंग्रज', 'आयर्लंडचा इतिहास' 'गॅरीबाल्डीचें चरित्र' इत्यादि ऐतिहासिक ग्रंथ, 'तोतयाचें बंड' 'कृष्णार्जुन युद्ध' यांसारखी नाटकें, 'टिळकांचें चरित्र' व अनेक विषयांवर त्यांचे निबंध आहेत, स्वाभाविक विनोद आणि सार्थ उपमा या वैशिष्टयांमुळे त्यांचें वाङ्मय चित्ताकर्षक झालें आहे.

(७) **वामन मल्हार जोशी**, एम. ए., ( १८८२–१९४३ ):—गाढे तत्त्वज्ञ, प्रतिभावान् साहित्यिक आणि त्यागी शिक्षणतज्ज्ञ, या नात्याने प्रा. जोशी यांचें नांव महाराष्ट्रांत सर्वश्रुत आहे. रागिणी, आश्रमहरिणी, सुशिलेचा देव, इंदु काळे आणि सरला भोळे इत्यादि कादंबऱ्यांतून त्यांनी अनेक तात्त्विक, सामाजिक आणि नैतिक प्रश्नांचा विचार केला आहे. विविध विषयांवर त्यांनी वेळोवेळीं लिहिलेले लेख अगर दिलेलीं व्याख्यानें तत्त्वविवेचनपर व विचारप्रवर्तक आहेत.

(८) **श्रीपाद महादेव माटे**, एम. ए. ( जन्म १८८६ ) :—मराठीचे प्राध्यापक आणि समाजसेवक या नात्याने फार मोठी कामगिरी केली आहे. उत्कृष्ट वक्ते अशी त्यांची प्रसिद्धि आहे. ' विज्ञानबोध ', ' अस्पृष्टांचा प्रश्न ', ' महाराष्ट्र-सांवत्सरिक ', ' परशुराम-चरित्र ', ' उपेक्षितांचे अंतरंग ', ' आपापलें हितगुज ', ' रसवंतीची जन्मकथा ', ' साहित्यमंजरी ' इ० ग्रंथ लिहून मराठी वाङ्मयाची अमोलिक सेवा केली.

(९) **प्रल्हाद केशव अत्रे**, बी. ए., बी. टी., टी. डी. ( लंडन ) :— (जन्म १८९८) मराठींतील थोर दर्जाचे विनोदी लेखक, नाटककार, कथाकार, कवि, वृत्तपत्रकार आणि प्रभावी वक्ते व शिक्षणतज्ज्ञ म्हणून अत्रे प्रसिद्ध आहेत. झेंडूचीं फुलें हा विडंबन-कवितांचा संग्रह, साष्टांग नमस्कार, भ्रमाचा भोपळा, घराबाहेर, उद्याचा संसार इत्यादि नाटकें, नवयुगचें संपादन या त्यांच्या ठळक लेखनामुळे त्यांचा लौकिक पसरला आहे. याशिवाय क्रमिक पुस्तकांचे संपादक म्हणूनहि ते विद्यार्थ्यांना माहीत आहेत. ' मी कसा झालों ?' हें त्यांनी नुकतेंच आत्मचरित्रपर पुस्तक लिहिलें आहे. हल्लीं शिक्षणाचा व्यवसाय सोडून ते चित्रपट-व्यवसायांत शिरले आहेत.

(१०) **गजानन त्र्यंबक माडखोलकर**, ( जन्म १९०० ) :—मार्मिक टीकाकार, रसाळ कादंबरीकार व यशस्वी पत्रकार. नागपूर येथील ' तरुण भारत ' या दैनिकाचे संपादक आहेत. ' आधुनिक कविपंचक ,' ' विष्णु शास्त्री चिपळूणकर, ' ' विलापिका ' इत्यादि टीकाप्रबंध, ' मुक्तात्मा, ' ' भंगलेलें देउळ, ' प्रमद्वरा ' इत्यादि कादंबऱ्या व अनेक लघुकथा लिहून त्यांनी मराठी वाङ्मयांत मोलाची भर घातली आहे. त्यांची भाषा संस्कृतप्रचुर, अलंकारयुक्त, भावरम्य आहे. त्यांचें अवलोकन सूक्ष्म आणि विवेचनपद्धति तर्कशुद्ध असल्यामुळे त्यांचें लेखन आकर्षक वाटते.

(११) **पांडुरंग सदाशिव साने**, एम. ए. ( १८९९–१९५० ) :— महाराष्ट्रांतील अत्यंत कळकळीचे राजकीय कार्यकर्ते; आदर्श शिक्षक म्हणून ' सानेगुरुजी ' या नांवानेच ते अधिक प्रसिद्ध आहेत. साहित्यिक या नात्यानेहि ते अग्रभागीं असून त्यांची पुस्तकें आबालवृद्ध मोठ्या आवडीने व हौसेने वाचतात. ' श्यामची आई, ' ' भारतीय संस्कृति '

इत्यादि त्यांची पुस्तकें अव्वल दर्जाचीं आहेत. भावनेची उत्कटता हे त्यांच्या वाङ्मयाचें वैशिष्टय असून त्यांची भाषा प्रसादयुक्त व हृद्य वाटते.

(१२) **नारायण सीताराम फडके**, एम. ए. (जन्म १८९४) :—आजचे श्रेष्ठ सामाजिक कादंबरीकार, लघुनिबंधकार व टीकाकार. 'गुजगोष्टी' लिहून एका नवीन वाङ्मय-प्रकाराची त्यांनी सुरुवात केली. 'कुलाब्याची दांडी', 'दौलत', 'जादूगार', इत्यादि कादंबऱ्या, 'टाकीचे घाव', 'लोला व इतर गोष्टी', 'प्रतिभासाधन' इत्यादि पुस्तकें लिहून त्यांनी मराठी भाषेची अमोलिक सेवा केली आहे.

(१३) **विष्णु सखाराम खांडेकर**, (जन्म १८९८) :—कादंबरी, लघुकथा, लघुनिबंध, चित्रपट-कथा इत्यादि वाङ्मय-प्रकारांत आपल्या लेखणीचें सामर्थ्य दाखविणारे आजचे प्रसिद्ध साहित्यिक. कल्पनाविलास, कोटीवैभव, अलंकारप्रचुर भाषा हीं खांडेकरांच्या वाङ्मयाचीं वैशिष्टयें होत. 'चांदण्यांत', 'कल्पलता' हे त्यांचे लघु-निबंधसंग्रह फार लोकप्रिय आहेत.

(१४) **अनंत आत्माराम काणेकर**, बी. ए., एलएल. बी. (१९०८) :— मुंबईच्या सिद्धार्थ कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक आहेत. 'चांदरात' हा त्यांचा कवितांचा संग्रह उत्कृष्ट दर्जाचा आहे. 'निशिकांताची नवरी, 'घरकुल' हीं त्यांची रूपांतरित नाटकें आहेत. पण त्यांच्या लेखनाचीं सर्व वैशिष्टयें त्यांच्या लघुनिबंधांत आढळतात. 'पिकलीं पानें, 'तुटलेले तारे,' 'उघडया खिडक्या,' हे त्यांचे लघुनिबंधसंग्रह प्रसिद्ध आहेत. संकेतांना धक्का देणाऱ्या त्यांच्या खेळकर वृत्तीचा परिचय त्यांच्या लघु-निबंधांतून होत असतो.

(१५) **विश्वनाथ पांडुरंग दांडेकर**, एम. ए., पीएच. डी. (१९०५) :— बडोद्यास मराठीचे प्राध्यापक आहेत. आज यशस्वी लघुनिबंधकार म्हणून त्यांनी नांव मिळविलें असून 'फेरफटका, टेकडीवरून, एक पाऊल पुढे' इत्यादि त्यांचे लघुनिबंधसंग्रह प्रसिद्ध आहेत. मराठी नाटयसृष्टीचा समग्र इतिहास त्यांनी लिहिला असून त्याबद्दल त्यांना डॉक्टरेट ही पदवी मिळाली आहे. खेळकर भाषा व आशावादी दृष्टिकोन हीं त्यांचीं वैशिष्टयें आहेत.

(१६) **नारायण माधव संत**, बी. ए., बी. टी. (१९०५ते१९५०) :— अकाली दिवंगत झालेला मराठींतील सहृदय टीकाकार, कवि व लघु-

निबंधकार. बेळगांवच्या ट्रेनिंग कॉलेजांत ते काम करीत होते. ' सहकार ' हा त्यांचा काव्यसंग्रह व ' उघडे लिफाफे ' हा त्यांचा लघु-निबंधसंग्रह प्रसिद्ध आहे. ग्रंथरचना अल्प असली तरीं ती बहुगुणी आहे. प्रसन्न भाषाशैली, जीवनविषयक निर्मळ दृष्टिकोन, खेळकर मित्राची घेतलेली भूमिका हीं त्यांचीं वैशिष्टचें लघुनिबंधांतून वारंवार आढळतात.

(१७) **महादेव नामदेव अदवंत**, एम. ए., बी. टी. ( १९१४ ):– जळगांव येथील मूळजी जेठा कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक म्हणून गेलीं आठ वर्षें काम करीत आहेत. काव्याचे समीक्षक व लघुकथाकार म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. त्याशिवाय ते एक नवोदित लघुनिबंधकार आहेत. ' मनाचे संकल्प ' आणि ' मनाची मुशाफरी ' हे त्यांचे दोन लघुनिबंधसंग्रह प्रसिद्ध आहेत.

(१८) **के. ज. पुरोहित**, एम. ए., ( १९२३ ) :–उमरावतीच्या कॉलेजांत इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम करीत असून शांताराम या टोपण नांवाने ते लघुकथा व लघुनिबंध लिहीत असतात. त्यांचे ' सांवळाच रंग तुझा, संत्र्याचा बाग व मनमोर ' या नांवाचे लघुनिबंधसंग्रह प्रकाशित झालेले आहेत.

REFBK-0008536